
गोफ
BMM2026
जपूया संस्कृती विणूया नाती

Persistent
Re(AI)magining™ the World
We deliver services through AI-driven platforms for enhanced efficiency, productivity and quality
$1,654.4M
FY26 revenue
27,500+
Employees
21
Countries
Know more on how we can help your business, visit persistent.com

गोफ जपूया संस्कृती, विणूया नाती...

स्मरणिका समिती
स्नेहल पिटके-कुलकर्णी- संपादिका
अश्विनी देवधर - उपसंपादिका
अश्विनी क्षीरसागर - सल्लागार

विशेष सहाय्य
राहुल तारांबळे
कादंबिनी धारप
शिल्पा कर्वे
मनीषा अरोस्कर

कथा स्पर्धा परीक्षक
विद्युल्लेखा अकलूजकर

जाहिरात विभाग
निलेश जोशी

मृखपृष्ठ संकल्पना आणि सहाय्य
तेजल सावदेकर

मुद्रण व टाईपसेटिंग
गायत्री सातपुते
श्री साई एंटरप्राईजेस
बिबवेवाडी, पुणे - ४११०३७
ईमेल - print.saient@gmail.com
Mobile- 7875743905

प्रकाशन
BMM convention committee 2026

ह्या स्मरणिकेत प्रसिद्ध झालेल्या साहित्यातील विचार आणि मते सर्वस्वी लेखक- लेखिकांची आहेत. त्या विचारांशी स्मरणिका समिती आणि संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।धृ।।

भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा,
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जीभा,
सह्याद्रीचा सिंह गर्जतो, शिवशंभू राजा,
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा,
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ।।१।।

काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी,
पोलादी मनगटे खेळती खेळ जीवघेणी,
दारिद्र्याच्या उन्हात शिजला,
निढळाच्या घामाने भिजला,
देशगौरवासाठी झिजला
दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ।।२।।

BMM Convention 2026, Seattle
बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२६, सिॲटल

गोफ

अंतरंग

जपूया संस्कृती, विणूया नाती...

महाराष्ट्र गीत – / ०२
अध्यक्षीय मनोगत– प्रसाद पानवळकर.... / ०५
संयोजकाचे दोन शब्द – मोहित चिटणीस.... / ०७
संपादकीय– स्नेहल पिटके-कुलकर्णी.... / ०९
देणगीदार यादी (Donors List) ...../ ११
बीएमएम समिती छायाचित्रे.... / १३

लेख/कथा

मी पाहिलेली खरी स्वयंसिध्दा– अपर्णा बोडस.... २३
समाजसेवेचा दीपस्तंभ– राहुल तारांबळे...२६
कृष्ण–अभय जोशी... २८
विराम का व केंव्हा? एक वेगळे विचारमंथन–अजित नातू... ३१
सोबती–संजय बुरडकर...३३
वंशावळ –अरुण निसरगंड.....३६
असे होते स्वातंत्र्यवीर –अरूण रोडे....३९
बहिणाबाईची गाणी –अश्विनी देवधर....४२
हवाई हवा... ''हवाई'' –सौ. चित्रा मेहेंदळे....४५
जागरूक पालकत्व –रजनी पेंडसे.... ४७
जगणे व्हावे गाणे –डॉ. रजनी अपसिंगेकर...४९
नारी तू नारायणी –डॉ. मेधा फणसळकर....५२
संख्यांचे सौंदर्य व लपलेल्या गोष्टी –सदाशिव गोडबोले...५४
अंतिम सत्याचा भ्रम –शास्त्रीय आणि सनातन दृष्टिकोन –नील कुलकर्णी...५५
आपण सारे अश्वत्थामा –प्रशांत कुलकर्णी...५८
श्रीकांत सबनीस–मुनींचा हवाई ऊर्फ ऑनलाईन आश्रम –डॉ. रमेश वाघमारे...५९
देवांनो, AI –१७१ च्या वेळी तुम्ही कुठे होता? –सदाशिव गोडबोले....६२
स्त्री शिक्षण : सुशिक्षित राष्ट्राचा पाया..!! –कु. साक्षी कुलकर्णी....६४
अमेरिकेचे गारूड –सौ. संगीता फाटक....६७
अनंत आमुची ध्येयासक्ती –सौरभ शेखदार...७१
अद्‌भुत अनातोलिया –वैभव साठे...७३
परदेशात भारतीय रेट्रो –वासंती मुदकण्णा....७८
कलासंक्रमण –सोनाली खर्चे....८१
अभिजात मराठी भाषेचा गाळीव इतिहास –जय मसुरेकर....८३
अवघड पण मनातील रंजक कथा –प्रभाकर जोशी....८४
माझे बिघडलेले पदार्थ –अविनाश कोल्हटकर....८५
एक गुढीपाडव्याचा दिवस –आयुष करंदीकर....८८
सिनेमा –आयुष करंदीकर....८८
माझी मोठी ट्रिप–पूर्व किनारा –अनिका कोषे...८९
कूटप्रश्न –अमृता काळे...९६
पंखांच्या सावलीत–कादंबिनी धारप...९९
सतरंज्या ते जाजम –प्रशांत कुलकर्णी...१०४
मंदार –रजनी अपसिंगेकर....१०९
एक सोनेरी संध्याकाळ –अभय जोशी...११२
भय इथले संपत नाही –अभिजीत जोशी...११५
रात्रपाळी –अरुण निसरगंड...११८
घर –मंजिरी खारकर...१२३
चमत्कार –नीला सहस्त्रबुध्दे....१२८
ती अदृश्य होताना –पल्लवी शिंदे माने.....१३०
गावची शाळा आणि आमचं बालपण –प्रसाद केसकर...१३४
चार शेपट्यांची गोष्ट –सौ. रसिका नेर....१३५
पाठवण –संजय राऊत...१३८
व्यक्ती आणि वल्ली बंड्या बोपर्डीकर –श्रीवास अष्टपुत्रे ..१४०
आरंभ –स्मिता जाधव...१४३
क्षमा –वासंती मुदकण्णा....१४६
मिठाने उडवलेली ब्रिटिश साम्राज्याची दांडी – जय मसुरेकर...१४९
वारी अंतरंगाची –सुप्रसाद बारपांडे...१५१
आजोबा–एक अजूबा – संध्या सामंत...१५५
हिंदु संस्कृति पाठशाळा, एक प्रयोग –सदाशिव गोडबोले...१६१

कविता

हे गणराया – ज्योति राम...३२
विठ्ठल –ज्योति राम... ३८
सुट्टीचा पहिला दिवस –मधुरा हलसगीकर....४१
वंदन तुज हे माय मराठी –गौरी विद्वांस ४४
घाव –अरूण रोडे....४८
उठ कैलासराणा –नितीन बंगाळे....६१
दिन प्रेमाने सजले गं –जय मसुरेकर....६३
मी माझा ना उरलो –संजय राऊत....६६
विसर –नितीन बंगाळे....७७
परिणीता– नितीन बंगाळे....७७
दिवा– ...८०
वारी –संजय राऊत...९४
वृक्षाचे मूळ उंच वाढलेल्या झाडाला म्हणते –अजित नातू....९८
श्रावण स्मृति –अश्विनी क्षीरसागर...१०३
माहेर –अभय जोशी...११४
राजदूत–प्रा. अरुण पाटील..११७
प्रीतीगाथा–अश्विनी क्षीरसागर...१२२
संगीत–मनिषा भिडे ...१३७
झोका–अश्विनी क्षीरसागर...१३७
काजव्यांच्या त्या त्यागाने ...१३९
मुंगीबाई –अश्विनी क्षीरसागर...१४५
खारूताई–अश्विनी क्षीरसागर...१४८
अधिवेशनानंतर –अनिता कांत ..१५०
सीता सामर्थ्य –दीप्ती चाफेकर....१५९
कविता –ज्योति राम...१६०
जपूया संस्कृती विणूया नाती –संजय राऊत...१६२

व्यंगचित्र

नितीन बंगाळे... ९३

चित्रस्पर्धा.... ८७

पाककला

पारंपारिक गव्हाची खीर –अर्चना पर्वतकर....९१
सोलापूर स्पेशल बाजारी आमटी –अर्चना पर्वतकर...९२
थोडी वेगळी आख्ख्या मसुराची आमटी –रेखा पै....९३
तिखट आंबट गोड अननसारी आमची –सुजाता परळकर...९४
पोह्याचे लाडू –शारदा गजभे...९५

अध्यक्षीय मनोगत...

नमस्कार मंडळी

आज बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २२व्या अधिवेशनाच्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधताना मला अत्यंत आनंद होत आहे. जून २०२४ मध्ये, बे एरिया अधिवेशनाच्या समारोपाच्या दिवशी पुढील अधिवेशन सिॲटल येथे होणार असल्याची घोषणा झाली आणि त्या क्षणी सिॲटलच्या मंडळींनी मंचावर उत्स्फूर्त जल्लोष करत आनंद व्यक्त केला. त्या दिवसापासून आजपर्यंत सुरू आहे ती असंख्य स्वयंसेवकांची अखंड धडपड. नोकरी-धंदा, कुटुंब, मुले-बाळे सांभाळत तुम्हा सर्वांना सर्वोत्तम कार्यक्रम देण्यासाठी केलेले अथक प्रयत्न.

सर्वप्रथम, आमच्यावर विश्वास ठेवून उत्तर अमेरिकेच्या तसेच जगाच्या विविध कानाकोपऱ्यांतून येथे उपस्थित राहिल्याबद्दल मी आपणा सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो. सर्वांच्या आवडी लक्षात घेऊन आम्ही या अधिवेशनात विविधरंगी कार्यक्रमांची मेजवानी सादर केली आहे - हलकीफुलकी नाटके, दर्जेदार संगीत कार्यक्रम, तत्त्वज्ञान, अध्यात्म, सांस्कृतिक, आणि सामाजिक विषयांवरील उपक्रम यांचा समृद्ध संगम आपल्याला येथे अनुभवायला मिळेल.

अधिवेशन म्हटले की कार्यक्रमांइतकेच आकर्षण असते ते भोजनाचे. तुमच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या विविध भागांतील चविष्ट खाद्यपदार्थ आम्ही खास तुमच्यासाठी आणले आहेत. कार्यक्रमांप्रमाणेच भोजनाचाही तुम्हाला मनमुराद आनंद मिळेल, अशी आम्हाला खात्री आहे.

अधिवेशनाचे आणखी एक खास आकर्षण म्हणजे जुन्या मित्र-मैत्रिणींच्या भेटीगाठी आणि नव्या ओळखी. यासाठी तुमची धावपळ होऊ नये म्हणून आम्ही कार्यक्रमांचे वेळापत्रक काळजीपूर्वक आखले आहे. जुनी नाती अधिक दृढ व्हावीत आणि नवी मैत्री फुलावी, हीच आमची मनापासून इच्छा आहे.

या लेखाचा समारोप करताना बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणी समितीतील सर्व सदस्यांचे, तसेच विश्वस्त मंडळाचे मी मनःपूर्वक आभार मानतो. तसेच अधिवेशनाचे संयोजक, श्री. मोहित चिटणीस यांच्या नेतृत्वाखाली काम करणाऱ्या संपूर्ण कार्यकारिणी समितीचे, सर्व उपसमित्यांच्या पदाधिकाऱ्यांचे आणि असंख्य स्वयंसेवकांचे विशेष आभार. गेल्या दोन वर्षांत या सर्वांनी मला अमूल्य सहकार्य आणि मार्गदर्शन केले.

अधिवेशनाचे आयोजन म्हणजे जणू शिवधनुष्य उचलण्यासारखे कार्य आणि हे कार्य केवळ आणि केवळ बृहन्महाराष्ट्र मंडळ व सिॲटल महाराष्ट्र मंडळाच्या संघटनशक्तीमुळे आणि असंख्य स्वयंसेवकांच्या निष्ठावान प्रयत्नांमुळेच यशस्वी झाले आहे, यात मला कोणतीही शंका नाही.

सर्वांत शेवटी, माझ्या कुटुंबीयांचा- माझी पत्नी, सौ. निवी आणि मुले, नील व प्रिया, यांच्या भक्कम पाठिंब्यामुळेच ही मोठी जबाबदारी पार पाडणे मला शक्य झाले. परमेश्वराची कृपा, ज्येष्ठ मंडळींचे आशीर्वाद, तसेच मित्रमंडळी आणि नातेवाईकांच्या शुभेच्छांमुळेच माझा बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अध्यक्षपदाचा हा दोन वर्षांचा प्रवास इतका संस्मरणीय ठरला. या सर्वांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

परत एकदा, तुमच्या सहकार्याबद्दल आणि उपस्थितीबद्दल मनापासून धन्यवाद.

जय हिंद! जय महाराष्ट्र!

आपला,

प्रसाद पानवळकर

अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

संयोजकाचे दोन शब्द ...



नमस्कार बंधूभगिनींनो,

बी एम एम २०२६ च्या अधिवेशनात आपले सर्वांचे सिॲटल, वॉशिंग्टन येथे मनःपूर्वक स्वागत!

आपण आपल्या व्यस्त दिनक्रमातून वेळ काढून या अधिवेशनाला उपस्थित राहिलात याबद्दल मी आमच्या मुख्य समिती आणि मार्गदर्शक समितीच्या वतीने आपले मनःपूर्वक आभार मानतो. तुमच्या उपस्थितीमुळे या अधिवेशनाला खऱ्या अर्थाने शोभा आली आहे.

जून २०२४ मध्ये San Jose येथे झालेल्या अधिवेशनात बी एम एम च्या अधिवेशन निवड समिती, कार्यकारिणी आणि विश्वस्त मंडळाने आम्हाला २०२६ च्या अधिवेशनाचे यजमानपद दिले. त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. २००७ नंतर जवळपास एकोणीस वर्षांनी पुन्हा एकदा सिॲटल महाराष्ट्र मंडळाला ही संधी मिळाली आहे, ही आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

माझ्यावर संयोजक (Convener) म्हणून जबाबदारी सोपवली गेली, याचा मला मनापासून आनंद आणि अभिमान आहे. मात्र हे काम कोणत्याही एका व्यक्तीचे नाही तर आमच्या मुख्य समितीतील सदस्य, मार्गदर्शक समितीतील अध्यक्ष आणि सह-अध्यक्ष, तसेच सर्व स्वयंसेवक यांच्या सहकार्यामुळेच हे शक्य होत आहे. जवळपास ७० जणांची आमची टीम गेली दोन वर्षे विविध उपक्रमांवर एकत्रितपणे काम करत आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळ ऑफ नॉर्थ अमेरिका ही महाराष्ट्राबाहेरील सर्वात मोठी मराठी संस्था आहे. २०१३ ते २०२४ या काळात बृहन महाराष्ट्र मंडळाचा स्वयंसेवक म्हणून काम करताना मला खूप शिकायला मिळाले. मोठ्या उपक्रमांचे नियोजन, संघटन आणि लोकांबरोबर काम करण्याचा अमूल्य अनुभव मिळाला. BMM Convention Committee (BCC) वर काम करण्याची संधी मला मिळाली, तिथेही खूप शिकायला मिळाले. ह्या सर्व अनुभवाच्या बळावर मी संयोजकपदाची जबाबदारी स्वीकारण्याचे धाडस करू शकलो.

या प्रवासात बी एम एमचे विद्यमान अध्यक्ष श्री प्रसाद पानवळकर यांचे विशेष सहकार्य मला सतत लाभले. त्यांच्याबरोबर काम करताना नेहमीच एक जिव्हाळा, विश्वास आणि सकारात्मक ऊर्जा अनुभवायला मिळाली. त्यांच्या सहकार्यामुळे आणि कन्व्हेन्शन समितीतील सर्व सहकाऱ्यांच्या पाठिंब्यामुळे हे काम अधिक सुरळीतपणे पुढे नेता आले. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

आमचे ब्रीदवाक्य आहे

''जपूया संस्कृती, विणूया नाती !''

या अधिवेशनामागचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे उत्तर अमेरिकेतील मराठी बांधवांना एकत्र आणणे, मराठी संस्कृती, कला, परंपरा आणि भाषा पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे. संगीत, नाट्य, साहित्य, खाद्यसंस्कृती, व्यावसायिक परिषद, युवक उपक्रम, मराठी शाळा, नृत्य आणि विविध सांस्कृतिक

कार्यक्रमांद्वारे मराठीपण जिवंत ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अधिवेशनाचे काम सुरू झाल्यावर स्वयंसेवकांनी अतिशय उत्साहाने कामाला सुरुवात केली. सुरुवातीचे काही महिने कसे गेले हे समजलेही नाही. मात्र काही काळानंतर अनेक अडचणी आणि आव्हाने समोर आली. काही क्षण असेही आले की अधिवेशन यशस्वीपणे उभे राहील का, असा प्रश्न पडला. पण प्रत्येक वेळी स्वयंसेवकांनी एकजुटीने उभे राहून त्या अडचणींवर मात केली आणि पुन्हा नव्या जोमाने काम सुरू केले.

आज आम्ही तुमच्यासाठी तीन दिवसांचा संस्मरणीय अनुभव घेऊन सज्ज आहोत. भारतातून आणि उत्तर अमेरिकेतून अनेक मान्यवर कलाकार, वक्ते आणि विविध क्षेत्रातील व्यक्ती सहभागी होत आहेत. मनोरंजन, शैक्षणिक, तत्त्वज्ञान, धार्मिक, व्यावसायिक आणि सांस्कृतिक अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमांची मेजवानी आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत.

यावर्षी विशेष म्हणजे आम्ही Real Estate Conference सारखा उपक्रमही आयोजित करत आहोत. त्यासाठी अनेक स्वयंसेवक आणि सहकारी खूप मेहनत घेत आहेत. या प्रवासात आम्हाला अनेक देणगीदार, प्रायोजक आणि हितचिंतकांचे सहकार्य लाभले. त्यांच्या पाठिंब्यामुळे हे अधिवेशन अधिक सक्षमपणे उभे राहू शकले. त्याबद्दल मी सर्वांचा मनःपूर्वक आभारी आहे.

अधिवेशनाच्या निमित्ताने मला अनेक नवीन व्यक्तींना भेटण्याची संधी मिळाली. अनेक नवीन मैत्री निर्माण झाल्या. प्रत्येक भेटीतून काहीतरी नवीन शिकायला मिळाले. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस आणि सौ. अमृता फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून अधिवेशनाचे निमंत्रण देण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे.

माझ्या नेतृत्वावर विश्वास ठेवून माझ्या पाठीशी उभे राहिलेल्या सिॲटल महाराष्ट्र मंडळ, विश्वस्त मंडळ, मुख्य समिती, मार्गदर्शक समिती आणि बी एम एम च्या सर्व सदस्यांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

विशेषतः माझी पत्नी रुना हिचा मी विशेष उल्लेख करेन. गेली दोन वर्षे ती सतत माझ्या पाठीशी उभी राहिली. तिच्या सहकार्यामुळेच मी ही जबाबदारी समर्थपणे पार पाडू शकलो.

हे अधिवेशन आपणा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरावे ही आमची मनापासून इच्छा आहे. तरीही आमच्या हातून नकळत काही चुका झाल्या असतील, काही कमतरता राहिल्या असतील, तर त्याबद्दल कृपया आम्हाला माफ करा. आम्ही आमच्याकडून सर्वोत्तम अधिवेशन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे.

तुम्ही हे तीन दिवस मनापासून आनंदाने साजरे करा, नवीन मित्र जोडा, जुन्या आठवणी जाग्या करा आणि मराठी संस्कृतीचा अभिमान अनुभवत राहा. आणि शेवटी ..

गणपती बाप्पा मोरया!

जय महाराष्ट्र!!

जय भारत!!

जय अमेरिका!!

मोहित चिटणीस
संयोजक २०२६

संपादकीय...

ओंजळ भरली प्राजक्ताने, सुवास त्याचा दरवळतो
मोती जणू हे संस्कारांचे, प्रकाश त्यांचा परिमळतो
गुंफून मोती संस्कारांचे, गोफ बांधूया नात्यांचा
चला घेऊनी व्रत हे हाती, उत्सव घडवू संस्कृतीचा!!

नमस्कार मंडळी,

बीएमएम २०२६ ची स्मरणिका ''गोफ'' तमाम वाचकांना समर्पित करताना मला अत्यंत आनंद होत आहे.

''गोफ'' म्हटले की डोळ्यांसमोर येतात ते अनेकविध रंगांचे नाजुक धागे आणि त्या धाग्यांना प्रेमाने, संयमाने आणि कौशल्याने गुंफून तयार केलेली एक सुंदर वीण. ही वीण त्या धाग्यांना एकत्र बांधून ठेवते, त्यांना एकसंध ठेवते आणि त्यांचे सौंदर्य अनेकपटींनी खुलवते.

माणसांचेही तसेच असते. आपल्या भावना, संवेदना आणि अनुभव हे अशाच नाजुक धाग्यांसारखे असतात. माणसामाणसांमधील हे धागे कधी नात्यांचे असतात, कधी आठवणींचे; कधी संस्कारांचे तर कधी अनुभवांचे; कधी अभिव्यक्तीचे तर कधी जिव्हाळ्याचे. हे सारे धागे जेव्हा प्रेमाने एकमेकांत गुंफले जातात, तेव्हा तयार होतो एक सुंदर गोफ माणुसकीचा, आपलेपणाचा आणि त्यातून बहरत जाणाऱ्या संस्कृतीचा.

मायभूमीपासून हजारो मैल दूर, जगाच्या कानाकोपऱ्यात मराठी माणूस जाऊन स्थायिक झाला आहे. पण तो केवळ स्थायिक झाला नाही; तो आपल्याबरोबर मराठीपणाचे धागेही घेऊन गेला. भाषा, कला, साहित्य, परंपरा, सण-उत्सव आणि संस्कार यांची शिदोरी त्याने जपली. आज अनेक पिढ्या परदेशात वाढत असल्या तरी या संस्कृतीची वीण अजूनही तितक्याच प्रेमाने विणली जात आहे, हे पाहून अभिमान वाटतो आणि समाधानही.

मात्र संस्कृती एकट्याने जपली जात नाही. ती जपली जाते माणसांत, वाढते संवादांत, फुलते भेटींमध्ये आणि टिकते नात्यांमध्ये. म्हणूनच संस्कृतीच्या संवर्धनाबरोबर नात्यांचे संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे. नाती ही संस्कृतीरूपी गोफाला सदैव सतेज ठेवणारी भावनिक वीण आहे.

म्हणूनच यंदाच्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनाचे ब्रीदवाक्य मनाला विशेष भावते - **''जपूया संस्कृती, विणूया नाती....''** हे केवळ घोषवाक्य नाही; तर आपल्या अस्तित्वाचे, आपल्या प्रवासाचे आणि आपल्या सामूहिक जबाबदारीचे सार आहे.

मराठी संस्कृतीचे आणि नात्यांचे हेच वैभव तुम्हाला पुन्हा एकदा या स्मरणिकेच्या माध्यमातून अनुभवता येणार आहे. यातील प्रत्येक लेख, कविता, कथा, अनुभव, पाककृती, चित्र आणि आठवण हा एका धाग्यासारखा आहे. एखाद्या लेखकाच्या मनातील भावना, एखाद्या कुटुंबाची परंपरा, एखाद्या कलाकाराची

कल्पना किंवा एखाद्या वाचकाची जपलेली आठवण. हे सर्व धागे एकमेकांत गुंफत जातात आणि मराठी मनाचा एक अद्वितीय गोफ आपल्यासमोर उभा राहतो.

संस्कृती जपणे म्हणजे केवळ भूतकाळ जतन करणे नव्हे; तर भविष्यासाठी पेरणी करणे होय. पुढील पिढीला केवळ परंपरांचा वारसा देणे पुरेसे नाही, तर परंपरांच्या मागील ज्ञान विज्ञानाची ओळख करून देणंही महत्वाचं आहे. पण त्यासोबतचं त्यांच्या विचारांना मोकळेपणाने समजून घेणं, स्वीकारणंही तितकंच महत्वाचे आहे. म्हणूनच या स्मरणिकेत आम्ही नव्या पिढीच्या विचारांना, त्यांच्या लेखनाला, कवितांना आणि चित्रांना विशेष स्थान दिले आहे. कारण उद्याचा हा गोफ त्यांच्याच हातांनी अधिक समृद्ध होणार आहे.

या निमित्ताने मी मनःपूर्वक आभार मानू इच्छिते त्या सर्व लेखक, कवी, कलाकार आणि रसिकांचे, ज्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन या स्मरणिकेला समृद्ध केले. तसेच बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे, संचालकांचे, देणगीदारांचे आणि या स्मरणिकेच्या निर्मितीसाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या माझ्या सहकारी संपादक मंडळाचे आणि स्वयंसेवकांचीही मी मनापासून ऋणी आहे. मला विशेष आभार मानायचे आहेत साई एंटरप्राईजेस यांचे ज्यांच्या सहयोगाने हि स्मरणिका आपल्यासमोर येत आहे.

शेवटी एवढेच...

प्राजक्ताच्या फुलांसारखे संस्कारांचे हे मोती, नात्यांच्या धाग्यांनी गुंफत राहूया. संस्कृतीची ही वीण अधिकाधिक दृढ करत राहूया. आणि जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलो तरी मराठीपणाचा हा सुंदर गोफ पुढील पिढ्यांसाठी जतन करत राहूया.

आपल्या सर्वांच्या सहप्रवासातून विणलेल्या या ''गोफ''चा आनंद घ्या.

धन्यवाद!

स्नेहल पिटके - कुलकर्णी

संपादक,

स्मरणिका - गोफ

बीएमएम २०२६

DONORS LIST

आपल्या सर्वांचे मनापासून आभार

No.	Name	City
	Bronze	
1	Sanjay Bhide	Chandler
2	Sona Bhide	Chandler
3	Urmila Deshpande	Mesa
4	Anuradha Deo	Long Beach
5	Ravindra Deo	Long Beach
6	Ravindra Deo	Long Beach
7	Ashwini Mishal	Long Beach
8	Prakash Pawar	Mission Viejo
9	Caythar Nene	North Hollywood
10	Meena Deo	Oakland
11	Rajeshwari Deshmukh	Palos Verdes Estates
12	Pramod Argade	San Diego
13	Sulabha Argade	San Diego
14	Medha Moharir	san diego
15	Vishnu Moharir	san diego
16	Kedar Bhide	Commerce City
17	Manisha Bhide	Commerce City
18	Jyoti Parkhi	Fort Myers
19	Parna Shenoy	Fort Myers
20	Pallavi Sathe	Suwanee
21	Vaibhav Sathe	Suwanee
22	Sangeeta Mehendale	Chicago
23	Radhika Chemburkar	Gurnee
24	Ashwin Dixit	Prospect
25	Monika Dixit	Prospect
26	Deepa Ingle	Canton
27	Kiran Ingle	Canton
28	Anjali Sharma	Columbia Heights
29	Santosh Salvi	Nashua
30	Shweta Salvi	Nashua
31	Anil Nerurkar	Kendall Park
32	Sulochana Gawande	Livingston
33	Ghulam Kalimi	Livingston
34	Mohan Ranade	Moorestown
35	Dr. Ram Pardeshi	Glen Oaks
36	Pramila Sarva	Little Neck
37	Ramesh Sarva	Little Neck
38	Ashwini Velankar	New Hyde Park
39	Prakash Velankar	New Hyde Park
40	Suchitra Velankar	New Hyde Park
41	Shreeyash Palshikar	Pelham
42	Shirish Devasthali	Fayetteville
43	Deepak Khopkar	Greensboro
44	Asha Khopkar	Greensboro
45	Relkha Parulkar	Powell
46	Sunil Parulkar	Powell
47	Milind Ratnaparkhi	Springboro
48	Radha Ratnaparkhi	Springboro
49	Swati Kulkarni	Windsor
50	Vivek Kulkarni	Windsor
51	Sharad Datar	Portland
52	Bharati Ingle	Portland
53	Jayant Ingle	Portland
54	Medha Joshi	Portland
55	Shilpa Karnik	Portland
56	Tanay Karnik	Portland
57	Hemant Lingnurkar	Portland
58	Swati Lingnurkar	Portland
59	Satish Palshikar	Portland
60	Swamini (Arlene) Palshikar	Portland
61	Alaka Sarangdhar	Portland
62	Nitin Sarangdhar	Portland
63	Sadhana Shenoy	Portland
64	Sunil Shenoy	Portland
65	Shruti Nigudkar	Pune
66	Sanjay Upadhye	Pune
67	Sharad Satpute	Richmond
68	Sheela Satpute	Richmond
69	Lakshmi Deshmukh	Fairfax
70	Narayan Deshmukh	Fairfax
71	Santosh More	Bothell
72	Savita More	Bothell
73	Gayatree Sapre	Bothell
74	Rajendra Sapre	Bothell
75	Kanchan Bodas	Fedaral Way
76	Deva Bodas	Federal Way
77	Aparna Nadkarni	Kirkland
78	Arun Nadkarni	Kirkland
79	Sanjay Phadnis	Monroe
80	Sunita Phadnis	Monroe
81	Jayant Bhopatkar	Redmond
82	Amit Deodhar	Redmond
83	Ashwini Deodhar	Redmond
84	Rahul Tarambale	Redmond
85	Arti Tayade	Redmond
86	Shriniwas Jambhekar	Sammamish
87	Dhananjay Mahajan	Sammamish
88	Shilpa Karve	Sammamish
89	Suneela Bhoplay	Seattle
90	Vinay Bhoplay	Seattle
91	Sandhya Karnik	Seattle
92	Bharati Mulgavkar	Seattle
93	Niranjan Paranjpye	Seattle
94	Rohinee Paranjpye	Seattle
95	Hema Ingle	Woodinville
	Bronze Lite	
96	Ghannasham Bhide	Burnaby
97	Vaishali Bhide	Burnaby
98	Pallavi Kulkarni	Torrance
99	Prakash Kulkarni	Torrance
100	Madhav Kamat	North Brunswick
101	Rohini Kamat	North Brunswick
102	Dattatraya (Deepak) Lad	Bixby
103	Jyoti Lad	Bixby
104	Milind Jatkar	PUNE
105	Ajita Jatkar	Seattle
	Bronze Shared	
106	Varsha Kandlikar	Chicago
107	Pratibha Deshpande	Lufkin
108	Gita Kode	Kenmore
109	Kalpana Patankar	Seattle
	Bronze Single	
110	Meena Date	Stevenson Ranch
111	Seema Hasolkar	Yorba Linda
112	Sujata Kulkarni	parkland
113	Anjali Anturkar Canton	
114	Mangala Khadilkar	Kendall park
115	Prabha Kulkarni	Camp Hill
116	Sugandha Kamalapuri	Shoreview
117	Amol Deshpande	Lufkin
118	Sunila Narvekar	Auburn
119	Anita Bhat	Seattle
	Gold	
120	Girish Gaitonde	Saratoga
121	Vibhavari Gaitonde	Saratoga
122	Anisha Durve	miami
123	Ramesh Lokre	Overlandpark
124	Swati Yelmar	Overlandpark
125	Seema Gogate	North Brunswick
126	Uday Gogate	North Brunswick
127	Namita Durve	Cleveland
128	Manoh Shirodkar	Pune
129	Surekha Shirodkar	Pune
130	Sampada Bhalerao	Sammamish
131	Vinayak Bhalerao	Sammamish
	Gold Single	
132	Yashoda Apte	Saratoga
	Platinum	
133	Smita Parikh	Plainview
134	Sudarshan Sathe	Chagrin Falls
135	Swati Sathe	Chagrin Falls
136	Mrunal Datar	Streetsboro
137	Ravindra Datar	Streetsboro
138	Padmaraj “Raj”	Angolkar Bellevue
139	Swati Angolkar	Bellevue
140	Vidya Angolkar	Newcastle
141	Dr Shaila Kode	Renton
142	Ashok Shendure	Seattle
143	Rajanee Shendure	Seattle
144	Madhuri Trivedi	Brookfield
	Platinum Couple/Duo	
145	Sudha Narkar	Anaheim
146	Sunil Narkar	Anaheim
147	Suresh Kamath	Concord
148	Vijaya Kamath	Concord
149	Meera Upasani	Irvine
150	Mohan Upasani	Irvine
151	Anupama Samant	La verne
152	Dinesh Samant	La Verne
153	Anil Mankar	Mission Viejo
154	Avinash Sadhu	Mission Viejo
155	Pratibha Sadhu	Mission VIejo
156	Meeena Mankar	Mission VIejo
157	Madan Joshi	Oceanside
158	Shama Joshi	Oceanside
159	Pradnya Kuwadekar	Porter Ranch
160	Sanjeev Kuwadekar	Porter Ranch
161	Mukund Moharir	San Diego
162	Vasanti Moharir	San Diego
163	Ravindra Upasani	San Jose
164	Ssndya Upasani	San Jose
165	Prakash Deshpande	San Marcos
166	Sushama Deshpande	San Marcos
167	Dileep Divekar	Santa Clara
168	Shubhada Divekar	Santa Clara
169	Usha Parashar	Seal Beach
170	Illa Singh	Seal Beach
171	Dr. Eknath Naik	Lakeworth
172	Manjusha	NaikLakeworth
173	Alka Pradhan	Tampa
174	Mohan Pradhan	Tampa
175	Jyoti Mahurkar-Thombre	Atlanta

No.	Name	City
176	Hemant Thombre	Atlanta
177	Sujata Gaitonde	Chicago
178	Sunil Gaitonde	Chicago
179	Rajiv Gokhale	Darien
180	Ranjana Gokhale	Darien
181	Ravi Gaonkar	Naperville
182	Mansee Joshi	Schaumburg
183	Niteen Joshi	Schaumburg
184	Shrikant Anant	Overland Park
185	Swati Anant	Overland Park
186	Shilpa Desai	Bloomfield Hills
187	Uday Desai	Bloomfield Hills
188	Hemant Marathe	Princeton Jct
189	Punit Marathe	Princeton Jct
190	Purushottam Kale	Somerset
191	Shaila Karandikar	Somerset
192	Jayshree Durve	Cleveland
193	Mohan Durve	Cleveland
194	Meena Dixit	Gates Mills
195	Sandeep Dixit	Gates Mills
196	Ashok Deshpande	North Olmsted
197	Sandhya Deshpande	North Olmsted
198	Anju Lele	Pepper pike
199	Shreeniwas Lele	Pepperpike
200	Sharad Wankhade	Solon
201	Sushama Wankhade	Solon
202	Nitin Samant	Twinsburg
203	Smita Samant	Twinsburg
204	Leena Deodhare	Mississauga
205	Sanjeev Deodhare	Mississauga
206	Rahul Karnik	Mumbai
207	A Deshpande	Thane
208	Milind Ajinkya	Oakton
209	Raj Ajinkya	Oakton
210	Mrudula Karmarkar	Bellevue
211	Nitin Karmarkar	Bellevue
212	Geeta Keni	Bellevue
213	Mahesh Keni	Bellevue
214	Seema Jejurikar	Hunts Point
215	Sanjay Jejurikar	Hunts Point
216	Vedang Gaonkar	Seattle
217	Shishir Pardikar	Yarrow Point
218	Sucheta Pardikar	Yarrow Point
	Platinum Single	
219	Avinash Vaidya	Riverwoods
220	Medha Godbole	Solon
	Platinum SingleW/0 Hotel	
221	Atul Mahableshwarkar	Chicago
	Silver	
222	Vidyullekha Aklujkar	Richmond
223	Vilas Bankar	Bakersfield
224	Ambika Thampi	Bakersfield
225	Anjali Sagdeo	Cupertino
226	Vivek Sagdeo	Cupertino
227	Arun Virginkar	Huntington Beach
228	Swati Virginkar	Huntington Beach
229	Savita Mayadev	La Jolla
230	Shyam Mayadev	La Jolla
231	Abdul Farooqui	Sacramento
232	Savita Farooqui	Sacramento
233	Amita Dalal-Rajadhyaksha	Yorba Linda

No.	Name	City
234	Prakash Rajadhyaksha	Yorba Linda
235	Jayashree Kulkarni	Lakewood
236	Kishore Kulkarni	Lakewood
237	Santosh Kulkarni	Miami
238	Smita Kulkarni	Miami
239	Pushkaraj Karandikar	Elkhart
240	Sushama Karandikar	Elkhart
241	Sanjeev Gupte	Louisville
242	Seema Gupte	Louisville
243	Roopa Borkar	Louisville
244	latika Mangrulkar	Farmington Hills
245	Nivedita Panwalker	Austin
246	Prasad Panwalker	Austin
247	Sheela Nerurkar	Sugar land
248	Ashok Joshi	Salt Lake City
249	Surekha Joshi	Salt Lake City
250	Surekha Nayate	Salt Lake City
251	Arun Nisargand	Bellevue
252	Shubhangi Nisargand	Bellevue
253	Mohit Chitnis	Bothell
254	Runa Chitnis	Bothell
255	Bharati Khandekar	Kenmore
256	Mohan Khandekar	Kenmore
257	Deepti Chitnis	Lakewood
258	Shashank Chitnis	Lakewood
259	Surabhi Sansgiri	Maple Valley
260	Shraddha Deodhar	Redmond
261	Pradip Ghate	Redmond
262	Sushama Ghate	Redmond
263	Subhag Oak	Redmond
264	Deepak Patil	Redmond
265	Hema Patil	Redmond
266	Anagha Soman	Redmond
267	Vivek Soman	Redmond
268	Aparna Masalkar	Sammamish
269	Prafulla Masalkar	Sammamish
270	Jyoti Samant	Seattle
271	Satish Samant	Seattle
272	Madhuri Bapat	Morgan Town
	Sliver Shared	
273	Usha Sathe	Anaheim
274	Milind Nerlekar	Edgware
275	Mrunal Phadnis	Issaquah
	Sliver SIngle	
276	Shilpa Gupte	Charlotte
277	NirmalaGupte	Lakewood
	Sliver SIngle W/o Hotel	
278	Soniya Shaha	Corona
279	Suresh Dandekar	Edgeare
280	Seema Waghmare	Seattle
	Spirit of Seattle	
281	Mrinalini Deshpande	Solapur
282	Kunda Thakar	Beaufort
283	Aarti Deshpande	Bellevue
284	Amit Kulkarni	Bellevue
285	Sheetal Patwardhan	Bellevue
286	Shilpa Churi	Bothell
287	Ganpat Dhalwade	bothell
288	Shubhangi Dhalwade	Bothell
289	Poonam Gajbe	Bothell

No.	Name	City
291	Shrikant Hangirgekar	Bothell
292	Dhananjay Kulkarni	Bothell
293	Gauri Kulkarni	Bothell
294	Disha Puradkar	Bothell
295	Sushil Puradkar	Bothell
296	Sandip Shahane	Bothell
297	Manasi Upasani	Bothell
298	Dhananjay Kulkarni	Everett
299	Shraddha Kulkarni	Everett
300	Ruchita Wattamwar	Everett
301	Girish Bhandari	Issaquah
302	Janhavi Bhandari	Issaquah
303	Aadi Adgaonkar	Redmond
304	Amol Adgaonkar	Redmond
305	Anand Adgaonkar	Redmond
306	Sujata Adgaonkar	Redmond
307	Usha Adgaonkar	Redmond
308	Kailas Bhoite	Redmond
309	Apurva Chinchwadkar	Redmond
310	Satish Deshmukh	Redmond
311	Shubhangi Deshmukh	Redmond
312	Pallavi Deshpande	Redmond
313	Ravikiran Deshpande	Redmond
314	Kadambini Dharap	Redmond
315	Parag Dharap	Redmond
316	Ashutosh Galande	Redmond
317	Bhakti Ganapule	Redmond
318	Prasanna Ganapule	Redmond
319	Rupali Ghanekar	Redmond
320	Milind Jambhekar	Redmond
321	Madan Natu	Redmond
322	Supriya Natu	Redmond
323	Anjali Parikh	Redmond
324	Sujal Parikh	Redmond
325	Mrunmayi Patwardhan	Redmond
326	Ketaki Ranade	Redmond
327	Sanjay Ranade	Redmond
328	Advait Sathe	Redmond
329	Meghana Sathe	Redmond
330	Charusheela Wani	Redmond
331	Hema Thanedar	Renton
332	Chetan Chudasama	Sammamish
333	Reetu Chudasama	Sammamish
334	Anuradha Godbole	Sammamish
335	Shilpa Godbole	Sammamish
336	Ashwini Kshirsagar	Sammamish
337	Vinay Kshirsagar	Sammamish
338	Ravindra Mohite	Sammamish
339	Vinita Mohite	Sammamish
340	Neela Sahasrabudhe	Sammamish
341	Parag Sahasrabudhe	Sammamish
342	Shailendra Upadhye	Sammamish

आपल्या सर्वांचे मनापासून

आभार

बृहन्महाराष्ट्र मंडळ मुख्य समिती
BMM Core Committee

शिल्पा कर्वे
जयंत भोपटकर
अपूर्व चिंचवडकर
मोहित चिटणीस
अश्विनी क्षीरसागर
सविता मोरे
सुभग ओक

स्मरणिका समिती
Smaranika Committee

कादंबिनी धारप
स्नेहल-पिटके कुलकर्णी
अश्विनी देवधर
राहुल तारांबळे
अश्विनी क्षीरसागर

कलास्पंदन समिती
Kalaspandan - Art Gallery Committee

प्राची कुलकर्णी
विनिता मोहिते
मंजिरी खारकर
रजनी पाटील
शीतल रांगणेकर
प्रेरणा कुलकर्णी
रेश्मा जोशी
कार्तिकी सराफ

भारतातील कार्यक्रम – संगीत समिती
India Programming-Music

आरती लोटलीकर
प्रसन्न गणपुले
मोहित चिटणीस
वर्षा दिघे

नोंदणी समिती
Registration Committee

ज्योती रसाळ
श्रध्दा ओक
मृडानी चिद्रे
रितू चुडासमा

उत्तर अमेरिका कार्यक्रम (इतर) समिती
North America programming (Other) Committee

अमित केळकर
शैलेश अरोरा
योगिनी पारखी
मधुरा भाटवडेकर
सुचेता पंडितराव
प्रसन्न परळकर
संजय राऊत
पराग सहस्त्रबुध्दे
अभय धर्माधिकारी

बालतरंग किशोरकुंज समिती
Baaltarang-Kishorkunj Committee

मधुरा भाटवडेकर
वीणा भोईटे
सविता मोरे
पल्लवी देशपांडे
केतकी सेठ

ढोल-ताशा समिती
Dhol-Tasha Committee

विनय क्षीरसागर
निखिल देवस्थळी
पराग राजोपाध्ये

आतिथ्य आणि पाहुणचार समिती Host and Hospitality Committee

अक्षता डोईफोडे, ईशा क्षीरसागर, मुक्ता मानवी, योगिनी कुलकर्णी-शर्मा, गायत्री सप्रे, पूनम गजभे, अश्विनी क्षीरसागर, शुभांगी ढाळवडे, सुनीता फडणीस, गौरी हुंडलेकर, साहना देव, अनुपमा मळेकर, प्रज्ञा लाडे, ज्योती रसाळ सुदेश पाटील, अनिल भागवत, अभिजित करगुद्रीस,अद्वैत साठे, शरद भागवत, संजय बुरडकर, शशांक चिटणीस

भारतातील कार्यक्रम (इतर) समिती

India Programming (Other)

चेतन चुडासमा
सुभग ओक
अमित केळकर
अश्विनी क्षीरसागर
शिल्पा कर्वे
मधुरा भाटवडेकर
सुखदा देवधर
इशा तर्टे-कुलकर्णी

उद्घाटन सोहळा-लेखन समिती

Opening Ceremony-Writers team

गौरी विद्वांस
वर्षा दिघे
राहुल तारांबळे
इशा तर्टे-कुलकर्णी
संजय राऊत
कादंबिनी धारप
तृप्ती राऊत
स्नेहल पिटके-कुलकर्णी

उद्घाटन सोहळा समिती

Opening Ceremony-Committee

तृप्ती राऊत
तन्वी काळे
गौरी विद्वांस
छवी खरे
इशा तर्टे-कुलकर्णी
गौरी कुलकर्णी

एकांकिका समिती (नाट्यसृजन)

Ekankika Committee

अमित देवधर
अश्विनी देवधर
रमा केळकर
चेतन चुडासमा
सुखदा देवधर

निरंतर वैद्यकीय शिक्षण समिती

Continuing Medical Education

डॉ. आरती देशपांडे, राहुल ओक,
डॉ. राणी कुलकर्णी, डॉ. आरती तायडे,
डॉ. योगिनी कुलकर्णी-शर्मा, डॉ. प्राची मुन्शी,
वर्षा पाटील, रुना चिटणीस

ग्रुप फोटोमध्ये नसलेले CME टीम सदस्य
डॉ. कोमल पाटील-सिसोदिया,
डॉ. मोहन दुर्वे, डॉ. हेमांगी काळे,
डॉ. संस्कृती ओम कुलकर्णी

संकेत स्थळ (वेब) समिती

Website Committee

सुशील पुरंदकर
धनेश प्रधान
अंबर रसाळ
अश्विनी क्षीरसागर
रजनी पाटील

उत्तर अमेरिका कार्यक्रम-संगीत समिती

North America - Music Commitee

शैलेंद्र उपाध्ये
अमित केळकर
मंदार माजलगांवकर
शीतल पटवर्धन-बापट
अरुणा उपाध्ये
सुभाषिणी अंधारे
पल्लवी देशपांडे

Flash Mob leads

सहाना देव
ईशा क्षीरसागर

प्रचार-प्रसार समिती

Marketing Committee

पराग सहस्त्रबुध्दे, सुखदा देवधर,
रश्मी साठे, श्रुती देसाई,
अभिजित देसाई, अश्विनी क्षीरसागर,
अनु हळदणकर, लेखा लोखंडे
देवयानी गोखले, जय म्हैसकर
शीतल रांगणेकर, शुभम गलांडे
ओंकार वाघमारे

वित्त समिती

Finance Committee

मानसी उपासनी
पुनम गजबे
राहुल तारांबळे
जयंत भोपटकर
अमित कुलकर्णी
विनय क्षीरसागर

उत्तरांग समिती

Uttarang Committee

अनुपमा मळेकर
उषा अडगावकर
सविता मोरे
श्वेता पटवर्धन
हर्षदा पाध्ये

स्वयंसेवक Volunteers

स्वयंसेवक समिती
Volunteering Committee
मानसी उपासनी
शुभांगी कानेटकर
प्रणिता वाडेकर

दृक- श्राव्य समिती
Audio-Visual Committee
संदीप शहाणे
संजय राऊत
शैलेश निकम
मिलिंद जांभेकर

व्यवस्था समिती
Facility Committee
अपूर्वा चिंचवडकर
निनाद लाडे

निधी संकलन समिती Fund Raising Committee

रजनी शेंदुरे, विकास पटवर्धन, वर्षा पाटील, सुशील पुरंदकर, श्रध्दा कुलकर्णी, शिल्पा गोडबोले, अमोल अडगावकर, शिल्पा कर्वे, निलेश जोशी, दीप्ती चिटणीस, रुना चिटणीस, मदन नातू, अनुपमा देशपांडे, अलका सारंगधर, संतोष भोसले

सजावट समिती

Decoration Committee

शिल्पा कर्वे, मधुरा भाटवडेकर, कस्तुरी देशपांडे, जान्हवी भंडारी

भोजन समिती

Food Committee

मानसी उपासनी, रूचिता वट्टमवार सविता मोरे, आशिष बागुल, मोहित चिटणीस

प्रदर्शन समिती

Expo Committee

आशुतोष गलांडे, अमित कुलकर्णी, श्रध्दा देवधर, शैलेश निकम, मयुरी कुलकर्णी

अस्सल बावनकशी शुद्धता,
परंपरा आणि विश्वास
WHP
वामन हरी पेठे ज्वेलर्स
सोनेरी क्षणांचे सोबती!
मुंबई: ठाकुरद्वार | रानडे रोड, दादर (प) | कोहिनूर स्क्वेअर, दादर (प) | विले पार्ले (प) | गोरेगाव (प) | कांदिवली | बोरीवली (प) | चेंबूर (पू) | कुर्ला | घाटकोपर (प)
मुलुंड (प) | ठाणे | डोंबिवली | बदलापूर (पू) | सीवूड्स | वाशी सेक्टर 10 | वाशी सेक्टर 17 | वसई (प) | विरार (प) | बोईसर
छत्रपती संभाजी नगर | अमरावती | नागपूर | कोल्हापूर | औंध पुणे | अलिबाग | माणगाव | रत्नागिरी | कणकवली | कुडाळ | पणजी गोवा | फोंडा गोवा | इंदोर

bvg
Humanity Ahead
BVG INDIA LTD
India's Largest Integrated Services Company
EXCLUSIVE SERVICES FOR BMM MEMBERS
Airport & Travel Assistance
• Airport Meet & Greet
• Pickup & Drop Services
• Chauffeur-driven Vehicles
• End-to-End Travel Coordination
• Hotel & Stay Arrangements
Medical Tourism & Health Care
• Online Doctor Consultation
• Hospital Selection & Second Opinions
• Admission Assistance
• Treatment Planning
Elder & Parent Care
• 24x7 Emergency Assistance
• Ambulance Support
• Health Check-ups
• Home Nursing & Caregivers
• Senior Citizen Support Services
Spiritual & Pilgrimage Assistance
• Temple Darshan Planning
• VIP Darshan Coordination
• Religious Tours
• Accommodation & Travel Management
Property Care & Management
• Property Inspections
• CCTV Monitoring
• Property Maintenance
• Legal & Revenue Representation
• Tenant & Rental Management
Exclusive Member Benefits
• Priority Assistance
• Preferential Pricing
• Dedicated Support Team
• Access to Verified Service Partners
Hanmantrao Gaikwad
Chairman & MD, BVG Group
BVG LIFE SCIENCE LTD
• Cancer Care
• Heart Care
• Liver Care
Contact no.: +91 7722 00 2581
Toll Free No.: 1800 268 1818
www.bvglife.com
BVG INDIA LTD
Address : Midas Tower, 4th Floor, Phase 1, Rajiv Gandhi Infotech Park, Hinjawadi, Pune, Maharashtra 411057
www.bvgindia.com
www.bmmonline.org/bvg/
bmm@bvgindia.com
+918055 99 2227

मी पाहिलेली खरी स्वयंसिद्धा!

अपर्णा बोडस
डुवॉल, वॉशिंग्टन

नवीन घरात आम्ही नुकतेच राहायला आलो होतो. घरासमोरच्या बागेत लावण्यासाठी आणलेली काही फुलझाडांची रोपं मी बागेत लावत होते. तितक्यात बाजूनं जाणाऱ्या एका तरुणीनं मला हाय-हॅलो केलं. मी गेल्याच आठवड्यात इकडे राहायला आले आहे असं तिनं सांगितलं. मग मीही तिला आम्हीही इथे नवीनच आल्याचं सांगितलं. तिचं घर आमच्या घरापासून ४, ५ घरं सोडून होतं. नवीन परिसरात नव्यानं ओळखी करून घेणारं आपल्यासारखंच दुसरं कोणी नवखं पाहून मला छान वाटलं. आमची जुजबी ओळख झाली. ती अमेरिकन तरुणी सिएॅटलस्थित एका मोठ्या सॉफ्टवेअर कंपनीत काम करत होती. स्वत:च्या हिंमतीवर तिनं एकटीनं घर घेतलं होतं. पहिल्या भेटीतच ही शेजारीण मला आवडून गेली. आता बऱ्याचदा जाता-येता तिची गाठ पडू लागली. कधी एखादा पदार्थ, कधी कसली फुलं, रोपं यांची एकमेकींना देवाणघेवाण होऊ लागली. बडबड्या आणि मोकळ्या स्वभावामुळं थोड्याच दिवसांत तिची गल्लीतल्या सगळ्यांशी ओळख झाली होती. 'घरी आम्ही तिघी असतो असं ती एकदा म्हणाली होती. तेव्हा मला वाटलं असतील कोणी तिघी स्त्रिया! मात्र एके दिवशी तिच्या घरापाशी बोलत असताना तिच्या घरातून एक कुत्रा आणि मांजर बाहेर पळत आले, तसं मला म्हणाली, या बघ माझ्या दोन मुली! आम्ही तिघी मस्त धमाल करतो!' थोडक्यात, घरी ती एकटीच बाईमाणूस आणि या दोन पाळीव बाया होत्या तर. ती एकटीच राहतेय, एकटीनंच घर घेतलंय हे सगळं समजल्यावर मला आता कुतुहलाबरोबरच तिच्याबद्दल आदर वाटायला लागला.

माझ्या या शेजारिणीला फिरायची फारच हौस. आज कुठे ट्रेकलाच जा, उद्या कुठे कॅम्पिंगला जा, तर परवा स्किइंगला नाहितर कयाकिंगला जा, अशी सतत कुठेतरी फिरतीवर. मग घरी असलेल्या पाळीव बायांची काळजी घ्यायला शेजार-पाजाऱ्यांच्या मुलांना सांगून जायची.

असेच काही महिने गेले. थंडी सुरू झाली तशी आमच्या जाता-येता होणाऱ्या गाठीभेटी थोड्या कमी झाल्या. डिसेंबर-जानेवारीत आम्ही भारतात जाऊन आलो. येताना मी आठवणीनं माझ्या या नवीन शेजारणीसाठी गोव्याहून काजू आणले होते. ते द्यायला मी एक दिवस तिच्या घरी गेले. तिनं दार उघडलं आणि तिला पाहून मला थोडं आश्चर्य वाटलं. पण तिनं माझी गळाभेट घेऊन गप्पा सुरू केल्या आणि माझा विचार माझ्या मनातच राहिला. मधूनच माझ्यासाठी काही खाण्याचं आणायला ती उठली. आता मात्र तिच्याकडे पाहिल्यावर मला खात्रीच पटली. माझी शेजारीण चक्क गरोदर होती! तिला विचारलं तर आवडेल की नाही असा विचार करत शेवटी मी तसं तिला विचारलंच. तर एकदम खुशीत येऊन तिनं होय, पाचवा महिना लागला आहे', म्हणून सांगितलं. येणाऱ्या बाळासाठी तिनं घरातली एक खोली स्वत:च छान रंगवली होती. ती मला दाखवली. आणखी काय काय तयारी करतेय वगैरे उत्साहानं सांगू लागली. मी पण मग तिला काय तारीख दिली आहे, तुझ्या मदतीला कोणी येणार आहे का वगैरे विचारलं. तर म्हणाली माझी आई काही लगेच येऊ शकणार नाही. डिलिव्हरीनंतर तिच्या सवडीनं कधीतरी येऊन जाईल, पण माझी एक मैत्रीण २, ३ दिवस मदतीला येणार आहे'. वर्षभराच्या आमच्या ओळखीत तिनं आत्तापर्यंत तिच्या नवऱ्याबद्दल किंवा तिच्या जोडीदाराबद्दल काहीच सांगितलं नव्हतं. पण आता बाळच होणार म्हटल्यावर माझ्या मराठमोळ्या बाळबोध मनात प्रश्न आलाच. अगं, होणाऱ्या बाळाचा बाबा तुझ्या मदतीला येणार नाही का? मी न राहवून तिला विचारलं. यावर तिनं जे सांगितलं ते ऐकून मात्र मी उडालेच.

ती सांगू लागली, 'काही वर्षांपूर्वी माझा एक जोडीदार होता. पण काही महिन्यांतच आमचं फारसं पटत नाही, असं आमच्या लक्षात आल्यावर आम्ही वेगळे झालो. तेंव्हापासून आता सध्यापर्यंत तरी मी एकटीच आहे, पण मला स्वत:चं मूल हवंच आहे. किती दिवस जोडीदाराची वाट पाहणार? शिवाय, मी आताच पस्तिशीत आहे. माझं आई होण्याचं स्वप्न पूर्ण व्हायचं असेल तर मला माझ्या वयाचाही विचार करायला हवा. जोडीदार काय, पुढे कधीतरी मिळेलही. त्यामुळे आत्ता मी unknown sperm doner च्या सहाय्यानं IVF उपचार (कृत्रिम गर्भधारणा) करून घेतले. यावेळी ते successful सुद्धा झाले आणि आता मी गरोदर आहे!'

हे सगळं ऐकून मी अक्षरश: थक्क झाले. जोडीदार साथीला नसताना, केवळ आपल्या मातृत्वाच्या तीव्र इच्छेसाठी IVF उपचारांचा असा वापर करुन घेणारी स्त्री मी पहिल्यांदाच पाहात होते. तिचं अगदी मनापासून अभिनंदन आणि कौतुक करून, तुला काहीही मदत लागली तर नक्की सांग, असं तिला सांगून मी घरी आले. तिचा विचार माझ्या डोक्यातून काही केल्या जाईना. मला माझी दोन्ही गरोदरपणं, बाळंतपणं आठवली. बाळ होण्याआधीचे ९ महिने आणि नंतरचे कितीतरी दिवस कोणत्याही आईला किती प्रकारची मदत लागते, शारीरिक-मानसिकदृष्ट्या त्या नाजुक अवस्थेत कुटुंबाचा भक्कम आधार किती गरजेचा असतो, भावनांची किती आंदोलनं चालू असतात हे सगळं आठवलं. जोडीदाराविना, कोणाच्याही मदतीविना ही एकटी हे कसं निभावेल, याचा विचार करून माझीच झोप उडाली. मी आता प्रत्यक्ष भेटून किंवा फोनच्या माध्यमातून वरचेवर तिची ख्यालीखुशाली घेत राहिले. ती मात्र फारच धीराची!

तिची तारीख जवळ आली, तशी ती ऑफिसचं काम पूर्णवेळ घरूनच करू लागली. नैसर्गिक गरोदरपणाच्या तुलनेत उपचारांतून आलेलं गरोदरपण तसं जास्त अडचणींचं आणि आव्हानात्मक होतं. मध्यंतरीच्या काळात तिला तब्येतीच्या काही तक्रारींमुळे एकदोन वेळा हॉस्पिटलमध्ये ॲडमिटही व्हावं लागलं होतं. स्वत:च गाडी चालवत जायची, यायची. मदत देऊ केली तरी नम्रतेनं नको म्हणायची. असेच काही दिवस गेले. मग एक-दोन आठवडे ती कुठेच दिसली नाही, तिचा फोन, मेसेजही नव्हता. म्हणून मी तिला कुठे आहेस, कशी आहेस, असा मेसेज केला. एरवी मेसेजला लगेच उत्तर देणारी ही, पण त्या मेसेजलाही हिचं २, ३ दिवस झाले तरी काही उत्तर आलं नाही. शेजाऱ्यांना विचारलं तर त्यांनाही काही माहिती नव्हती. मग मात्र मला काळजी वाटू लागली. पुढे ३,४ दिवसांनी तिचा छान मोठा मेसेज आला. आठ दिवसांपूर्वी तिला मुलगी झाली होती! दिलेल्या तारखेच्या ३ आठवडे आधी. त्यापूर्वी तिला काही त्रास व्हायला लागल्यानं ती ॲडमिट झाली होती. एवढ्या गडबडीतही तिथूनच तिनं तिच्या घरासमोर राहणाऱ्या एका मुलीला हिच्या घरी असणाऱ्या कुत्र्याची आणि मांजराची काळजी घ्यायला सांगितली होती. बाळ pre-mature असल्यानं पुढे काही आठवडे NICU मध्येच असणार होतं. पण आईला मात्र आणखी ४ दिवसांत हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळणार होता.

ती घरी आली. बाळ अजून हॉस्पिटलमध्येच होतं. स्वत:ला लागणारं किराणा सामान, इतर खाद्यपदार्थ तिनं घरी मागवून घेतले. आता ती रोज सकाळी बाळाकडे हॉस्पिटलमध्ये जायची. दिवसभर तिथे थांबून रात्री झोपायला घरी यायची. हे सगळं ती एकटीच करत होती. आम्ही काही शेजाऱ्यांनी तिला मदतीसाठी विचारलंही, पण मला मदत लागेल तेव्हा मी नक्की सांगेन, आत्ता मी मॅनेज करू शकतेय, असं म्हणाली. ३, ४ आठवड्यांनी बाळ घरी यायच्या आधी तिनं बाळासाठी लागणारं सामान दुकानातून मागवून ठेवलं होतं. बाळाला घरी घेऊन यायच्या दिवशी मात्र तिची एक मैत्रीण तिच्याबरोबर गेली होती.

बाळ घरी आलं. हिच्या बोलक्या स्वभावामुळं तिनं गल्लीत सगळ्या लहान थोरांशी गट्टी जमवली होती. त्यामुळे तिला बाळ झालेलं एव्हाना सगळ्यांना कळलेलं होतं. मग आजूबाजूच्या सगळ्या छोट्या मुलांनी मिळून बाळाच्या स्वागताला तिच्या घरासमोर रंगीत खडूंनी छान छान चित्रं काढली होती, 'वेलकम होम बेबी' म्हणून लिहिलं होतं. दाराला रंगीबेरंगी फिती लावून ठेवल्या होत्या. फुलांच्या परड्या, फुगे, शुभेच्छापत्रं ठेवली होती. हे आगळंवेगळं स्वागत बघून माझ्या डोळ्यात पाणीच आलं. या देशाच्या सामाजिक संकेतांप्रमाणं इतरांच्या खाजगी आयुष्यात फार ढवळाढवळ न करता पाळलेला हा शेजारधर्म मला खूप मोलाचा वाटला. बाळ घरी आल्यानंतर तिची मैत्रीण पुढे ४ दिवस तिच्या मदतीला राहिली. त्यानंतर मात्र ही शेजारीण दिवसरात्र एकटीनं बाळ सांभाळू लागली. अधूनमधून आम्हाला बाळाचे फोटो पाठवायची. आम्ही आजूबाजूचे शेजारीही कुठे दुकानात जाणार असू तर तिला फोनवरूनच काही हवं आहे का विचारायचो. काही हवं असेल तर आणून तिच्या दारापाशी ठेवायचो. बाळ अपुऱ्या दिवसांचं असल्यामुळं

इतक्यातच लोकांनी तिच्या घरी जाणं योग्य नव्हतं. बाळाची तब्येत अजूनही तशी नाजुक होती. घरी आल्यावरही बाळाला २,३ वेळा हॉस्पिटलमध्ये न्यावं लागलं होतं.

बाळ घरी येऊन महिना-सव्वा महिना झाला असेल आणि ही एक दिवस बाळाला स्ट्रोलरमध्ये घालून, बरोबर तिच्या डॉगीला घेऊन चालताना भेटली. म्हणाली आता बाळ महिनाभराचं झालंय, तिला बाहेर घेऊन जायला हरकत नाही, असं डॉक्टरांनी सांगितलं आहे, त्यामुळे चालायला आलोय. आता पुढच्या आठवड्यात मी तिला घेऊन २ दिवसांची Over night trip सुद्धा करणार आहे. आता हळूहळू बाहेर पडायला हवं ना!' आणि तिच्या काही मित्रमंडळींसह खरंच ती जाऊन आलीही. आता ती बाळाला घेऊन फिरताना वरचेवर दिसू लागली. अशीच एकदा फिरताना भेटली. यावेळी तिच्याबरोबर चक्क तिची आई होती! मनात आलं, चला, आता तरी हिला जरा मदत मिळेल. पण दोनच दिवस राहून आई परत आपल्या घरी निघून गेली. माझ्या भारतीय मनाला हे सगळं पचवणं जरा जड जात होतं. हिच्या धाडसाचे धक्के मात्र अजून संपले नव्हते. बाळ तीनेक महिन्यांचं झालं तेव्हा तिनं सांगितलं की नुकतीच ती बाळाला घेऊन इथल्या एका नॅशनल पार्कमध्ये ३,४ दिवसांसाठी एकटीच कॅम्पिंगला जाऊन आली. त्याच्या पुढच्याच आठवड्यात एकटीनंच बाळाला घेऊन ८ दिवसांची रोड ट्रिप केली. तिची हिंमत, धडाडी तसंच स्वत:च्या आणि बाळाच्या क्षमता आजमावण्याची तिची ही पद्धत थक्क करणारी होती.

बाळंतपणासाठी तिला तिच्या कंपनीतून ६ महिन्यांची रजा मिळाली होती. रजा संपत यायच्या दरम्यान हिनं बाळासाठी डे-केअर शोधलं. आता ती दररोज बाळाला सोडून ८-९ तास ऑफिसला जाते, येताना बाळाला घेऊन येते. आईप्रमाणं बाळसुद्धा जगन्मित्र आणि चुणचुणीत आहे. तिचं बाळ सगळ्या गल्लीचं बाळ झालं आहे. बाळाला कोणी कडेवर घेतात, फिरवून आणतात, खेळवतात. जाता-येता सगळे बाळाशी खेळूनच पुढे जातात. त्या बाळाच्या येण्यानं शेजारपाजाऱ्यांमधली औपचारिकता एकदम कमी झाली, वागण्यात मोकळेपणा आला. लोकांना एकत्र आणण्याचं मोठं काम त्या छोट्याशा बाळानं केलं.

विचारांची स्पष्टता असणारी माझी ही शेजारीण एक स्वावलंबी स्त्री आहेच शिवाय, एक उत्तम आई होण्यासाठीचे तिचे प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहेत. तिची मुलगीसुद्धा मोठी होऊन आईसारखीच किंबहुना तिच्यापेक्षा कणभर अधिकच साहसी, धाडसी, जिद्दी, स्वतंत्र विचारांची आणि मुख्य म्हणजे आईप्रमाणेच स्वावलंबी होईल, याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही.

जोडीदार हवा/हवी पण मुलं नकोत या नव्या विचाराच्या आजच्या समाजात, जोडीदार मिळेल तेव्हा मिळेल पण आपलं आई होण्याचं स्वप्न योग्य वयातच पूर्ण व्हावं ही इच्छा बाळगणाऱ्या आणि त्यासाठी शब्दश: तनमनधन अर्पण करणाऱ्या माझ्या शेजारिणीचं मला कौतुक वाटतं. एकट्या स्त्रीनं मूल वाढवणं हल्लीच्या काळात नवीन नाही पण एकट्या स्त्रीनं स्वेच्छेनं, एकटीच्याच जीवावर IVF च्या माध्यमातून आई होणं आणि स्वखुशीनं एकल पालकत्व निभावणं हे निश्चितच विशेष आहे.

आपल्या संस्कृतीत आपण देवीच्या मातृत्वाचा, कर्तृत्वाचा, स्त्री शक्तीचा जागर करतो. देवी पार्वतीने स्वत:च्या घामातून श्रीगणेशाला जन्म दिला, ही गोष्ट तर स्त्रीसामर्थ्याचं प्रतीक मानली जाते. विविध रूपांमधली ही स्त्री शक्तीच मला माझ्या या शेजारणीमध्ये दिसते. मुक्त विचारांची आणि सर्वार्थानं स्वावलंबी असलेली मी पाहिलेली ही खरी स्वयंसिद्धा!



In the context of
Swami Vivekananda's teachings....
Sangathan
(Organization or Unity)
is the dynamic application of his spiritual philosophy to practical nation-building. He believed that to break the cycle of poverty, ignorance, and subjugation, Indians had to overcome individualism and organize for collective strength and service.

समाजसेवेचा दीपस्तंभ

राहुल तारांबळे
सिॲटल

अनेक वर्षांपूर्वी इंजिनीअरिंग शिकत असताना कॉलेजच्या वार्षिक अंकासाठी काम करत होतो तेव्हा मला श्री. जीवन किर्लोस्करांच्या ओळखीतून काही सामाजिक संस्था अगदी जवळून अनुभवण्याचा योग आला होता. 'रुद्रवाणी' नावाचे मासिक सुमारे ३५ होऊन अधिक वर्षे एकहाती चालवणारे वरिष्ठ संपादक श्री. जीवन किर्लोस्कर माझे स्नेही होते. वयाने ज्येष्ठ पण आमचा ऋणानुबंध विशेष होता. त्यांचा मित्र-परिवार अफाट होता. अनेक लहान -थोर सामाजिक कार्यकर्ते किर्लोस्करांना भेटायला येत असत. मी पुण्यातील रास्तापेठेतील राम मंदिरातल्या रुद्रावणीच्या कार्यालयात बसलो असताना एक पत्रकार तिकडे आले होते आणि पुण्याजवळील कापूरहोळ परिसरात समाजासाठी झटणाऱ्या एका समाजसेवकाला शासनाकडून काही मदत करता येईल का, या विषयावर चर्चा सुरु होती. त्या इसमाला मदतीची लालसा नाही, पण आपण मदत करू शकलो तर त्याने सुरु केलेले कार्य खूप पुढे नेता येईल, यावर हे दोघे पत्रकार अत्यंत गंभीरपणे खलबतं करीत होते. त्या सज्जन समाजसेवकाला याची कल्पनाही नव्हती. मानवतेच्या दृष्टीने किती सुंदर दृश्य होतं ते.

आपल्या मदतीतून गरजूंना त्यांच्या पायावर उभे करणे ही केवळ समाजसेवा नाही, तर समाज सशक्तीकरणाचा पाया आहे. तो प्रसंग मनात खोलवर रूजला होता. असो, माझे शिक्षण पूर्ण झाले, घर-संसार सुरू झाला, पुणे सुटले, देश सुटला. समाजासाठी काहीतरी केले पाहिजे, ही उर्मी मनातच राहिली.

अलीकडे काही महिन्यांपूर्वी भारतात गेलो होतो तेव्हा, माझी आई सौ. संध्या रमेश तारांबळे, कार्यरत असलेल्या बिबवेवाडी, पुणे येथील सप्तशृंगी देवीच्या मंदिरात गेलो. तिथे आईने तिच्या एका मैत्रिणीशी ओळख करून दिली. ''या छायाताई'' अशी सुरूवात झाली आणि आईने छायाताईंचे समाजकार्य सांगितले. तेव्हा सुमारे २५-३० वर्षांपूर्वी मनात रेंगाळणाऱ्या विचारांची उजळणी झाली. वयाची पंचाहत्तरी गाठलेल्या छायाताई देशपांडे यांच्या कार्याबद्दल प्रचंड कुतूहल निर्माण झालं आणि त्यांचेशी संपर्क साधून माहिती गोळा केली. ती माहिती थोडक्यात अशी मिळाली -

- छायाताईनी बीए. बीएड. अध्यात्म शिक्षण पूर्ण केले. त्यांना जो गीतापाठ शृंगेरी पुरस्कार (२१ हजार रुपये) मिळाला त्यात आणखी तीस हजाराची भर घालून ज्या शाळेत नोकरी केली त्या शाळेला ५१ हजार रुपयांची देणगी दिली.
- ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, संस्कृत पाठशाला यांचा अभ्यास केला आणि त्यांनी प्रथम श्रेणी मिळवली.
- लहानपण मध्यमवर्गीय घरात गेले, वडिलांचे संस्कृत पठण यामुळे अनेक संस्कृत श्लोक, सुभाषिते, स्तोत्रे सतत ते कानावर येत असे. त्याचा परिणाम म्हणजे संस्कृत सुभाषितांनी खूप चांगली शिकवण दिली. सतत चांगले काम करण्याची प्रेरणा मिळाली. छायाताईंनी अनंत काणेकरांचे एक वाक्य कायम लक्षात ठेवले ''स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यासाठी जगलास तर जगलास''. यातून प्रेरणा घेऊन छायाताईंनी निवृत्तीनंतर आत्तापर्यंत १५

वर्षांत सुमारे ५०० ते ६०० गरीब विद्यार्थ्यांना मोफत मराठी, इंग्लिश, विशेषतः व्याकरण शिकवून ज्ञानदान केले आहे. यात समाजातील गरीब होतकरू विद्यार्थी असतील त्यांना चांगल्या घरात छोटी छोटी कामे मिळवून दिली. आत्मनिर्भरतेचे हे पाऊल पडते पुढे. त्यांनी शिकवलेल्या विद्यार्थ्यांमधून इंजिनीअर्स, सी.ए. तयार झाले आहेत.

- पुण्यातच न राहता, वनवासी कल्याण आश्रम, भोर येथे जाऊन तेथील मुलांना मोफत मराठी, इंग्लिश शिकवले. आश्रमासाठी निधी गोळा केला, स्वतः निधीही दिला.
- छायाताईंचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, त्या कोणत्याही वस्तू, सायकली असतील किंवा कपडे असतील, कधीही दुरुस्त केल्याशिवाय किंवा योग्य पद्धतीने शिवल्याशिवाय पुढे देत नाहीत. त्याचा संपूर्ण खर्च त्या स्वतः करतात. छायाताईंच्या दृष्टीस पडलेल्या रस्त्यात काबाडकष्ट करणाऱ्या असंख्य कामगारांना तत्क्षणी चहा/पाणी/उसाचा रस/खाद्यपदार्थ मिळाले असतीलच.
- याशिवाय आजूबाजूच्या वयस्कर लोकांसाठी त्यांच्याबरोबर बँकेत जाणे, पोष्टात, दवाखान्यात जाणे त्यांना आधार देणे, काही एकट्या महिला राहतात अशावेळी त्यांच्या घरी गरज असेल त्याप्रमाणे रात्री झोपायला जाणे हा तर एक नित्यक्रमच झालाय.
- सोसायटीत लहान मुलांसाठी व महिलांसाठी रोज संध्याकाळी सात ते आठ रामरक्षा, गीतापाठ घेणे, आणि उत्तम विषयावर सतत चर्चा करणे अशा प्रकारे आपल्या परीने समाजासाठी जे करता येईल ते सतत करत राहणे यातच छायाताईंना खरा आनंद मिळतो
- व्रतवैकल्ये, नवस याला विरोध नाही पण तसे करण्यापेक्षा उत्तम कर्म यातच जीवनाचे सार्थक आहे असे त्यांना वाटते.

खरंच, समाजसेवा म्हणजे केवळ दान, किंवा आर्थिक सहाय्य एवढेच नव्हे; तर वेळ, ज्ञान, कौशल्य आणि प्रेम यांचे वाटप करणेही समाजसेवेचाच भाग आहे. दुसऱ्याच्या चेहऱ्यावर हसू आणणे, त्याच्या अडचणीत उभे राहणे, गरीब मुलांना शिक्षण मिळवून देणे किंवा वयस्करांना आधार देणे, या लहान लहान कृती समाजाला अधिक सक्षम बनवतात. मोठे कार्य करण्याची अपेक्षा नसली तरी आर्थिक आणि श्रमदानाच्या या कृतींमधून समाजसेवा साधता येते. छाया प्रकाश देशपांडे यांचे जीवन हेच दाखवून देते की, आपली निष्ठा, वेळ आणि प्रेम जर समाजाला अर्पण केले, तर जीवनाचे सार्थक नक्कीच साधता येते. किती मोठं कार्य पण किती विनम्रता! छायाताईंच्या या विचारांमुळे अंधारात चाचपडणाऱ्याला एकदम प्रकाश दिसावा तशी माझी अवस्था झाली. आपण फक्त बोलतोच का? वेळ निघून गेली का? वय साथ देईल का? सामाजिक प्रश्न बदलले आहेत का? आपण काही मदत केली तर कुणी गैरफायदा घेईल का? अशा असंख्य प्रश्नांची उत्तरे अगदी चुटकीसरशी मिळाली, मला प्रकाश दिसला, हरवलेली उर्मी परत जागी झाली, वाट दिसली आणि एक निश्चित ध्येय मिळाले.

छायाताईंसारखे असंख्य स्वयंप्रकाशी नंदादीप समाजात तेवत आहेत. त्या सर्व नंदादीपांचा दीपस्तंभ माझ्यासारख्या चाचपडणाऱ्या अनेकांसाठी दिशादर्शक होवो. समाज सशक्तीकरण असेच जोमाने पुढे चालत राहो, हीच सदिच्छा !

कृष्ण हे महाभारतातील सर्वांत रोमांचक आणि रहस्यपूर्ण व्यक्तिमत्व आहे. जगभरातील विविध प्रकारचे लोक कृष्णावर किती प्रेम करतात, हे पाहून नवल वाटते! माझ्यासारखे नास्तिकही कृष्णाच्या प्रेमात पडतात! कृष्णाचं व्यक्तिमत्त्व खरंच लोभस आहे, लडिवाळ आहे, हवंहवंसं वाटणारं आहे. प्रेमिक, मित्र, राजनीतीज्ञ, सर्वप्रिय सखा अशी अनेक बलस्थानं त्याच्या व्यक्तिमत्वात आहेत. मानवी जीवनात आदर्श किंवा हव्याहव्याशा वाटणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा मूर्त आविष्कार कृष्णामध्ये आढळतो मग हे आदर्श बुद्धिजीवींचे असोत किंवा साध्याभोळ्या लोकांचे असोत.

कृष्ण खरंच होऊन गेला की नाही, या वादात मी पडत नाही. व्यासांनी कृष्णाभोवती गुंफलेली प्रत्येक कथा मला आवडते. या कथा मनोरंजक, प्रेरणादायी आणि ज्ञानवर्धकही वाटतात. पण मला सर्वात जास्त रस आहे एक व्यक्ती म्हणून असलेल्या कृष्णाच्या गुण आणि स्वभावविशेषात. त्याने केलेल्या चमत्कारांमध्ये किंवा त्याला बहाल केलेल्या अलौकिक दर्जात, देवत्वात नाही.

कृष्ण

अभय जोशी
रेडमंड

कृष्ण सर्वप्रकारे मुक्त होता

कृष्णाच्या आधीचा विष्णूचा अवतार राम हा निर्बंध पाळणारा, मर्यादांमध्ये वागणारा होता. कृष्ण मात्र अनिर्बंध होता. खऱ्या अर्थाने आणि सर्व प्रकारे मुक्त होता. संपूर्ण महाभारतात तो सर्वत्र मुक्तपणे फिरतो, त्याच्या युक्त्या आणि डाव खेळतो, लोकांना भेटून त्यांच्या विविध समस्या सोडवतो. त्याला कुणीच अटकाव करू शकत नाही. मानवनिर्मित नियमांना तो बांधील नव्हता. एवढेच काय तत्कालीन धर्माच्या मर्यादा आणि त्यामुळे निर्माण होणारे विरोधाभास यांपासून देखील तो दूर राहिला.

सर्वत्र सहभागी असूनही तो अलिप्त होता

कृष्णाची उपस्थिती, त्याचा वावर सर्वत्र आहे. महाभारतातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला मग तो शत्रू असो वा मित्र, सज्जन असो वा दुर्जन कृष्णाचा स्पर्श आहेच. सामान्य माणसाच्या सर्व भूमिका त्याने साकारल्या. भाऊ, मुलगा, विद्यार्थी, मित्र, प्रियकर, शिक्षक, गुरू, समुपदेशक इत्यादी. प्रत्येक भूमिका त्याने पूर्णतः समरस होऊन, पूर्ण सहभाग देऊन साकारली. तरीही तो आयुष्यभर कोणातही किंवा कोणत्याही ठिकाणी गुंतून राहिला नाही. प्रत्येक अनुभव तो अंतर्बाह्य जगला. सर्वांसाठी त्याच्या हृदयाची दारे खुली होती. त्याची युक्त्यांची पोतडी तो सर्वांसाठी उघडत राहिला. पण महासागरात मिसळून गेलेल्या पण तरीही आपला वेगळेपणा जपणाऱ्या तेलाच्या थेंबाप्रमाणे कृष्णाचा गाभा अबाधित राहिला.

कृष्णाचे स्त्रियांबरोबरचे नाते

स्त्रियांबरोबर कसे वागावे, यासाठी कृष्ण हा सर्व पुरूषांसाठी आदर्श आहे. कृष्णाने त्याच्या आयुष्यात आलेल्या सर्व स्त्रियांना अत्यंत आदरपूर्वक व प्रेमाने वागवले, त्यांची काळजी घेतली, त्यांचा मान जपला. प्रत्येकीला तिच्या क्षमतेनुसार आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता प्रतिसाद दिला.

काही टीकाकारांनी आरोप केल्याप्रमाणे कृष्ण हा कॅसानोव्हा नव्हता आयुष्यात कधीच तो ''लाईन मारत'' फिरला नाही. सर्व स्त्रिया त्याच्याकडे उत्स्फूर्तपणे आल्या आणि त्याने त्यांचे नेहमीच सन्मानाने आणि मैत्रीपूर्वक स्वागत केले.

कृष्णाने प्रत्येक नाते जगापासून दूर, एका अदृश्य विश्वात ठेवले व जपले. जिथे त्या स्त्रीला सुरक्षित वाटे व ती निःशंक मनाने, समरस होऊन, तिच्या इच्छेनुसार त्या नात्याचा आनंद घेऊ शके. त्या विश्वात कृष्ण खरोखर आणि पूर्णपणे तिचा असे आणि ती त्याची. त्या विश्वात सर्व बंधने वास्तविक आणि कल्पितदेखील गळून पडत. संस्कारदोष आणि पूर्वग्रह नाहीसे होत.

कृष्णाची सखी असणे म्हणजे काय होते ?

मी स्वतः एक सामान्य पुरुष असल्याने, कृष्णाची मैत्रीण असण्यात काय विशेष होते हे माहीत असल्याचा दावा मी करू शकत नाही. पण इतर लेखिका आणि कवयित्रींनी व्यक्त केलेल्या विचारांचा आधार घेऊन मी या विलक्षण घटनेचे वर्णन करण्याचे धाडस करणार आहे.

कृष्णाशी असे निकटचे नाते असलेल्या स्त्रीचे आयुष्य अनोख्या अनुभवांनी समृद्ध होऊन जाई. तिला कृष्णाचे गुणविशेष अतिशय आकर्षक, सुखदायक आणि हृदयस्पर्शी वाटत. त्याच्या संगीताची आणि खेळकरपणाची तिला भुरळ पडे. कृष्णाच्या सहवासात तिच्या स्त्रीत्वाचा तिला अभिमान वाटे. कारण कृष्ण तिच्या विचारांचा अथवा भावनांचा नेहमीच आदर करत असे. स्वतःचा पुरुषी दृष्टिकोन लावून उपमर्द करत नसे. अगदी मोकळेपणाने स्वतःचे अगदी जिव्हाळ्याचे विचार ती त्याच्यापाशी व्यक्त करू शके. कृष्णाच्या मैत्रीतून तिला तिच्या इच्छा-आकांक्षांचा, सर्जनशीलतेचा पूर्ण उत्साहाने पाठपुरावा करण्याची प्रेरणा मिळत असे. आयुष्यातील इतर भूमिका सक्षमपणे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेला दिलासा व आधार मिळत असे.

कृष्णाची सखी असणे सहज-सोपे नव्हते.

कृष्ण हा सर्वसाधारण नियमांनी बांधलेला सामान्य माणूस नव्हता. कृष्णाची मैत्रीण व्हायचे असेल तर तुम्हाला कृष्ण हे एक जागृत स्वप्नच आहे, हे समजून घेणे आणि स्वीकारणे आवश्यक होते. तुम्ही जागृतावस्थेत त्याला पाहू शकत व अनुभवू शकत होता. परंतु त्याला पकडून ठेवू शकत नव्हता.

त्याच्यावर आधिपत्य गाजवायचा प्रयत्न न केल्यास तो तुमचाच होता. कोणत्याही पारंपरिक भूमिकेत तुम्ही कृष्णाला बंदिस्त करू शकत नव्हता.

कृष्ण हा प्रत्येक क्षणाचा राजा होता, त्या त्या क्षणातच राहणारा होता. काळाचा काटा पुढे सरकला की कृष्णही त्याच्याबरोबर पुढे प्रवास चालू ठेवी. वृंदावन सोडल्यानंतर राधा त्याच्या भूतकाळाचा एक भाग बनली; त्यानंतर त्याने तिच्या आयुष्यात ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला नाही.

कृष्ण आता प्रतीकात्मक झाला आहे.

प्रत्येक स्त्री आपल्या कृष्णाच्या शोधात असते. कृष्णासारखेच त्या पुरुषाने आपल्याला आदराने, प्रेमाने, सखीसारखे वागवावे, अशी तिची अपेक्षा असते. प्रत्येक पुरुषालाही आपल्या स्त्रीसाठी कृष्ण होण्याची संधी असते. कृष्ण खरोखरच पुरुषांसाठी एक उत्तम आदर्श आहे पण कृष्णाला असंख्य मैत्रिणी होत्या म्हणून नव्हे, असा विचार

करण्याऱ्या पुरुषांना मी म्हणेन की तुम्ही तुमच्या आयुष्यात आलेल्या एका स्त्रीला जरी ''मला माझा कृष्ण मिळाला'' असे समाधान देऊ शकलात तरी ती तुमची मोठी कमाई ठरेल.

सध्याच्या स्त्रीजागृतीच्या युगात पुरुषजात कोंडीत सापडली आहे असे मला वाटते. शतकानुशतके चालवून घेतलेली पुरुषांची अरेरावी आणि अन्याय खपवून घेणे तर दूरच राहिले, आता स्त्रिया ''नकोच ती ब्याद, त्यापेक्षा मी एकटी राहीन किंवा कुत्रा/मांजर पाळीन'' अशा भूमिकेप्रत आल्या आहेत. पुरुषांनी कृष्णाचा आदर्श समजून घेण्याची व त्यातून धडे शिकण्याची गरज निर्माण झाली आहे.

कृष्णाचे जीवनविषयक तत्त्वज्ञान

कृष्णाच्या अनोख्या नैतिकतेला एक नाव आहे: कृष्णनीती. पारंपरिक नीतीरक्षक या नीतीकडे पाहून नाके मुरडतात. राधेसोबतच्या प्रेमाला ते विवाहित स्त्रीशी असलेला अनैतिक संबंध म्हणतात. रुक्मिणीने प्रेमपत्र लिहिले म्हणून तिला घेऊन पळ काढल्याबद्दल त्याला भेकड म्हणतात. आणि शत्रूंचा नाश करण्यासाठी त्यांची फसवणूक केली आणि तशी करण्यास इतरांनाही प्रोत्साहन दिले म्हणून त्याला कपटी म्हणतात.

पण तुम्ही कृष्णाला सर्व बाजूंनी समजून घेण्याचा प्रयत्न केलात, त्याचे अंतरंग आणि त्याच्या वैयक्तिक तत्त्वज्ञानाची मूलभूत तत्त्वे समजू शकलात तरच कदाचित तुम्ही कृष्णनीतीचे गूढ समजू शकता, तिचे सामर्थ्य जाणू शकता. मला कृष्णनीती समजली आहे, असे म्हणणे अर्थातच धाष्ट्याचे होईल. पण तिचे काही कंगोरे समजून घेण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न.

कृष्णाने आपले जीवन इतरांना प्रेरणा देण्यात, त्यांना सक्षम बनवण्यात, शक्य तिथे शिष्टाई करून वाद मिटवण्यात, राजांचे राज्याभिषेक करण्यात कारणी लावले. तो लहान–लहान युक्त्या खेळला आणि मोठे, गुंतागुंतीचे खेळही खेळला. परंतु त्याने स्वतःच्या वैयक्तिक फायद्यासाठी काहीही केले नाही. त्याला अनेक राज्यांवर राज्य करण्याची संधी चालून आली, पण त्याने नेहमीच एखाद्या सक्षम व्यक्तीला अधिकारी बनवले आणि स्वतः राज्याच्या मोहापासून दूर राहिला. कृष्णाचे जीवन म्हणजे पाठोपाठ केलेल्या साहसांची, धाडसी उपकथांची मालिका होती. तो जरूरीपेक्षा जास्त वेळ एका ठिकाणी राहिला नाही. त्याच्यासाठी विश्रांतीची जागा दोन उपकथांच्या मधल्या अल्प काळातली एकच होती. त्याच्या प्रेयसीचा प्रेमळ सहवास जिथे तो राजेरजवाड्यांच्या कारस्थानांबद्दल किंवा सामान्य माणसांच्या सांसारिक समस्यांबद्दल चिंता न करता विश्रांती आणि शांतीचा लाभ घेऊ शके.

कृष्णाने जेव्हा जेव्हा आपली मदत देऊ केली तेव्हा तेव्हा ती बहुतेक वेळा सल्लामसलत किंवा ''सुचवेन गोष्टी युक्तीच्या चार'' अशा रूपात असे; हिंसक, विध्वंसक शक्तीच्या रूपात नाही. महाभारत युद्धाच्या काळात जेव्हा अर्जुन आणि दुर्योधन कृष्णाकडे युद्धप्रयत्नात मदतीसाठी आले तेव्हा कृष्णाने त्यांना एका बाजूला त्याचे संपूर्ण सैन्य आणि दुसऱ्या बाजूला स्वतः कृष्ण पण पूर्णपणे निःशस्त्र असे पर्याय दिले.

कृष्ण दयाळू आणि उदार अंतःकरणाचा होता परंतु बावळट अथवा अविवेकी नव्हता. त्याने कोणावरही आपले प्रेम, चांगुलपणा किंवा मदत लादली नाही. तसेच कोणालाही आपला गैरफायदा घेऊ दिला नाही. एखाद्या यंत्राप्रमाणे त्याने प्रत्येकाचे अंतरंग समजून घेतले आणि प्रत्येक व्यक्तीशी त्याच्या क्षमतेनुसार आणि गुणवत्तेनुसार संवाद साधला. कृष्णाला बऱ्यावाईटाची अचूक समज होती. अगदी थोर किंवा वयाने ज्येष्ठ लोकांमधेही दोष असतात, याची त्याला जाणीव होती. कोणामध्ये सुधारणा होण्याची शक्यता व क्षमता आहे, याचा त्याला सहज अंदाज होता. महाभारतातील असंख्य पात्रे व कृष्ण यांच्यातील परस्परसंवादाच्या व संबंधाच्या कथा केवळ विस्मयकारक आहेत. त्यातली प्रत्येक कथा कृष्णाच्या संवादकौशल्याचा पुरावा तर देतेच, शिवाय मानवी स्वभाव आणि परिस्थिती यांचे त्याला किती अचूक ज्ञान होते हेही दाखवून देते.

समारोपाचे शब्द

कृष्णाच्या व्यक्तिमत्वाची परिमाणे अनेक आहेत. त्याची जनमानसावरील जादू अपरंपार आहे. असंख्य कलावंतांनी, लेखकांनी, कवींनी आणि तत्त्वज्ञांनी त्यांचे कलाकसब पणास लावून कृष्णाची व्यक्तिरेखा चितारण्याचा प्रयत्न केला आहे. आणि तरीही तो अथांग, गूढ, आकलनाच्या पलिकडे आहे. मला कृष्णाचे व्यक्तिमत्व आकर्षक आणि मनमोहक का वाटते हे स्वतःसाठी समजून घेण्याचा हा माझा प्रामाणिक प्रयत्न आहे.

विराम का व केंव्हा ? एक वेगळे विचारमंथन

अजित नातू
फोल्सम, कॅलिफोर्निया

खूप दूरवर आलो, खूप काही केले, काही स्वतःसाठी तर पुष्कळ दुसऱ्यांसाठी. ज्यात समाज, लोक, अर्थात कुटुंब आणि मुले आली!

पण या आत्ताच्या थांब्यावर मला आनंद आहे-कारण घेण्यापेक्षा मी जास्त दिले, असे मला प्रांजळपणे वाटते आणि म्हणूनच मी, शुद्ध मराठीत सांगायचे तर content आहे! माझ्या जीवनाकडून आता पुढे काही अपेक्षा नाहीत, अर्थात त्या कधीच नव्हत्या, कधी मोठाली ध्येय नाही ठेवली म्हणून प्रवास निर्व्याज होता, नदी जसे स्वतःसाठी काही मागत नाही म्हणून निर्मळ, वाहती असते तसाच मी येथवर आलो.

ध्येय ठेवलीच नाही, त्याचे ओझे ओढवून घेतले नाही. मला काही पद मिळेल, मान मिळतील, अमुक पल्ला गाठायचा असे नाही ठरवले. तरी पण काही वेगळे विचार होते, प्रयोजन होते. काय करायचे याचा अंदाज होता. ध्येय नाही म्हणून काम केले नाही, संसार केला नाही, असे मुळीच नाही. किंबहुना खूप कष्ट घेतले, सचोटीने कामे केली, संबंध जोडले. पण उगाच धावत सुटण्यापेक्षा, चालताना आनंद घेत जायचे, जवळील लोकांना आनंद वाटत जायचे, त्यांच्यासाठी उदात्त असे करता आले तर प्रयत्न करायचे. त्यात मुलांना नीट वाढवणे हा मुख्य भाग झाला-नुसते उच्च शिक्षण घ्यायला प्रोत्साहन देऊन (बळजबरी, धोषा, धावाधाव कधीच केली नाही), त्यापुढे जाऊन त्यांचे सर्वांगीण व्यक्तिमत्व कसे होईल, त्यांना 'Right and Righteous'' हा मंत्र त्यांच्या नकळत मी शिकवला. त्यासाठीचे माझे कष्ट कमी नाहीत. तसेच लोकांसाठी, समाजासाठी काही भरीव पाया रचून देऊन त्यांच्या जीवनात नक्कीच Impact आणला, हे मी नाही तर लोक मला सांगतात. मराठी मंडळ स्थापन करून समाजामध्ये एक मराठी छत्र निर्माण करून, मराठी माणसांना अमेरिकेत एकत्र आणून भारतातील आपल्यावेळचे वातावरण निर्माण करून त्यांच्या जीवनावर चांगला व ऊर्जात्मक बदल मला करता आला. तसेच भारतीय वेगळ्या भाषिकांना एका छत्राखाली आणण्याच्या कामात सुरुवातीपासून अथक प्रयत्न करून यशस्वीपणे एक खेळीमेळीचा समाज घडवण्यात मोलाचा वाटा माझ्या हातून घडला. मुलांना व सभोवतालच्या लोकांना 'मोठे' 'एकमेकांचे' कसे करायचे हे होते माझे प्रयोजन! म्हणून जगताना कसरत असते असे कधीच वाटले नाही. **शिवाजी होण्याचे माझ्यात नक्कीच गुण होते, पण मी तानाजी, बाजीप्रभू होण्याचे जाणून बुजून खूप विचारपूर्वक ठरवले होते आणि तसेच केले.**

कृतकृत्य ह्या जीवनाच्या थांब्यावर आता येऊन पोहोचलो आहे. आता ''विराम'' घ्यावा म्हणतो. त्याचे मुख्य

कारण 'सद्हेतूपूर्वक ठोस प्रयोजन' आता उरले नाही. चिमण्या घरटे सोडून कधीच निघून गेल्या, चार दिवस येतात चिवचिव करायला पण ते माझे ३६५ दिवसांचे प्रयोजन नाही उरले. त्यांची शिदोरी मी चांगली भरून त्यांना दिली, आता ते त्यांचा प्रवास करतील, तसेच लोकांसाठी माझे काम मला हवे तसे पूर्ण झाले व आता तिथे इगो म्हणून रेंगाळून राहायचे, हे मुळीच उद्दिष्ट नाही. त्यांचे प्रयोजन तेच ठरवतील.

मी या निर्णयाप्रत आलो आहे की,– माणसाने जेंव्हा भरीव प्रयोजन उरत नाही तेंव्हा विराम घ्यायला हरकत नाही. हे मुळीच Negative Statement नाही. एक मार्ग चालल्यावर, त्यावर नुसते फरफटत मला तरी जायचे नाही. अर्थात पूर्णविराम हा माझ्या हातात नाही हे मी जाणतो, तो कोणाच्याच हातात नसतो, पण विराम तर माझ्या हातात आहे? मला आता थांबायचे आहे हे जर नीट विचारपूर्वक ठरवले, किंतु ना ठेवता ठरवले, तर 'विराम आता करतो' हे मुळीच निराशाजनक नाही उलट एक प्रकारे विचारी व उदात्त संकल्पना आहे! अर्थात माझे विचार माझ्यासाठी, प्रत्येकाने अशा अर्थाचा 'विराम' घ्यायचा की नाही, केंव्हा घ्यायचा, हे त्याचे त्याने ठरवावे.

आता त्यांचा प्रवास व त्यांचे प्रयोजन त्यांनी करायचे, आता मी त्यावर Influence नाही करू इच्छित. ही मर्यादा मी ओळखतो व म्हणूनच असा व त्यासाठी विराम. प्रत्येकाने असा पूर्ण विचारांती विराम करून – फक्त तथास्तु म्हणायला मागे मी उरलो तर समाज, संसार खूप सुखी होतील! तेंव्हा सकारण, विचारात्मक प्रयोजन जेंव्हा संपते, तेंव्हा 'विराम' घ्यायला शिका. कोठल्याच अपेक्षा नका ठेवू, तसेच मी इतके केले, मी तितके केले हे नका लोकांना सांगत बसू, लोकांनी स्वतःहून सांगितले पाहिजे तुम्हाला आणि तसे तुमचे जीवन हवे. हा माझा विराम म्हणजे संन्यास नाही, असा विराम म्हणजे तडजोड नाही, नामुष्की नाही, अलिप्तता नाही तर हा विराम म्हणजे जीवनातील वेगळा राम म्हणून यापुढील वाटचाल – ज्याला सिंहासन नको, वनवास पण नको, राज्य नको पण गुलामी पण नको. मागितली तर मदत जरूर करा पण कमी दिसले तर उगाच सावरायचा खटाटोप नको. मानाने जगलात, मानाने रहा पण माझेच ते खरे हा अट्टाहास आता नको.

बाह्य जीवनातून Contently माघार घेऊन आता पार्श्वभूमीत जगायला शिका! चिडून, वैतागून, काही नाईलाज म्हणून नको, तर समजून उमजून, मागची सीट घ्या, इतरांना फक्त 'तथास्तु' म्हणायला शिका. Dignity ने जगलात, Dignity ला Dignity प्रमाणेच यापुढे जगू द्या. काळा आड नाही तरी पडद्या आड जा!! नाटक आपल्यासाठी संपवून विंगेत कधी रमायचे हे योग्य वेळेला ठरवून रंगभूमीवरील रोलपासून विराम घ्या. अशा पूर्ण विचारांती घेतलेल्या विरामाने जीवन आणखी समृद्ध, समाधानी होईल – तुमचे व इतरांचे!

असा विचारांती मी आता विराम घेत आहे! तुम्हीच ठरवा असे विचार करून तुमचा विराम घ्यावा का नाही आणि केंव्हा घ्यावा!

हे गणराया

हे गणराया तुला वंदितो प्रसाद मज द्यावा
तुझ्या कृपेचा वरदहस्त मज सदैव लाभावा
अमित अविघ्ना अविनाशी रे कीर्ति कृपाकर तू
गुणी गदाधर गणाध्यक्ष तू गौरीसुत वीर तू
तूच धृती अन् तूच धारणा, तूच क्षमाकर देवा
तुझ्या दर्शने शुभवरठेवा आम्हास लाभावा
हे गणराया तुला वंदितो प्रसाद मज द्यावा

मृत्युंजय तू मंगलमूर्ती नंदन ओंकारा
बुद्धिनाथा बुद्धिप्रिया तू शिवशंकर तनया
वीर गणपती शुभगुणकानन शिवगण तू अधिपती
महोत्कटा अन् महोदरा तू हेरंबा श्रीपती
तुझ्या दर्शने गुणसंचय हा आम्हास लाभावा
हे गणराया तुला वंदितो प्रसाद मज द्यावा

ज्योति राम (सिॲटल)

सोबती

संजय बुरडकर
सिॲटल

हुश्श! सुस्कारा सोडत बाकावरती बसलो. छोट्याशा तलावाच्या बाजूला बरेच जण चालत होते, कुणी धावत होते, लहान मुले सायकल शिकत होती आणि त्यांचे आई बाबा त्यांच्या मागून जोरात चालत होते. छान ऊन पडलं होतं. वातावरणात थोडासा गारवा होता.

काही क्षण बरं वाटलं पण विचारांचं वादळ काही थांबत नव्हतं. हे असंच असतं का? मग असे असेल तर प्रत्येकाच्या मनात असेच विचार घोंघावत असतील का? याआधी काही नामांकित किंवा वडीलधारी मंडळींशी बोलताना वाटायचं कि यांना या प्रश्नांची उत्तरं सापडली आहेत कि काय? पण तेही काही नक्की वाटत नाही. ऑफिस, घर, आयुष्य, समाज, सवंगडी, नातेवाईक आणखी इतर बरंच काही.. जिथे कुठे साधारण माणसाला पटणाऱ्या गोष्टी आणि त्याच्या बाहेर होणाऱ्या अरेरावीपणा (तसे म्हणावे कि आणखी काय म्हणावे?) दिसतो तेव्हा तेव्हा या विचारांना पाय फुटतात. एव्हाना समोर जी गोष्ट समोर येईल त्याच्याविषयी काही ना काहीतरी विचारांचं थैमान डोक्यात सुरु होतं. यातून काहीतरी विरंगुळा मिळेल या हेतूने तलावाच्या काठी येऊन बसलो.

विचार करीत होतो कि याचे नियमन कसे करावे, कुठेतरी या विचारांवर ताबा मिळविता येईल असे वाटत होते. जेवढा जास्त त्याला आळा घालायचा प्रयत्न करीत होतो, तेवढ्याच वेगाने विचारांचे थैमान वाढत होते. यातून काही मार्ग सापडत नव्हता.

तेवढ्यात जगात कुठलीही चिंता नाही, असं भासणारी आनंदी व्यक्ती 'ब्रो' तिथे आला आणि पाठीवर जोरात थाप मारून बाजूला उभा राहिला. काहीसा हळुवार उड्याच मारत होता. 'काय चाललंय? मस्त मजेत ना?', 'ब्रो' नी व्यावहारिक प्रश्न टाकला. मला काही क्षण वाटलं कि याला काय उत्तर द्यावे? हा तर कधीच गंभीर नसतो. याला 'आपलं नेहमीच कसं आनंदित, ताण तणाव न घेता चालत राहावं' हेच सांगायचं असतं. तो मला पूर्णपणे ओळखुन होता. त्याला लगेच कळलं, कि मी कुठल्यातरी गहन विचारांमध्ये गुरफटलोय आणि म्हणूनच शांत आहे. 'अरे चालतं रे, ये सब तो चलते रहता है, ज्यादा लोड नही लेने का'!. 'ब्रो' आता हिंदीवर उतरला होता. मला बघ कशाची चिंता नसते, मस्तपैकी काम करायचं, मजा मारायची, आणखी काय. चलतोस का आज? चल पार्टीला जाऊया. ब्रोचं आपलं सुरु होतं. तो मला आनंदी आणि तणाव न घेता कसं जगायचं याचं गुपित सांगत होता.

'काय रे तुम्ही दोघे इथे कसे? काय चाललंय?', भाऊ तिथे आला आणि आमच्यात सामील झाला. भाऊलाही कळून चुकले होते कि, इथे काहीतरी खोलवर विचारांची परिषद सुरू आहे. भाऊला मी विचारले, 'काय रे समाजात लोकं असे कसे वागतात? ऑफिसमध्ये सुद्धा ज्या गोष्टी सरळ मार्गाने व्हायला हव्या, त्या वाकड्या वाटेने नेणारे का सापडतात? समाजात सुद्धा काही बाबी सर्वसाधारण चांगल्या विचारांच्या विरुद्ध का वाटतात?' भाऊ म्हणाला 'हे असेच

आहे अरे'. त्यात तुझे काही नियम आणि तर्क चालणार नाही आणि चालतही नाही'. काही गोष्टी तुझ्या म्हण किंवा आपल्या आवाक्याच्या बाहेर असतात. भाऊ सत्य परिस्थितीची जाणीव करून देत होता. त्यामुळे तू जास्त विचार करूही नको. भाऊ समोर सगळ्या गोष्टी जशा आहे तशा मांडत होता, मनाला ते सगळं पटत होतं, पण ते तेवढ्यापुरतं. प्रत्येक वेळी मन बंड करून हाच प्रश्न विचारत होता की यातून काहीतरी मार्ग असेल. भाऊ एक आपल्यासारखा कौटुंबिक, नोकरी करणारा, प्रयत्न करून आपलं विश्व साकार करणारं व्यक्तिमत्वं होत.

मिस्टर अर्थतज्ञांनी प्रवेश करतच प्रश्न टाकला, 'आज अचानक बाजारात काय हालचाल झाली माहिती आहे का तुला?' मग आर्थिक स्वातंत्र्य किती महत्त्वाचं आहे आणि ते मिळविण्यासाठी काय प्रयत्न करावे लागतात आणि तसं करावे, असा त्यांचा अट्टहास होता. हे खरे आहे कि जीवनातील बऱ्याच गोष्टी त्यावर अवलंबून असतात. श्रीमंतीचा आव आणता येत नाही, हे तो आम्हाला पटवून देत होता. यांना मी 'मिस्टर अर्थतज्ञ' म्हणत असे. हे नेहमी आर्थिक सुरक्षितता किंवा अर्थविश्वात होणाऱ्या घडामोडी समजावून द्यायचा प्रयत्न करीत असे. कधी समजायच्या, तर कधी नाही. एक क्षण वाटतं, त्याचं तरी काय चुकलं? शेवटी पैसा हा सुद्धा महत्त्वाचाच; पगारी माणसांना तर आणखीनच काळजीपूर्वक सगळ्या गोष्टींचे नियमन करावं लागतं.

'अबे साल्यांनो तेव्हापासून आवाज देतोय, ओ सुद्धा देत नाहीत', श्रीयुत चिडके यांचं ओरडत पदार्पण झालं. तुम्हाला समजत नाही का? एवढी कामं पडलेली आहेत. कालपासून जिमला गेलो नाही, पत्रं पाहिलेली नाही, बिल आली असतील तर बिलं भरायला उशीर होईल. त्यांना बऱ्याच बाबतीत चिडचिड होते. काही मनासारखं झालं नाही, तर पुढे काही विचारायची सोय नाही. जो त्याच्या कचाट्यात सापडला त्याची तर काही खैर नाही. साधारण लोकं त्याच्यापासून दूरच असतात. खरंच त्यांचंही काही चुकत नव्हतं बऱ्याच गोष्टींच्या कचाट्यामुळे त्याचा हा स्वभाव झाला होता.

ब्रो, भाऊ, श्रीयुत चिडके, मिस्टर अर्थतज्ञ हे सगळे बोलत होते. कधी आवाज कमी तर कधी जास्त होत होता. मला त्या तरंगांवर कधी चिडचिड, कधी शांत, कधी अस्वस्थ वाटत होते. या सगळ्यांचा गोंगाटच सुरू होता. कसं करायचं, हे लक्षात ठेवायचं, याच्याकडे लक्ष द्यायचं असे एक दुसऱ्यांना सांगत होते, ह्या कल्लोळात आवाज वाढत जात होते.

आणि अचानक!! मला शांतता जाणवायला लागली. या सगळ्यांचा आवाजच येईनासा झाला. एवढेच काय बाजूला धावपळ करणारी मुले, सायकली, पक्षी यांचाही आवाज येईनासा झाला. कुठून तरी एक निरव शांततेचा अनुभव येत होता. फक्त त्या क्षणात काय घडतयं तेच दिसत होतं, एखाद्या मूक चित्रपटासारखं. बाकी कशाचीच चिंता नव्हती, कुठल्याही प्रकारचा तणाव नव्हता, सगळं कसं आल्हाददायक वाटत होतं. पण क्षणात, माझं मलाच उलगडायला सुरुवात झाली. ब्रो, भाऊ, मिस्टर अर्थतज्ञ, श्रीयुत चिडके हे सगळे दुसरे तिसरे कोणीही नसून, माझ्या मनाचेच वेगळे वेगळे प्रतिबिंब होते.

माझंच मन कधी 'ब्रो' होऊन आनंदी जगावं हे सांगत होतं, तर कधी भाऊ बनवून मला जगातल्या सत्य परिस्थिती समजावत होतं. जास्त ताण तणाव न घेता असे पुढे पुढे चालत राहावे हे शिकवत होतं. मिस्टर अर्थतज्ञ आपला सल्ला देऊन पुढच्या गोष्टींचे नियोजन करायला सांगत होते. कधी काही अडखळलं किंवा सांगून व्यवस्थित केलं नाही तर चिडचिड करणार, तेही माझंच मन होतं. हे सगळं करणारं, सावरणारे हेही माझंच मन, तोही मीच. फक्त वेगवेगळ्या परिस्थितीत वेगवेगळी रूपे आणि जेव्हा या सगळ्यांकडे अलिप्त राहून पाहिलं, तेव्हा हे सगळं माझ्यासमोर घडतयं, असं दिसत होतं. यातून मी मात्र अलिप्त राहून बघण्याने की काय माझे मन शांत वाटत होते. बराच काळ तशाच अवस्थेत बसून होतो. शांतता आणि बाकी काहीच नाही. ना आवाज ना कुठलीही हालचाल, आता सगळं वादळ शांत झालं होतं. मनाची धावपळ थांबली होती. कुठेतरी स्थिर होतोय असं वाटत होतं.

नकळतपणे मला माझ्या शाळेच्या प्रांगणाचे दृश्य दिसले. समोर शिक्षक आणि शिक्षिका चटईवर बसून होत्या. आम्ही

मुले त्यांच्या समोर रांगेत बसलो होतो. गुरूजन आंम्हाला आचार्य विनोबा भावे यांच्या गीताईचे श्लोक आमच्याकडून म्हणवून घेत असत. ‘‘स्थिरावला समाधीत स्थित-प्रज्ञ कसा असे ’’, आणि सोबतच त्याचा अर्थ सांगत असत. स्थितप्रज्ञ म्हणजे जो कुठल्याही परिस्थितीत अढळ असतो, जो या जीवनातील चढउतारांच्या किंवा विचारांच्या वादळात तटस्थ असतो, खंबीर असतो. विजेच्या गतीने मनात विचार आला की, आपल्या या गुरुजनांनी आपल्याला काय काय शिकवलं, छान घडवलं. आणि हे सगळं, ते त्यांच्या जीवनातल्या वादळांना सामोरे जात असताना!! गीताईचे श्लोक सुरू होते, पण मी आत्ताचं ते सगळं दृश्य बघत होतं. त्या सगळ्या शिक्षक शिक्षिकांना बघून आदराने मान खाली वाकली.

घरात आई वडील, वडीलधारी माणसे, यांनी कधीच त्यांची वादळं आपल्यापर्यंत पोहोचू दिली नाहीत. समाजात वावरतांना देखील काही वडीलधाऱ्या माणसांनी सांगितलेल्या गोष्टी आज मोलाच्या उपयोगी वाटतात. एवढेच नव्हे तर काही मित्र मैत्रिणींनी सुद्धा सोबत दिल्याच्या आठवणी जाग्या झाल्या. वाटलं एवढे सगळ विचारधन सोबत आहे.

चेहऱ्यावर हलकसं हसू उमटलं, समाधानयुक्त. कृतकृत्य होऊन, क्षणातच डोळ्यात पाणी तरळलं. सगळं कसं अस्पष्ट दिसत होतं, डोळ्यांच्या कडांना न जुमानता, गालावरून घरंगळत पाणी हातावर पडलं. आणि त्या उबदार पाण्याने खाडकन भानावर आलो.

पक्षांचे आवाज कानात घुमायला लागले, मुलांना ‘घरी चला रे’ म्हणून सांगणाऱ्या पालकांच्या हाका कानावर पडत होत्या. बराच उशीर झाला होता. परतायची वेळ झाली होती. तिथून उठलो ते उभारलेल्या मनाने, परत एकदा नव्या जोमाने भरारी मारण्याकरिता!

Visit us at: 791 E El Camino Real, Sunnyvale, CA 94087. Call: 408 245 6764 | www.pngjewelers.com

वंशावळ

अरुण निसरगंड
बेलव्ह्यू, वॉशिंग्टन

''नगरची नावं जरा चमत्कारिकच'', 'ब्रॅडमा'च्या वर्क्स मॅनेजरने मला विचारले होते.

माझ्या आडनावाचा आणि इंजिनीअरिंग जॉब इंटरव्ह्यूचा काय संबंध आहे, असे त्याला विचारायचा मोह मला झाला होता. पण गप्प बसण्यातच शहाणपण होते. कारण 'ब्रॅडमा' ही एक नवीन, तेव्हाची हाय-टेक ब्रिटिश कंपनी ठाण्याला होती. फॅक्टरीच्या गेटवर ''यावर्षी २० % बोनस'' अशी मोठी पाटी होती. पुढच्या वर्षी मलाही तो मिळाला तर?.

''निसरगंड? तोरडमल?'' माझ्या प्रश्नार्थक चेहरा बघून माझ्या भावी साहेबाने विचारले.

प्रा. मधुकर तोरडमल यांचे ''काळे बेट लाल बत्ती'' हे नाटक त्यावर्षी फार गाजले होते.

''तोरडमल? ते आम्हाला इंग्लिशचे प्रोफेसर होते.'' मी अभिमानाने म्हणालो. ''ते नगरचेच''.

''तुम्ही कानडी का?'' साहेबाने इंटरव्ह्यू ऐवजी नावाचीच चौकशी चालू ठेवली.

''नाही. मराठीच.'' मी म्हणालो.

''मी बेळगावचा आहे'' साहेब म्हणाले. ''कर्नाटकात 'निसरगड' नावाचे एक लहान गाव आहे. तुम्ही मूळचे तिथलेच असाल''

मी कानडी नाही असे म्हटल्यामुळे किंवा साहेबाला 'काळे बेट लाल बत्ती' आवडले नसावे म्हणून की काय, पण मला तो जॉब मिळाला नाही. मी सरळ ''हो. कानडीच आहे'' असे म्हणायला हवे होते. २० % बोनस? ठाण्याला फ्लॅट? मजा आली असती.

ब्रॅडमात जॉब मिळाला नाही म्हणून माझी तेव्हा निराशा झाली होती. पण एका दृष्टीने ती इष्टापत्तीच ठरली.

मागच्या आठवड्यात मी गूगलला 'निसरगड' असे गाव कुठे आहे का, असे विचारले आणि ब्रॅडमातल्या साहेबाने 'तुम्ही कानडीच असाल' हे जेवढ्या छातीठोकपणे सांगितले होते तेवढ्याच छातीठोकपणे गूगलने ''निसरगड'' या नावाचे गाव भारतातच काय पण जगात कुठेही नाही असे सांगितले. त्याचे मला आश्चर्य वाटले नाही. कारण माझ्या माहितीप्रमाणे आम्ही नगरचेच.

माझ्या आडनावाचीच काय पण आमच्या घराण्याचीही मला फारशी माहिती नाही.

माझे वडील मी चार-पाच वर्षाचा असतांना गेले. काका, मामा, आजी, आजोबा कोणीही हयात नव्हते. जी काही थोडीफार माहिती आहे ती माझ्या आईकडून मिळालेली. पण तिलाही फारशी माहिती नव्हती. वडिलांच्या जुन्या मित्रांना थोडी माहिती होती. पण ती कितपत खात्रीलायक आहे हे कळायला मार्ग नाही.

शाळेत असल्यापासून मला माझे ''पूर्ण'' नाव माहीत आहे. अरुण लक्ष्मण निसरगंड. आणि वडिलांचे पूर्ण नाव, लक्ष्मण गणेश निसरगंड. याशिवाय दुसरी माहिती नाही. माझ्या वाडवडिलांनी कुणी वंशावळ लिहून ठेवली असती तर बरे झाले असते.

आईच्या बाजूनेही. आईचा जन्म पुण्यात झाला होता आणि तिचे माहेरचे आडनाव डांगे होते. एवढीच माहिती मला आहे.

आईची आई बाळंतपणात गेली. आईचे वडील पुणे म्युनिसिपालटीत नोकरी करत होते. त्यांना कामावरून काढून टाकले होते, असे आईने सांगितले होते. त्यांचा अपराध? स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरच्या खटल्यात ब्रिटिश सरकारला सापडलेल्या एका ग्रुप फोटोत सावरकरांबरोबर आईचे वडील होते. तेवढ्यावर त्यांच्या नोकरीवर गदा आली. ते हार्ट अटॅक येऊन गेल्यावर आई आणि तिच्या दोन लहान भावंडांची रवानगी तिच्या मामांकडे झाली. ती प्रॅक्टिकली अनाथच होती. लग्न झाल्यावर ती पुण्याहून नगरला आली. त्यामुळे आमच्या आडनावाची किंवा निसरगंड घराण्याची तिला काहीच माहिती नव्हती.

पंधराव्या शतकात निजामशाहीत शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे नगर भागाचे सुभेदार होते. १८०३ मध्ये, ईस्ट इंडिया कंपनीने मराठ्यांचा नगरजवळ पराभव केला आणि तेथे कंपनी सरकारचे राज्य सुरू झाले. आमच्या घरांची प्रॉपर्टी रेकॉर्डस अहमदनगर म्युन्सिपालिटीच्या रेकॉर्डसमधे १८५२

पर्यंत सापडतात. म्हणजे १८५२ च्या आधी कुणीतरी निसरगंड मराठा-कालीन नगरचे रहिवासी असणार. त्याकाळी सर्वजण राजाकडेच चाकरी करत असत. पण माझे पूर्वज पिढ्यान्‌पिढ्या नगरचेच असले तरी त्यांच्यापैकी कोणी शहाजीराजे यांच्या पदरी काम करणारे होते की नाही या बाबत माहिती उपलब्ध नाही. आमच्या घराण्यात कोणी काही खास कामगिरी केली नसावी. त्यामुळे माझ्या मुलांना त्यांच्या (आणि माझ्या) पूर्वजांत दादोजी कोंडदेव, तानाजी मालुसरे किंवा बाजीप्रभू देशपांडे अशी कोणी मंडळी होती असे सांगून Brag करायची सोय नाही.

अगदीच नाही असे नाही. लो. टिळकांनी "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, आणि तो मी मिळवणारच" अशी गर्जना प्रथम नगरमध्ये केली होती. भाषणानंतर त्यांची मिरवणूक माझ्या वडिलांच्या दुकानावरून जाताना टिळकांवर दहीहंडीसारख्या वर बांधलेल्या परडीमधून माझ्या वडिलांनी पुष्पवर्षाव केला होता. दुसरी गोष्ट म्हणजे, ब्रिटिशांनी पं. जवाहरलाल नेहरूंना आणि इतर पोलिटिकल प्रिझनर्सना जेव्हा नगरच्या किल्ल्यात कैद करून ठेवले होते, तेव्हा, त्यांना चहा-बिस्किटे पुरवण्याचे कॉंट्रॅक्ट आमच्याकडे होते. नेहरूंनी आपल्या हस्ताक्षरात सही करून दिलेले ब्रिटिश पद्धतीचे 'Recommendation' आमच्याकडे आहे. म्हणजे होते. आता कुठे गेले आहे ते माहीत नाही.

आम्ही नगरला 'चहावाले निसरगंड' म्हणून ओळखले जात होतो. नंतर एक 'चाय-वाला' भारताचा पंतप्रधान झाला. त्यामानाने आमच्या निसरगंड पिढीने, speaking for myself now, तितकेसे दिवे लावले नाहीत ही गोष्ट वेगळी. चालायचेच. नाही म्हणायला बेलव्ह्यू मधल्या Chutney's रेस्टॉरंटमधे एकदा लंचला गेलो होतो तेव्हा मला जवळच एका कोपऱ्यात बिल गेट्स त्याच्या सहकाऱ्यांबरोबर लंच घेताना दिसला होता. आणि आणखी एकदा जवळच्या Lincoln Theater मधे एस्कलेटरवरून खाली येतांना दिसला होता. मुलांना टिळक, नेहरू माहिती नसले तरी बिल गेट्स माहीत आहे.

मला जशी माझ्या पूर्वजांची माहिती नाही, तशी बऱ्याच वाचकांनाही त्यांच्या पूर्वजांची माहिती नसेल. आजी-आजोबा किंवा क्वचित पणजोबा हयात असले तरी सर्व साधारण कुटुंबांना दोन पिढ्यांपेक्षा जास्त माहिती नसते. रोजचे आयुष्य जगताना आपल्याला पाच-दहा मिनिटे स्वस्थ बसायला वेळ नसतो. आणि मिळालाच तर fun गोष्टी करण्यात घालवायच्या ऐवजी आजी-आजोबांच्या कंटाळवाण्या हकीकती ऐकण्यात तो कोण घालवणार? आणि वेळ असला तरी कुतुहूल असेलच असेही नाही. लहान असताना मुले आई-वडिलांना स्वतःच्या आणि आई-वडिलांच्या लहानपणीच्या आठवणी सांगा असा आग्रह करतात. त्यांना गंमत वाटते. आणि मुले मोठी होऊन वयस्क झाली की त्यांना आपल्या Roots विषयी Curiosity वाटायला लागते. पण तेव्हा उशीर झालेला असतो. कारण ज्यांच्याकडून ही माहिती हवी असेल ती मंडळी हयात असतीलच असे नाही.

आपल्याकडे वंशावळ किंवा डीटेल्ड फॅमिली ट्री करायची पद्धत नव्हती. अजूनही नाही. पाश्चात्य देशात, विशेषतः चर्चमधे, baptismal, मॅरेज, बर्थ, डेथ रेकॉर्डस ठेवायची पद्धत आहे. त्यामुळे प्रयत्न केला तर त्यांच्याकडून चार-पाचशे वर्षांपूर्वीची पूर्वजांची माहिती मिळू शकते. आपल्याकडे ते शक्य नाही. काशी-बनारसमधे वंशावळी असतात, असे मी ऐकले आहे. आपल्याकडे गंगादर्शनाला गेलो की आपल्या पूर्वजांसाठी क्रियाकर्म करण्याची पद्धत आहे. त्यावेळी काशीचे पंड्या कोण, कुठल्या गावाचे, इ. चौकशी करून आपल्या घराण्यातले आधी कुणी तेथे गेले असतील तर त्याची माहिती काढू शकतात व त्यावरून वंशावळ तयार करता येते. पूर्वी आपल्याकडे एकदा तरी काशीयात्रा करायची अशी लोकांची इच्छा असे. बरेच जण ती यात्रा करायचे. त्यामुळे त्यांच्या वंशाची माहिती पंड्याकडे लिहिली जायची. हल्ली प्रवासाची साधने आणि सोयी खूप आहेत. पण काशीयात्रा करणारे कमी.

अमेरिकेतील मॉर्मन चर्चमधे, अगदी पद्धतशीरपणे पूर्वजांची माहिती गोळा करायची शिस्त आहे. मॉर्मन चर्चमधल्या लोकांचीच नाही तर या जगातल्या सर्व लोकांची आणि त्यांच्या पूर्वजांची लिस्ट करायची असे त्यांचे ध्येय आहे. त्यांनी काशीच्या पंड्यांना मायक्रोफिश करायचे कॅमेरे देऊन त्या माहितीची कॉपी मॉर्मन डेटाबेसमधे ठेवली आहे. ती आपल्याला ॲक्सेस करून, त्यांनी गोळा केलेल्या माहितीचा आपल्याला उपयोग नक्कीच करता येईल.

अमेरिकेत बऱ्याच लोकांना फॅमिली ट्री, ट्रेसिंग फॅमिली रूटस् याचा छंद असतो. ज्याला इंग्रजीत Geneology म्हणतात तो विषय पॉप्युलर आहे. त्याचे क्लब आहेत. पण आपणा मराठी किंवा भारतातून आलेल्यांना त्याचा फारसा उपयोग नाही. कारण आपली सगळी roots भारतात. same thing with genealogy companies, Ancestry.com सारख्या वेबसाइट DNA टेस्टिंग करून तुमचे व तुमच्या पूर्वजांचे नातेवाईक शोधायला मदत करतात. पण त्यांचा बहुतेक डेटा अमेरिकन आणि युरोपीयन लोकांचा आहे. त्यामुळे त्याची मराठी आणि भारतीय मेंबरशिप खूप वाढल्याशिवाय आपले फॅमिली ट्रीज् करायला त्याचा तितकासा उपयोग नाही.

आणखी वीस, पंचवीस, तीस वर्षांनी अमेरिकेत जन्मलेली आणि वाढलेली आपली मुले त्यांच्या Roots चा विचार करायला लागतील. अमेरिकेत आलेल्या पहिल्या, दुसऱ्या पिढीपेक्षा त्यांचे भारतातले संबंध, साहजिकच कमी असतील. त्यामुळे त्यांना उपयुक्त अशी काही माहिती आपण तयार ठेवली तर त्यांना त्याचा उपयोग खासच होईल. म्हणून मी आमच्या फॅमिलीविषयी ('घराण्या'विषयी असे मुद्दाम म्हणत नाही. उगीच बडेजाव नको) जमेल तेवढी माहिती गोळा करत आहे. मुलांना लागली तर उपयोगी पडेल.

अमेरिकेत चाळीस-पन्नास महाराष्ट्र मंडळे आहेत. इतर देशात आणखी आहेत. प्रत्येक मंडळाने ''वंशावळ'' अभ्यास ग्रुप सुरू केला तर पाच-सहा वर्षात भरपूर माहिती आणि फॅमिली ट्रीज् तयार होतील. आणि इथे जन्मलेल्या किंवा वाढलेल्या आपल्या मुलांना 'मी कसा झालो?' असा विचार पडला तर लोकल महाराष्ट्र मंडळाला किंवा बृहन्महाराष्ट्र मंडळाला फोन करून सुरुवात करता येईल.

सिॲटल महाराष्ट्र मंडळात Geneaology चा ग्रुप सुरू करायचा माझा प्लॅन आहे. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या २०२८ च्या अधिवेशनात कितपत प्रगती झाली आहे ह्याचा अहवाल देऊच.

Who knows? कदाचित अजून माहीत नसलेले माझे लांबचे नातेवाईक मला सापडतील. निसरगंड सापडण्याची शक्यता कमी. But any 'डांगे'ज् with pune roots ?

विठ्ठल



ज्याचा त्याचा विठ्ठल
ज्याचा त्याचा विठ्ठल ज्याने त्याने शोधावा .
ध्यानी मनी स्वप्नी सूर त्याचा आळवावा.
ज्याचा त्याचा विठ्ठल ज्याने त्याने शोधावा .

टाळ मृदुंग वीणा चिपळ्या हाती घेऊन चालावे
तुळसाईचे नित्य स्मरण भक्तिभावे करावे
कोणत्या रूपात कधी विठ्ठल उभा येऊन ठाकला
डोळा नाही दिसला पण विवेकाने जाणवला
त्याच्यासाठी घटकाभर वेळ राखून ठेवावा
ज्याचा त्याचा विठ्ठल ज्याने त्याने शोधावा .

प्रत्येक वेळी विठ्ठल नसतो चंद्रभागेच्या तीरावर
प्रत्येक वेळी विठ्ठल नसतो शेतावरच्या बांधावर .
धुणी धुतो भांडी घासतो पाणी भरतो कुणाकडे
ध्यानी ठेवा अशाच रूपात विठ्ठल असतोच आपल्याकडे
अशा जीवांना जाणून घेता विठ्ठल मनी आठवावा
ज्याचा त्याचा विठ्ठल ज्याने त्याने शोधावा

कोणी म्हणेल आत्मज्ञान, कोणी म्हणेल परमधाम
संतांसाठी जगतज्योत् विज्ञानाचा ऊर्जास्रोत
नाना प्रतिमा अवतार महिमा परब्रम्ह म्हणायचे
अवघा रंग एक म्हणत, चंद्रभागेत खेळायचे.
पावलांचा प्रवास माऊली गंध टिळा लावायचा
या हृदयीचा विठ्ठल विठ्ठल
अवघ्या हृदयी शोधायचा
अवघ्या हृदयी शोधायचा.

-ज्योति राम (सिॲटल)

असे होते स्वातंत्र्यवीर

अरुण माधव रोडे
पाषाण, पुणे

'जब जब रामने जनम लिया, तब तब पाया वनवास' नीटसे आठवत नाही. परंतु चाळीस- एक वर्षांपूर्वी पाहिलेल्या हिंदी सिनेमातले हे गीत आठवले, कारण घडलेही तसेच, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचेवरील काहींनी केलेल्या वक्तव्यावर पुन्हा एकदा सावरकरांचा विषय ऐरणीवर आला. देशाच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेल्या व केवळ स्वातंत्र्याकरता लढत लढत मरण्याची लहानग्या वयात प्रतिज्ञा करून ती अखेरपर्यंत धसास लावणारे सावरकर हे खरे देशभक्त! मग त्यांच्या देशभक्तीला आव्हान करणारे हे कोण? त्यांना सावरकर समजलेच नाहीत. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा होम करणारे स्वातंत्र्यसेनानी कोठे, तर मिळालेल्या स्वातंत्र्यात सत्ता मिळवून भ्रष्टाचारात गुंतलेले आजचे राज्यकर्ते, जेव्हा अशा महापुरुषांवर चिखलफेक करतात तेव्हा त्यांची चीड तर येतेच, परंतु त्यांच्या कोत्या मनोवृत्तीची कीवही येते. स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाची होळी करणारे, हालअपेष्टा भोगणारे सावरकर स्वातंत्र्यानंतरही उपेक्षित देशभक्त राहिले व त्यांच्या महानिर्वाणानंतरही त्यांच्या हेतुबाबत संशय घेणारे आजही त्यांना अग्निदिव्य करावयास लावत आहेत. रामाप्रमाणे सावरकरांचा वनवास मर्यादित नव्हता. आजच्या पिढीला व राज्यकर्त्यांसह सर्वांना परत एकदा सावरकर समजले पाहिजेत. रोमहर्षक जीवन, ज्वालामुखीसारखे प्रदीप्त व्यक्तीमत्व, असामान्य कर्तृत्व, अजरामर साहसी प्रसंग, असामान्य वक्तृत्व, कवी, साहित्यिक, क्रांतिकारक एक ना अनेक गुणवैशिष्ट्य असणारे सावरकर हे एक ना अनेक असा प्रश्न पडतो. खालील बाबी पाहता त्याचे असामान्यत्व समजते.

१. ब्रिटिश सरकारचे अनुदान मिळत असलेल्या महाविद्यालयाच्या वसतीगृहातून काढून टाकलेले सावरकर हे पहिले भारतीय विद्यार्थी होत.
२. देशभक्ती दाखविली म्हणून एका भारतीय विद्यापीठाने ज्यांची पदवी काढून घेतली असे सावरकर हे पहिले भारतीय पदवीधर होत.
३. सार्वजनिक रीतीने परदेशी कपड्यांची प्रचंड होळी करणारे ते पहिले भारतीय पुढारी होत.
४. ज्या काळी 'राज्य' किंवा 'स्वराज्य' हा नुसता शब्द उच्चारला तरी संकट ओढवत असे. त्याकाळी संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हे भारताचे उद्दिष्ट आहे, असे प्रकटपणे उद्‌घोषित करणारे ते आद्य क्रांतिकारक राजकीय नेते होत.
५. ब्रिटिश राजकीय विचारसरणी व्यक्त केली म्हणून ब्रिटिश सरकारने बॅरिस्टर ही पदवी देण्यास नकार दिलेले ते पहिले बॅरिस्टर होत.
६. भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय महत्व मिळवून देणारे पहिले भारतीय नेते.
७. ज्यांचा ग्रंथ छापण्यापूर्वीच वा प्रकाशित होण्यापूर्वीच दोन राष्ट्रांच्या सरकारांनी तो जप्त केला व त्या ग्रंथाला जागतिक साहित्य क्षेत्रात एक अजोड बहुमान मिळवून दिला, असे सावरकर हे पहिले ग्रंथकार होत.
८. ब्रिटिश न्यायालयाचा अधिकार अमान्य करणारे ते पहिले बंडखोर भारतीय नेते होत.

९. हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयात ज्यांच्या अटकेच्या प्रश्नांवर अटीतटीचे रण माजले असे जगाच्या इतिहासातले ते पहिले राजकीय बंदिवान होत.

१०. जगाच्या संपूर्ण इतिहासात ५० वर्षांची, अर्ध्या शतकाची जन्मठेपेची शिक्षा झालेले ते पहिले भारतीय राजकीय बंदिवान होत.

११. कागद व लेखन साहित्य नसतांना कारागृहाच्या भिंतीवर काट्याने अगर अणकुचीदार दगडाने महाकाव्य कोरणारे ते पहिले महाकवी होत.

१२. कीर्तीची हाव ठेवली नाही, लक्ष्मीची आराधना केली नाही, वैयक्तिक मोठेपणाची हाव बाळगली नाही, सदैव राष्ट्राचीच चिंता वाहिली असे ते महान देशभक्त होत.

१३. आपल्या अद्‌भुत स्मरणशक्तीने संपूर्ण डेमॉस्थनिस, संपूर्ण मिल्टन, संपूर्ण बायबल, तोंडपाठ असलेला मेकॉलेला सावरकर हेच तोडीला तोड प्रतिस्पर्धी होते.

अशा दीपस्तंभाप्रमाणे जीवन लाभलेल्या व भावी पिढ्यांना प्रकाश देणाऱ्या स्वातंत्र्यवीरावर, ज्यांनी सावरकर समजून घेतला नाही, त्यांनी चिखलफेक करावी हे जीवनदात्या सूर्यावर थुंकण्यासारखे आहे. प्रत्येक भारतीयाने एकदा तरी सावरकरांची माझी जन्मठेप वाचावी म्हणजे अशी वक्तव्ये करण्याची बुद्धि होणार नाही.

सावरकर जीवनक्रम

(जन्म: शके १८०५ वैशाख कृ.६. निर्वाण: शके १८८७ फाल्गुन शु.६)

दिनांक	घटना
२८ मे १८८३	जन्म, भगूर गाव, जि. नासिक
१८९२	मातृनिधन
मे १८९८	देवीपुढे सशस्त्र क्रांतीची शपथ
५ सप्टें. १८९९	पितृनिधन
१ जाने. १९००	मित्रमेळ्याची स्थापना
मे १९०४	अभिनव भारतची स्थापना
दसरा १९०५	विदेशी कपड्यांची होळी
९ जून १९०६	लंडनला प्रयाण
१० मे १९०७	१८५७च्या स्वातंत्र्ययुद्धाचा लंडनमध्ये सुवर्ण महोत्सव
जून १९०७	मॅझिनीचे चरित्र प्रसिद्ध केले
२ मे १९०८	लंडनमध्ये प्रथम शिवजयंत्युत्सव
१९०८	हॉलंडमध्ये सत्तावनचें स्वातंत्र्यसमर (इंग्रजी) गुप्तपणे छापले
मे १९०९	बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण, पण पदवीस नकार
८ जून १९०९	वडील बंधु श्री. बाबाराव यांना जन्मठेप काळेपाणी शिक्षा
१ जुलै १९०९	धिंग्राकृत कर्झन वायलीचा वध
२४ ऑक्टों. १९०९	लंडनमध्ये दसऱ्याचा उत्सव. अध्यक्ष बॅ. गांधी
८ जुलै १९१०	मार्सेलिस बंदरात समुद्रात उडी
२४ डिसें. १९१०	जन्मठेप काळ्या पाण्याची शिक्षा
३१ जाने. १९११	दुसऱ्या जन्मठेपेची शिक्षा
४ जुलै १९११	अंदमानच्या कारावासास (एकलकोंडीत) प्रारंभ
एप्रिल १९१९	बाबारावांच्या पत्नी सौ. येसूवहिनींचे निधन
३० नोव्हें. १९२०	पत्नी, धाकटे बंधू, भावजय अंदमान कारागृहात जाऊन भेटले
२ मे १९२१	बाबाराव आणि तात्याराव दोघांची अंदमानातून हिंदुस्थानात पाठवणी
१९२१, १९२२	अलिपूर (बंगाल) आणि रत्नागिरी येथील बंदिवास
१९२३	मुंबईचे राज्यपाल लॉईड जॉर्ज यांची सावरकरांशी मुक्ततेविषयी चर्चा
६ जाने. १९२४	राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यात राहणे या दोन अटींवर येरवडा कारागृहातून सुटका
७ जाने. १९२५	कन्या प्रभात हिचा जन्म
१० जाने. १९२६	हुतात्मा स्वामी श्रद्धानंदांच्या स्मरणार्थ श्रद्धानंद साप्ताहिक सुरू केले
१ मार्च १९२७	रत्नागिरीस गांधीजी-सावरकर भेट आणि चर्चा
१६ नोव्हें. १९३०	रत्नागिरी स्पृश्यास्पृश्यांचे पहिले प्रकट सहभोजन
१० मे १९३७	रत्नागिरी-स्थानबद्धतेतून विनाअट संपूर्ण मुक्तता

१५ एप्रिल १९३८	महाराष्ट्र–साहित्य संमेलन २२वे अधिवेशन, मुंबई, अध्यक्ष
१ फेब्रु. १९३९	निझामविरोधी भागानगरचा लढा प्रारंभ
२२ जून १९४१	सुभाषचंद्र बोस–सावरकर यांची सावरकर सदनात भेट
२५ डिसें. १९४१	भागलपूरचा नागरिक सभा स्वातंत्र्यार्थ लढा
५ नोव्हें. १९४३	अखिल महाराष्ट्र नाट्यशताब्दी महोत्सव (सांगली) अध्यक्ष
१९ एप्रिल १९४५	अ.भा. संस्थान–हिंदुसभा–अधिवेशन (बडोदे) अध्यक्ष
एप्रिल १९४६	मुंबई सरकारने संपूर्ण सावरकर वाङमयावरील बंदी उठवली
१५ ऑगस्ट १९४७	दुःखमिश्रित आनंद! घरावर भगवा ध्वज आणि राष्ट्रध्वज उभारले
५ फेब्रु. १९४८	गांधी हत्येनंतर सुरक्षा निवेधान्वये अटक
१० फेब्रु. १९४९	गांधी हत्या अभियोगातून निष्कलंक सुटका
१९ ऑक्टो. १९४९	धाकटे बंधू डॉ. नारायणराव यांचे निधन
डिसें. १९४९	अ.भा.हिं.म. सभा कलकत्ता अधिवेशनाचे उद्घाटक
४ एप्रिल १९५०	पाक पंतप्रधान लियाकत अलींची दिल्ली भेट. म्हणून अटक व बेळगाव कारागृहवास
फेब्रु. १९५५	रत्नागिरीच्या पतितपावन मंदिराच्या सुवर्ण महोत्सवाचे अध्यक्ष
२४ डिसें. १९६०	मृत्युंजय दिन साजरा. (या दिवशी ५० वर्षे जन्मठेप संपत होती.)
१४ जाने. १९६१	मृत्युंजय दिनानिमित्त शेवटचे प्रकट भाषण (पुणे)
८ नोव्हें. १९६३	पत्नी यमुनाबाई यांचे निधन
१ ऑगस्ट १९६४	मृत्युपत्र केले
१ फेब्रु. १९६६	अन्न नि औषध वर्ज्य करून प्रायोपवेशनास प्रारंभ
२६ फेब्रु. १९६६	शनिवारी सकाळी ११.१५ वा. देह विसर्जित. वय ८३.
२७ फेब्रु. १९६६	मुंबईच्या चंदनवाडी विद्युतदाहिनीत अग्निसंस्कार

सुटीचा पहिला दिवस

(भारतात गेल्यावर)

कोकिळेचं गाणं, कावळ्याची कावकाव
भल्या पहाटे जागे होते सारे गाव

कुकरच्या शिट्या अन वाजतात भांडी
ऑफिसची वेळ झाल्याची पिटतात दवंडी

रिव्हर्स मारताना कळवळतो मोझार्ट
स्कूटरची डरकाळी, करताना किक स्टार्ट

गॅलरीत फोनवर काकू सकाळी सकाळी
सगळी सिक्रेट्स ऐकतो बागेतला माळी

किचनमधे शिरताच येतो खमंग वास
खिचडी वा पोह्यांचा बेत असणार खास!

अंगणातला चाफा आणि थोरला पिंपळ
खुणावतात मला म्हणतात ये ना जवळ

कोपऱ्यावरचा रद्दी डेपो दुरून खुणावतो
जुन्या वह्यांची मला आठवण करून देतो

घराशेजारचे दत्तमंदिर जवळ बोलावते
हळुवार शांत घटकेचे आश्वासन देते

लाईट जातो मधेच, काडीपेटीचा वास
प्रगत देश आपला आहे अजून तसाच

रंग, गंध, आवाज हल्ला करतात मिळून
जेटलॅग बिचारा माझा, जातो लगेच पळून!

– मधुरा हलसगीकर
(सिॲटल)

बहिणाबाईंची गाणी

अश्विनी देवधर
सिॲटल

बहिणाबाई माझ्या मनात शिरली मी शाळेत होते तेव्हांच. दूरदर्शनवर तिच्यावर एक माहितीपट दाखवला तेव्हा. कोवळ्या वयात जे समोर येतं त्याचा अर्थ जरी पुरता आकलन झाला नाही तरी हे काहीतरी विशेष आहे एवढं तर नक्कीच कळतं. शिवाय मग आज्जी घरात असल्यामुळे ''अगं, बहिणाबाई लाव की जरा'' असं म्हणून टेपवर तिची गाणी ऐकायची. अशी ती गाणी, ते शब्द कानावर पडत राहिले आणि 'बहिणाबाई चौधरी' नावाची ही खानदेशातली प्रतिभावान पण रूढार्थाने अनोळखी अशी ही कवयित्री मनांत कुठेतरी ठाण मांडून बसली. मग खूप वर्षांनी संसारात रमून गेलेली असताना तिच्या गाण्यांवर करायच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने पुन्हा एकदा तिने माझा हात धरला. मग तेव्हा त्या शब्दांचे अर्थ नव्याने उलगडू लागले. शहाणपण, सोशिकता, कष्टाळूपणा, वात्सल्य, विरक्ती असे अनेक भाव तिच्या कवितांतून सामोरे येऊ लागले. ''माझी माय सरसोती, मले शिकवते बोली'' किंवा ''माझ्यासाठी पांडुरंगा तुझं गीता भागवत, पावसात सामावलं माटीमधी उगवतं'' ''तुझ्या पायाची चाहूल लागे पानापानांमंधी, देवा तुझं येणं जाणं वारा सांगे कानामंधी'' असं तत्वज्ञान आणि अध्यात्म सोप्या भाषेत सांगणारी ती वडीलधारी मैत्रीण वाटू लागली.

ऐकणाऱ्याला सहज आपल्याशा वाटतील अशा या कविता इतक्या साध्यासुध्या आणि खऱ्या आहेत. पण त्यामधला आशय किती थक्क करणारा आहे.

दररोजच्या ग्रामीण शेतकरी जीवनातले, जगण्यातले, व्यवहारातले अनुभव तिने अगदी ओघवत्या भाषेत व्यक्त केले. तिची कविता इतकी साधी आणि गोड आहे की वाचताना कुठेही थबकावं लागत नाही, शब्दांची वीण उसवावी लागत नाही, प्राण कंठाशी येत नाहीत. पानांवरून पावसाचे थेंब सहज ओघळावेत तशी तिची कविता आहे. त्यात कसलाही अट्टहास, अभिनिवेश नाही. तिने मुळी कुणी वाचाव्या आणि वाहवा करावी म्हणून कविता केलीच नाही आणि तिच्या बाबतीत ''कविता करणे'' हा मुद्दाच नव्हता. कविता तिच्या मनात उमटत होती. तिला तर ती लिहिता सुद्धा येत नव्हती. आपण हसतो, रडतो, प्रेम करतो, त्रागा करतो तशा ती कविता करत होती. तिच्या नजरेला जसं जग दिसलं, तिच्या मनात तरंग उमटवून गेलं, काही शिकवून गेलं, दुखवून गेलं ते ते सारं तिच्या शब्दातून पाझरलं.

''माझं सुख, माझं सुख, हंड्याझुंबरं टांगलं, माझं दुख, माझं दुख, तयघरात कोंडलं'' असं म्हणणारी ती किती बरं शहाणी आणि विचारी होती. जबरदस्त निरीक्षणशक्ती, तरल मन याची देणगी असणारी ती. भोवतालचं जग हजार डोळ्यांनी बघते. ''किती रंगविसी रंग, रंग भरले डोयात, माझ्यासाठी शिरिरंग रंग खेळे आभायात'' असं तिने सगळ्याशी नातं जोडलं. माणूस, माती, निसर्ग आणि ईश्वराशी सुद्धा!!

निसर्गातल्या चमत्कारांचा साक्षात्कार तिला पदोपदी होतो. विविध रूपात देव पाहायची तिची सूक्ष्म दृष्टी आणि त्याचवेळी मातीशी जोडलेली अतूट नाळ, ह्यामुळे तिच्या कवितेला अगदी मोजक्या शब्दात अर्थगर्भ रूप येतं.

धरतीमध्ये बी रुजतं आणि पाहता पाहता शेत बहराला येतं हा सृजनापासून सुफलतेचा प्रवास ती इतक्या कोमल शब्दात करते की मन भरून येतं. ''धरित्रीच्या कुशीमधीं बियबियाणं निजली, वऱ्हे पसरली माटी जशी शाल पांघरली''!! मातीत खपून तिने अमाप कष्ट केले. ज्या हातांनी मोती पिकतात ते हात सुखासीन होत नाहीत. रोजचं जगणं आनंदानं जगताना अडीअडचणींचा बाऊ न करता कमलपत्राच्या अलिप्तपणे त्यातून मार्ग काढावा लागतो. हा जगण्याचा तोल तिला साधला होता. म्हणूनच तिच्या साध्यासुध्या प्रतिमांमधून रसाळ काव्य साकारलं आहे.

सुगरणीच्या घरट्याकडे बघून ती माणसाला सांगते.. ''तिची उलूशीच चोच तेच दात तेच ओठ, तुले दिले रे देवानं दोन हात दहा बोटं'' या उपजत शहाणपणामुळे तिने कधी आक्रस्ताळेपणा,

सुखाचा देखावा आणि दु:खाचं भांडवल केलं नाही. हक्कांसाठी भांडण वगैरे शब्द न वापरता ती तिच्या मनात ठाम होती. स्पष्ट होती. त्यामुळे तिच्याकडे वैचारिक गोंधळाला जागा नव्हती. संसारात प्रवेश केल्यावर त्याबद्दल येणाऱ्या जबाबदाऱ्या पेलायलाच हव्यात. सुख मागून मिळत नाही आणि दु:ख येणार तेव्हा येतंच. त्याबद्दल तक्रार आणि त्रागा कशाला? संसार म्हणजे चुलीवरचा तवाच. भुकेला भाकर हवी तर हाताला चटके बसणारच.

बुद्ध म्हणतात आधीच माणसाचा जन्म मिळणं कठीण आणि त्याहून कठीण तो निभावणं आहे. जगताना तारेवरची कसरत करावी लागते. आयुष्याची वाट चालतांना सगळ्यांमध्ये राहिलो तरी आपलीच आपल्याला सोबत असते. ऐन तारुण्यात वाट्याला आलेल्या पतीनिधनाच्या अपार दु:खाला कड घालताना तिला तिच्या शब्दांचा आधार आहे. आणि तिची सोबतीण बसलेल्या धरतीलाच ती म्हणते ''सांग सांग धरतीमाता, अशी कशी जादू झाली.. झाड गेलं निघीसनी मागे सावली उरली'' अशी बिकट वाट चालताना तिला माणसांचे अनुभव आले, त्यांचं चमत्कारिक वागणं दिसलं. ''मानुस मानुस मतलबी रे माणसा.. भरला डाडोर भूलीसनी जातो सुध, खाईसनी चारा गाय म्हैस देते दूध'' माणसाला अरे जरा माणसासारखा वाग रे, असं ती ठणकावते.

''मन मोकाट मोकाट, त्याले ठाई ठाई वाटा, जशा वाऱ्यानं चालल्या पाण्यावरल्या रे लाटा ।। मन एवढं एवढं जसा खाकसचा दाना, मन केवढं केवढं आभायात बी मायना'' माणसाचं मन असं कसं घडलं याचा तिला अचंबा वाटतो. मन जह्यरी मन लह्यरी, अशा मनात अत्यंत टोकाच्या विचारांचे तरंग कसे उठतात, याने ती विचारात पडते. एकेक क्षणी विजेसारखं तळपून उठणारं मन कधी कमालीचं कोडगं होतं. हे असं मन घडवताना देवाने काय विचार केला असा तिला प्रश्न पडतो.

नामवंतांनी गौरवलेली तिची कविता मार्मिक, परखड आणि बुद्धीची चमक दाखवणारी आहे. बोटचेपेपणा तिला मान्य नाही. विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, स्त्री मुक्ती, स्त्री शक्ती हे शब्दही तिच्या कानावरून गेले नसतील, पण ती मुळातच खंबीर आणि स्वतंत्र विचारांची होती. तिचे विचार घट्ट होते. तिला जे वाटलं ते तिने तिच्या कवितांमधून म्हटलं. नेमक्या शब्दात सांगितलं. ''नको लागू जीवा सदा मतलबापाठी'' असं ती म्हणते. जीवनविषयक तत्वज्ञान अतिशय रसाळ करून आणि इतक्या चपलख शब्दात सांगते की ते कालातीत होऊन जातं. ''ज्याच्यामधी नाही भाव त्याले भक्ती म्हनू नही, ज्याच्यामधी नाही चेव त्याले शक्ती म्हनू नही'', बहिणाबाई सश्रद्ध आहेच पण निसर्ग, देव, धरती या साऱ्याबद्दल तिच्या मनात अतीव कृतज्ञता आहे. देव चराचरात आहे यावर तिचा विश्वास आहे. ''काम करता करता देख देवाजीचं रूप'' अशी आपल्या कामाबद्दलची तिची भूमिका आहे. ही ठोस श्रद्धा महत्वाची आहे, कारण ती तिला निर्बल न करता खंबीर आणि सकारात्मक बनवते.

माणसाचा आंतरिक विकास करणारी, त्याला माणूस म्हणून प्रगल्भ करणारी श्रद्धा केव्हाही चांगलीच. देव शोधला तर प्रत्येकाच्या हृदयात आहेच. मिटल्या डोळ्यांपुढेही तो आहेच. ईश्वराप्रती कृतज्ञता व्यक्त करताना ती म्हणते ''अरे देवा तुझं देणं नाही सरलं सरलं, देलं मोटभरी दान पोट भुकेलं उरलं'' ''अरे देवा तुझं घेणं कहि नहि कहि नहि, तुज्या पुढचा निवेद मानुसच जातो खाई'' माणूस हावेसाठी देवालासुद्धा वेठीला धरतो. सुखासाठी नवस बोलतो आणि दु:खात देवाला बोल लावतो. ''माणूस मोठा हिकमती, याचं घोंगडं त्याच्यावर, दगडाचा केला देव शेंदुराच्या जीवावर''

माहेरी जाणं हे एक सण साजरा करण्यासारखं असण्याचा तो काळ होता. तिची माहेरावरची कविता इतकी गोड आहे. ''लागे पायाला चटके, रस्ता तापीसनी लाल, माझ्या माहेरची वाट मले वाटे मखमल'' हे तर सगळ्या बायकांचं प्रातिनिधिक वाक्य होऊ शकेल. माहेरची ओढ दाखवताना अगदी गोड उपमा ती देते. वाट चालताना ठेच लागली तर तो माहेरच्या वाटेवरचा दगड त्याला वाचा फुटली असं ती म्हणते. ''लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते'' ह्या ओळीतून मायलेकींचे रेशीमबंध अधोरेखित करताना अन् स्त्री म्हणून जन्म झाल्यावर जे फक्त एक स्त्रीच जाणू शकते अशा एका अनाम धाग्याने ती साऱ्याच माय लेकी बाळी सुनांना जोडून घेते.

मातीशी घट्ट नातं असणारी बहिणाबाई धरणीमातेबद्दल कृतज्ञ होती. ''अशी धरित्रीची माया अरे तिले नाही सीमा, दुनियेचं सर्वे पोट तिच्यामधी झालं जमा'' अशी तिची धारणा होती. काळीशार, केल्या कष्टांचं चीज करणारी माती आणि तिच्यावर आपली विशाल छाया धरणारं आभाळ हे तिचे सतत सांगाती होते. डोळ्यासमोर रोज दिसणारा हा विशाल भव्य पट तिला न बोलता द्यायला शिकवत होता. सोसायला, धीर धरायला शिकवत होता. आणि ते जाणवणारं अत्यंत तरल आणि संवेदनशील मन तिच्याकडे होतं.

''जीव देवानं धाडला'' या कवितेत ती एक चिरंतन सत्य सांगून जाते. जीवन एक प्रवास आहे आणि जगणं मरणं दोन्ही आपल्या हातात नाही. मी करतो मी करतो असं म्हणताना आपला श्वासोच्छवास किती आपोआप चालू असतो तेच आपल्या लक्षात येत नाही. शेवटी जगणं आणि मरणं यात एका श्वासाचं अंतर आहे. ''नहि सरलं सरलं जीवा तुज येणं जाणं जसा घडला मुकाम त्याले

म्हणति रे जिणं'' ही ओळ तर कुठल्याही संतकाव्यात सहज सामावून जाईल अशी आहे.

जन्म मरण हे चक्र अव्याहत चालू आहे. म्हणून ''जग जग माझ्या जीवा असं जगणं तोलाचं उच्च गगनासारखं धरित्रीच्या रे मोलाचं'' असं सांगून ती ह्या कवितेचा शेवट करते. जगताना जाणीवपूर्वक जीवन जगावं, शेवटी तेच आपल्या हातात असतं.

बहिणाबाई जशी बोलली तशीच जगली. काम करता करता तिला सुचलेल्या कितीतरी ओळी मातीने, आभाळाने ऐकल्या असतील किंवा वाऱ्यावर लहरून गेल्या असतील. काही तिच्या मनातून ओठावरही आल्या नसतील. आपल्यापर्यंत ज्या पोहोचल्या त्या ती गेल्यानंतर अनेक वर्षांनी. पण अजूनही त्या तितक्याच ताज्या, खऱ्या आणि पटणाऱ्या आहेत. अजरामर साहित्य कालातीतच असतं, नाही का?

WONDERTREE

Trusted by Indian Farmers for 4,000 years

Neem Cake

IF YOU ARE GARDENING, ADD NEEM CAKE TO ALL YOUR PLANTS (A SOIL AMENDMENT).

INDOOR OR OUTDOOR

Scan To Learn How To Use Neem Cake

+ natural pest & pathogen control

+ slow-release

+ improves soil texture

WWW.WONDERTREEORGANICS.COM
MADE IN USA

वंदन हे तुज, माय मराठी!

सुरेख स्वप्ने मनात धरुनी
विहार करतो विशाल गगनी
वायु वेगे होता प्रगती
यश शिखरांची तोरणं सजती
वंदन हे तुज माय मराठी !

ना सीमांचे कुंपण अडवी
अज्ञाताचे भय ना जखडी
शौर्य शाईने भरू लेखणी
लिहिण्या तत्पर नवी कहाणी
वंदन हे तुज माय मराठी !

विकास होता विचार येती
घेऊन धुरटे पंखांवरती
कुणा आधारे धाडस करती ?
तुझ्याच संस्कारांची शक्ती
वंदन हे तुज माय मराठी !

असशी माता किती वीरांची
किती समर्पण किती आहुती
लखलखणारी पूर्व कीर्ती
किती मुखांनी गावी महती
वंदन हे तुज माय मराठी !

तुझाच आशिष असता पाठी
जुळती येती रेशिम गाठी
जणू विणलेली वैश्विक नाती
अभिमानित अलौकिक ख्याती
वंदन हे तुज माय मराठी !

–गौरी विद्वांस (सिॲटल)

हवाई हवा...''हवाई''!! प्रवासवर्णन

सौ. चित्रा मेहेंदळे
सॅन होजे

अमेरिकेत आल्यावर पहिल्यांदा हवाई बेटांचे नाव ऐकले तेव्हा मि. इंडियातल्या श्रीदेवीच्या ''हवाहवाई'' गाण्याचीच आठवण झाली, मग प्रत्यक्षात तिकडे गेल्यावर तिथल्या निसर्ग सौंदर्याने भारावून जाऊन ''ये हसीं वादियां'' हे गाणे कानात गुंजत राहिले! मी व माझा नवरा - नितीन दोघांनाही भटकंतीची हौस. आमच्या या छंदाला आणखी खतपाणी मिळाले ते मुख्यत्वे इथे असलेली अनेक निसर्गरम्य ठिकाणे, सुबक रस्त्यांचे सर्वत्र जाळे आणि विश्रांतीसाठी उत्तम व्यवस्थेची उपलब्धता या सोईसुविधांमुळे. गेल्या अनेक वर्षात अमेरिका व इतरही बरेच देश फिरलो. पण हवाई बेटांनी आमच्या मनात एक खास जागा निर्माण केली आहे, हे मात्र निश्चित!

हवाईमध्ये पोचल्यावर सर्वत्र हिरवीगार झाडी - नारळ-पामची झाडे, विलोभनीय समुद्रकिनारा, समुद्रावरच्या फेसाळत्या लाटा, आणि ह्या सौंदर्याचे दर्शन घडवत जाणारे वळणावळणाचे रस्ते आपल्या मनाचा ठाव घेतात! इथले निसर्गसौंदर्य बघताना माझ्या कोकणातल्या आजोळच्या सुंदर आठवणीही ताज्या होतात! पहिल्या ट्रिपमध्ये आम्ही माऊवी आणि ओहाऊ ह्या बेटांना जाऊन आलो. सूर्यास्त बघायला एका बीचवर गेलो आणि समोर बघून थक्क झालो! गडद निळ्याशार समुद्राच्या लाटांच्या पार्श्वभूमीवर समोरच्या फिकट निळ्या आकाशाच्या भव्य कॅनव्हासवर गुलाबी आणि केशरी रंगांची मुक्त उधळण झाली होती आणि त्याचा प्रकाश पाण्यावर प्रतिबिंबित होत होता! अहाहाहा - आम्ही बघितलेला तो सर्वात सुंदर सूर्यास्त! माऊवीमध्ये हलाईकेला, पाणबुडी (सबमरीन)-राईड, रोड टू हॅना ह्या गोष्टीही बघितल्या. पाणबुडी राईडमध्ये पाण्याखाली १०० फुट नेऊन तिथल्या मासे, कोरल रीफ, जलचर वनस्पती अशांनी बनलेले एक रंगीबेरंगी विलक्षण विश्व आपल्याला काचेतून दाखवतात! पाणबुडी खाली जात असताना तिच्यावर पाण्याचा किती प्रचंड दाब असेल ह्या विचाराने छाती दडपते पण तंत्रज्ञानामुळे आपल्याला तो दाब काहीच जाणवत नाही ह्याची

फारच कमाल वाटते! ''रोड टू हॅना'' ही वळणावळणाच्या रस्त्यावरून केलेली अतिशय निसर्गरम्य सफर! एका बाजूला निळाशार फेसाळता समुद्रकिनारा आणि दुसऱ्या बाजूला हिरव्यागार उंचच उंच डोंगररांगा! बघावं तिकडे ''पोस्टकार्ड फ्रेम'' दृश्य! डोळ्यांत जेवढे सौंदर्य साठवू तेवढं कमीच! पहिला स्नोर्केलिंगचा अविस्मरणीय अनुभव घेतला तो माऊवीच्या मोलोकीनि आयलंडजवळ. पहाटे चार वाजता उठून दोन्ही मुलांना तयार करून आम्ही सगळे बोटीने सहाच्या ठोक्याला मोलोकींनी आयलंडजवळ भरसमुद्रात गेलो. उजाडत असतानाच स्नॉर्केलिंग गियर घालून आम्ही पाण्यात उतरलो. आमच्या सगळ्या बाजूंनी रंगीबेरंगी मासे इकडूनतिकडे मस्त गिरकी घेऊन फिरत होते. काय गंमत वाटत होती! आम्हाला अक्षरशः मत्स्यालयात टाकले आहे असे वाटत होते. तिथून पुढे ''टर्टल टाऊन'' मध्ये समुद्राच्या तळातून एक मोठ्ठे कासव आमच्या समोरच अलगद लयीत डुलत डुलत वर येत होते, काय गोड व मोहक अदा होती त्याची! हा विलक्षण अनुभव दोन्ही मुलांबरोबर घेता आला ह्याचा जास्त आनंद होता. ओवाहूमध्ये पर्ल हार्बर म्युझियम, अननसाची लागवड ते कॅनिंगपर्यंतचा प्रवास, तेथील पॉलिनेशिअन संस्कृतीची माहिती, त्यांचे पारंपरिक नृत्य - ''लूआऊ'' बघायला मिळाले. ह्या लोकनृत्य प्रकारात स्थानिक कलाकारांबरोबर त्यांच्या तालावर ठेकाही धरायलाही मिळाला. ओवाहूच्या मुख्य बेटाच्या मध्यभागातून जाणारा मुख्य रस्ता, मशालींच्या उजेडात दुतर्फा रेस्टॉरंटस, दुकानांमुळे मध्यरात्रीच्या पुढेही पर्यटकांनी ओसंडून रस्ता वाहत असतो! तिथे रात्री चालत समुद्रावरून येणाऱ्या मंद वाऱ्याच्या झुळकीबरोबर शेव्हड आईस, आंबा, अननसाचा ताजा रस आणि आईस्क्रीमचा आस्वाद घ्यायची गम्मत काही औरच! पुढील दोन वर्षात आम्ही बिगआयलंड आणि कवाई ह्या दोन आयलंडनाही भेट दिली. बिगआयलंड हे हवाई बेटांमधले नावाप्रमाणेच सर्वांत मोठे आयलंड. ह्या आयलंडचे हिलो आणि कोना असे दोन भाग, तिथला निसर्गही वेगवेगळा! हिलो अगदी हिरवेगार तर कोना ज्वालामुखीच्या अवशेषांमुळे पूर्णतः खडकाळ. इथे जिवंत ज्वालामुखी (अर्थातच लांबून) बघायलाच हवा! दोन मैलांच्या अंतरात चौदा धबधब्यांवरून नेणाऱ्या उमाउमाच्या झिपलाइन्सचा एक रोमांचकारी अनुभव इथे घेतला. पहिल्यांदाच करत असल्याने सुरुवातीला वाटत असलेली भीती हवेत गेल्यावर खाली दिसणारे हिरवेगार डोंगर, दऱ्या आणि खळाळत कोसळणारे धबधबे बघून कुठल्याकुठे पळून गेली. कॉफीबियांची लागवडही छान पाहता आली. कवाई आयलंड हे हायकिंगसाठी प्रसिद्ध! तिथे जंगलाच्या आतून शेजारी वाहणाऱ्या झऱ्याशेजारून केलेला तीन तासांचा केलेला सुंदर हाईक, अप्रतिम हिंदु मंदिर , जवळ असलेला आश्रम (मॉनेस्टरी) आणि तिथे लावलेले रुद्राक्ष अरण्य हे बघायलाच हवे! ताजी रुद्राक्ष ही चकचकीत निळ्याशार गोट्यांसारखी दिसतात, ते बघून खूपच आश्चर्य वाटले. पाचूच्या रंगाचे पाणी असणारा नापाली कोस्ट, हिरवागार निसर्ग आणि उंचचउंच पर्वतरांगा बघायला हेलिकॉप्टर टूर अगदी योग्य आणि डोळ्याचे पारणे फिटवणारा हा रोमांचकारी अनुभव! हवाईची खासियत असलेली ''पोके'' ही डिश मुलांना विशेष करून आवडली. उघड्या जीपमधून ऊसाच्या आणि अन्य पिकांच्या खडकाळ शेतातून सुसाट वेगाने जायचे आणि शेवटच्या पॉइंटवर असलेल्या धबधब्यात उडी मारायची अशी जर मजा लुटायची असेल तर ATV राईड जरूर केलीच पाहिजे. एकंदरच हवाईला घेतलेले स्नॉर्केलिंग, झिपलाईन, हेलिकॉप्टर, पाणबुडी आणि ATV राईडचे अविस्मरणीय अनुभव हे आयुष्यभर जपलेली ''मर्म बंधातली ठेव'' असेल हे नक्की!

हवाईची ही चारही बेटे निसर्गाची जादुई किमया आहेत. काही गोष्टींमध्ये साम्य असले तरी प्रत्येक बेटाला स्वतःचे असे खास वैशिष्ट्य आहे. खरा स्वर्ग असेल तर कसा असेल ह्याचे वर्णन आपण जुन्या ग्रंथात, पुस्तकात, वेगवेगळ्या कवितांमधून ऐकलेले असते. पण या स्वप्नवत स्वर्गाची झलक धरतीवर ''याचि देही याचि डोळा'' बघायची असेल तर हवाई ट्रिपचा नंबर तुमच्या बकेट लिस्टवर अगदी पहिल्या नंबराने लावा! आणि या ट्रिपला जाऊन अद्‌भुत अनुभव जरूर घ्या!



जागरूक पालकत्व

रजनी पेंडसे
पॅलो आल्टो

टेनिसच्या तीनही मॅचेस एकापाठोपाठ एक जिंकून दहा वर्षाचा राघव चंदेरी चषक घेऊन बाबांकडे धावत आला. बाबाने त्याला प्रेमाने जवळ घेतले, उचलून घेऊन कार सीटवर बसवले; डोक्यावरून हात फिरवला व आधीच चालू असलेल्या कामाच्या फोनमध्ये नाईलाजानेच बुडाला. दोघेही आनंदाने उड्या मारत घरी आले. राघव धावतच आईकडे गेला. तिने त्याला घट्ट मिठी मारली, प्रेम भरल्या डोळ्यांनी कौतुक केले व एका महत्त्वाच्या मीटिंगमध्ये गुंतून गेली. टेबलवर तिने आधीच छान खायला करून ठेवले होते. राघव बराच नाराज झाला, पण खाणे घेऊन टीव्ही समोर बसला. हा आनंद शेअर करायला घरात दुसरे कोणीच नव्हते. ना भावंड, ना काका, मामा, ना आत्या, मावशी, ना आजी आजोबा !

संध्याकाळी आई-बाबांचे काम अटोपल्यावर मात्र स्वयंपाक करता करता राघवला त्यात सामावून घेऊन तिघेही प्रत्येक पॉईंट कसा चुरशीने जिंकला; याची भरपूर चर्चा करत बसले. कारण दोघेही आईबाप अतिशय सुजाण, मुलाचे कौतुक करणारे, मानसशास्त्राची जाण असणारे आणि आपल्या चिमण्यासाठी जीव ओवाळून टाकणारे. त्यांनी कौतुक तर करायला हवेच ना ! त्यांनी त्याला भरपूर व उत्तम वेळ दिला.

दुसऱ्या दिवशी शाळेत एका खोडकर मित्राने त्याला उगीचच ढकलले. टीचरने राघवलाच थोडी शिक्षा केली. खरंतर राघवची काहीच चूक नव्हती. तर त्याचा तो मित्र कुत्सित हसत होता. आई घरी न्यायला आली, पण ती कॉल वर होती व बाबा तर ऑफिसलाच होता. राघव आपला उद्वेग गिळून, खाऊ खाऊन अंगणात जाऊन बॉलवरच आपला राग काढत बसला

राघव अतिशय शांत सोजवळ, आत्मनिर्भर मुलगा. अतिशय आदर्श वाटावा असा, सर्वच नातेवाईक मित्रमंडळीमध्ये आदर्श म्हणून गणला जाणारा.

गेल्या जवळ जवळ दोन पिढ्यांपासून, घरात एक नाही तर दोनच मुले, माझी आजी म्हणायची खेळायला तर जाऊ देच पण यांना भांडायलाही कोणी नाही. यशानंतर येणारा आनंदाचा उन्माद अथवा पराजयाचा उद्वेग झेलायलाच कोणी नाही, मग या भावनांना कुठे वाटच मिळत नाही, मग त्या उद्रेकात परिवर्तित होऊन कधीकाळी मानसिक संतुलनाला धक्का तर पोचवणार नाहीत? व मग आदर्श व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी बाधक तर ठरणार नाहीत?

आनंद, दुःखच नाही, तर अनेक वेळेला अनेक छोट्या मोठ्या गोष्टी शेअर करायची प्रत्येकालाच इच्छा, गरज असते. आज-काल मध्यमवर्गीयांमध्ये भरपूर आर्थिक सुबत्ता आली आहे पण माणसांची श्रीमंती लोप पावली आहे. मुलांना कौतुकाबरोबर, शिस्त लावण्याची व आपल्या वागणुकीचा आदर्श ठेवून, त्यांना घडवण्याचीही जबाबदारी, निव्वळ आईबापाचीच नसून इतर सर्व नातेवाईकांबरोबरच मित्रपरिवाराचीही आहे.

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याला मिळणारी दाद किंवा फिर्याद दोन्हीने तो सुखावतो किंवा दुखावतो. एकत्र कुटुंब पद्धती कोसळली व आम्ही विभक्त कुटुंब पद्धती अंगिकारली. त्यामुळे घरात फक्त आई-बाबा आणि दोन किंवा एकच मूल. एकुलत्या एक मुलांच्या भावविश्वाचा तर विचार करायलाच नको. भावंडा विना वाढणाऱ्या मुलांच्या सर्वांगीण विकासाला फार मर्यादा पडतात. शेअरिंग, केअरिंग या भावनांची वाढच होत नाही. मी माझा, माझे या भोवतीच, त्याचे जग फिरते, त्याचे विश्व फिरते. त्यात आई-वडिलांचे अति व्यस्त वर्क कल्चर! मग सर्वांगीण विकास होणे अवघड जाते. मग आनंद, दुःख, हिरमोड, क्रोध, संताप, प्रेम या कोणत्याही भावना प्रकटच होत नाहीत. मग त्यांच्या निचऱ्यालाच वाव राहत नाही. भावनांचा निचरा होण्यासाठी दुसऱ्या व्यक्तीची आवश्यकता असते. काही ठिकाणी तर सिंगल पेरेंटच. बापाचा पत्ताच नाही, अथवा डायव्होर्समुळे फक्त एका वेळी एकच आई किंवा वडील. मग आदर्श निकोप समाजाची अपेक्षाच कशी करणार? अडीच तीन वर्षाचे मुलंही बाबा फोनवर कामाचे बोलतोय म्हणून गप्प राहायला शिकते, हे चांगले की वाईट? चांगले निश्चितच, पण मग त्याला एक्सप्रेशनला दुसरी जागा हवी. व्यक्तिस्वातंत्र्य भरपूर लाभले असले तरी समाजाबरोबर राहून सामाजिक, कौटुंबिक निकोप आणि उमेदीच्या जीवनाची सर्वांनाच गरज आहे. दोन पिढ्यांपूर्वीची फायदा तोट्यांनी भरलेली घरे नष्ट झाली व आता चारच नाही तर तीन,दोन तर अनेकदा एकटाच जीव असलेली घरे अस्तित्वात आली. भरल्या घरातही अनेक जणांची घुसमट होत होती, ती तर नाकारता येणार नाहीच.

यासाठीच समाजाबरोबर प्रत्येक व्यक्तीने निकोप समाज निर्मितीसाठी मी व्यक्तिशः व सर्वांबरोबर काय करू शकतो याचा विचार करायलाच हवा. यासाठी तरुणांनीच नाही तर सर्व वयोगटातले लोक काय करू शकतात, यासाठी खास प्रयत्नांची गरज आहे. तरुण वर्ग त्यांच्या कामाव्यतिरिक्त अनेक गोष्टींमध्ये व्यस्त आहे पण आम्ही सीनियर काय करू शकतो, याचा मुळात विचारच करतो का? व विचारानंतर आचार करतो का? याचा मागोवा घेण्याची आवश्यकता आहे. रिकामा वेळ वाया न घालवता चार बुद्धिमान डोक्यांनी एकत्र येऊन फक्त करमणुकीव्यतिरिक्त या अशा अनेक विषयांसाठी ब्रेन स्टॉर्मिंग सेशन घ्यायला हवेत.

नातवंडांची जबाबदारी न झटकता झडझडून प्रयत्न करून आऊट ऑफ द वे जाऊन मी काय करू शकतो, याचा विचार व्हावा. यासाठी नवीन विचाराने दानधर्म, तप, भक्ती करून समाजासाठी काहीतरी करायलाच हवे. आता काय? माझे सर्व झाले. निव्वळ बघ्याची भूमिका नको. दुसऱ्याला काही कर सांगण्यापेक्षा, स्वतः काय करू शकतो, या विचाराने प्रेरित व्हावे व आचरण व्हावे म्हणून व्यक्तीश:च नाही तर सांघिक रित्याही काय करू शकतो याचा विचार व आचार व्हायला हवा.

घाव

घाव सोसता सोसता
गेले आयुष्य सरून
घाव झेलता झेलता
गेले जगणे राहून...

मन जोडण्या दुजांचे
गेले तारुण्य संपून
आपुल्याशी जगण्याचे
गेले भान विसरून...

कलंदर... बिलंदर
नाही जाहले जगणे
तमा दुजांची राखत
झाले फकिराचे जिणे...

जीवनाच्या संध्याकाळी
सारे सारे आठवता
जमा-नावेचा रकाना
सारा कोराच ये हाता...!

- अरुण रोड (पुणे)

जगणे व्हावे गाणे

डॉ. रजनी अपसिंगेकर
पुणे



संगीतं करोती कल्याणम,
आरोग्यं धन संपदा...

हे कसे काय? ते जर का कळले तर जगणे आपसूकच गाणे होऊन जाईल ..

जगण्याला जर मैफिल म्हटलं तर ती सुरेल मैफिल करण्यासाठी आपण नक्कीच मेहनत घेतो, पण हेच जर जगण्याला रडगाणं म्हटलं, तर ते त्याच प्रकारचं होऊन जातं. गाणं का रडगाणं आपणच आपले जगणे तपासून पाहणे गरजेचे आहे.

आयुष्य म्हणजे सरळ रेषा नाही. 'ईसीजी' वर सरळ रेषा उमटली की आयुष्य संपलं असं डॉक्टर सांगतात. तसंही ज्याच्या आयुष्यात चढ उतार आले नाहीत, असा कोणीच माणूस आपल्याला सापडणार नाही आणि कुणी असेल तर तो परिपूर्ण जगला असेही म्हणता येणार नाही.

माणसाला जगण्यासाठी आवश्यक गोष्टी कोणत्या? असा प्रश्न विचारला असता.. आपण चटकन म्हणतो की, अन्न, वस्त्र, निवारा आणि शिक्षण. पण खरंच हे सगळं मिळालं तर तो सुखी झाला, असं होतं का हो! कारण या सोबत शरीर स्वास्थ्य आणि मनःस्वास्थाची गरज असते. त्यासाठी काही अनुषंगिक गोष्टींशी मैत्री करणं आवश्यक असतं. या अनुषंगिक गोष्टी म्हणजेच मनाला आनंदित करणाऱ्या गोष्टी. व्यक्ती तितक्या प्रकृती.. त्यामुळे प्रत्येकालाच वेगवेगळ्या आवडी आणि निवडी असतात, प्रत्येकाची प्रकृती वेगळी असते, आनंद शोधण्याच्या पद्धती स्वभावानुरूप वेगवेगळ्या असतात. मात्र जेव्हा ज्याला जे आवडते ते करायला मिळत नाही, काय हवंय.. काय आवडतेय, तेच कळत नाही.. तेव्हा ती व्यक्ती उदास होते. अगदी पंचपक्वान्नांचे ताट समोर ठेवले तरी त्याला ते जेवावेसे वाटत नाही. त्याचं मनच लागत नाही.. काहीतरी शोधत असते..अस्वस्थ राहते. चित्त विचलित होते.. परिणामी शरीर आणि मन अस्वस्थ होऊन स्वास्थ्य बिघडते.

वैद्यकशास्त्रात रोगाचे मूळ शोधण्यासाठी मनःस्वास्थ विचारात घेतले जाते. मन म्हणजे चित्त. चित्त विचलीत झालं की मनस्वास्थ्य बिघडते आणि मानसिक व्याधीतून शारीरिक व्याधींना आमंत्रण मिळतं.

जगण्याला अर्थ प्राप्त करून घ्यायचा असेल, तर आपण आपला स्वतःचा आनंद कशात आहे ते शोधले पाहिजे. चित्ताला आनंद देणाऱ्या गोष्टीत आयुर्वेदशास्त्राने संगीताचा विचार केला आहे. संगीतामुळे आवश्यक गोष्टींच्या उपभोगात उत्तम वातावरण निर्माण होत असतं.. ही वातावरण निर्मिती महत्त्वाची असते की ज्यामुळे मन प्रसन्न होते.

वैद्यकशास्त्रात गौतमेय तंत्रात म्हटले आहे की, व्यापिनीर्ध्योमरूपाः स्युरनन्ताःस्वरशक्तयः !

म्हणजेच स्वरांच्या शक्ती अगाध आहेत. त्या आकाशाप्रमाणे सर्व व्याप्त आहेत. म्हणजेच स्वरांची शक्ती अगाध आहे. अशा या स्वरातील शक्तींच्याद्वारे...नाना प्रकारचे रोग, वेदना, यातना दूर करणे शक्य आहे, हे लक्षात आले. आपल्यातील प्राणशक्ती, मन:शक्ती, दिव्य शक्ती वाढवणे हा फार प्राचीन काळापासून चालत असलेला प्रपंच संगीतामुळे साध्य होत आहे.

उत्कृष्ट उच्च प्रतीच्या गायनानेही आजार बरे होतात. मात्र ही दैवी शक्ती प्राप्त करून घेण्यासाठी गायक-वादक संगीतज्ञ यांची बैठक शुद्ध अध्यात्माशी जुळलेली असावी लागते. फार मोठी साधना त्यासाठी आवश्यक असते, ती साधली की त्या संगीत तज्ञांच्या गायन, वादनाचा त्यांच्या स्वतःच्या प्रकृतीवर आणि ते ऐकणाऱ्या व्यक्तीच्या

प्रकृतीवरही चांगला सकारात्मक परिणाम दिसत असतो. त्यांच्या प्रत्येक स्वराचा शरीरातील प्रत्येक पेशींवर समन्वय होऊन त्या पेशी उत्तेजित होत असतात आणि रक्ताभिसरण नीट करत असतात.

अथांग सागर, निळेभोर आकाश, टवटवीत झाडे, फुले, मनाला भारावून टाकणारी चित्रकृती, एखादी सीरिअल, सरगम, तानपुऱ्याचा पंचम, मायेचा स्पर्श, प्रेमाचा शब्द ..अशा सुखकर गोष्टी जर का जाणीवपूर्वक अनुभवल्या तर जगणं गाणं होऊन जाईल .

आपल्या अवतीभवतीची जी चराचर सृष्टी आहे, त्यात लय व्यापून आहे. आपले शरीर आणि सभोवतालची वातावरणातील लय परस्परांशी संवाद साधत असते.

जपानमधील एक संशोधक मासारू इमोटो यांनी २५ वर्ष पाण्याचा अभ्यास केला. ज्यावेळेस त्यांच्या लक्षात आलं, की माणसाच्या विचारांना, संगीतातील स्वरांना, बोललेल्या शब्दांना, मंत्राला प्रतिसाद देण्याच्या बाबतीत पाणी हे एखाद्या जिवंत अस्तित्वासारखं वागत असते. तेव्हा ते म्हणतात, मानवी शरीरात कंपनाला, ऊर्जेला, कल्पनेला तसंच संगीतातील सुरांना पाणी हे प्रतिसाद देत असते. जीवन शक्तीच्या वहनाचे माध्यम पाणी हेच असतं, हे आपल्या लक्षात आलं तर स्वरांचा परिणाम शरीरावर कसा होऊ शकतो याचं उत्तर मिळणं शक्य आहे .

शास्त्रज्ञ मासारू इमोटो ठामपणे सांगतात की, आपला मेंदू ९० टक्के पाण्याचा बनलेला असतो. तेव्हा आपण देत असलेला प्रतिसाद हा पेशीसमूहांकडून जसा असतो, तसा तो या पाण्याच्या वहनामुळेही मिळत असतो. असेही सांगितले जाते की, कोणताही आजार होणे म्हणजेच शरीराने पाण्यासाठी दिलेली हाकच असते. शरीरातील पाण्याचे जीवन ऊर्जेत सातत्याने रूपांतर होत असते, त्यासाठी संगीताचा उपयोग अधिक परिणामकारकतेने करता येतो.

शरीरातील सांध्यांना होणारा पाण्याचा कमी पुरवठा हे संधिवाताचे कारण असते. कान, नाक, डोळे, त्वचा इ. बाबतीतही या अवयवातील पाण्याचे प्रमाण कमी झाले की आजार संभवतो.

माझे गुरू डॉ. सुनील काळे म्हणतात, की पाण्यामध्ये माहिती साठवून ठेवण्याची क्षमता असते. हे अनेक प्रयोगातून सिद्ध झाले आहे ..तसेच एखादी गोष्ट ज्या वेळी घडते त्याच क्षणी त्याच्याशी निगडित माहिती दुसरीकडे संक्षेपित करण्याची देखील क्षमता पाण्यामध्ये असते आणि यालाच ''डेटा ट्रान्सफर इन रिअल टाइम'' असे म्हणतात.

भौतिकशास्त्राचा मूलभूत नियम आहे की प्रत्येक तरंगलहरी स्वतःबरोबर माहिती आणि त्या माहितीमुळे येणारी ताकद घेऊन प्रवास करत असते. जेव्हा आपण पाण्यातून ध्वनीकंपन सोडतो, तेव्हा त्या तरंगलहरीमध्ये असलेली माहिती, म्हणजे शब्द आणि सूर, त्या शब्दांचा जो अर्थ अभिप्रेत आहे तो आणि त्यातील भाव उत्कट होतो. आपले कुटुंब आपण निरोगी आनंदी राहण्यासाठी आपली जीवनशैली संगीताशी बांधून सुसंबद्ध केली तर जगणे गाणे होईल!

कोणतंही गाणं कोणताही राग किंवा एखादे वाद्य जेव्हा आपण ऐकत असतो, तेव्हा ते जाणीवपूर्वक ऐकलं पाहिजे म्हणजे ते स्वर शरीरात झिरपत जातात, अंतस्त्रावी ग्रंथी व प्रत्येक पेशी पेशींवर त्याचा परिणाम होत जातो आणि त्यामुळे समाधान शांतता आणि उत्साह निर्माण होतो. सकारात्मक भावना झाल्यामुळे आपण अधिकाधिक आनंदी होऊ शकतो. यात तल्लीनता ही महत्त्वाची असते. एखाद्या गोष्टीला शरण जाणं म्हणजेच त्या स्वरांशी आपण तादात्म्य पावणे, म्हणजे मग आनंदाचे डोही आनंद हे समाधान आपल्याला लक्षात येते आणि जगणं कसं गाणं होऊन जातं हे अनुभवाला येतं.

सुरेल स्वरांच्या प्रभावामुळे आपल्या शरीरात बदल होऊ शकतात. या अभ्यासाला बेस मिळालेला आहे... म्हणूनच कोणत्याही आजारी माणसाला, कोणत्याही निराश माणसाला जेव्हा संगीत ऐकवतो तेव्हा त्याला बरे वाटते.

स्वरातून भावना निर्माण होते. भावनेतूनच रसनिष्पत्ती होत असते.. या रसनिष्पत्ती तून मानवी मनावर बरेवाईट परिणाम होतात. हा स्वर जेव्हा स्पष्ट होत जातो तेव्हा.''तत् जप तदर्थ भावनम'' या न्यायाने आपल्या रक्तातील पेशी आपलं मूळ रूप विसरून या स्वरभावात समरस होतात, विरून जातात.. विलक्षण सामर्थ्य देण्याची शक्ती स्वरभावात निर्माण झालेली असते, पण स्वर केव्हा उमटतो, जर का तिथे ओलावा असेल तर, जर का आपलं तोंड कोरडे पडले असेल, तर आपल्या तोंडातून शब्द बाहेर पडत नाहीत. आपण घाबरलो आपल्या तोंडातून शब्द बाहेर पडत नाही कारण पाणी तिथे नसते तर

संपूर्ण तोंड कोरडे झालेलं असतं, कारण तिथे ओलावा नसतो.

श्रद्धा असेल तर आपल्याला हे लक्षात येईल.

कोणत्याही गोष्टीची अनुभूती ती गोष्ट प्रत्यक्ष कृतीत आणल्यानंतर येते असा नियमच आहे.

संगीत हा नादब्रह्माचा आविष्कार आहे. निर्गुण आणि सगुण अशा चित्तशक्तीची आणि तिच्या आविष्काराची सौंदर्याची स्तोत्र गाणारा सामवेद त्यातूनच निर्माण झाला, या सामवेदात संगीत विषयक सुप्त गुण आहेत, आपल्या वेद वाङमयात, पुराण उपनिषदांत, ऋषिमुनींच्या सखोल चिंतनात संगीत अनुभूतीचे चित्रण केलेले आहे. सृष्टीच्या चराचरात, भारल्या स्वरूपात असलेल्या या नादाचे, संगीताचे कुतूहल जगाच्या उत्पत्तीपासूनच संशोधनाचा कुतुहलाचा एक विषय राहिला आहे. आपले भारतीय संगीत हे 'साम' गायनावर आधारित आहे. संगीतातील सात स्वर आणि शरीरातील सात चक्र यांचा परस्पर संबंध आहे, म्हणूनच योगशास्त्र शरीराला 'गात्रवीणा' असे म्हटले आहे. आपल्या प्रत्येकाच्या शरीरातील पेशींची कंपनी संख्या वेगवेगळी असली, तरी आपले प्रत्येकाचे शरीर हे पंचमहाभूतांनी बनलेले असते, हे आयुर्वेदाने सिद्ध केलं आहे. आपल्या शरीरात जी पण 'सप्तचक्र' असतात, त्यांना त्या त्या स्वरांचा, त्या त्या चक्राशी संपर्क आला की तो आपल्या अंतःकरणाला जाऊन भिडतो. त्याचा परिणाम म्हणजे प्रत्येक पेशी त्या तालाने, त्या स्वराने प्रेरित होऊन कंप पावतात. त्या स्वरातील अध्यात्मिक शक्ती सुद्धा त्या उच्चारांना वजन प्राप्त करून देत असते आणि सात स्वरांच्या सहाय्याने शरीरातील सप्तचक्रांचं जागरण होत असतं, अशी नादयोगाची संकल्पना आहे. विशिष्ट आंदोलने निर्माण होतात. त्या स्वरांचा आणि स्वर चक्राचा होणारा एकात्मिक संवाद शरीरातील व्याधीचे मूळ नष्ट करण्यास मदत करतो. तेव्हा मग जगणे गाणे होऊन जाते. विश्वास, श्रद्धा असेल तर अशक्य काहीच नसतं. संत तुकाराम महाराज म्हणतात, देही आरोग्य नांदते, भाग्य नाही या परते.

जागतिक आरोग्य संघटनेने संस्थेची संकल्पना स्पष्ट करताना म्हटलं आहे की, आरोग्य म्हणजे केवळ रोगाची अनुपस्थिती नाही, तर शारीरिक, मानसिक, अध्यात्मिक आणि सामाजिक सुखदायक स्थिती आहे. अशी सुखदायक स्थिती असावी म्हणूनच व्यायाम, प्राणायाम आणि संगीताशी मैत्री करणं गरजेचं असतं. आत्म उन्नतीसाठी प्रभावी ठरलेलं संगीत माणसाच्या शारीरिक मानसिक स्थितीवर परिणाम करत असतं.

हे तज्ञांच्या संशोधनातून स्पष्ट होत गेला आहे. 'म्युझिक इज ए लैंग्वेज ऑफ सोल' संगीताने मानवी मनं एकत्र येतात. संगीतामुळेच प्रतिकारशक्ती वाढते, दुखणं विसरतं, रागावर नियंत्रण येते, कामात अभ्यासात एकाग्रता वाढते, काम चांगलं होतं, शीण वाटत नाही, स्मरणशक्ती वाढते, परस्पर संबंध चांगले होतात, भावना सकारात्मक होतात, आनंद निर्मिती होते, कामे लवकर लवकर होतात, असे अनेक फायदे होतात. म्हणून तर म्हटले आहे, संगीताशी मैत्री केली की जगणे हे गाणेच होऊन जाईल .

म्हणूनच म्हणावेसे वाटते, की

संगीतं करोती कल्याणम्

आरोग्यं धनसंपदा

नारी तू नारायणी...

(अर्थात सप्तशक्ती)

डॉ. मेधा फणसळकर.
माणगाव, सिंधुदुर्ग.

''तिकडे खूप लांब सातासमुद्रापार एक मोठ्ठा राक्षस राहत असतो, त्याचे मोठे मोठे डोळे, लांब कान ....'' आपण लहान असताना आपल्याला गोष्टी सांगितल्या जात तेव्हा बऱ्याचदा गोष्टीची सुरुवात थोड्या फार फरकाने अशीच असे. म्हणजे कधी सातासमुद्रापार राक्षस असेल तर कधी परी, तर कधी सुंदर राजकुमारी वगैरे वगैरे! त्यामुळे मला नेहमी प्रश्न पडायचा की नेहमी सातासमुद्रापार का असते? आपल्या जवळच्या समुद्राच्या पलिकडे का नसते? मग हळूहळू मोठे व्हायला लागल्यावर त्यातले वास्तव समजू लागले. लांब म्हणजे किती हे मोजण्याचे ते एक काल्पनिक अंतर होते, हे लक्षात आले. पण तरीही सातच का? आठ किंवा नऊ किंवा दहा का नाही? असा विचार करताना लक्षात आले की आपल्या संस्कृतीत सात या आकड्याला थोडे जास्त महत्त्व आहे. उदा. आठवड्याचे वार सात, सप्तशती पाठातील श्लोक ७०० म्हणजे सातच्या पटीत, सप्तपदी हा विवाहातील महत्त्वाचा संस्कार, सात पर्वतांच्या कुशीत असणारी सप्तशृंगी देवी, शिवाय संगीतातील सात सूर अशी सातची महती शोधता शोधता अचानक भगवद् गीतेतील एक श्लोक मिळाला.

''**कीर्ति: श्रीवाक् च नारीणाम् स्मृतिर्मेधा धृति:क्षमा** ''

भगवान श्रीकृष्ण म्हणतात की स्त्रियांमध्ये या सात शक्तींच्या रूपात मी राहतो. म्हणजेच स्त्री ही जीवनात अनेक भूमिका पार पाडत असते. म्हणूनच तिच्यातील या सात शक्तींचा उत्कर्ष होऊन ती ''नारायणी'' म्हणजेच सर्व शक्तीमान व्हावी असे अपेक्षित आहे. या शक्तीच्या आधारेच आपली प्रकृती, संस्कृती, परंपरा, पर्यावरण, कुटुंब या सगळ्यांच्या बाबतीत जाणीव असणारी, जागरूक असणारी आणि हा वारसा अखंड पुढे नेणारी महिला ही एका अर्थी देशाचा कणा आहे, असे म्हणावे लागेल.

आई मुलांना सुसंस्कारित करते. त्याच्या बळावरच मुले वेगवेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवतात. शिवाजी महाराजांना घडवणारी जिजाबाईंसारखी आई होती. म्हणून राजांच्या मनात स्वराज्याची संकल्पना रुजली. श्यामच्या आईने अगदी हलाखीच्या परिस्थितीत पण मुलांवर योग्य संस्कार केले म्हणून आज साने गुरुजींना आपण आदर्श मानतो. सीमेवर लढणाऱ्या सैनिकांच्या आयांनी त्यांना देशभक्तीचे बाळकडू पाजले आणि त्यांच्यातील त्यागामुळे आपण आज निर्धोकपणे आयुष्य जगत आहोत. म्हणूनच तिच्या प्रभावाने कुटुंबाला कीर्ती प्राप्त होते असे म्हणावे लागेल.

वास्तविक श्री म्हणजे धन किंवा संपत्ती! पण संपत्ती म्हणजे केवळ आर्थिक संपत्ती का? तर धन, धान्य, पशु-पक्षी, पर्यावरण हेही या संपत्तीमध्ये अपेक्षित आहे. धान्य, पशु-पक्षी यांना तर त्या जिवापाड जपतातच. आपल्या घरातील शैक्षणिक संपत्तीचा विकास व्हावा म्हणूनही ती जागरूक असते. अगदी एखादी अशिक्षित महिलासुद्धा आपल्या मुलांना योग्य शिक्षण मिळावे म्हणून झटत असते. आज आयएएस अधिकारी झालेल्या मनिषा धार्वे, श्रीधन्या सुरेश अशी काही उदाहरणे आपल्याला आपल्याच देशात पाहायला मिळत आहेत. पण त्याचबरोबर आर्थिक संपत्तीसुद्धा आपल्याकडे योग्य मार्गाने येते आहे का, यासाठी बहुतांशी स्त्रिया जागरूक असतात. स्टॅम्प घोटाळ्यातील तेलगीच्या पत्नीला जेव्हा आपला पती कोणत्या मार्गाने पैसा मिळवत आहे हे समजले तेव्हा तिने त्या पैशांना नाकारले. शिवाय तेलगीच्या मृत्यूनंतर तिने तो पैसा सरकारी खात्यात जमा केला. म्हणूनच तिचा हा ठामपणा हीच तिची खरी ताकद ठरली.

योग्य बोलण्याचे, वागण्याचे कसब स्त्रियांमध्ये उपजतच असते. म्हणूनच लग्नानंतर दुसऱ्या घरात येऊनही ती अनेक इतर कुटुंबांना जोडत असते. तिचा हाच वारसा स्वाभाविकपणे पुढच्या पिढीकडे जातो. कारण मुले नेहमी अनुकरणशील असतात. आपल्या गोड बोलण्याने ती मुलांनाही शिस्त लावत असते. तिची भाषा जर शिवराळ असेल तर साहजिकच मुले

त्याच भाषेत बोलतात. त्यामुळे वाणी हे आपले एक आयुध आहे हे लक्षात घेऊन स्त्रीने त्याचा योग्य वापर करण्याची गरज आहे. अगदी पुराणातील उदाहरण द्यायचे झाले तर सावित्रीने आपल्या वाक्चातुर्याच्या बळावरच यमाकडून आपल्या पतीचे प्राण परत मिळवले होते. तर आधुनिक सावित्रीने आपल्या याच कौशल्यावर स्त्रियांमध्ये शिक्षणाची गोडी निर्माण केली होती.

स्मृति म्हणजे ढोबळ मानाने आपण मागच्या गोष्टी लक्षात असणे असे म्हणतो. आताच्या भाषेत सांगायचे झाले तर मोबाईल, संगणक यांमध्ये जशी स्टोअरेज सिस्टीम असते तशी आपल्या मेंदूचीही स्टोअरेज सिस्टीम आहे आणि स्त्रियांमध्ये ती अधिक सक्षम असते. त्याच्या बळावरच ती घरातील रोजची कामे अष्टभुजा देवीसारखी पार पाडत असते. एकाच वेळी अनेक आघाड्या ती लीलया सांभाळत असते. शिवाय आपल्या घरातील परंपरा, कुळाचार असोत किंवा काही पारंपरिक पदार्थ असोत ते सर्व मागच्या पिढीकडून समजून घेऊन ती पुढच्या पिढीकडे पोचवण्याचे काम उत्तम प्रकारे करत असते.

मेधा म्हणजे बुद्धी असे म्हटले जाते. पण बुद्धी म्हणजेच धारणाशक्ती, समज, तर्कनिष्ठ बुद्धी, संश्लेषण, विश्लेषण हे सर्व घटक यामध्ये अभिप्रेत आहेत. या सर्व घटकांचा वेगवेगळा विचार केला तर लक्षात येते की धारणाशक्ती म्हणजे एखादी गोष्ट समजून घेऊन आपल्या मेंदूत त्याची नोंद ठेवणे. नोंद केलेली गोष्ट समजून घेणे, त्यावर तर्कनिष्ठ विचार करणे. त्याची योग्यायोग्यतेची पडताळणी म्हणजे मेधा! उदा. गुलाबजाम जेव्हा आपण पहिल्यांदा पाहतो तेव्हा मेंदू त्याचा आकार, रंग, पोत याची नोंद करतो. मग ही वस्तू कशासाठी उपयुक्त आहे याचा विचार केला जातो. मग तो खाण्याचा पदार्थ आहे हे निश्चित झाल्यावर तो खाणे योग्य आहे की अयोग्य याचा विचार केला जातो. कारण दोन महिन्याचे मूल गुलाबजाम खाण्यास योग्य नसते. हा विचार म्हणजेच तर्कनिष्ठ बुद्धी, संश्लेषण, विश्लेषण! हे सर्व गुण स्त्रियांमध्ये ओतप्रोत भरलेले असतात. त्याच्या जोरावरच ती कुटुंबाचे आणि मुलांचे पालनपोषण करत असते. आपल्या कुटुंबासाठी योग्य काय, अयोग्य काय, हे ठरवून योग्य गोष्टींना प्राधान्य देणे ही तिच्यातील मेधा !

धैर्य, सहनशीलता म्हणजे धृती! पण अन्याय, अत्याचार सहन करणे म्हणजे सहनशीलता नव्हे. स्त्रिया सोशिक, सहनशील जरूर असतात. पण शेपटावर पाय दिल्यावर चवताळून उठणाऱ्या नागिणीप्रमाणे त्या वेळ पडली तर आक्रमक बनतात. म्हणूनच सहनशीलता हा दुबळेपणा ठरत नाही. स्त्रीमध्ये असेच धैर्य आहे आणि म्हणूनच शौर्य आहे. सिंधुताई सपकाळ सारखी एखादी धैर्यवान स्त्री इतक्या संकटांना तोंड देत दुसऱ्या निराधारांसाठी आधार होते. धैर्यातून तिच्यात आलेले शौर्य हीच तिची शक्ती आहे.

क्षमा ही शेवटची शक्ती वर्णन केली आहे. स्त्रिया या जात्याच क्षमाशील असतात. आपल्या मुलांनी केलेले अपराध पोटात घेऊन ती त्याला योग्य दिशा दाखवण्याचे काम करते. अर्थात त्यासाठी ती जागरूक असणे आवश्यक आहे. कारण आंधळेपणाने ती मुलांच्या चुकांवर पांघरूण घालत राहिली तर मुलांना योग्य वळण लागण्याऐवजी ती चुकीच्या मार्गाने वाटचाल करतील. जे कुटुंब, समाज व राष्ट्रासाठी अहितकर ठरेल. म्हणून डोळसपणे केलेली क्षमा येथे अपेक्षित आहे.

स्त्रियांमध्ये असलेले हे सात गुण अधिक विकसित करून सप्तशक्ती रूपातील मातृत्वाची ओळख करून घ्यावी असे येथे अभिप्रेत आहे. या मातृशक्तीने आपल्यातील शक्ती ओळखावी, स्वतःचा अभिमान जपावा आणि त्याबरोबरच स्वतःची ओळख निर्माण करावी. देशासाठी आणि कुटुंबासाठी आपण करत असलेली कर्तव्ये अधिक जागरूकपणे पार पाडावी. परंपरेचा वसा आणि वारसा पुढे चालू ठेवावा.

प्राचीन भारतात गार्गी, मैत्रेयी, अनुसूया यासारख्या अनेक महिला ज्ञान, तप, नीतिमत्ता आणि शिक्षण यांचे ज्वलंत उदाहरण होती. आधुनिक काळात पण महिलांनी शिक्षण, प्रशासन, कृषि, विज्ञान, संरक्षण, खेळ या सर्व क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. एकत्र कुटुंब, आहार विहार, परंपरा, पर्यावरण असे अनेक विषय विश्वशांतीसाठी आवश्यक आहेत. खरं तर याचा मूळ आधार भारतीय स्त्री होती आणि आहेही. किंबहुना ती याला आपली जबाबदारी न मानता धर्म मानत असे. काळाच्या ओघात आपण आपलीच संस्कृती विसरत चाललो आहोत आणि पाश्चात्य देशांचे अनुकरण करत आहोत. देशाच्या विकासात महिलांनी अधिकाधिक सक्रिय होणे, मुलांच्या समग्र विकासात आईची नक्की भूमिका काय हे समजावून घेणे, नागरिक कर्तव्याची जाणीव करून घेणे, स्वतःच्या क्षमता जाणून घेणे आणि यासाठी मातृशक्ती म्हणून आपण काय करू शकतो याचा शोध आणि बोध या सप्तशक्तीच्या माध्यमातून करून घेतला तर मला वाटते नारीची नारायणी व्हायला वेळ लागणार नाही.

संख्यांचे सौंदर्य व लपलेल्या गोष्टी

सदाशिव गोडबोले
नॉर्थ कॅरोलिना

अनेक संख्यांमध्ये एक आगळं सौंदर्य लपलेलं असतं, ते फक्त काही लोकांनाच दिसू शकतं. काही संख्यांमध्ये एखादी गोष्ट दडलेली असते, जी त्यांना सांगण्याची उत्सुकता असते. सौंदर्य दिसण्यासाठी किंवा गोष्ट लक्षात येण्यासाठी लहानपणी पाढे पाठ केले तर त्यांचा फार उपयोग होतो.

काही संख्या एंजल नंबर म्हणून ओळखल्या जातात, तर काही संख्या उलटीकडून पाहिल्या तरी बदलत नाहीत; अशा संख्यांना Palindromic नंबर असे म्हणतात. काही संख्यांमध्ये बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार, वर्ग, घन लपलेले असतात, तर काहींमध्ये थोडं कठीण गणित लपलेलं असतं.

अशा संख्यांकडे प्रयत्नाने नियमित लक्ष देण्याने बौद्धिक स्वास्थ्य सुधारते असा विश्वास वाटतो.

तर आता या निरनिराळ्या संख्यांमधील सौंदर्य किंवा गोष्टींकडे पाहू.

१. १११, ११११, ०१०१, १०१०, १००१, २२२, किंवा ४५६, १२३४ अशा विशिष्ट पॅटर्नच्या संख्यांना एंजल नंबर म्हणतात. अशा संख्या आपल्या घड्याळात निरनिराळ्या वेळी दिसतात त्यांच्याकडे जसं जसं वरचेवर आपलं लक्ष देऊ तसं तसं योग्य वेळी त्या आपलं लक्ष वेधून घेतात. अशा संख्या आपल्यासाठी खूप उपयोगी असतात असा विश्वास वाटतो.

२. संख्या ही अशी संख्या आहे जी उजवीकडून किंवा डावीकडून पाहिली तरी तीच राहते, बदलत नाही. जसे:
५२०२५, ५२१२५, ५२२२५, ... ५२९२५.
या संख्या २०२५ या वर्षाच्या २० मे पासून २९ मे पर्यंतच्या तारखा आहेत (उदा., ५-२०-२५).
अशा संख्या घड्याळात जेव्हा १-२१, २-३२, १०१०, ११११, १२२१, वगैरे वाजले असतील तेव्हा दिसतात.

३. ७५६ ही संख्या तीन एकापाठोपाठचे अंक असलेली आहे, पण त्याचबरोबर सात आणि छप्पन यांचा साताच्या पाढ्यातील संबंध सुद्धा आहे, जसे साती आठी ५६. हा संबंध, ही लपलेली गोष्ट, ज्यांना पाढे येतात त्यांना सहजासहजी ओळखता येते.

अशा अनेक संख्या आहेत, उदाहरणार्थ ९६३, १२९६, १४११२, वगैरे.

८१७, ७५२, ६१५ अशा संख्या बेरीज वजाबाकी या गणितात बसतात. जसं ८१७ मध्ये आठातून एक गेला की सात किंवा आठ म्हणजे एक अधिक सात ही गोष्ट लपलेली आहे. अशा संख्या आपल्याला घड्याळात वरचेवर दिसतात.

४. काही संख्या वर्ग किंवा घन या रीतीने संबंधित असतात. जसे ६४ ($८^२$ किंवा $४^३$), १२५ ($५^३$), १४४, १६९, २२५, वगैरे. अशा संख्यांची गोष्ट पण ज्यांना पाढे येतात त्यांना सहज कळते.

५. काही संख्यांशी खूप कठिण गणिताचा संबंध असतो. तो संबंध फक्त मोजक्या लोकांनाच कळतो. उदाहरणार्थ, २०२५ या संख्येचा संबंध एक ते नऊ संख्यांच्या बेरजेचा वर्ग किंवा १ घनापासून ९ घनापर्यंत बेरजेचा आहे:
$२०२५ = (१+२+...+९)^२$
$= ४५^२ \ (१+२+...+९ = ४५)$
$= (१^३+२^३+...+९^३)$

दुसरं उदाहरण म्हणजे १७२९. या संख्येला रामानुजन संख्या असे म्हणतात. कारण एका किश्श्याप्रमाणे ब्रिटिश गणितज्ञ जी. एच. हार्डी यांनी सहगणितज्ञ श्रीनिवास रामानुजन हे एकदा आजारी असताना त्यांना रुग्णालयात भेट दिली, तेव्हा त्यांच्या टॅक्सीवरील १७२९ ही संख्या ''निस्तेज संख्या'' आहे असे ते सहज म्हणाले. रामानुजन यांनी लगेच उत्तर दिले की ती अजिबात निस्तेज नाही, तर दोन घनांची बेरीज म्हणून दोन वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त करता येणारी सर्वांत लहान संख्या आहे:

$(१^३+१२^३)$ आणि $(९^३+१०^३)$!

वरीलप्रमाणे उदाहृत संख्या आपलं सौंदर्य किंवा गोष्ट दाखवण्यासाठी उत्सुक असतात. अशा संख्यांकडे जसे जसे जास्त जास्त पाहू तसे तसे ही वैशिष्टे आपली आपणच समजू लागतील व त्या आपणहूनच तुमचं लक्ष वेधून घेतील. संख्यांशी असा संबंध ठेवल्याने बौद्धिक स्वास्थ्याच्या दृष्टीने खूप उपयोग होऊ शकतो असा विश्वास वाटतो.

तेव्हा यापुढे अशा संख्यांचे सौंदर्य किंवा गोष्ट पाहण्याचा प्रयत्न करणार ना?

अंतिम सत्याचा भ्रम
शास्त्रीय आणि सनातन दृष्टिकोन

नील कुलकर्णी
सिॲटल

खूप वर्षांपूर्वी राजा शिबीची एक गोष्ट वाचली होती. आजही ती कथा मनात घर करून आहे. अतिशय सुंदर आणि विलक्षण अशी ही कथा आहे.

राजा शिबी आपल्या अतुलनीय त्याग आणि करुणेसाठी प्रसिद्ध होता. एके दिवशी, एक जखमी आणि घाबरलेले कबुतर त्याच्या मांडीवर येऊन पडले, त्याला श्वास घेतानाही त्रास होत होता. काही क्षणांतच, एक भयानक ससाणा वरच्या फांदीवर येऊन बसला आणि राजाला म्हणाला–

''हे राजा, ते कबुतर माझे भक्ष्य आहे. मी उपाशी आहे, माझी मुले उपाशी आहेत. त्या कबुतराला आश्रय देऊन, तू निसर्गाच्या नियमांच्या विरोधात जात आहेस. एका जीवाला वाचवण्यासाठी दुसऱ्या जीवाला उपाशी ठेवणे योग्य आहे का?''

राजा म्हणाला, ''मी माझ्या आश्रयाला आलेल्या प्रत्येक जीवाचे रक्षण करण्याचा प्रण घेतला आहे. या कबुतराला तुझ्या स्वाधीन करणे माझ्या धर्माच्या विरुद्ध आहे.''

आता इथे राजा बरोबर आहे. पण तो ससाणाही तितकाच बरोबर आहे. रक्षक आणि भक्षक दोघेही आपापल्या जागी १००% बरोबर आहेत.

मग एकच अंतिम सत्य काय आहे? न्याय कसा होणार? सत्य तर एकच असायला हवे ना? (ही कथा पुढे अजूनच गहन होत जाते. पण त्याचा शेवट मी इथे सांगणार नाही. ती तुम्ही कधीतरी स्वतःच वाचायला हवी.)

धर्मयुद्धातील द्वंद्व

आपल्या पुराणांमध्ये अशा अनेक कथा आहेत. कर्ण आणि अर्जुनाची गोष्ट बघा. कुरूक्षेत्राचे महायुद्ध पेटले आहे. अर्जुन आणि कर्ण समोरासमोर उभे आहेत. युद्ध अंतिम टप्प्यात पोहोचले आहे आणि नेमकं त्याच वेळी कर्णाच्या रथाचे चाक ओल्या जमिनीत रूतते.

कर्ण आपले धनुष्य बाजूला फेकून चाक काढण्यासाठी खाली उतरतो. कृष्ण नेमका हाच क्षण हेरतो. त्याला माहित असते की जोपर्यंत कर्णाच्या हातात धनुष्य आहे, तोपर्यंत तो अजिंक्य आहे. अर्जुनाला बाण चढवताना बघून कर्ण गोंधळतो.

''अर्जुनासारखा श्रेष्ठ धनुर्धर एका निःशस्त्र योद्ध्यावर वार करेल? हे कसे शक्य आहे?''

येथे, कर्णाचे सत्य हे वैयक्तिक सत्य आहे:

– नियम म्हणजे नियम; वचन म्हणजे वचन; सन्मान हेच सर्वस्व.

दुसरीकडे, कृष्ण आणि अर्जुनाचे सत्य हे व्यापक आहे:

– नियम ही केवळ साधने आहेत. जर एखादा नियम अंतिम न्यायाच्या आड येत असेल, तर तो तोडलाच पाहिजे.

दोघेही आपापल्या जागी बरोबर आहेत. पण मग वास्तविक सत्य काय आहे?

मी तर आपला एक सामान्य माणूस. मला एकच काय ते खरे सांगा. उगाच गोंधळात टाकू नका.

पण आता मला प्रश्न पडू लागला आहे... सत्य खरोखरच एक असू शकते का?

सापेक्ष सत्याचा शोध

आईन्स्टाईन म्हणाला की काळ सापेक्ष आहे (Time is

relative). काळ हा प्रत्येकासाठी वेगळा असू शकतो. पण जेव्हा क्वांटम फिजिक्सने (Quantum Physics) सापेक्षतावादाच्या सिद्धांताला आव्हान दिले, तेव्हा आईन्स्टाईनने एकमेव सत्य शोधण्यासाठी युनिफाइड फील्ड थिअरी (Unified Field Theory) मांडण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याला यश आले नाही. कदाचित त्यालाही शेवटी उमजले असेल की सत्यसुद्धा सापेक्ष असू शकते?

अनेक धर्म मोठ्या खात्रीने सांगत असतात, ''आमचे आहे तेच सत्य आहे.'' आणि इकडे आपली संस्कृती म्हणते, ''जसा भाव, तसा देव.''

आपल्या बौद्धिक पातळीनुसार सत्य बदलत असेल का? हाच Quantum Physics मधला Observer's Effect असेल का?

माया म्हणजे भ्रम की सापेक्षता?

कृष्ण म्हणाला, की हे जग माया आहे. मला आधी वाटायचे की माया म्हणजे भ्रम, हे जग खोटे आहे, चला हिमालयात. पण कदाचित कृष्णाला म्हणायचे होते की जग सापेक्ष (Relative) आहे? माया म्हणजे सापेक्षता तर नव्हे?

जेव्हा अर्जुनाने कृष्णाला विचारले, ''सत्य काय आहे?'' तेव्हा कृष्णाने एका वाक्यात उत्तर का दिले नाही? त्याने पूर्ण भगवत्‌गीता का सांगितली?

कृष्ण हुशार होता. त्याला माहित होते की त्याची आणि अर्जुनाची बौद्धिक पातळी वेगळी आहे. त्याचे सत्य आणि अर्जुनाचे सत्य वेगळे असणार. म्हणून, सत्य लादण्याऐवजी, कृष्णाने सत्य शोधण्याची पद्धत (System) सांगितली.

''हे बघ पार्थ, कर्मयोग, राजयोग, भक्तियोग, ज्ञानयोग... हे सत्य शोधण्याचे मार्ग आहेत. तुला जो मार्ग आवडेल तो निवड, किंवा तुझा स्वतःचा मार्ग शोध; काही हरकत नाही.''

आणि हे सर्व ज्ञान दिल्यावर शेवटी कृष्ण म्हणाला:

''विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु।।''

(''या ज्ञानाचा पूर्ण विचार कर, आणि तुला जसे योग्य वाटेल तसे तू कर.'')

कोणतीही नियमावली नाही. कोणतेही आदेश (Commandments) नाहीत. कोणतीही धमकी नाही. कोणताही कट्टर सिद्धांत नाही. कृष्णाने थोडक्यात सांगितले: तुझे सत्य, तुझा देव आणि तुझा धर्म तू स्वतः शोध. संपूर्ण स्वातंत्र्य!

सनातन धर्माची क्रांतिकारक मांडणी

कदाचित म्हणूनच सनातन धर्मात करोडो देव असतील? ही किती क्रांतिकारक आणि तेवढीचं सुंदर संकल्पना आहे: तुमचा देव आणि तुमचे सत्य तुम्ही शोधा.

तुम्ही जे काही शहाणपण आणि ज्ञान समाजासाठी घेऊन याल, त्याचा आदर केला जाईल. त्याला मान्यता मिळेल. तुम्हाला देवावर विश्वास ठेवायचा नाही? उत्तम! काहीच हरकत नाही, ते ही चालेल.

विज्ञान आणि अध्यात्म

हायझेनबर्गच्या अनिश्चिततेच्या तत्त्वाचा (Uncertainty Principle) विचार करा. हायझेनबर्ग म्हणाला की तुम्ही एकाच वेळी एखाद्या कणाचे स्थान आणि गती अचूकपणे मोजू शकत नाही. निसर्गाला स्वतःच्या मर्यादा आहेत.

गीता काय सांगते? इंद्रिये आणि मनाला जन्मजात मर्यादा आहेत. अंतिम वास्तव (ब्रह्म/स्व) केवळ इंद्रियांच्या आकलनाने पूर्णपणे समजले जाऊ शकत नाही.

कदाचित म्हणूनच हायझेनबर्ग स्वतः म्हणाला होता की उत्तरांच्या शोधात तो शेवटी उपनिषदांकडे वळला.

भीष्म पितामह म्हणाले होते,

''धर्मः सूक्ष्मः''म्हणजे धर्म (सत्य, नैसर्गिक नियम) सूक्ष्म आहे.

हे विधान अतिशय क्रांतिकारक आहे.

शास्त्रीय विज्ञानात (Classical Science), आपण मानत होतो की जर तुम्हाला प्रत्येक अणूची सुरुवातीची स्थिती माहित असेल, तर तुम्ही संपूर्ण भविष्याचा अंदाज लावू शकता. पण हायझेनबर्गने सिद्ध केले की निसर्ग मूलतः ''सूक्ष्म'' आहे.

तुम्ही कणाला बदलल्याशिवाय त्याचे मोजमाप करू शकत नाही. निरीक्षणाची कृतीच कणाच्या सत्यात ''हस्तक्षेप'' करते. ज्याप्रमाणे एखाद्या शास्त्रज्ञाला निरीक्षकाने स्पर्श न केलेला ''शुद्ध'' कण सापडत नाही, त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या दृष्टिकोनाने स्पर्श न केलेला ''शुद्ध'' धर्म किंवा सत्य सापडत नाही. परिस्थितीचे सत्य ''सूक्ष्म'' असते आणि ज्या क्षणी तुम्ही त्यात प्रवेश करता, ते बदलते.

याचा अर्थ सत्य किंवा देव, किंवा धर्म आपल्या सामान्य

माणसाच्या आकलनापलीकडे आहे का? कारण ज्या क्षणी आपण त्याला स्पर्श करतो, ते बदलते. मी तर म्हणेन की आपण स्पर्श केल्यावर आपण त्याला ''नासवतो'' (Spoil), आणि बदल्यात ते आपल्याला नासवत.

अंतिम सत्याचा भ्रम

इतिहासातील प्रत्येक युद्ध आणि हिंसाचाराचे मूळ कारण एकच आहे: ''माझेच बरोबर आहे आणि तुमचे थोतांड आहे.''

कदाचित येथे सनातन धर्म तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने बरोबर होता पण ऐतिहासिकदृष्ट्या हरला. आपण म्हणत बसलो, ''आम्ही बरोबर आहोत, पण तुम्हीही बरोबर आहात,'' आणि आपण हे वादविवाद करत असतानाच, ज्यांना वाटत होते की फक्त तेच बरोबर आहेत, त्यांनी आपल्या...

दैनंदिन जीवनातील उपयोग

असो, मी ठरलो सामान्य माणूस. कोणाला काय करायचे हे सांगणारा मी कोण? पण मला हा प्रश्न नक्कीच पडतो. हे उच्च-स्तरीय तत्त्वज्ञान मी माझ्या रोजच्या धकाधकीच्या जीवनात कसे वापरू?

कुटुंब, ऑफिस आणि नातेसंबंधांमधील संघर्षांमध्ये दोन्ही बाजू सहसा वेगवेगळे सत्य बोलत असतात; ते खोटे बोलत नसतात.

आपला दृष्टिकोन हा आपल्या आठवणी, भीती, इच्छा, संस्कार आणि शिक्षण अशा अनेक गोष्टींनी आकार घेत असतो. एकदा हे समजलेकी प्रत्येकजण आपापल्या संस्कारांनुसार वागत आहेकी मग त्रास कमी होतो. भांडणे कमी होतात.

आपल्याला हे समजले पाहिजे की दुःख हे कठोर अपेक्षांमधून जन्माला येते.

''हे असे घडायला नको होते.''

''लोकांनी असेच वागले पाहिजे.''

''आयुष्य न्याय्य असले पाहिजे.''

अस्तित्वाने आपल्याशी असा कोणताही करार केलेला नाही.

आपल्या या अनैसर्गिक, ताठर आणि कडक समजुतींमुळेच आपल्याला वेदना आणि दुःख मिळते.

उत्सव

मला आता कुठे कृष्ण आणि गीता थोडी थोडी समजायला लागली आहे. कारण त्यात कडक नियम नाहीत, फालतूचे आदेश नाहीत. ''हे खा, ते खाऊ नका'' किंवा ''हे करा, ते करा'' असल्या काही गोष्टी नाहीत.

ती आपल्या मानसिक गुंतागुंतीचा आदर करते.

ती स्वातंत्र्य देते.

कदाचित कृष्णाला माहित असावं कि जो पर्यंत मनुष्याची चेतना (consciousness) या आपल्या ३ का ४ आयामात अडकली आहे तो पर्यंत अंतिम सत्य त्याला कधीच कळू शकत नाही. मग गीतेचं काय प्रयोजन?

कदाचित अंतिम सत्यापेक्षा अजून काहीतरी महत्वाचं असूं शकत? मनुष्य एका असीम शांतीचा अनुभव तर नक्कीच घेऊ शकतो आणि आयुष्याचा उत्सव पण साजरा करू शकतो.

तुम्ही कधी बारकाईने बघितलंय का, जगभरातले महापुरुष किंवा संत एका असीम शांततेत दिसतात.

पण इथे कृष्ण -

मुरली वाजवतोय, नाचतोय, रंग उधळतोय, प्रेमात पडतोय, मनुष्याचे फालतू नियम तोडतोय.

उगाच त्याला पूर्णावतार नाही म्हणत. तो नेहमीच मनुष्याच्या मर्यादेच्या आणि आकलनाच्या पलीकडचा वाटतो. (कधी विचार केलायं का कि आपल्या सनातन संस्कृतीमध्ये एवढे सण का आहेत?)

थोडक्यात, कृष्ण काय सांगतो? प्रामाणिकपणे जगा. सखोल विचार करा. आणि गोष्टी थोड्या हलक्यात घ्या (Take it easy).

अस्तित्व कधीच असा आग्रह धरत नाही की तुम्ही बरोबरच असले पाहिजे, किंवा सत्य नेहमी तुमच्याच बाजूने असले पाहिजे. कारण आपण कधीच अंतिम सत्य जाणू शकत नाही. ते सापेक्ष आहे.

मला वाटते निसर्ग फक्त एवढेच सांगतोय: थोडे जागे व्हा. प्रगती करत राहा. शांत राहा. उत्सव मनवा आणि पुन्हा एकदा... जरा हलक्यात घ्या.

हे माझं सापेक्ष सत्य आहे (सध्या तरी). तुमचं काय आहे?

आपण सारे अश्वत्थामा!

प्रशांत कुलकर्णी
लॉस एंजेलिस

पुराणात सात चिरंजीवी- हनुमान, परशुराम, बळी, बिभीषण, कृपाचार्य, व्यास आणि अश्वत्थामा आहेत, असे मानले जाते. यातील अश्वत्थामा डोक्यावर भळभळती जखम घेऊन रानोमाळी, जंगलात अजुनही भटकत आहे असे मानतात. हा अश्वत्थामा कधी घनघोर अरण्यात किंवा इतर ठिकाणीही दिसल्याचा, भेटल्याचा आणि डोक्यावरील जखमेसाठी तेल मागत असल्याचा दावा ऐकीव किंवा छातीठोकपणे अनेक जण करत असतात. यातील सत्यासत्येचा वा श्रद्धेचा भाग सोडून मग प्रश्न असे पडतात की, लोकांना अश्वत्थामाच का दिसतो? इतर चिरंजीवीच का दिसत नाहीत? किंवा ते भेटल्याचा दावा अश्वत्थामा भेटीइतका प्रबळ का नसतो?

महाभारतावर किंवा पुराणावर लिहावे एवढा अभ्यास माझा नाही. इरावती कर्वे आणि इतरही विदुषींनी अश्वत्थामावर त्यांचे शोध आणि विश्लेषण लिहिलेले आहेत, ते नक्कीच चिंतनीय आहेत. पण तरीही एक सामान्य वाचक या नात्याने माझे हे मनोगत.

इतर चिरंजीवींचं अस्तित्व या ना त्या निमित्ताने आपल्या आसपास जाणवतं. त्यांची मंदिरं, होणारे उत्सव किंवा इतरही कारणांमुळे असेल ते. सभोतालच्या हाडा-मासांच्या माणसांमध्ये कोणी बलोपासक, व्यासंगी(व्यास), उत्कृष्ट शिक्षक किंवा काबाडकष्ट करणारे बळीराजा असे दिसतच असतात. मग खरोखरच जर हे इतर चिरंजीवी त्यांच्या मूळ रुपात जरी भेटले, तरी सामान्य माणसाला भेद कसा जाणवणार? या उलट अश्वत्थामामध्ये नाट्य आहे; एक प्रकारची अलौकिकता आहे ज्याकडे साहजिकच विचार आकृष्ट होत असावेत. डोक्यावर भळभळती जखम घेऊन दारो-दारी हिंडणारी माणसं किती दिसतात? ठळक जाणवणारं आणि अति विरळ असं वेगळेपण, हा प्रबळ दावा सत्याच्या जवळ घेऊन जात असावा.

क्षणभर महाभारतातील पात्रे या मानवी प्रवृत्ती मानल्या, तर महाभारत हे मानवी भाव-भावनेच्या अगदी जवळ जाणारं, जनसामान्यांचे जगरहाटीतील अनुभव आणि त्यावेळच्या मनाच्या त्या त्या अवस्थांच्या आसपास असणारं, जगण्याचं एक उत्कृष्ट तत्त्वज्ञान ठरतं. पण तरीही अश्वत्थामा या प्रवृत्तीचं वेगळेपण आहे. सामान्यात: मानवी मनाला एकटेपण, भय, दु:ख आणि दु:खाचं भय याचं एक सुप्त आकर्षण असतं जरी या अवस्था त्याला नको असल्या तरी! हे आकर्षणच मनाला इतर सत्प्रवृत्ती (तुलनात्मक) चिरंजीवींपेक्षा 'अश्वत्थामा चिरंजीवी'च्या जास्त जवळ नेत असावं. एकंदरीत दु:खद आठवणी व अवस्था या आनंदी / सुखाच्या अवस्थांपेक्षा मनात जास्त काळ आणि जास्त खोल राहतात (मनाला तसे केलं नसेल तर). यातूनही अश्वत्थामा चिरंजीवी दिसत असावा; आणि हा अश्वत्थामा फक्त तेलच का मागतो? ही मानवी मनाला वाटणाऱ्या दु:खाचं, भेडसावणाऱ्या प्रश्नांची / भयाची उकल त्या त्या परिघातच करण्याची वृत्ती किंवा मर्यादा. या परिसीमांना भले-भले आणि मोठमोठ्याही चुकल्या नाहीत.

अश्वत्थामा खरा काय आहे? जगाने अव्हेरलेला, एक वेदना डोक्यावर बाळगणारा, विद्या आणि ज्ञान असूनही त्यांचा उपयोग न करता येणाऱ्या आणि त्यामुळे अस्वथ (रानोमाळी हिंडणे) असणाऱ्या पण तरीही स्वतःच आखलेल्या परिघाबाहेर न जाणाऱ्या अशा प्रवृत्तींचा संगम? ही गुंतागुंतीची अवस्था अनेकांनी कधी ना कधी तरी अनुभवलेली असणार. प्रत्येकाच्या भाळी तशी कमी-जास्त तीव्रतेची, काही ना काही समस्या (वेदना) असतेच. या वेदनेवर ते त्यांच्या परिघात उत्तर शोधत असले तरी अस्वथ असतात. पण कधी कधी या समस्या चिरंतन भासतात. मग हाच मानवी मनाचा दुवा कदाचित अश्वत्थामा कथेशी प्रबळ जवळीक जोडत असावा; इतका की इतर चिरंजीवींच्या दर्शनाच्या कथा न होण्या एवढा. या न्यायाने आपण सारे कमी-अधिक प्रमाणात अश्वत्थामा नव्हे काय?

श्रीकांत सबनीस-मुनींचा हवाई ऊर्फ ऑनलाइन आश्रम

डॉ. रमेश वाघमारे
न्यूमार्केट, ऑंटॅरिओ, कॅनडा

''योग म्हणजे चित्तवृत्ती निरोध'' असे पतंजली ऋषिंनी म्हटले आहे. आपले मन हे संथ पाण्यासारखे असते. पाण्यात खडा टाकल्यावर जसे त्यात तरंग उठतात व खळबळ माजते तसेच मनाचे आहे. योगाचा एक उद्देश मन शांत करून त्याला दैनंदिन कार्ये करण्यास उत्साही करणे हा आहे. योगविद्येत कुशल असणारे श्रीकांतजी सबनीस गीतेत सांगितल्या प्रमाणे ''योग: कर्मसु कुशलम्'' दोन्ही अर्थांनी जगणारे खरे कर्मयोगी आहेत. ह्या जगात वावरत असताना आपणास रोज नित्य-नैमित्तिक कार्ये करावी लागतात व ती कौशल्याने म्हणजे क्षमतेने करण्यासाठी शरीर तंदुरूस्त असावे लागते. त्यासाठी श्रीयोगात आसने व निरनिराळ्या कसरती शिकविण्यात येतात. शारीरिक व मानसिक प्रगतीला अध्यात्माची जोड दिल्याशिवाय आयुष्याला पूर्णत्व येत नाही म्हणून श्रीयोगात ध्यान धारणा कशी करावी हेही शिकविले जाते. प्रत्येक दिवशी दुसऱ्या दिवशीच्या संपूर्ण कार्यक्रमाचे पत्रक साधकांना पाठविले जाते.

लोकसंख्येचे वृद्धीकरण होत आहे व त्यामुळे स्नायू आणि सांधेदुखी वाढत आहेत. त्याचे वेळीच निराकरण करण्यासाठी, व वेदना कमी करण्यासाठी श्रीयोगात ऑस्टीओपॉरोसीससाठी आसने शिकविली जातात. हस्तमुद्रा व शारीरिक-मानसिक आरोग्य ह्यांचा परस्पर संबंध आहे म्हणून त्याचेही वर्ग घेतले जातात. हे सर्व विनामूल्य करण्यात येते!

श्रीयोगा हा गुरुवर्य श्रीकांतजी सबनीस ह्यांनी स्थापन केलेला एक आश्रम आहे. मी ह्याला आश्रम म्हणतो कारण ह्या ऑनलाइन आश्रमात सोमवार ते रविवार प्राणायाम, किंवा योगिक कसरती किंवा ध्यान धारणा ह्यांचे सत्र चालू असते. ते वॉशिंग्टनच्या परिसरात राहात असल्याने तेथील लोकांसाठी ते प्रत्यक्ष हजेरीत वर्ग घेतात; इतर दूर शहरात राहणाऱ्या साधकांची प्रत्यक्ष भेट व्हावी म्हणून ते वर्षातून एक इंडोअर व एक आउट डोअर अशी दोन शिबिरे भरवतात. त्याशिवाय अधून मधून Meet and Greet हा कार्यक्रम असतो; त्यात साधक आपला व्यवसाय, आपले छंद हयाविषयी माहिती देतात व त्यामुळे साधकाच्या मागचा 'माणूस' दिसू लागतो.

बहुतेक साधक सकाळची सुरुवात श्रीकांतजींच्या प्राणायामच्या पस्तीस मिनिटाच्या वर्गाने करतात. प्राणायामचा उद्देश श्वास शुद्ध करून श्वासोच्छ्वासाची क्रिया सहजपणे व अनिर्बंध करणे हे आहेत. साधक आश्रमात प्रवेश करतात. बव्हंशी लोक अनेक वर्षापासून श्री योगा करीत असल्याने गुरुजी त्यांना ओळखतात व त्यांना नमस्कार करून 'गुड टू सी यू' असे अभिवादन करतात. साधकाला बरे वाटते. प्रथमच हजेरी लावणाऱ्या साधकाचे 'वेलकम टू श्रीयोगा' असे स्वागत करून ते ''तुम्हाला हे सेशन संपल्यावर काही अवघड वाटले, तर मला लिहा, मी तुम्हाला अधिक माहिती पाठवीन,'' असा

दिलासा देतात. साहजिकच त्या नवागताचा परकेपणा नाहीसा होतो. प्राणायाम म्हणजे श्वासोच्छ्वास हा जीवनाचा पाया असल्यामुळे त्याविषयी जरा विस्ताराने सांगतो.

प्राणायामाच्या वर्गात सुरुवातीला स्ट्रेचिंग म्हणजे अवयवांना तणाव देऊन शरीर शिथिल केले जाते. मग भस्त्रिका, कपालभाती, श्वास निरोध, मूलबंध, व ''गोल्ड नगेट'' हे शिकविले जातात. पोटात हलके वाटावे म्हणून सोप्या क्रिया करवून घेतात. यानंतरच्या दोन प्रमुख क्रिया म्हणजे ''अनुलोम-विलोम व ''गोल्ड नगेट'' ऊर्फ सुवर्ण गोल. अनुलोम-विलोम मधे एका नाकपुडीने श्वास घेऊन तो दुसऱ्या नाकपुडीने सोडायचा असतो. ''गोल्ड नगेट'' मधे चाळीस सेकंद श्वास निरोध करून मग फक्त गळ्यापर्यंत श्वास जलद गतीने आत-बाहेर करायचा असतो. प्राणायामाच्या वर्गानंतर मनाला आणखी शांत वाटते व मन अंतर्मुख होते.

प्राणायामाचा शेवट आपले बाह्यशरीर (Physical Body) व ईश्वरी अंश असलेले सूक्ष्म शरीर (Astrak Body) ह्यांचा समन्वय करण्यात होतो. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणीपुर, अनाहत, विशुद्धी, आज्ञा व सहस्रार ही सूक्ष्म शरीरातील महत्वाची चक्रे आहेत. त्यांचा बाह्य शरीराशी समन्वय साधण्यासाठी पाच बोटांपैकी दोन बोटे विशिष्ट प्रकारे एकमेकांना स्पर्शून मग प्रत्येक चक्राचा उपलब्ध असलेला बीजमंत्र उच्चारण्यात होतो. उदाहरणार्थ, विशुद्धी चक्रात अंगठा तर्जनीवर अलगद ठेऊन ''यम्' हा मंत्र उच्चारायचा असतो. ह्या सर्व क्रिया सोप्या असून त्यापासून होणारा फायदा मोठा आहे.

कोणत्याही दोन माणसांची शारीरिक प्रकृती व अवयवांचा लवचिकपणा सारखा नसतो. त्यामुळे योगिक आसनांच्या बाबतीत '' One size fits all '' हे तत्त्व अवलंबिता येत नाही. श्रीयोगात सकाळपासून संध्याकाळपर्यंत, अर्धा किंवा एक तासाचे करायला सोपे किंवा अवघड, अशा आसनांचे वर्ग घेतले जातात.

उदाहरणार्थ, ज्यांचे अवयव सहजपणे वाकत नाहीत असे लोक 'सोपा वर्ग' (Easy Class) व चेअर योगाचे वर्ग घेतात. ज्यांचे अंग लवचिक असते असे लोक 'नेहमीचा' (Regular) क्लास घेतात. ह्या दोन्ही प्रकारात कित्येक आसने समान असतात पण नेहमीच्या (रेग्युलर) वर्गात करायला अवघड अशीही आसने असतात. सोपा वर्ग अंगवळणी पडला की विद्यार्थी रेग्युलर क्लास घेतो. विन्यास योगात (Vinas Yoga) वरील दोन्ही योगिक आसनांपैकी काही आसने असतात. पण विन्यास योगात एका आसनातून सहजपणे दुसऱ्या आसनात जाण्यावर भर असल्याने हा वर्ग 'सोपा वर्ग' अंगवळणी पडल्याशिवाय घेता येत नाही. मला कित्येक वेळा स्नायू किंवा शरीरातील इतर काही भागातील दुखणी निस्तरण्यासाठी फिजियोथेरापिस्टकडे जावे लागले आहे. आजपर्यंत फिजियोथेरापिस्टकडे शिकलेली अशी एकही कसरत (Exercise) नाही की जी मी थोड्या फार फरकाने ह्या योगिक कसरतीत शिकलो नाही!

सोपा वर्ग (Easy Class) हा त्याच्या पुढील कठीण वर्गांचा पाया असल्यामुळे त्याबद्दल थोडक्यात सांगतो. त्यात दोन्ही हात एकमेकात गुंतवून वर-खाली करणे, भिंतीशी उभे राहून अलगद उठबशा काढणे व उभे राहून हात जमिनीवर टेकणे, वगैरे कसरती येतात. त्याशिवाय पाठीवर किंवा पोटावर झोपून निरनिराळ्या सोप्या कसरतीही शिकविण्यात येतात. ज्यांना सकाळी अकरा ते दुपारी सव्वा बारा ही ह्या वर्गाची वेळ सोयीस्कर नसते, त्यांच्यासाठी गुरुजी आपल्या ऑनलाइन आश्रमात आठवड्यातून तीन दिवस संध्याकाळी साडेपाच ते साडेसहा हा Easy Class घेतात.

दिवसाचा शेवट गुरुजींच्या रात्री साडे-नऊ ते नऊ-पन्नास ह्या ध्यानधारणेने होतो. त्याआधी निरनिराळे शिक्षक आपण करीत असलेली ध्यानधारणेची निरनिराळी तंत्रे साधकांना शिकवतात. गुरुजी आपल्या वर्गात स्ट्रेचिंगने सुरुवात करून मग ॐ च्या वेदघोषाचा ऑडियो लावतात. प्रणवापेक्षा मनःशांती देणारा दुसरा मंत्र आहे काय? ज्यांना श्रीयोगाचे ऑनलाईन वर्ग घ्यायचे असतील त्यांनी श्रीकांतजींना. ह्या इमेलवर लिहावे. वेबसाईट: https://shri-yoga.org आहे.

येथे सबनीस गुरूजींनी हा आश्रम कसा सुरू केला, हे सांगितल्याशिवाय ह्या अद्वितीय सेवाभावी संस्थेची गाथा पूर्ण होणार नाही. व्यावसायिक जीवनात त्यांनी चाळीस वर्षे जी. पी. एस. व जी. पी. एस- आधारित विमान वाहतूक नियंत्रण ह्या सुरक्षा-निर्णायक पद्धतीत (safety critical systems) सुधारणा करण्याचे काम केले. निवृत्त झाल्यानंतर त्यांच्या मनात योगशास्त्र शिकून त्याचे वर्ग विनामूल्य शिकवावे असा विचार

आला. त्यासाठी पत्नी सौ. रेखाताईंचीही साथ होती.

प्रथम त्यांनी विन्यास योगाचा अभ्यास करून त्यात ५०० तासांचा शिक्षकाचा कोर्सही पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी श्री श्री रविशंकर ह्यांच्या 'आर्ट ऑफ लिव्हिंग' ह्या पद्धतीतील सुदर्शन क्रिया, विपश्चना व इतर पद्धतीतील महत्त्वाच्या प्रक्रियाही शिकून घेतल्या. प्रथम त्यांनी मंदिरे, सामाईक केंद्रे व इतर ठिकाणी प्रत्यक्ष वर्ग सुरू केले व त्यातून त्यांना योग शिक्षक होण्यासाठी तयार असलेले अनेक स्वयंसेवक भेटले. सबनीसांनी त्यांना शिकविले व परिणामी आता श्रीयोगाचे दिवसा सात-आठ वर्ग चालू असतात व त्यात आलटून पालटून तीस शिक्षक शिकवतात. सकाळी पावणे सहा पासून ते रात्री नऊ पर्यंत निरनिराळ्या वेळी हे वर्ग चालू असतात व ते सर्व विनामूल्य असतात. विशेष म्हणजे ४ ते १४ वर्षाच्या मुलांसाठीही गुरुजींनी वर्ग सुरू केले असून अनेक मुले योगासने करण्यात व योग शिकवण्यात तरबेज झाली आहेत.

श्रीयोगाचे एक उल्लेखनीय कार्य म्हणजे दर रविवारी रात्री आठ ते साडेनऊ पर्यंत आहार, आरोग्य, व अध्यात्म ह्यावर तज्ञांची व अनुभवी साधकांची होणारी व्याख्याने. निरनिराळ्या रोगांचा प्रतिबंध व त्यावरील इलाज, आहार शास्त्र व अध्यात्माच्या प्रवासात साधकांना आलेले अनुभव ह्यावरील ही व्याख्याने लोकप्रिय ठरली आहेत. त्यात प्रत्येक व्याख्यानाचा व्हिडीयो देण्याची श्रीयोगाची पद्धत असल्याने ह्या व्याख्यानांची उजळणी करता येते व त्यांचा इतरेजनांनाही फायदा होतो.

श्रीयोगाचे कार्य गुरुजींनी २०१२ साली सुरू केले आणि त्याचे बीज फोफावून तो आज एक प्रचंड वृक्ष झाला आहे. श्रीकांत सबनीस यांना त्यांच्या कार्याबद्दल ऑगस्ट २०२२ मध्ये झालेल्या अधिवेशनात बृहन्महाराष्ट्र मंडळाने सन्मानित केले. तसेच त्यांनी केलेल्या समाजकार्याबद्दल अमेरिकन राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांचेकडून गुरुजींचा " President's Lifetime Achievement Award" ने गौरव झाला. हा जेवढा गुरुजींचा गौरव आहे तेवढाच तो ह्या पदकांचा गौरव आहे असे आम्हा साधकांचे मत आहे.

डॉ. रमेश वाघमारे हे गेली चार वर्षे श्रीकांतजी सबनीस ह्यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीयोगाच्या प्राणायाम, सोपी योगिक आसने व ध्यानधारणा ह्यांचे शिक्षण घेत आहेत.

उठ कैलासराणा

उठ कैलासराणा जाग आली सर्वजणा
जलकलश धरूनि हाती, उभी आहे ही भूशाला

दुग्धशर्करा पात्र घेउनि वाट पाहते आपली अपर्णा
उठ सांब सदाशिवा उठ महादेवा ऊठ लौकरी नीलवर्णा

भस्म विलेपुनी जमले सर्व गण जागवाया आपणा
उठ भालचंद्रा उठ जगदीशा उठ हे नागभूषणा

जमले सर्व चराचर अंगणी तव दर्शना
उघडा उघडा शयनगृह द्वार हे त्रिनयना

कुमुदिनी ह्या प्रसन्न वदने शिंपी सडे अंगणा
देऊनि दर्शन पावन करा हे पार्वतीच्या राणा

मन हे माझे गुंतले विविध विषयसुखा
उघडा त्रिनेत्र अन् भस्म करा सर्वदुःखा

-नितीन बंगाळे
(नैरोबी)

देवांनो, AI-१७१ च्या वेळी तुम्ही कुठे होता?

सदाशिव गोडबोले
नॉर्थ कॅरोलिना

देव आपल्या अंतरी असून तो आपले सर्व अवयव व प्रणाली नियमितपणे व निरपेक्षपणे सतत चालू ठेवतो. आणि म्हणूनच आपण प्रत्येक क्षणी त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्याची अनन्य भावाने आठवण, जाणीव, भक्ती, पूजा, भजन, वगैरे करणे खूप चांगली गोष्ट आहे. पण कधी कधी ''कठिण समय येता'' कोणताही देव धावून मदतीला येत नाही. तेव्हा प्रश्न पडतो की देव आपल्या गरजेच्या वेळी मदतीला येईल की नाही? असाच प्रश्न एअर इंडिया १७१ फ्लाईट संबंधी पडतो.

जून बारा २०२५ ला एअर इंडियाची १७१ नंबरची फ्लाईट अहमदाबाद एअरपोर्टवरून निघून इंधनाचा स्रोत बंद पडल्याने एअरपोर्ट जवळच क्रॅश झाली व २६० निरपराध लोकांनी अतिशय कष्टप्रद अशा आगीत होरपळून प्राण गमावले. त्यात कित्येक लहान मुले पण होती. या घटनेमुळे मला वेळोवेळी प्रश्न पडतो की हा अपघात टाळण्यासाठी इतक्या देवांपैकी कोणीच कसे धावून आले नाही? आणि हा प्रश्न मी वेळोवेळी निरनिराळ्या देवांची पूजा करताना विचारतो.

उदाहरणार्थ, गणपतीची पूजा करताना मी विचारतो की, ''देवा, तू विघ्नहर्ता म्हणून सर्वत्र पूजला जातोस, पण तू त्या उड्डाणाच्या वेळी नेमका कुठे होतास आणि काहीतरी विघ्न आणून ते उड्डाण रोखली का नाही?''

असाच प्रश्न विष्णूंना पण विचारतो की, '' 'गजेंद्रमोक्ष' आख्यानात गजेंद्राने नुसतं तुमच्या 'नारायण' या नावाची पहिली दोन अक्षरे म्हणताक्षणी तुम्ही जसे होता तसेच लक्ष्मीला सोडून व पादत्राणं न घालता धावून गेलात व गजेंद्राला मगरमिठीतून सोडवलं. मग १२ जूनला तुम्ही कुठे होता व इतक्या निरपराध लोकांना अपघातातून सोडविण्यासाठी धावून कां गेला नाही?

तसेच पुंडलिकासाठी तुम्ही त्याच्या द्वारी विटेवर २८ युगं रखुमाई बरोबर वाट पाहात उभे राहिलात. मग तुम्ही इतकी निरपराध माणसं विनाकारण आगीत होरपळून अवेळी मृत्युमुखी जाण्याआधी विमानाची वाट अडवून कां उभा राहिला नाहीत?''

दत्तात्रयांना पण हाच प्रश्न विचारतो की, ''तुम्ही ब्रह्मा, विष्णू, महेश यांची युती आहात, आणि म्हणूनच तुमच्यामध्ये तिन्ही देवांची अफाट शक्ति आहे. असे असून, तुमच्यापैकी एकाने पण हा टाळण्यायोग्य अपघात आणि जीवित का वाचवली नाही?''

महादेवीला पण हाच प्रश्न की, ''तू महिषासुर मर्दिनी आहेस. तू चंड, मुंड, रक्तबीज, शुंभ, निशुंभ या सारख्या अतिबलाढ्य महाराक्षसांचा संहार करून देवांवर कृपा केलीस, मग दुष्टता-स्फूर्त किंवा इंधन-स्रोत-बंद रूपी राक्षसापासून ए-आय-१७१ ला वाचवलं का नाहीस?''

हाच प्रश्न हनुमानाला की, ''तुम्ही चिरंजीव व अपार शक्तिमान असून या अपघाताच्या वेळी उपस्थित होतात, परंतु तुम्ही त्या विमानाला वर उचलून सुरक्षितपणे जमिनीवर का ठेवलं नाही?''

शेवटी हाच प्रश्न शंकरांना पण विचारावासा वाटतो की, ''तुम्ही समुद्रमंथनाच्या वेळी हलाहल विष प्राशन करून त्रिलोकीला नष्टप्राय होण्यापासून वाचवलं. मग या अपघातरूपी महाविषापासून निरपराध जीवांना तुम्ही का वाचवलं नाही?''

असं म्हणतात की जे होतं ते चांगल्या करताच होतं, पण आपल्याला त्याचं गूढ कारण माहीत नसतं, देवालाच ते माहीत असतं. पण टाळता येण्यासारख्या अशा मोठ्या प्रमाणाच्या अपघातामागे आणि इतक्या लोकांच्या जीवन यात्रा अकस्मात् संपण्यामागे असं काय कारण होतं, हे देवाकडून जाणून घ्यायचा आपल्याला अधिकार आहे असं वाटतं. याचं उत्तर मिळेल की नाही हे माहीत नाही, पण उत्तर मिळेपर्यंत मी हा प्रश्न रोज विचारीत राहणार आहे.

सृष्टी निर्माण करण्यावेळी प्रगट झालेली ३३ महान तत्वे संघटित नसल्यामुळे त्यांना काहीच करता येत नव्हतं. मग परमात्म्याने त्यांना संघटित केल्यावर विराट पुरुष उत्पन्न होऊन सृष्टि निर्माण झाली. तसंच आपले इतके देव आपापली कामे करण्यामध्ये इतके व्यस्त आहेत का, की त्यांच्यापैकी कोणाला पण असा अपघात होईल व तो टाळावा असं सुचलं नाही? त्यांना संघटित करायला परमात्माच हवा कां?

या प्रश्नाचं उत्तर मिळो किंवा न मिळो, आपल्या पंचकोशरूपी जीवामध्ये सक्रियपणे सतत अपेक्षारहित वास करणाऱ्या देवाचं रोज अनेकदा कृतज्ञतेसह स्मरण करीत राहणं याशिवाय आपण दुसरं काय करू शकतो? आशा करू या की कधी ना कधी देव या प्रश्नाचे उत्तर नक्की देईल!

गुरूजी – सांगा बरं, भारतात इलेक्ट्रिक वायर एवढ्या उंचीवर का असतात?

गण्या – कारण भारतातील बायका त्यावर पण कपडे वाळत घालायला कमी करणार नाहीत!

– रेखा पै

दिन प्रेमाने सजले ग

दिन प्रेमाने सजले ग
अंतरंग मम कृष्णधवल
तू रंग जीवनी भरले ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

प्रौढत्वाच्या शुष्क काष्ठीला
फुटे पालवी यौवन ग
नजरेचे सामर्थ्य तुझ्या या
हरितक्रांतीने वदले ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

निरंजनाचे वैभव माझे
पार्वती लंकेची
परिसस्पर्श तव नवल वर्तवी
क्षण सोन्याने उजळे ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

ओठांवरले सलज्ज हसू
थंडी गुलाबी पसरे ग
सांग गुपित मग लाल ठसे हे
माझ्या गाली कसले ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

घनतिमिरी कधी किरणांसाठी
साहस मम आसुसले ग
सप्तरंगी व्यक्तित्व तुझे हे
इंद्रधनुषी ठसले ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

आयुष्याच्या पश्चिमरंगी
साथ मला दे अशीच ग
हात तुझा हा असता हाती
भय मरणाचे कसले ग
दिन प्रेमाने सजले ग ।।

– जय मसुरेकर (ओहायो)

स्त्रीशिक्षण : सुशिक्षित राष्ट्राचा पाया..!!!

कु. साक्षी मुकुंद कुलकर्णी
छत्रपती संभाजीनगर

भारतीय सभ्यता ही जगातील सर्वांत प्राचीन आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध संस्कृतींपैकी एक आहे. तिच्या आरंभीच्या काळात विशेषतः वैदिक आणि उपनिषदकाळात ''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः,'' असं म्हणत प्राचीन संस्कृती भारतातली स्त्रीचे स्थान किती उच्च होते हे दाखविते. त्या काळात स्त्रीला अत्यंत सन्मानाचे स्थान होते. ती ज्ञान, शौर्य, संस्कारांची मूर्ती आणि कलांनी नटलेली होती. अगदी सर्वगुण संपन्न होती हे प्राचीन ग्रंथ दाखवितात. ती भारतीय समाजाच्या प्राचीन तत्त्वज्ञानाचे प्रतीक आहे हेच आपले वेद पुराण आणि अनेक पवित्र ग्रंथ सांगतात.

ती जीवनाची जननी, संस्कृतीची वाहक आणि राष्ट्रनिर्मितीची मूळ शक्ती आहे. समाजाच्या जीवनप्रवाहातील ऊर्जा आहे. ती राष्ट्रनिर्मितीची केंद्रबिंदू आहे. असे असले तरीही काळाच्या ओघात तिची प्रतिष्ठा, भूमिका आणि ओळख अनेक परिवर्तनातून गेली आहे. वेदकाळात ''गार्गी'', ''मैत्रेयी'', ''लोपामुद्रा'', ''अपाला'' यांसारख्या स्त्रियांनी तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, आणि वेदज्ञानात पारंगत मिळवलं होत. त्यांचा समाजनिर्मित्तात सक्रिय सहभाग होता. त्या काळात ''उपनयन संस्कार'' मुलींसाठीही होत असे, म्हणजे त्यांना शिक्षणाचा पूर्ण हक्क होता. वैदिक संस्कृतीने स्त्रीला ''सहधर्मचारिणी'' मानले होते, म्हणजे ती पुरुषासोबत समान हक्काने धर्म, ज्ञान आणि कर्तव्य पार पाडणारी साथीदार होती.

त्याकाळी स्त्रिया गुरुकुलांमध्ये शिकत, शास्त्रार्थ करत आणि तत्त्वज्ञानाचा प्रचार करत. त्यामुळे समाजात त्यांना बौद्धिक सन्मान लाभला होता. गुरुकुल आणि आश्रम या ठिकाणी मुली वधूवरांसाठी (विवाहासाठी) तसेच समाजाच्या बौद्धिक गरजांसाठी शिक्षित केल्या जात. त्यांनी तत्त्वज्ञानाचा प्रचार केला, धार्मिक ग्रंथांची रचना केली आणि ज्ञानयज्ञात भाग घेतला. त्यामुळे त्या केवळ घराची शोभा नव्हत्या, तर समाजाची दिशा ठरवणाऱ्या व्यक्ती होत्या.

मात्र काळाच्या प्रवाहात, विशेषतः मध्ययुगात, परकीय आक्रमणांमुळे आणि धर्माच्या रूढीवादी व्याख्यांमुळे स्त्रीच्या स्थानात हळूहळू अधोगती झाली. पर्दा प्रथा, बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीप्रथा आणि स्त्रियांवरील शिक्षणबंदी यांचा उदय झाला. त्याने स्त्रियांना सार्वजनिक जीवनापासून दूर केले गेले. त्यांचा मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकास थांबला. स्त्रीला व्यक्तिमत्त्वाच्या विकासापासून रोखले. ह्याकाळापासून स्त्रीला केवळ ''गृहिणी'' किंवा ''परपुरुषाची संपत्ती'' मानले जाऊ लागले. तिच्या विचारस्वातंत्र्यावर आणि शिक्षणावर नियंत्रण आले.

सामाजिक व्यवस्थेत ती घरकामापुरती मर्यादित राहिली. आर्थिकदृष्ट्या स्त्रियांना संपत्तीच्या हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले, ज्यामुळे त्यांच्या स्वावलंबनावर परिणाम झाला. शिक्षणावरही याचा नकारात्मक परिणाम झाला; मुलींचा गुरुकुल आणि शाळांमध्ये प्रवेश कमी झाला, शास्त्रार्थ, वेदविद्या आणि तत्त्वज्ञानाचे ज्ञान मर्यादित झाले. मंदिर, बाजार आणि शिक्षणाच्या स्थळांमध्ये तिचा सहभाग मर्यादित झाला. सती प्रथेने पतीच्या मृत्यूनंतर पत्नीच्या स्वेच्छेने किंवा जबरदस्तीने आत्महत्या करण्याची परंपरा रुजवली, ज्यामुळे स्त्रीच्या हक्कांवर मोठा आघात झाला. बालविवाह आणि बहुपत्नी प्रथेने स्त्रीच्या शारीरिक, मानसिक

आणि बौद्धिक विकासावर नकारात्मक परिणाम केला.

तरीही काही थोर संत आणि सुधारकांनी तिच्या उन्नतीसाठी आवाज उठवला. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत जनाबाई, मीराबाई, आणि भक्ति आंदोलनातील स्त्रियांनी अध्यात्माच्या माध्यमातून शिक्षणाचे महत्त्व जपले. भक्ति चळवळीने स्त्रियांना वैयक्तिक ओळख आणि बौद्धिक स्वातंत्र्य दिले आणि धार्मिक, बौद्धिक आणि सामाजिक सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन केले. भक्ति आणि सुधारक चळवळीमुळे तिच्या भविष्याच्या संधी टिकवण्यात आल्या. हे बीज पुढील आधुनिक काळात स्त्रीशिक्षण आणि सक्षमीकरणाच्या चळवळीसाठी पाया ठरले.

आधुनिक भारतात स्त्रीशिक्षण आणि सक्षमीकरणाची स्थिती गतिमान झाली आहे. त्या काळात स्त्रीच्या शिक्षणाचा आणि सक्षमीकरणाचा प्रवास ब्रिटिश साम्राज्याच्या शासकीय धोरणांपासून सामाजिक सुधारकांच्या प्रयत्नांपर्यंत विस्तारला गेला. स्त्रीशिक्षण हा फक्त व्यक्तिमत्त्वाचा विकास नव्हे, तर संपूर्ण समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचा पाया बनला. ब्रिटिश काळात आणि नवजागरण काळात सामाजिक सुधारकांनी स्त्रीशिक्षणाला समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक मानले. राजा राममोहन रॉय यांनी सती प्रथा बंद केली, ज्यामुळे स्त्रीला जीवनात स्वायत्तता मिळाली.

त्यानंतर सावित्रीबाई फुले आणि ज्योतिराव फुले यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या, ज्याने स्त्रीशिक्षणाचा पाया निर्माण केला. पंडिता रमाबाई, महादेव गोविंद रानडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रीच्या सामाजिक, आर्थिक आणि बौद्धिक उन्नतीसाठी निरंतर प्रयत्न केले. सुधारकांनी स्त्रीस्वातंत्र्य, समानता आणि शिक्षणासाठी संघर्ष केला, ज्यामुळे समाजात स्त्रीसंबधी रुढीवादी विचारांना आव्हान मिळाले. या काळात स्त्रीशिक्षण केवळ अकादमिक ज्ञानपुरते मर्यादित नव्हते; ते समाजातील बंधने मोडण्याचे, आत्मनिर्भरतेचे आणि नेतृत्व क्षमतेचे साधन बनले. शिक्षित स्त्रिया केवळ घरगृहस्थीत मर्यादित न समाजसेवा, सार्वजनिक जीवन, आणि कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत सक्रिय होऊ लागला.

या प्रक्रियेत स्त्रीशिक्षणाचे परिणाम व्यापक प्रमाणावर दिसू लागले-महिलांची सामाजिक प्रतिष्ठा वाढली, कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढला आणि आर्थिक दृष्ट्या त्या घराच्या तसेच समाजाच्या विकासात योगदान देऊ लागल्या. शिक्षणामुळे स्त्रिया फक्त पारंपरिक बंधनांमधून मुक्त झाल्या नाहीत, तर त्या नवीन विचारांची वाहक, समाजसुधारक आणि राष्ट्रनिर्मात्री बनल्या. आधुनिक भारतात स्त्रीशिक्षणाचा हा पुनरुत्थान काळ हा राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरला आहे, कारण यामुळे समाजाच्या प्रत्येक स्तरावर स्त्रीसशक्तीकरणाची बीजे रुजली.या प्रयत्नांनी शिक्षित स्त्री बालविवाह, कौटुंबिक हिंसा, स्त्रीविरोधी रूढी यांचा विरोध करण्यास सक्षम झाली, ती आपल्या अनुभवांद्वारे इतर मुलींना शिक्षणासाठी प्रेरित करायला लागली आणि समानतेची जाणीव निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावू लागली. राजकीय दृष्ट्या सुद्धा शिक्षणामुळे स्त्री जागरूक नागरिक बनली. ती मतदान, स्थानिक स्वराज्य संस्था, समाजसेवा आणि नेतृत्त्वाच्या माध्यमातून समाजातील धोरणात्मक बदल घडवू लागली आहे. सांस्कृतिक दृष्ट्या, ती आपल्या घरात आणि समाजात परंपरा जपत आधुनिक विचारांचा समावेश करणारी बनली ज्यामुळे संस्कृतीचे सुसंवाद आणि समतोल राखला जातो आहे.

आजच्या डिजिटल युगात शिक्षणाचे स्वरूपही व्यापक झाले आहे; ऑनलाईन शिक्षण, कौशल्य विकास कोर्सेस, उद्योजकता प्रशिक्षण आणि आरोग्य-साक्षरतेचे कार्यक्रम स्त्रियांच्या सशक्तीकरणात क्रांतिकारी बदल घडवत आहेत. शिक्षित स्त्री केवळ घराची शोभा नसून, समाजाची दिशा बदलणारी आणि राष्ट्रनिर्मितीत योगदान देणारी शक्ती ठरली आहे. तिच्या सामर्थ्यामुळे कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत संतुलन यायला लागले आहे, सामाजिक न्याय साकार होतो आहे आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती मिळते आहे.

असे असले तरीही तिच्या जीवनात अनेक सामाजिक, आर्थिक आणि मानसिक संघर्ष अजूनही विद्यमान आहेत. कार्यस्थळी असमान वेतन, लैंगिक भेदभाव, आणि छळ यांसारख्या अडचणींना तिला सामोरे जावे लागते, तर घरगृहस्थीतही पारंपरिक पितृसत्तात्मक अपेक्षा आणि जबाबदाऱ्या तिच्या स्वप्नांच्या मार्गात अडथळा निर्माण करतात. ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाला अजूनही दुय्यम स्थान दिले जाते, आणि अनेकदा आर्थिक अडचणी, रूढीवादी सामाजिक विचारसरणी आणि सुरक्षिततेचा अभाव या कारणांमुळे स्त्रीच्या स्वप्नांना अडथळा येतो.

तरीही, आधुनिक भारतीय स्त्री हार मानत नाही. शहरी

आणि ग्रामीण, दोन्ही भागात स्त्रिया डॉक्टर, अभियंता, शिक्षक, अधिकारी, उद्योजक, वैज्ञानिक, सैन्यदलातील अधिकारी आणि समाजसेवक म्हणून स्वतःचा ठसा उमटवत आहेत. अनेक महिलांनी स्वयंरोजगार, स्टार्टअप्स, सामाजिक उपक्रम आणि शैक्षणिक क्षेत्रात नवकल्पना करून आपल्या क्षमतांचा अनोखा ठसा निर्माण केला आहे.

स्त्री आज केवळ कौटुंबिक जबाबदाऱ्यांपुरती मर्यादित नाही. ती समाजात सकारात्मक बदल घडवणारी, नेतृत्व क्षमता असलेली आणि जागरूक नागरिक बनली आहे. तिच्या संघर्षात तिच्या स्वप्नांची गतीच तिच्या शक्तीचा पुरावा आहे. शिक्षण, कौशल्य विकास, डिजिटल संसाधने, महिला स्वयं-सहायता गट, आणि सरकारी योजना यामुळे स्त्रिया स्वतःच्या स्वप्नांनुसार आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करत आहेत.

आधुनिक भारतीय स्त्री म्हणजे समाजाच्या प्रत्येक स्तरावर परिवर्तन घडवणारी शक्ती, जी केवळ स्वतःसाठी नव्हे, तर कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यासाठी लढत आहे. तिच्या संघर्ष आणि स्वप्नांचा संगम हेच भारतातील स्त्रीशक्तीचे खरे प्रतिबिंब आहे. शिक्षणामुळे स्त्री घरातील शोभेच्या पलीकडे जाऊन राष्ट्रनिर्मितीत सक्रिय भूमिका बजावते आहे, सामाजिक न्यायासाठी लढत नवोन्मेषी विचारांचे नेतृत्व करत आहे. शिक्षणातून जागर झालेली स्त्री ही समाज बदलण्याची, राष्ट्र उभारण्याची आणि संस्कृती संवर्धनाची प्रेरक शक्ती आहे.

भारतीय संस्कृतीने सदैव स्त्रीला मातृसन्मान दिला आहे, परंतु खरा सन्मान केवळ पूजन, आदर किंवा प्रतीकात्मक मान्यतेत नाही तर तो तिच्या शिक्षण, स्वातंत्र्य, समान संधी आणि निर्णयक्षमतेत दिसतो. स्त्रीशिक्षण हे राष्ट्राच्या प्रगतीचे मूळ असून, शिक्षित स्त्री ही फक्त घराची शोभा नसून सुजाण नागरिक, संवेदनशील आई, समाजसुधारक आणि नेतृत्वकर्ता बनते. शिक्षित स्त्री केवळ आपल्या कुटुंबात संस्कार रुजवत नाही, तर पुढील पिढीला शिक्षण आणि मूल्यांचे बीज घालते, समाजातील रुढीवादी अडथळे मोडते आणि सामाजिक न्यायासाठी प्रयत्न करते.तिच्या शिक्षणामुळे समाजात समानतेची भावना वाढते, मुलींच्या स्वप्नांना पूर्णत्व मिळते, आणि राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाला गती मिळते. तिचे शिक्षण हे समाजातील प्रत्येक स्तरावर परिवर्तन घडवणार आहे. ती राष्ट्राच्या प्रगतीची प्रेरक आणि संस्कृतीची वाहक शक्ती आहे. तिच्या शिक्षणातून प्रसारित होणारा प्रकाश समाजातील अज्ञान, भेदभाव आणि असमानतेवर विजय मिळवतो आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्यास मार्गदर्शन करतो.

अखेर स्त्री शास्त्रज्ञा भवति, राष्ट्र उन्नत भवति विचार सार्थ ठरतो.!!



मी माझा ना उरलो

मी माझा ना उरलो
ऊरात उरल्या श्वासांपुरता उरलो
मी माझा ना उरलो
चातक बनुनी तुझ्याचसाठी झुरलो
मी माझा ना उरलो

आयुष्याला ध्यास तुझा
सहवास तुझा
मम भास तुझा
तव स्पर्शास्तव जिवंत विस्तव उरलो
मी माझा ना उरलो

आठवणीत सुगंध तुझा
अनुबंध तुझा
मज छंद तुझा
प्रेमासक्त मी तुझाच फक्त उरलो
मी माझा ना उरलो

ऊरात उरल्या श्वासांपुरता उरलो
मी माझा ना उरलो

– **संजय राऊत** (सिॲटल)

अमेरिकेचे गारूड

सौ. संगीता टी. फाटक
सिॲटल

सामामिशची खासियत, हिरवाई व निसर्ग सौंदर्य

भारताच्या मुळात अमेरिका एक महाकाय देश, आपल्या भारतापेक्षा तिप्पट-चौपट मोठा. शिवाय ५० राज्यांचा एकमेकांचा समूह. तिथली भाषा, इतिहास, भूगोल, संस्कृती-नानाविध गोष्टींची माहिती मिळते.

मुबलक जमीन, अगणित वृक्ष, तलाव, नद्या, डोंगर, दऱ्या, आजूबाजूचे वेगवेगळे निसर्गरम्य प्रदेश, प्रशांत महासागराच्या अविरत मार्गक्रमण करणाऱ्या लाटा आणि संध्याकाळी आपल्याला आश्वस्त करणारा सूर्यास्त... क्षितिजाकडे पाहताना आकाशाचा विस्तीर्ण गाभारा न्याहाळताना आपण नकळत नतमस्तक होतो आणि अनामिक शक्तीला प्रणाम करतो.

आजकाल लोक खूप परदेशात प्रवास करतात-ISD, USA, ऑस्ट्रेलिया, युरोप. तरीही ''अमेरिकेला जायचं'' म्हटलं की डोळे चमकतात. प्रवासाच्या तयारीचा बागुलबुवा मोठा असतो. पहिला परदेश प्रवास म्हटलं की सामानाची तयारी, व्हिसासाठी मुलाखतीची तयारी-सर्वतोपरी करावीच लागते. आणि परवानगी मिळते का नाही, ही धाकधूकही असतेच.

आमचाही हा पहिलाच परदेश प्रवास-भेट अमेरिका, सिएटलच्या सामामिश शहरात. आमच्या मुलगा-सून यांना भेट देण्याचा अपूर्व योग आला. हा परदेश प्रवास खूप उत्साहवर्धक होता.

विमानतळाच्या बाहेर पडताच सर्वप्रथम मुकुटमणी Mount Rainier चे विलोभनीय दर्शन झाले. जणू पांढरा-शुभ्र, शिसवी कापूसच असावा. पर्वताला दृष्ट लागू नये म्हणून काळी वाळूसारखी जमीन आजूबाजूला पसरलेली असावी असे वाटते.

सामामिश शहराचा संपूर्ण परिसर हिरव्यागार देवदार वृक्षांनी सजलेला आहे. रस्तेही आखीव-रेखीव आहेत. इथे मे ते ऑगस्ट उन्हाळा असतो, त्यामुळे सूर्यप्रकाशाचं अप्रूप असतं. रात्री साडेनऊपर्यंत उजेड. ४-५ महिने उन्हाळा असल्याने लोक संध्याकाळी फेरफटका मारतात, पाळीव कुत्र्यांना घेऊन फिरायला जातात. लहान-मोठी माणसं सुद्धा सायकल चालवतात आणि तीही हेल्मेट घालूनच.

सायकलस्वारांसाठी स्वतंत्र मार्ग आखलेले आहेत. याशिवाय इथल्या अमेरिकन लोकांना नौकाविहार आणि तलावात पोहायला फार आवडते.

इथली घरे लाकडाची असतात, सर्व सुखसोयींनी सुसज्ज. हवामान थंड असल्याने घरात सर्वत्र कार्पेट्स अंथरलेली असतात. सुकामेव्याचे इथे प्राबल्य आहे आणि तो सहज पचतो.

वास्तविक इथलं हवामान खूप बदलतं. कायमच निसर्गाशी दोन हात करावे लागतात आणि दैनंदिनी सांभाळावी लागते.

वातावरणात कमालीची शांतता असते; गाडीच्या आवाजानेच रसभंग होतो. आकाशाचे रंग गडद आणि स्पष्ट दिसतात. इथे आभाळाला हात लागतील असे वाटते. पक्षीही खूप कमी दिसतात. इथे ठराविक आकाराची घरे आहेत, भोवताली सुसज्ज लॉन आहे; पण घरे कधीकधी मुकी भासतात. पराकोटीची शिस्त, तुरळक दिसणारी माणसं आणि भयंकर आत्मकेंद्री वृत्ती-हे जाणवतं.

घरापासून जवळ Snoqualmie Falls पाहायला गेलो. दृश्य मोठं विहंगम होतं. भोवताली झाडी आणि गर्जणाऱ्या पाण्याचा घनगंभीर आवाज. तिथेच वरती छोटं धरण आहे. अशा ठिकाणी गेल्यावर मन शांत होतं.

इथले मूळ रहिवासी Native Americans असल्यामुळे शहरांची मूळ नावं तशीच्या तशी ठेवली आहेत. सामामिश हे त्यापैकीच एक.

हलक्याफुलक्या वातावरणात आम्ही इथल्या काळाशी जुळवून घेत होतो. काही दिवसांनी आम्ही Tacoma येथून बोटीने Bainbridge Island वर जाऊन आलो. बोटीच्या डेकवर वाऱ्याचा बेफामपणा अनुभवला. आकाश आणि समुद्राच्या विविध छटा दिसल्या.

निळंशार पाणी आणि दूरवर क्षितिजाची रेषा. क्रूझवरून परतताना डौलदार सिएटल शहर दिसत होतं. प्रचंड आखीव-रेखीव, उंच-उंच इमारती एखाद्या कामाच्या पेटीसारख्या दिसत होत्या.

या शहराला माऊंट रेनियर पर्वताने वेढलेले आहे; तेच शहराचं सौंदर्य आहे. शुभ्र पांढरा रंग डोळ्यांत भरतो. जणू पर्वत म्हणतो- ''मी तुमच्या पाठीशी आहे, निश्चिंत राहा!''

अमेरिकेत प्रत्येक शहरात एक सुसज्ज लायब्ररी असते. इथे नियोजनपूर्वक पुस्तकं ठेवलेली असतात. वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. इथल्या लायब्ररीत देश-विदेशातील भाषांतरित पुस्तकंही आहेत.

उन्हाळ्यात इथे दर बुधवारी आठवडी बाजार भरतो. ताज्या भाज्या, फळे, लहान-मोठ्यांसाठी विविध स्टॉल्स, खाण्याचे जिन्नस, कानातली, गळ्यातली वगैरे. मला तर पुण्यातील तुळशीबाग किंवा सारसबागेत गेल्यासारखं वाटलं.

इथे श्रीकृष्ण भक्तीला वाहिलेले ISKCON चे सुंदर मंदिर आहे. भक्तगण शांततेत वावरत होते. ईश्वरचरणी सेवा अर्पण केली जात होती. प्रसाद स्वरूपात अन्नदानही होत होतं. कृष्ण कन्हैयाची मूर्ती केशरी पेहरावात मोहक दिसत होती.

''कृष्णमुरारी, कृष्णमुरारी, हे बनवारी...'' अशी कितीतरी गाणी आठवली.

इथल्या Grand View Park ला सूर्यास्त पाहायला गेलो तेव्हा सायंकाळच्या रंगछटा डोळे दिपवून गेल्या.

या देशाचे वैशिष्ट्य म्हणजे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन. नाहीतर कारवाईचा बडगा तयार. स्वतःच नेमून दिलेलं काम पूर्ण करा, कर्तव्य करा, चेहऱ्यावर स्मितहास्य ठेवा. मरगळ दूर करण्यासाठी डोंगर, दऱ्या-धावाधाव करा, निसर्गाचा आस्वाद घ्या, ताजेतवाने व्हा.

इथं वेगवेगळं हवामान- थंड, बर्फ, पाऊस-यांचा सामना करावा लागतो. सगळी दुकाने खूप अंतरावर आहेत. सगळेजण स्वतःच्या चारचाकीतून प्रवास करतात. इथली गाडी म्हणजे भारतातील स्कूटर चालवण्यासारखं म्हणतात.

ट्रेकिंगसाठी लोक अवजड मोटरसायकली किंवा सायकली वापरतात.

अमेरिकेत टेक्सास शुष्क प्रदेश आहे; झाडं कमी. मिशिगनमध्ये खूप जास्त थंडी. सॅनहोझे टेकसाठी प्रसिद्ध. सॅन डिएगो-सिटक प्रवासात Redwood Highway मधून प्रवास करताना प्रचंड, महाकाय रेडवूड वृक्षांच्या मधून वाट जाते. Yellowstone पार्ककडे जाताना Mount Rushmore येथे अमेरिकन अध्यक्षांचे दगडात कोरलेले चेहरे पाहिले. यलोस्टोनला उन्हाळ्यातही हिमपात झाला.

जुलैला अमेरिकेचा स्वातंत्र्यदिन अनुभवला. सरकारतर्फे रात्री मोठ्या बागेत १० ते ११ वाजेपर्यंत फटाक्यांची आतषबाजी. निळ्या-लाल रंगांच्या चांदण्या आकाश व्यापतात. छोटी जत्रा भरते. पार्कमध्ये हजारो नागरिकांची गर्दी. उभारलेल्या स्टेजवर काही मान्यवरांचे अभिवादन. बँड वाजत असतो आणि जनता आनंदात उड्या मारत असते.

सिएटल शहरात सर्वत्र उंच उंच इमारती. प्रमुख कंपन्यांच्या कार्यालयांच्या इमारती-Oracle, Amazon, Cisco इत्यादी. मोठी बाजारपेठ आहे-पुण्यातल्या लक्ष्मी रोडसारखी.

इथे Space Needle नावाचा उंच टॉवर आहे. लिफ्टने वर गेल्यावर संपूर्ण शहर, समुद्र, Mount Rainer चे दर्शन-अप्रतिम नजारा!

अमेरिकेत खूप उंचावर राष्ट्रीय उद्याने आहेत आणि प्रत्येक उद्यानाचं स्वतःचं वैशिष्ट्य आहे. आम्ही Mount Rainer, North Cascade, Mountains, Olympic National Park पाहिले.इथे Rainforest देखील आहे.

North Cascade पर्वत रांगा म्हणजे जणू एकत्र हात गुंफलेल्या मैत्रिणी-निळ्याशार आकाशाचं गाणं गात, आनंदात झिम्मा खेळत आहेत. त्या सगळ्यांचं एकसंध रूप बघून आपण सुखावतो. मला आमच्या सातपुडा पर्वतरांगांची आठवण झाली. सह्याद्रि पर्वतही अभिमान वाटावा असेच सुंदर.

इथल्या पर्वतरांगांच्या पायथ्याशी मोठे तलाव आहेत. उन्हाळ्यात सूर्यप्रकाशात हे पाणी हिरवट-निळं दिसतं. इथले रहिवासी नौकाविहाराचा आनंद घेतात. या उद्यानात तुरळक अस्वलं आढळतात. आम्हाला दोन जातींचे सांगाडे जतन केलेले पाहायला मिळाले.

याशिवाय इथे Baker पर्वत आहे. पांढऱ्या रंगाचा दणकट पर्वत रात्रीच्या अंधारात सौंदर्य अजून खुलतं. भाद्रपद पौर्णिमेच्या रात्री आम्हाला मोकळ्या आकाशात चांदण्यांचे स्पष्ट दर्शन झाले. अमावस्या असल्याने आकाश स्वच्छ. अधूनमधून उल्कापात होत होता. उपग्रह इकडून-तिकडे जाताना दिसत होते. राष्ट्रीय आकाशदर्शन दिवस असल्याने छान अनुभव मिळाला. उन्हाळ्यातच हा आनंद घेता येतो; नाहीतर इथे बर्फवृष्टीमुळे छोट्या-छोट्या दगडांचा खच पडतो.

आम्ही कॅनडा बॉर्डरपर्यंत गेलो. तिथे उंच Peace Arch Park फुलांनी नटलेली विस्तीर्ण बाग. इथूनच अमेरिका-कॅनडा सीमारेषा सुरू होते. International Border of Rocky Mountains through Pacific असे लिहिलेले आहे.

विस्तीर्ण महासागराचे दर्शन.India Gate सारखी पांढऱ्या दगडात उभारलेली प्रतिकृती. Maple वृक्षाच्या पानाचं चिन्ह असलेला कॅनडाचा ध्वज फडकत असतो. Maple हे कॅनडाचे राष्ट्रीय प्रतीक.

प्रशांत महासागराचे अलौकिक दर्शन हा माझ्यासाठी अविस्मरणीय अनुभव. टकोमा शहराजवळचा सागर अथांग समुद्र, ताकदवान लाटा, संध्याकाळचा सूर्यास्त, संधीप्रकाश, भयंकर जोराचा वारा-हे सगळं झेलत आम्ही निसर्गाचा आस्वाद घेतला. हा महासागर अमेरिकेच्या पश्चिमेला आहे. रात्रीही गारवा जाणवत होता.

आम्ही Red Indian चे पवित्र Crescent Lake पाहिले.

इथली शेतीही डौलदार. सुपीक जमीन, भरपूर पाणी-मोठ्या आकाराची फळं, भाज्या. भारतीयांचे खानपान हे मेक्सिकन भोजनासारखेच आहे.

इथे प्रामुख्याने विविध प्रकारचा रानमेवा-बेरीज-खूप प्रमाणात. लाल, काळ्या बेरीज आम्ही थेट शेतातून तोडून खाल्ल्या.

असे विविध अनुभव घेत, भटकंती करत असताना हमखास मायदेशाची आठवण येत होती. मनात आलं-आपला भारतही आपण पूर्ण पाहिलेला नाही. आपल्याकडेही निसर्गाचे वैविध्य ओतप्रोत आहे.

अमेरिका जेवढी पाहिली त्यात आम्ही समाधानी आहोत. अजूनही इथल्या वेगवेगळ्या राज्यांतील सृष्टिसौंदर्य, इतिहास जाणून घ्यायला आवडेल. नवीन अनुभव घ्यायला भविष्यात पुन्हा एकदा यायला आवडेल.

अनंत आमुची ध्येयासक्ती...

सौरभ शेखदार
सैक्रमेन्टो सीए

१२ एप्रिल २०२३अजूनही तारीख लक्षात आहे. त्या दिवशी दोघांचेही 'वर्क फ्रॉम होम' असल्यामुळे एक जण आतल्या खोलीत आणि एक जण बाहेर, असे आम्ही काम करत बसलो होतो. अनुजाची मीटिंग असल्यामुळे ती आत काम करत होती. काही वेळ बोलण्याचा आवाज आला नाही आणि अचानक खोलीतून रडण्याचा आवाज आला. मी हातातले काम सोडून लगेच आत गेलो, तर ती रडतच म्हणाली- ''माझी नोकरी गेली. माझा Layoff झालाय. अगदी आजपासूनच!!'' हे ऐकून माझी पायाखालची जमीनच सरकली. काय प्रतिक्रिया द्यावी, तेच कळेना.

एकाच आठवड्यापूर्वी अनुजाचा ह्या H1B लॉटरीत नंबर लागला होता. त्या वर्षी नेहमीपेक्षा खूप लोकांनी अर्ज केल्यामुळे, तुलनेने खूप कमी जणांची निवड झाली होती. आमच्या ग्रुपमध्ये फक्त अनुजाचेच नाव लॉटरीत आले होते. फक्त तिचेच काम झाले, म्हणून आम्ही छोटेखानी पार्टी देखील केली होती आणि काहीच दिवसांत, हे असे घडावे. माझा विश्वासच बसत नव्हता. मुळात असे होऊ शकते, याचा जराही अंदाज आम्हाला नव्हता. त्यामुळे अचानक नोकरी जाणे, हा मोठा धक्का होता. नोकरी गेल्यामुळे लॉटरीत लागलेला नंबरही गेला. त्याचे दोघांनाही खूप वाईट वाटले.

कंपनीतला आजचा शेवटचा दिवस. कमी वेळात काय काय करायचे, कोणाशी बोलायचे, आणि कुठली कागदपत्रे घ्यायची- काही सुचत नव्हते. कॉम्प्युटर सायन्स क्षेत्रात Layoff होतात, हे ऐकले होते. Linkedin वर वाचण्यात आले होते. पण आपल्या बाबतीत सुद्धा असे काहीतरी होऊ शकते आणि असे झाल्यानंतर किती धक्का बसतो, हे प्रत्यक्षात अनुभवले. माझे वडील कामानिमित्त जर्मनीत होते. वेळेतील अंतराचा फरक कमी असल्यामुळे त्यांना लगेचच कळवता आले. त्यांच्याशी आणि अनुजाच्या ताई-जिजूंशी बोलून जरा धीर आला. महत्वाची कागदपत्रे डाऊनलोड केली. आता कुठे नवीन नात्यात स्थिरावत असताना, हे आपल्याच बाबतीत का घडावे? असे अनेक विचार मनात येत होते. तिच्या समोर मला हे बोलून दाखवता येत नव्हते. जर मीच खचलो, तर तिला कोण समजावणार- हा पण एक विचार. आणि अनुजा हे सगळं कसं हाताळेल, याची काळजी वाटू लागली. मनात अगदी विचारांचे काहूर निर्माण झाले. पण आतून अनुजाच्या टीम मिटिंगचा आवाज आला. ती स्वतःला सावरून सगळ्या तिच्या टीमला निरोप देत होती, हे बघून मी अक्षरशः अवाक झालो. कारण तिने लगेचच स्वतःला सावरले होते, म्हणजे हे सगळे तिने स्वीकारले होते. आयुष्यात कुठलीही गोष्ट स्वीकारणे खूप महत्वाचे आहे. या नंतर आयुष्यातील पुढचा प्रवास सुखकर होतो. कारण त्यामुळेच पुढे काय करायचे, याचा मार्ग सापडतो. तिने हे सगळं कमी वेळात सहज स्वीकारलं, त्यामुळे मला थोडा धीर आला.

भारतात नोकरी गेली असती, तर चित्र वेगळे असले असते. पण अमेरिकेत नोकरी गेली की लगेच दिवस मोजायला सुरुवात होते. आणि त्यादृष्टीने नोकरीचा शोध घेणे गरजेचे होते. झालेला वृत्तांत मी आमच्या कंपनीत सांगितला. त्यावेळेस मला एका सीनियरने सुचविले- ''ही गोष्ट जास्तीत जास्त जणांना सांग. वेळ कमी आहे आणि कोणाची मदत मिळेल सांगता येत नाही''. हा सल्ला माझ्यासाठी खूप मोलाचा होता. त्याप्रमाणे आम्ही कामाला लागलो. सगळ्या व्हाट्सॲप ग्रुप्स आणि वर टाकले. एक मित्र सहजच म्हणाला, ''अरे, या कठीण प्रसंगातूनच तुमची एकमेकांना नव्याने ओळख होईल''. हे ऐकून आणि मित्रांशी बोलून आमची सकारात्मकता वाढवली. घरी सगळे याच क्षेत्रात (इंजिनीअरिंग) असल्यामुळे त्यांच्या करिअरमधील चढ-उतार मी जवळून पाहिले होते. ''Happened is happened'' हा त्यांचा मंत्र आणि अनुभव अनुजाला सांगितला. हा नोकरीचा शोध आणि हे आव्हान दोघांचे आहे, हे मनाशी पक्के ठरवले आणि जोमाने नोकरी शोधायला सुरुवात केली. त्यातील आणि घरातील दोन्ही कामांची वाटणी

करून घेतली. ''एकमेकां साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ'' अगदी ह्या ब्रीदवाक्याप्रमाणे. संघटनाची (Networking) सगळी ताकद वापरायची, हे ठरवले. कंपन्यांची आणि तेथील काम करणाऱ्या लोकांची (आमच्या मित्रांची आणि ओळखीच्या लोकांची) यादी बनवली. सुरुवातीच्या काळात अनुजा Resume आणि Interview ची तयारी करत होती. आणि मी इकडे Referral जमवत होतो. उगीच नुसते अर्ज (Applications) करण्यापेक्षा प्रत्येक कंपनीत ओळख काढून, Referral वापरून आणि Resume मध्ये योग्य ते बदल करून त्यानुसार अर्ज करण्याकडे आमचा कल होता.

आता तिच्या हातामध्ये एकच H1B व्हिसा लॉटरी बाकी असल्यामुळे अनेक मोठ्या कंपन्यांचे सुद्धा नकार आले. सुरुवातीला मुलाखतींमध्ये (Interviews) सुद्धा अपयश येत होते. मग अनुजाने मूलभूत कौशल्यांवर जास्त भर दिला. Layoff झालेल्या मैत्रिणीसोबत एकत्र अभ्यास आणि चर्चा करायला सुरुवात केली. त्यामुळे तिच्या प्रयत्नांना एक नवी दिशा मिळाली आणि तिची सकारात्मकता सुद्धा वाढली. मार्ग कितीही धूसर असला, तरी हार न मानता, न थकता आणि न डगमगता तिने प्रयत्न सुरूच ठेवले. दोन्ही कुटुंबांकडून या काळात मानसिक आधार आणि प्रोत्साहन मिळतच होते. त्यांच्या आशीर्वादामुळे, भगवंताच्या कृपेमुळे आणि परिश्रम, सातत्य आणि संयम या त्रिकुटाच्या जोरावर अनुजाने सलग ३ 'ऑफर्स' मिळवल्या.

अशा ह्या कठीण प्रसंगातून आम्हाला काय शिकायला मिळाले, ते या ब्लॉगच्या निमित्ताने व्यक्त करावेसे वाटले.

सध्याच्या अवघड जॉब मार्केटमध्ये 'Referral' जणू आवश्यकच बनले आहे. त्याने नोकरी मिळेलच असे नाही, पण नोकरी मिळण्याची संधी किंवा Interview येण्याची संधी वाढते. एकच Resume वापरण्यापेक्षा प्रत्येक ठिकाणी resume मध्ये योग्य ते बदल करण्यावर भर दिल्याचा उपयोग झाला. आताच्या काळाचा चतुराईने वापर करून हे सहज करता येईल.

'Networking' (संघटन) ही गंभीर आणि प्रत्येक वेळेस ठरवून करायची गोष्ट नाही. ते अगदी अमेरिकेतल्या मंदिरात सुद्धा होऊ शकते आणि प्रवास करताना पण बरं का. माझ्या आईने तर तिच्या काश्मीर ट्रिपमध्ये २ Referrals मिळवले. कोणाला मदत मागायला कचरून काहीच उपयोग नाही, हे लक्षात आले. आपण १५ लोकांना विचारले, तर दोघांचा प्रतिसाद येतो- याचा अनुभव आला.

जे आपल्या हातातच नाही, त्याचा खूप विचार करून फारसे काही साध्य होत नाही. उदाहरणार्थ, H1B व्हिसा नियम, येथील प्रशासनाचे सतत बदलणारे नियम हे काही आपल्या हातात नाही.

कोणी मदत मागितली तर वेळ काढून मदत करायला हवी. आपण काढलेल्या ५ मिनिटांमुळे आणि एका फोनमुळे एखाद्याला नोकरी मिळू शकते. माझी आई नेहमी म्हणते- ''जसे जमेल तसे लोकांना वेळोवेळी मदत करत जा''. याचा प्रत्यय आम्हाला या काळात आला. त्यामुळे आम्हाला पण वेळोवेळी मदत मिळत गेली. अगदी अनोळखी व्यक्तींनी वेळ काढून मदत केली. इतकं की एका लांबच्या मित्राने पैशांची गरज असेल तर बिनधास्त सांग म्हणले, हे अनपेक्षित होते.

अमेरिकेतले दैनंदिन आयुष्य प्रचंड व्यस्त असते. काही लोकांचा दिवस कंपनीचे काम करण्यात आणि जाण्या-येण्यात जातो. अनेक लोकांना परिचय विचारल्यावर- मी अमुक एका कंपनीत काम करतो, अशी ओळख सांगतात. आणि सहज गप्पा मारताना सुद्धा आपसुकच कंपनीतलेच विषय निघतात. पण या प्रसंगामुळे ''माणूस म्हणजे कंपनी किंवा नोकरी नाही, नोकरी आज आहे आणि उद्या नसूही शकते''. हे सर्व क्षणभंगुर आहे, याची जाणीव झाली. कंपन्यांसाठी आपण फक्त एक 'Headcount' आहोत. त्यामुळे ह्या सगळ्या गोष्टींना आपण किती महत्व द्यायचे आणि किती अभिमान बाळगायचा, याची एक शिकवणच मिळाली.

नुकतेच लग्न झाल्यामुळे आमची आर्थिक नियोजनाला तशी सुरुवातच होती. या काळात आम्हाला कमी गरजा ठेवण्याचे महत्व कळले. Layoff ने जणू आर्थिक नियोजनाचा धडा शिकवला, किंवा Surprise Test च घेतली म्हणा ना. कुठलीही गोष्ट विकत घेताना ह्याची खरंच गरज आहे का, हे आम्ही एकमेकांना विचारायला लागलो.

या कठीण प्रसंगात सगळ्यात महत्वाचे शिकायला मिळाले- ते म्हणजे अचानक बसलेला धक्का किंवा अपयश पचवणे. नुसते पचवणे नाही तर कमीत कमी वेळात न डगमगता त्यावर मात करणे. अशा प्रकारे आम्ही या कठीण प्रसंगावर दोघांनी मिळून प्रयत्नांच्या जोरावर चिकाटीने मात केली. हीच ''अनंत अमुची ध्येयासक्ती''.

अद्‌भुत अनातोलिया

वैभव साठे
सुवानी, जॉर्जिया.

''ओह! तुम्ही शत्रूराष्ट्रात Vacation ला चालला आहात?'', आम्ही साठे परिवारातले चौघे २०२५ च्या उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी तुर्कियेला फिरायला चाललो आहोत हे कळल्यावर बऱ्याच व्हॉट्सॲप बहाद्दरांनी विचारलं. चौघांच्या बिझी वेळापत्रकांतून १५ दिवस काढून आम्ही तुर्कियेची टूर ८–१० महिने आधी ठरवली होती. मे २०२५ मध्ये २–३ दिवसांचं भारत–पाकिस्तान युद्ध झालं आणि त्यानंतर जे इतर देशांचं ध्रुवीकरण (Polarization) झालं, त्यात तुर्किये अचानक भारताचा ''शत्रू'' बनला. आता दर काही महिन्यांनी बदलणाऱ्या मित्र राष्ट्रांमधे आपण फक्त मुशाफिरी करणारे उगाच भरडले जातो. दुसऱ्यांच्या नीतिमत्तेच्या फूटपट्टीवर जगणं मी केव्हाच सोडून दिलं आहे. त्यामुळे आपण ठरवलेल्या प्रवासाला जायचंच, असा हिय्या करून आम्ही पुढे जायचं ठरवलं. आता आपण जातो की नाही, अशा धाकधुकीत आम्ही शेवटी ११ जुलैला अटलांटातून इस्तंबूलच्या विमानात बसलो.

इस्तंबूलचा २०१८ साली उघडलेला नवीन विमानतळ जगात सर्वांत सुंदर गणला जातो. संध्याकाळी आम्ही सुलतान अहमत भागात Self Exploration ला निघालो. आया सोफ्या (Hagia Sophia) जवळील मध्यवर्ती भागात (Downtown) झकास टेस्टी कबाब नावाची प्रसिद्ध डिश खाऊन परत हॉटेलला आलो. दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता इस्तंबुलची गाईडेड टूर होती. भूमध्य समुद्र आणि काळ्या समुद्रामधील ह्या प्रदेशाला पूर्वी अनातोलिया किंवा आशिया मायनर म्हटले जायचे. ''तुर्कस्तान/ तुर्किये'' हे नाव नंतर आले. अनातोलियाचा इतिहास हजारो वर्षांचा आहे.

इस्तंबूल हे शहर मार्मारा समुद्र आणि काळ्या समुद्राच्या दरम्यान वसलेले आहे. ख्रिस्तपूर्व ६५७ मध्ये ग्रीक वसाहतवादी बायझसने एक नवी वसाहत स्थापन केली – बायझंटिअम. पुढील अनेक शतकांमध्ये हे शहर साम्राज्यांच्या केंद्रस्थानी राहिले. इ.स. ३३० मध्ये रोमन सम्राट कॉन्स्टंटाईन ने बायझंटिअमचे नाव बदलून कॉन्स्टॅन्टिनोपल ठेवले आणि ते रोमन साम्राज्याची राजधानी बनले. पुढील हजार वर्षे हे शहर बायझंटाईन साम्राज्याचे धार्मिक आणि राजकीय केंद्र राहिले. तुर्क हे मूळचे तुर्कमेनिस्तान, उझबेकिस्तान, अल्ताई पर्वत भागातले भटके. सातव्या ते दहाव्या शतकात त्यांनी अरबस्तानात पोचून इस्लाम धर्म स्वीकारला. १२९९ मध्ये उस्मान (Usman>Uthman>Ottoman) पहिला याने मध्यपूर्व अनातोलियातून हळूहळू आपले साम्राज्य वाढवायला सुरुवात केली. हेच ते ऑट्टोमन साम्राज्य जे १२९९ पासून पहिल्या महायुद्धापर्यंत टिकले. १४५३ मध्ये सुलतान महंमद द्वितीय ने कॉन्स्टॅन्टिनोपल जिंकले आणि बायझंटाईन साम्राज्याचा अंत झाला. शहराचे नाव हळूहळू इस्तंबुल म्हणून ओळखले जाऊ लागले. ऑटोमन काळात हे शहर इस्लामी जगाचे सांस्कृतिक आणि धार्मिक केंद्र बनले. विविध धर्म, भाषा आणि परंपरांचा येथे संगम झाला. १९२३ मध्ये मुस्तफा कमाल अतातुर्कने तुर्की प्रजासत्ताकाची स्थापना केली आणि राजधानी अंकाराला हलवली. या भूमीला हक्काने आणि अभिमानाने Turkiye (तुर्कांचा देश) असे नाव मिळाले. इस्तंबूलने मात्र आपली सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवली. आता वळूया आमच्या प्रवासाकडे. इस्तंबूल दोन खंडांना जोडते. एका बाजूला आशिया, दुसऱ्या बाजूला युरोप, आणि मधोमध बोस्पोरस सामुद्रधुनी (Strait). दुसऱ्या दिवशी

आम्ही आया सोफ्याच्या आत गेलो. (गुगल ट्रान्सलेटर जसं ''हागिया सोफिया'' लिहितो तसा उच्चार करू नये असा हाग्या दम आमच्या गाईडने आधीच भरला). इ.स. ५३७ मध्ये बायझंटाईन सम्राट जस्टिनियन यांनी हे भव्य चर्च बांधले. १४५३ मध्ये कॉन्स्टँटिनोपल ऑट्टोमन तुर्कांनी जिंकल्यानंतर तिला मशीद करण्यात आले. २०व्या शतकात ती संग्रहालय

झाली आणि अलिकडे पुन्हा मशीद म्हणून वापरात आली आहे. तिचे प्रचंड घुमट, बायझंटाईन मोझाईक कला, आणि इस्लामी कॅलिग्राफी यांचा सुंदर संगम पाहून पर्यटक चकित होतात. दुसरे आकर्षण म्हणजे निळी मशीद (Blue Mosque). १७व्या शतकात सुलतान अहमद पहिला यांनी ही मशीद बांधली. तिचे सहा मिनार आणि आतल्या भागातील निळसर टाईल्समुळेच तिला ''ब्ल्यू मॉस्क'' हे नाव मिळाले. त्यानंतर आम्ही बोस्पोरसच्या काठावरील तोपकापी राजवाड्याला भेट दिली.१५व्या शतकात मेहमेद फतिह (Mehmed II) यांनी हा भव्य राजवाडा बांधला. जवळपास ४०० वर्षे हा ऑट्टोमन सुलतानांचा राजवाडा होता. आज येथे संग्रहालय आहे ज्यात सुलतानांचे खजिने, शस्त्रे, वस्त्रप्रावरणे, इस्लामी पवित्र अवशेष जपले गेले आहेत.

रात्री आम्ही ट्राम पकडून गलाटा टॉवर बघायला गेलो. जाऊन बघतो तर तिथे रात्री १० वाजता तोबा गर्दी. आणि आम्हाला सांगण्यात आलं की मागच्या वर्षापेक्षा ३०-४०% कमी प्रवासी आहेत. गलाटा टॉवर (Galata Tower) हा इस्तंबुलमधील एक ऐतिहासिक आणि वास्तुशिल्पदृष्ट्या महत्त्वाचा मनोरा आहे. तो शहराच्या क्षितिजावर उठून दिसतो.

तिसऱ्या दिवशी सकाळी फक्कड नाश्ता करून आम्ही चनक्कलेच्या दिशेने निघालो. पहिला थांबा हा गॅलिपोलीला होता. गॅलिपोली हे पहिल्या महायुद्धातील दोस्त राष्ट्रांची दुखरी जखम आहे. १९१५ साली ब्रिटन, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड (ANZAC सैनिक) यांनी तुर्कींवर हल्ला केला, पण मुस्तफा कमाल अतातुर्क यांच्या नेतृत्त्वाखालील तुर्की सैन्याने त्यांना पराभूत केले. या विजयामुळे तुर्की राष्ट्रवादाला मोठी चालना मिळाली.

गॅलिपोलीहून एक फेरी पकडून आम्ही डार्डनेल्स सामुद्रधुनी पार करून चनक्कलेला पोहोचलो. ट्रॉयच्या अवशेषांना जाण्यासाठी चनक्कले हे मुख्य प्रवेशद्वार आहे. ट्रॉय म्हणजे होमरच्या इलियड महाकाव्यातील शहर. ग्रीक आणि ट्रोजन यांच्यातील युद्ध (Trojan War) इथे झाले, अशी दंतकथा आहे.

प्रसिद्ध Trojan Horse लाकडी घोड्याच्या युक्तीने ग्रीकांनी ट्रॉय जिंकलेली कथा जगभर प्रसिद्ध आहे. १८७०

मध्ये जर्मन पुरातत्त्वज्ञ हेनरिक श्लीमन यांनी उत्खनन करून ट्रॉय शोधले. येथे किमान नऊ स्तरांवर प्राचीन वसाहतींचे अवशेष सापडले. त्यामुळे ट्रॉय हे केवळ दंतकथेपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष इतिहासाशीही जोडले गेले. आज ट्रॉय हे UNESCO जागतिक वारसा (World Heritage) स्थळ आहे. संग्रहालय, उत्खननस्थळ आणि प्रतीकात्मक ट्रोजन हॉर्स पर्यटकांना आकर्षित करतो.

चौथ्या दिवशी आम्ही पर्गामॉन (आजच्या काळातले बर्गामा) नावाच्या गावात गेलो. प्राचीन कालच्या अलेक्झांड्रिया नंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे ग्रंथालय इथे होते, ज्यात २ लाखांहून अधिक हस्तलिखितं होती. स्थानिक कबाब, हमस आणि वाईन्सचे जेवण करून आम्ही आम्ही कुशादासीला एका रिसॉर्टमध्ये मुक्काम ठोकला. कुशादासी हे तुर्कियेतील एक अत्यंत लोकप्रिय आणि सुंदर शहर आहे. कुशादासी हे एक प्रमुख क्रूझ शिप बंदर आहे, जिथे सुंदर समुद्र किनारे, रिसॉर्ट्स आणि नाइटलाइफ भरभराटीत आहे.

पाचव्या दिवशी आम्ही एफेसस या प्रसिद्ध पर्यटन स्थळाला भेट दिली. इफेससची स्थापना इ.स.पू. ११व्या शतकात आयोनियन राजकुमार अँड्रोक्लोसने केली, अशी आख्यायिका आहे. येथील ग्रीक देवता आर्टेमिसचे मंदिर जगातील सात प्राचीन आश्चर्यांपैकी एक मानले गेले होते. हे मंदिर पार्थेनॉनपेक्षा चारपट मोठे होते. येथे सेल्सस ग्रंथालय, रोमन रंगमंच आणि रस्त्यांवर असलेली भव्य वास्तुशिल्पे आजही पाहता येतात. व्हर्जिन मेरीचे घर (House of the Virgin Mary) हेही एफेसस जवळच आहे, जे ख्रिस्ती भाविकांसाठी पवित्र स्थान मानले जाते.

सहाव्या दिवशी दोन तासांचा प्रवास करून आम्ही पामुक्कले (Pamukkale)ला पोहोचलो. सर्वांना इस्तंबुलमधील प्रसिद्ध हमाम माहीत आहेत. पण इस्तंबुलमध्ये नळाचे पाणी तापवून हमाम सेवा दिली जाते. पामुक्कलेमध्ये निसर्गतः गरम पाण्याचे झरे आहेत. त्यामुळे कोणाला टर्किश हमामचा खरा आनंद घ्यायचा असेल तर तो पामुक्कलेला घ्यावा. पामुक्कलेचा शब्दशः अर्थ म्हणजे ''कापसाचा किल्ला'' (Cotton Castle). सातव्या दिवशी आम्ही पामुक्कलच्या ट्रॅव्हर्टीन टेरेस (Trovertine Terrace) ला भेट दिली. येथे कॅल्शियमयुक्त गरम पाण्याचे झरे डोंगरावरून वाहतात आणि त्यातून कॅल्शियम कार्बोनेट साचतो. यामुळे पांढऱ्या दगडी टेरेस तयार होतात, जणू काही बर्फाचे धबधबे किंवा कापसाचे ढग. या पायऱ्यांवर पर्यटकांना चालता येते. तिथेच हायेरापोलीस नावाचे इ.स.पू. दुसऱ्या शतकात वसवलेले हे शहर रोमन साम्राज्याच्या काळात वैद्यकीय केंद्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या शहराचे अवशेष दिसतात. येथे नाट्यगृह, मंदिरे, समाधिस्थळे आणि प्राचीन रस्ते आजही पाहता येतात.

त्यानंतर आम्ही सुमारे तीन तासांचा बसने प्रवास करून अँटाल्याला पोहोचलो. अँटाल्या हे तुर्कियेतील भूमध्य समुद्रकिनाऱ्यावर वसलेले एक लोकप्रिय शहर आहे. अँटाल्यापासून जवळची बरीच ठिकाणे बघण्यासारखी आहेत. आम्ही Tahtali Dagi (ताताली पर्वत) वर गेलो. त्याचे

प्राचीन नाव Lycin Olympus असं आहे. याची उंची सुमारे २,३६६ मीटर (७,७६२ फूट) आहे, आणि हे Olympos-Beydaglari राष्ट्रीय उद्यानातील सर्वात उंच शिखर आहे. पर्यटक Olympos Aerial Tram द्वारे शिखरावर जाऊ शकतात. प्रवासादरम्यान भूमध्य समुद्र, झाडांची रांग, आणि खडकाळ कडे यांचे विहंगम दृश्य दिसते.

नवव्या दिवशी सकाळी आम्ही पर्गा (Perga) आणि अस्पेंडोस (Aspendos) या तुर्कियेतील प्राचीन शहरांना भेट दिली. पर्गाला ३००० पेक्षा जास्त वर्षांचा इतिहास आहे. इथे रोमन काळातील शहराचे बरेच अवशेष अजूनही आहेत. स्तंभांनी सजलेले रस्ते, मध्यभागी पाण्याचा वाहता नाला, सुमारे १५,००० प्रेक्षकांची क्षमता असलेले नाट्यगृह, १२,००० प्रेक्षकांची क्षमता असलेले स्टेडियम, आगोरा, स्नानगृह (Hamam), बॅसिलिका, आणि हेलनिस्टिक मनोरे आजही उभे आहेत. अस्पेंडोसमध्ये इ.स.पू. १०व्या शतकात ग्रीक वसाहत होती. इथले वास्तुविशारद झेनॉनने इ.स १३८१ मध्ये बांधलेले रोमन नाट्यगृह, ज्याची सुमारे २०,००० प्रेक्षकांची क्षमता आहे, ते अतिशय प्रसिद्ध आहे. तिथे अजूनही संगीत महोत्सव होतात.

दहाव्या दिवशी सुमारे चार तासांचा प्रवास करून आम्ही कोन्या(Konya)ला पोचलो. कोन्या हे मध्य अनातोलियन प्रदेशातले २३ लाख लोकसंख्येचे मोठे शहर जे महान सूफी कवी रूमी याचे समाधिस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. जलालुद्दीन रूमी हा मूळचा अफगाणिस्तानात जन्मलेला कवी मंगोल आक्रमणांपासून बचावासाठी १३व्या शतकात कोन्यामध्ये आला. त्याचे मेसनेवी आणि दिवान-ए-शम्स हे प्रेम, एकरूपता, आणि ईश्वराच्या शोधावर आधारित ग्रंथ जगप्रसिद्ध आहेत. रूमीच्या मृत्यूनंतर, त्याचा मुलगा सुलतान वेलेद आणि शिष्य हुसामुद्दीन चेलेबी यांनी मेवलेवी पंथाची स्थापना केली. Whirling Dervish लोकांचे सेमा नृत्य, जिथे दरवेश ध्यानात फिरतात ते मेवलेवी पंथात सुरू झाले.

त्यानंतर आणखी ४ तास प्रवास करून आम्ही कापाडोक्यात मुक्कामाला आलो. कापाडोक्या म्हणजे तुर्कियेमधील स्वप्ननगरी! कापाडोक्याचा शब्दश: अर्थ एक हजार घोड्यांचे शहर असा आहे. हे फक्त एक शहर नाही तर तुर्कियेतील मध्य अनातोलिया भागातील एक ऐतिहासिक आणि भौगोलिक प्रदेश आहे. हा प्रदेश ज्वालामुखीच्या उद्रेकांमुळे तयार झालेला असून, Fairy Chimney सारख्या खडकांच्या रचना, गुहांमधील चर्च, आणि हॉट एअर बलूनसाठी प्रसिद्ध आहे.

आमच्या यात्रेचा अकरावा दिवस पहाटे ४ वाजता सुरू झाला. आम्ही २० जणांनी एका बास्केटमध्ये बसून फुग्याने उड्डाण केले. जमिनीपासून ८०० मीटर उंचीवर सुमारे शंभर-दीडशे बलून्स हवेत झेप घेतात. ते विविध रंगांचे आणि वेगवेगळ्या उंचीवर तरंगणारे बलून्स बघून नजरेचे पारणे फिटते. त्यानंतर गोरेमे Open Air Museum ला प्रयाण केले गोरेमे ओपन एअर म्युझियम हे कापाडोक्याच्या गुहांमधील आध्यात्मिक आणि कलात्मक वारशाचं केंद्र आहे जिथे खडकात कोरलेल्या चर्च आणि मठांमधून बायझंटाईन काळातील श्रद्धा आणि सौंदर्य प्रकट होतं. या खेड्यांत दगडांच्या मनोऱ्यांनी, गुहेतल्या चर्चांनी वेगळंच जग उभं केलंय.

बाराव्या दिवशी आम्ही पुन्हा इस्तंबूलला परतलो. आता घरचे वेध लागले. शेवटचा दिवस इस्तंबूलमध्ये लिस्टवर ठेवलेली खरेदी करण्यात घालवायचा होता. क्रूझच्या प्रवाशांमध्ये अतिशय प्रसिद्ध असलेला मसाल्यांचा बाजार भटकून आलो. नंतर आम्ही बोस्फोरस सामुद्रधुनीच्या पुलावरून आशियातील इस्तंबूलमध्ये गेलो. तिथे काडिकॉय नावाच्या भागात आमच्या ग्रुपचा सेंड-ऑफ लंच होता. येताना आम्ही एका फेरीने बोस्फोरस पार करून पुन्हा युरोपातील इस्तंबूलमध्ये आमच्या हॉटेलवर परत आलो. संध्याकाळी इस्तिकलाल (Independence) स्ट्रीट हा टॅक्सिम चौक ते गलाटा टॉवरपर्यंतचा १.४ किमीचा पादचारी मार्ग अतिशय प्रसिद्ध आहे. इथे अतिशय सुंदर बकलावा, टर्किश डिलाइट्स आणि बऱ्याच वस्तू मिळतात. दिवसभर प्रचंड चालून दमून भागून आम्ही हॉटेलमध्ये पहुडलो.

पुढला दिवस हा परतीच्या प्रवासाचा दिवस होता. इस्तंबूल ते अटलांटा विमानप्रवासात मी रम्य आठवणी सोबत घेऊन परत निघालो. आम्हाला सर्वत्र अतिशय हसतमुख आणि सेवाभावी लोक भेटले. तुर्कियेची जी इमेज आपल्याला मीडियाने दिलेली आहे त्याच्या एकदम विरुद्ध! शेवटी एकच सांगावेसे वाटते, जगात एवढे सौंदर्य भरलेले आहे. ते खुल्या दिलाने पहा. राज्यकर्ते आज आहेत तर उद्या नाहीत. त्यांच्या लहरीवर आपले आयुष्य वाया घालवू नका. Tesekkurler! धन्यवाद!

विसर

विसरू कसा सांग प्रिये मी तुला
विसरू कसा ते तरूतळीचे गीत
विसरू कसा तव अधरामृत
विसरू कसा ते बकुळफुले वेचणे
विसरू कसा ते नक्षत्रलेणे
विसरू कसा ते समुद्र लाटांतले गाणे
विसरू कसा त्या आठवणी
करतो सदा प्रयत्न तुला विसरण्याचा
नादच लागला मना विसरण्याचा तुला
तुझे विसरणे आठवण्याचा अन्
तुला विसरून विसरून आठवण्याचा

-नितीन बंगाळे (नैरोबी)

परिणीता

ती रम्य चांदरात
अन् तुझी बेधुंद साथ
तो सळसळता सरितासंगम
मुग्ध तू अन् मुग्ध मी
अन् मूक भावना त्या
तन मनातले ते प्रणयगीत
त्यात रातराणीचा मंद गंध
चोरून घेतलेले तुझ्या सवेचे ते क्षण
नाही सापडले पुन्हा परत

-नितीन बंगाळे (नैरोबी)

परदेशात भारतीय रेट्रो

वासंती मुदकण्णा
मिनेसोटा

२०२३च्या संक्रांतीला मी मिनियापोलिसमधे आमच्या घरी बाजरीच्या भाकरी करायचा घाट घातला. जर 'टॉर्टिया प्रेस' वापरून मक्याच्या पिठाच्या 'टॉर्टिया' करता येतात तर बाजरीच्या भाकरी का नाही होणार, असा विचार केला. कारण भाकरी करायच्या म्हणजे त्या परातीत थापून नं मोडता तव्यावर टाकाव्या लागतात आणि हे कौशल्य जर तुमच्यात नसेल तर भाकरी करता येत नाहीत. पण हा प्रश्न टॉर्टिया प्रेसने सोडवला आहे म्हणून मारे दाबात बहिणीला म्हणजे मीनाला सांगितलं की आज संध्याकाळी मी तुला भोगीची भाजी आणि बाजरीची भाकरी खायला घालीन!

मीना म्हणाली, ''आजकाल तू खूप बदलली आहेस, सण साजरे करायला लागली आहेस. पूर्वी तर तुला सण कधी आहेत हे पण माहीत नसायचं''. मला एकदम धक्का बसला! खरंच का? मी 'धार्मिक' झाले की काय? हा फरक कधी घडून आला? आणि मुख्य म्हणजे का?

तर, असल्या विचारांचं मंथन करत बाजरीचं पीठ आणलं, गरम पाण्यात ते भिजवलं, एक छोटा गोळा केला, प्रेसवर दाबला आणि सुरेख गोलाकार पातळ भाकरी तयार झाली. माझ्या नवऱ्यानं म्हणजे अँड्रूनं कुशलतेने ती गरम तव्यावर टाकली, मी भाकरीवर पाण्याचा हात फिरवला, अँड्रूवर 'तीळ पसर' म्हणून ओरडले, त्याने ढीगभर तीळ ओतले पण मी काही बोलले नाही कारण त्याला काय माहीत किती तीळ लावायचे असतात, आणि दोघं उत्सुकतेने पाहू लागलो

आणि क्षणातच आमचा उत्सुकताभंग झाला – भाकरीवर बुडबुडे आले आणि हळूहळू मोठे होऊ लागले! मी उलथण्याने ते दाबण्याचा प्रयत्न केला आणि मग भाकरी उलटली. जिथे फुगे तयार झाले होते तिथे भाकरी भाजली गेली नव्हती. दाबून दाबून कशीबशी भाकरी तयार झाली. गॅसवर आई भाकरी फुगवायची तशी मी फुगवणार होते, पण भाकरीचे तीन तेरा वाजले! कसचं काय नी कसचं काय! शेवटी अशाच पाचसहा भाकऱ्या केल्या आणि भाकरीचे तुकडे आणि भोगीची भाजी घेऊन आम्ही जेवायला बसलो. अँड्रू मिटक्या मारून खात होता! मला लाज वाटली आणि मी मदतीसाठी तातडीने व्हॉट्सऍपवर एस.ओ.एस.चा फुगा सोडला.

बऱ्याच जणांनी सातासमुद्रापार असून सुद्धा माझ्या समस्येचे निरसन करण्याचा प्रयत्न केला. माझ्या यमामावशीनं तर फोनच लावला. म्हणाली, ''पीठ जरा घट्ट कर आणि तवा सुरवातीला जास्त गरम करू नकोस''. काका गेल्यापासून मावशी तिच्या मुलाबरोबर राहते. मी विचारलं, ''तुझ्या घरी सुनेनं बाजरीच्या भाकरी केल्या असतील ना?'' आणि तिचं उत्तर ऐकून मी स्तंभित झाले. ती म्हणाली, ''अगं, आमच्या इथे मशीनवर केलेल्या बाजरीच्या भाकरी मिळतात. तिथूनच आणल्या''. काय! कमतेनट्टी सारख्या कर्नाटकातल्या लहानशा गावात मशीनवर केलेल्या भाकरी मिळतात! आणि लोक चक्क त्या खरेदी करतात!

मी आश्चर्य व्यक्त करीत म्हटलं , ''पण का?'' मावशी म्हणाली, ''अगं बाजरीचे नखरे फार असतात. बाजरी दळून आणल्यावर लगेच संपवावी लागते, नाही तर ती कडवट होते. आणि घरात जेवणारी माणसं खूप आहेत म्हणजे भाकऱ्या बडवून बडवून सुनेचे हात दुखतात. ती उभी राहून चपात्या करते पण भाकरी करणं तिला जमत नाही''. माझ्या आजोळी किर्लोस्करवाडीला म्हणजे मावशीच्या माहेरी तर याहून जास्ती माणसं होती पण तिथे कधी कोणी बाहेरून हलगेकरांची भडंग सोडली तर काही आणल्याचं मी तरी ऐकलेलं नाही.

तर खरंच का मी धार्मिक झाले होते हा किडा मला सतावत होता. बऱ्याच विचारांती माझ्या असं लक्षात आलं की मी धार्मिक नाही पण खादाड झाले होते! आणि मला विकतच्या पदार्थांपेक्षा माझ्याच हातचे पदार्थ जास्ती आवडतात. हे बरेचसे पदार्थ भारतीय असतात.

आयुष्यात मला माझ्या आईचा सहवास खूप मिळाला. लहानपणापासून आई म्हणायची, ''तू अभ्यास कर आणि खूप प्रगती कर. स्वयंपाक काय कधीही शिकशील''. मग पुढे नोकरी लागल्यावर पण आई म्हणायची, ''अगं, थकली असशील. तू आराम कर. स्वयंपाक काय, तो करायचाच आहे पुढे''. अगदी इथे अमेरिकेत आमच्याकडे राहायला आल्यावर सुद्धा आईला वाटायचं की मुलींनी स्वयंपाकघरात स्वतःला कोंडून घेऊ नये. कदाचित वयाच्या सातव्या-आठव्या वर्षांपासून आईला चार भावंडं, आई-वडील, आणि मामा इतक्या लोकांचा स्वयंपाक तिच्या आईच्या आजारामुळे करायला लागला आणि तिचं बालपण घरकामात गेलं म्हणून असेल किंवा उच्च शिक्षण न मिळाल्यामुळे तिला आपल्या मुलींचं आयुष्य आपल्या आयुष्यापेक्षा वेगळं असावं, असं तिला वाटलं असेल.

वीसएक वर्षांपूर्वी मीना तिच्या लहानग्या मुलीला उमाला घेऊन पहिल्यांदाच मिनियापोलीसहून पुण्याला गेली होती. उमाला छानपैकी परकर-पोलकं घालून, दोन वेण्या घालून आणि मोगऱ्याचा गजरा माळून मीना आपल्या मैत्रिणींना भेटायला गेली आणि पाहते तर काय तिच्या मैत्रिणींच्या मुली जीन्स किंवा शॉर्ट्स घालून आल्या होत्या! मीनाच्या मैत्रिणी पाहतच राहिल्या आणि मीनालाही जरा लाज वाटली. पण तीन वर्षांच्या उमाला हे तिच्या डोक्यावर घडणारं नाट्य जाणवलंच नाही कारण ती लहान होती आणि तिला भारतातलं सगळंच नवीन होतं.

तेव्हाच भारतीय बदलू लागले होते. बाहेर खाणं वाढलं होतं. उपाहारगृहांची संख्या वेगाने वाढत होती आणि जगातले वेगवेगळे खाद्यपदार्थ मिळू लागले होते. दोन वर्षांपूर्वी माझ्या मित्राच्या मुलानं पुण्यात इटालियन उपाहारगृह काढलं आणि स्वीट होममध्ये जाऊन साबुदाण्याची खिचडी खाणाऱ्या पुणेकरांना एकदम कॉस्मोपॉलिटन बनवून टाकलं!

इथे आमच्या घरात नेहमीच इटालियन, मेक्सिकन, चायनीज असा स्वयंपाक केला जातो. पण मग कधी कधी आपली साधी लाल माठाची भाजी, मक्याची भाकरी, कांदा, आणि घरचं दही असा बेत बनतो आणि त्या जेवणाला जी लज्जत येते ती सगळ्यात महागड्या मिशेलिन स्टारवाल्या फाइन डायनिंगला पण येत नाही. अर्थात हे सगळं घरीच शिजवावं लागतं. पुणेकर मात्र झुणका-भाकरी खावीशी वाटली तर सरळ उठून सिंहगडावर जातात आणि तिथे भाजी-भाकरी खातात. भारतात खूप लोकांच्या घरी पोळ्या करायला बाई येते. माझी पुण्यातली मैत्रीण तर म्हणते की तिच्या घराजवळ इतक्या बायका घरगुती स्वयंपाक करून देतात की ती कंटाळा आला की इथून पालेभाजी आण, तिथून आमटी आण असं करून जेवण 'असेम्बल' करते!

मिनियापोलिसमधे आई राहत होती पण तिचं मन मात्र पुण्यात होतं. पहिल्या वर्षी उन्हाळ्यात तिला आम्ही पुण्यात करायचो तसे सांडगे-पापड्या कराव्याशा वाटल्या. अँड्रूनं उत्साहानं अंगणात टेबल घातलं आणि त्यावर प्लास्टिक पसरलं. आईनं मग साबुदाण्याच्या पापड्या त्याच्यावर वाळत टाकल्या. मीना आणि मी अर्धवट वाळलेल्या पापड्या दिवसभर खात होतो. तेव्हापासून आम्ही पापड्या आणि पापड दर वर्षी करतो. हे ऐकल्यावर आमच्या भारतातल्या मैत्रिणी अचंबित होतात, ''आम्ही बाई असल्या गोष्टी विकतच आणतो'', असं म्हणातात. आता तर मीना आणि मी पोह्याचे पापड सुद्धा घरीच करतो!

दिवाळीचा फराळ मला अजून नीट जमत नाही पण पुरणपोळी मात्र जमते. माझ्या पुण्यातल्या मैत्रिणी हे पदार्थ

विचार न करता विकत आणतात. लग्नात आणि सणावारी अमेरिकेतल्या भारतीय बायका साड्या नेसतात पण भारतात मात्र बायका गाऊन किंवा सलवार–कुडता घालतात! मागच्या वर्षी मीना पुण्यात तिच्या एका मैत्रिणीच्या मुलाच्या लग्नाला गेली होती. पाहते तर काय तिच्या काही मैत्रिणी गाऊन घालून आल्या होत्या! का तर म्हणे साडी नेसायला त्रास होतो! गाऊन कसे सुटसुटीत वाटतात! आणि आम्ही मात्र इथे सगळ्यात नवीन प्रकारच्या साड्या आणि ब्लाऊज घालण्याचा प्रयत्न करतो! भारतात गेलं की बॅगा भरभरून साड्या आणतो आणि संधी मिळताच त्या नेसतो!

मुलांना मराठी बोलता यावं म्हणून आपण त्यांना रविवारी मराठी शाळेत पाठवतो. त्यांच्यावर भारतीय संस्कार करायचा प्रयत्न करतो. पण ही सगळी धडपड फक्त पहिल्या पिढीची! आणि काही प्रमाणात इथे जन्मलेली दुसऱ्या पिढीतली मुलं आईवडिलांच्या आग्रहामुळे थोडाफार प्रयत्न करतात. पण ही पिढी म्हणजे एबीसीडी – 'अमेरिकन बॉर्न कन्फ्युज्ड देसी'. हळूहळू देशीपणाच्या वरवरच्या थराला तडे पडायला लागतात आणि त्यांचे पोपडे निघून आतील 'अमेरिकनपणा' बाहेर पडतो! आणि त्यांची मुलं म्हणजे तिसरी पिढी आपलं भारतीयपण पार विसरून जाते!

आणि मग इथे पिढ्यानपिढ्या असलेल्या इटालियन, जर्मन, मेक्सिकन वगैरे लोकांप्रमाणे आपली भाषा, संस्कृती, स्वयंपाक आणि जगण्याची पद्धत सोडून सगळे भारतीय अमेरिकन होऊन जातात! आधी मला आश्चर्य वाटायचं की माझ्या नवऱ्याचं आडनाव जर्मन आहे पण जर्मन भाषेचा अ, ब, क, ड ही त्याला कसा येत नाही! जर्मनीला भेट दिली तेव्हा मीच त्याच्या चुलतभावाबरोबर माझ्या मोडक्यातोडक्या जर्मनमध्ये बोलले!

हा सगळा काळाचा महिमा असतो हे आता कळायला लागलं आहे; मग आपण का एवढी धडपड करतो? परदेशांत भारतीय 'रेट्रो' होण्यात का आनंद मानतो?

दिवा

काळाकुट्ट अंधार
आकाश ढगाळ
वाट खडकाळ
मध्येच पावसाचा शिडकाव
ढगांचा गडगडाट
विजेचा कडकडाट
त्यातच दिसे नदीचा काठ
दोन्ही बाजूला झाडे घनदाट
तो एकटाच चाललेला अडखळत, धडपडत
वाट चुकलेला काळीज होते धडधडत
घशाला पडली कोरड
रातकिड्यांनी धरीला सूर
घुबडांच्या आवाजाने दूरवरच्या कोल्हेकुईने
बेडकांच्या डराव डरावने मनांत थरथर
कुठं गेला गाव
देवाचा केला धावा
दूरवर झाडाजवळ काहीतरी लखलखले
त्या दिव्याने मनात आशेचे किरण खुलले
दिवा, गाव, माणूस, मशाल
असे अनेक विचार तरळले
झपाझप पावले चिखलाने माखली
कधी दिवा दिसे, कधी काळोख पसरे
कुठे गेला दिवा?
ह्या झाडाजवळच होता बघा
तेवढ्यात एकच काय, अनेक दिवे प्रकाशले
झाडच काय सर्व आसमंत उजळले
काजव्यांच्या त्या जादूने त्याचे डोळे दिपले
मन भरले!
पहिल्यांदा एकटाच मग पर्यटकांसमवेत
तो अनेकवेळा तेथे आला
ती जादू त्याने अनेक वेळा पाहिली
पण पहिल्या अनुभवाइतकी मजा कधीच आली नाही
पर्यटनामुळे तो श्रीमंत झाला
तो फक्त अंधाराकडून दिव्यांकडे
तिमिराकडून तेजाकडे जात राहिला...

– **मनिषा भिडे** (कालोरॅडो)

कलासंक्रमण

सोनाली अनिल खर्चे
चिपळूण, रत्नागिरी

माझ्या लहानपणी दुपारच्या फावल्या वेळात आई सुंदर भरतकाम, शिवणकाम, भरपूर पुस्तकं वाचत असे. सणावाराला आई अंगणात विशेष आकर्षक रांगोळी काढायची. स्वयंपाक करताना छान छान गाणी गुणगुणाची. आम्ही तिला बघत आलो आणि कधी या कला शिकलो, कधी या कला आमच्यात संक्रमित झाल्या हे कळलंच नाही. पण खरं सांगू, या कलांमधे गुंतलेलं असणं म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या, निसर्गाच्या, निर्भेळ आनंदाच्या खूप जवळ असतो. आयुष्य अतिशय सुंदर आहे यावरचा विश्वास दृढ होऊ लागतो. म्हणून कला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असला पाहिजे. नोकरी, व्यवसाय भाकरी देईल. पण ती आनंदानं कशी खायची हे कला शिकवते. कला जगायला, जगणं साजरं करायला शिकवते.

लग्नानंतर नोकरी आणि संसाराचे व्याप यातून माझं कलेकडं दुर्लक्ष झालं. मात्र माझा मुलगा मोठा होत असताना, प्रामुख्यानं वयात येताना, मुलांचा जो चिडचिडेपणा वाढतो तो मी अनुभवला. त्याच्या ऊर्जेला प्रवाहीत करणं गरजेचं होतं. तेही; अर्थातच सकारात्मक दिशेला. त्यावर उपाय म्हणून मी माझ्या मुलासोबत शाडूच्या मातीचा, साचा/मोल्ड न वापरता गणपती बनवायला सुरूवात केली. आजही मी 'बाल गणूल्या' घडवते. उद्देश एकच कुणी तरी ही कला पाहिली की त्यालाही प्रेरणा मिळते. ''ज्योत से ज्योत जलाते चलो, प्रेमकी गंगा बहाते चलो''. या वचना नुसार कलेतून कले कलेनं, कलाकुसरीतून, कारागिरीतून कलाकारांच्या कलाविष्काराचं कौशल्यपूर्ण कोलाज आकार घेत असतं. कला संक्रमित होताना कालानुरूप बदल स्वीकारत पुढं जाते.

अशीच कोविड मधल्या दिवसांमधली नवरात्र होती. भोंडला घालायचा तर फुलं हवीत. पण बाजारात, गर्दीच्या ठिकाणी जाण्यास बंदी. आपण सगळेच अगदी महत्त्वाच्या कामासाठीच बाहेर पडत होतो. मग मी अंगणातली जास्वंदाची चार-पाच फुलं, गुलाबाचं फुलं, पानं घेऊन नेमक्याच साहित्यातून, पण स्वतःच्या प्रतिभेला आव्हान देऊन भोंडला करायला सुरूवात केली. हे काहीसं असल्यानं हा भोंडला खूपच लोकप्रिय झाला. त्यानं आणखी एक ओळख दिली आणि वाढवली. कलेचा वारसा जपणारी माणसं, कलेचे उपासक जोडून दिले. दैनिक 'सागर' वृत्तपत्रानं या भोंडल्याला नियमीत प्रसिद्धी दिली आणि देत आहे. शहराच्या, गावाच्या सीमा पुसून लोक कौतुक करू लागले. म्हणजे कलेतून लोकसंग्रह आणि लोकसंगम होऊ लागला. कोणतीही कला माणूस आणि संस्कृती जोडण्याची कला शिकवूनच जाते.

भोंडल्यातही पाकळ्या जोडूनच चित्र बनतं ना! जे अर्थपूर्ण असतं. रांगोळीच्या परंपरेतही ठीपके जोडायचे म्हणजे तरी काय हो... आकारच द्यायचेत ना! म्हणजे वेगवेगळी विखुरलेली नाती, मैत्री जोडायची, ती ही एका निश्चित अर्थपूर्ण आकारावर. मुक्तहस्त रांगोळीतही रेषा-रेषा जोडल्या जातात आणि माणसा माणसातल्या सीमारेषा पुसल्या जातात. संगीतातही तेच. सात स्वर पूर्ण स्वतंत्र आहेत. पण अलंकारांमध्ये गुंफले की सुरावट आणि गोड गाणं तयार होतं. स्वरांची गुंफण तरी काय सांगते ... हेच नां, की गुंफलं की गाण्यातलं सौंदर्य वाढतं. हे गुंफणं म्हणजे जोडणंच ना! मातीचे कण-कण एकत्र येतात. कलाकार त्यांना आकार देतो आणि एक मूर्ती घडवतो. कलाकुसरीतही जोडणं अनिवार्य आहे. वीणकाम करताना धागे धागे विणतो तेव्हा एकसंध वस्त्र तयार होतं. शुद्ध सोन्याचा दागिना घडवला तर ढोबळ नक्षीचा

दागिना बनतो. पण जर तुम्हाला नाजूक, नजाकत, कलाकुसर असणारा सुंदर दागिना हवा असेल, तर मात्र या सोन्यात तांबं मिसळायलाच हवं. म्हणजे जोडल्याशिवाय, मिसळल्या शिवाय सौंदर्य निर्मिती, कलेचं सर्जन, नि नात्यांचं सिंचन होत नाही आणि गंमत बघा, अगदी व्यावहारीक विचार केला तरी धाग्यापेक्षा विणलेल्या वस्त्राचं, शुद्ध सोन्याच्या दागिन्यांपेक्षा तांबं मिसळून केलेल्या सोन्याच्या सुबक सुंदर नक्षीच्या दागिन्याचं, गुंफलेल्या स्वरांचं सरगम- गीत, स्वतंत्र एकट्या माणसापेक्षा कुठल्याशा नात्यानं जोडलेला, समाजाशी जोडलेला माणूस या साऱ्यांचं सौंदर्य मूल्य आणि उपयोगिता मूल्य निश्चितच खूप खूप जास्त असतं; नाही का?

पण... आम्ही थोडं- जास्तीत त्या space/स्पेसला घेऊन बसलोय. मी थोडं आणि जास्ती हे दोन शब्द एकत्र म्हणतीये, याचा अर्थ आपल्या लक्षात आलाच असेल की नेमकी किती, केव्हा, कशाप्रकारची space/ स्पेस गरजेची असते हेच, आपल्याला नीट लक्षात आलेलं नाही. माणूस माणसापासून तुटण्यापेक्षा जुळला पाहीजे. नाहीतर पृथ्वीवर माणसाचं टिकून राहाणं, तग धरणं सुद्धा कठीण होईल.

जोडणं आणि सौंदर्य निर्मिती हे कलेचं मुख्य उद्दिष्ट असावं. म्हणूनच समाजात समान कला विषयाची आवड असणारे समूह स्थापन होतात. अखिल भारतीय नाट्यपरिषद, साहित्य परिषद, ढोल ताशा पथकं, सांस्कृतिक कलामंच, दिल्ली, ललित कला अकादमी इ. अशा अनेक उपयुक्त संस्था कलेच्या निर्मितीचं, देवघेवीचं आणि मुख्य म्हणजे कलेच्या उपासकांना मुक्त सृजनासह घट्ट बांधून ठेवतात.

एकत्र येणं, जोडलेलं राहणं म्हणजे संमेलन. हा शब्द सम् + मिलन असा आला. मिलन म्हणजे एकत्र येणंच ना. समान गुण, समान आवडी, समान कला, समविचारी लोक एकत्र येतात. संमेलनं तीच जिथं एकटं भटकणाऱ्याला सम सापडते. हे समेवर येणं जसं संगीतात महत्त्वाचं तसंच आयुष्यातही!

असंच एक उदाहरण. परवा, चिपळूणात आम्ही बांधावरचं संमेलन घेतलं. साहित्याला बांध नसतो, ते प्रवाही असतं. पण साहित्याची सेवा करणारे, साहित्याला जपणाऱ्यांनी या संमेलनात परस्परांना बांधून घेतलं, ते शेताच्या बांधावर. माणूस, नाती आणि माती यातले बंध बांधावर विणले गेलेत, बंध उलगडलेत सुद्धा. आम्ही निसर्ग आणि मातीला बांधून राहायचं म्हणून संमेलनात भारतीय बैठकच बांधावर आणि बांधासमोर होती. शाल श्रीफळा ऐवजी घोंगडीनं सत्कार केलेत. आपल्या संस्कृतीला बांधलेलं राहायचं म्हणून आंबोळी आणि नारळाची चटणी नाश्त्यासाठी, झुणका, वांगं-पावट्याची ग्रामीण भाजी, नाचणीची भाकरी, खीर, ग्रामीण पद्धतीचं मिरचीचं ताजं लोणचं असा भोजनाचा बेत. कोकणात डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी महिन्यात जो मडक्यांमधे पावटा, मटार, कणसं, कांदा, बटाटा, रताळी आणि भांबुर्डी वनस्पतीची पानं, ओवा, मीठ वगैरे घालून; जमिनीत खड्डा खोदून वर काटक्यांनी शेकवतात, शिजवतात त्याला मोंगा म्हणतात. हा मोंगा संध्याकाळचा नाश्ता. म्हणजे परिपूर्ण रानमेवा. फांदीलाच माईक होता. बाजूनं येणारी फांदी बांधावरच्या व्यासपीठाची नैसर्गिक सजावट होती. मुंग्यांची मोठी वारूळं ज्या भूमातेचं प्रतिक आहेत, ज्याला 'भोंबाड' किंवा 'सातेरी' म्हणतात त्यांचं पुजन करण्यात आलं, दगडी दिव्यांचं पुजन, मांडव न घालता झाडांच्या ऊन सावल्यात साहीत्याचा रानमेवा सा-यांनी आस्वाद घेतला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना जाणीवपूर्वक निमंत्रण या कार्यक्रमाचं दिलं कारण कलेचा, साहित्याचा संस्कार आणि संक्रमण होणं सगळ्यात महत्त्वाचं. हा सगळा मिलाप घडवून आणणं म्हणजे संमेलनातल्या समेवर अनेक कलाकार सांधले जाणं. ते घडलंही तसंच.

कलेचा मुख्य हेतू सौंदर्य निर्मिती आणि दुसरा लोकसंग्रह, लोकसंगम हा असला तरी, एक मोठा शाप कलेला, कलाकाराला असू शकतो; तो म्हणजे मत्सर. जेव्हा एखादा कलाकार दुसऱ्या कलाकराला प्रोत्साहन देत नसेल, कौतुक करत नसेल, तेव्हा मत्सर करणाऱ्या कलाकारामधली निरागसता, सहजता संपते. आकस वाढतो. विचारांमधली व्यापकता लोप पावते, कले मधलं सौंदर्य हरवतं. कला दुरावा आणते. पण; प्रगल्भ कलाकार मुळात स्वान्त सुखासाठी कला जोपासतो. कलेसाठी स्वतःला समर्पित करतो. कलेतून नात्याचे बंध विणत जातो. कारण तो जाणतो की माणूस जोड प्रकल्पात कलेचं योगदान खूप मोठं आहे.

अभिजात मराठी भाषेचा गाळीव इतिहास

– जय मसुरेकर
सोलोन, ओहायो

तीन ऑक्टोबर २०२४ ला भारत सरकारचे माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याचं जाहीर केलं. मराठीबरोबर आसामी, प्राकृत, पाली व बंगाली या चार भाषांना पण अभिजात भाषेचा दर्जा मिळाला.

थोडक्यात आता पुस्तक ''असा मी असामी'' असो की आसामी ते आता अभिजात भाषेत असणार. कोटी फालतू असली तरी मराठीत असल्याने ती अभिजात आहे, असे वाचणाऱ्यांनी मानावे. तसेच ''मी चाय पिली'' अथवा ''मला हे पुस्तक भेटले'' ही अभिजात भाषेतील वाक्ये आहेत, याची जाणीव समस्त (विशेषत: पुण्यातील) मराठी भाषिकांना असणे गरजेचे आहे. याशिवाय 'पालींचे' चुकचुकणे अभिजात नसून फक्त 'पालीतले' चुकचुकणे अभिजात असेल, याची कृपया नोंद घ्यावी. बंगाली क्रिकेटप्रेमींना हे जाणून विशेष आनंद होईल की ''कोरबो, लोरबो, जीतबो'' आणि ''खेला होबे'' या घोषणाही आता अभिजात ठरल्या आहेत. तरीही आयपीएल चषक मात्र रक्तात ''आयला, सचिन'' हे अभिजात मराठी घोषवाक्य असलेला संघच जिंकणार आहे हे निश्चित.

सर्वांत जुना मराठी शिलालेख २२२७ वर्षांपूर्वी नाणेघाटात तेंव्हाच्या राजकारण्यांनी लिहून ठेवला आहे. तेंव्हा राजकारणी आणि नाणे (किंवा खोके) यांचा संबंध पुरातन काळापासून आहे हे सिद्ध होते. तो शिलालेख खाली उद्धृत केला आहे. ''उद्धृत'' ह्या शब्दाला अभिजात भाषेत ''लिवलाय'' असे म्हणतात, हे महाराष्ट्रातील जनतेला ठाऊक असेलच.

मूळ – महारठीनो अंगीय कुल वधनस सगरगिरीवलयाय पथविय पथम विरस वस य महतो मह

शासकीय अर्थ – महारठी अंगीय कुलातील गिरीसमुद्रवलयांकित पृथ्वीवरील वीर महान पुरुष.

खरा अभिजात अर्थ – मराठी लोकांनी अंगी जो कूलनेस गिरवलाय तो पाहून प्रथम विरस होतो थोरा मोठ्यांचा.

थोडक्यात मराठी लोकांवर प्राचीन काळातील इतर भाषिक आतासारखेच खार खाऊन असायचे हे कळते.

'गाथासप्तशती' या मराठीतील सर्वांत प्राचीन ग्रंथाचा मराठीला हा अभिजात दर्जा मिळवून देण्यास मदत झाली. कमळाचा ह्या ग्रंथात ४९ वेळा उल्लेख असल्यानेच हे शक्य झाले. ही केवळ एक अफवा आहे याची जाणकारांनी नोंद घ्यावी. तसेच गाथासप्तशती हा प्रेमकवितांचा संग्रह आहे. ह्यावरून हे कळते की पहिल्या शतकात का होईना, पण मराठी माणूस प्रेमाने बोलू शकत असे. या ग्रंथातील बहुतांशी कविता ह्या अविवाहित तरुणींच्या दृष्टिकोनातून आणि प्रियकराला भेटण्यासंबंधी लिहिल्या आहेत. तेंव्हा पहिल्या शतकात संस्कृती रक्षक राजकीय पक्ष आणि खाकी वर्दीतले अमरिश पुरी नसल्याने प्रेमी युगुले निःशंक भेटू शकत असत असेही कळते. संस्कृती पुरुष ''प्रधान'' असली तरी प्राचीन मराठी साहित्याची ''सम्राज्ञी'' स्त्रीच होती हेही सिध्द होते. ह्या ग्रंथाच्या निर्मितीतही सचिन पिळगावकरांचा हात होता, असे खात्रीलायक सूत्रांकडून (म्हणजे स्वतः पिळगावकरच. सॉरी, सचिनजी) समजते.

अभिजात भाषेचा दर्जा एकाहून अधिक भाषांना मिळाल्यामुळे मात्र थोडा गोंधळही उडाला आहे. उदाहरणार्थ, खाद्यसंस्कृतीच घ्या. हिंदी अभिजात भाषा नसल्याने ''गोलगप्पा'' अभिजात नाही पण मराठीतील ''पाणीपुरी'' जास्ती अभिजात की बंगालीतील ''पुचका''? ''श्रीखंड'' जास्त अभिजात की ''सोंदेश'' आणि हे दोन्ही पदार्थ चापल्यावर ''आयला, काय मस्त आहे'' म्हणणे अधिक अभिजात की ''फाटाफाटी''? किंवा चव आवडली नाही तर ''फालतू आहे'' म्हणणे अधिक अभिजात की ''छोतोरमाथा''? या आणि अशा सर्व इतर महत्त्वपूर्ण शंकांवर ४०० हून अधिक विद्यापीठे आता संशोधन करणार आहेत.

एकूणच काय तर हा दर्जा घोषित करायची वेळ पाहता, जातनिहाय राजकारण करणाऱ्यांना, अभिजातनिहाय ''राज''कारण करणाऱ्यांनी धोबीपछाड देण्याचा प्रयत्न केला आहे, ही नाणेघाटातील शिलालेखासारखी काळ्या दगडावरची रेघ आहे.

अवघड पण मनातील रंजक कथा

प्रभाकर जोशी
लिबर्टीविले, इलीनॉय

वर्ष होते १९६३. रिझर्व्ह बँकेने फक्त आठ डॉलर्स आणि ८० सेण्टस प्रत्येकी आणावयास परवानगी दिली होती. म्हणून एका अमेरिकेंतील गव्हर्नरच्या सेक्रेटरीला लिहिले. तिने २०० डॉलर्स पाठवले. ते घेऊन टेक्सासला जाईपर्यंत पैसे संपत आले. दोघांना विश्वविद्यालयात नोंदणी करायची होती. बँकेत गेलो. पासपोर्ट वगैरे कागद दाखवले. ४००० डॉलर्स देण्यास तयार होते. एवढे नकोत म्हटले. आग्रह केल्यानं फक्त फी पुरते आणि खर्चायला असे ५०० डॉलर्स कर्ज घेतले. सौभाग्यवती रोज ५ चौक आणि मी अडीच मैल शिक्षणासाठी चालत जायचो. हातात पुस्तकांची पिशवी. एक आठवड्यानंतर मी चालताना एक मोटार थांबली. मला विचारले तुम्ही विद्यार्थी आहात ना ? मी हो म्हटले. इतके लांब चालता जाता का ? मी सांगितले चालणे हा उत्तम व्यायाम आहे. ते दोघे हसले. मोटारीत बसा म्हणाले. त्यानंतर माझे कॉलेजसाठी चालणे संपले. एकीकडे नोकरी होती. डॉलर्स एक आणि दहा पैसे दर तासासाठी. थोडे पैसे वाचवल्यावर एक सायकल पाहिली पोलीस स्टेशनवर. सात डॉलरला मिळाली. जुन्या सायकलींचा सेल होता. पुढे दांडी असलेली मेन सायकल घेतली. सगळीकडे जाणे सोयीचे झाले. लवकर जाता येऊ लागले गंमत म्हणजे बायको पुढल्या दांडीवर बसून दोघे जाऊ लागलो की खिडक्या उघडून अमेरिकन हात दाखवीत. कारण गावात आम्ही दोघेच भारतीय .

आणखी गंमत म्हणजे आम्हाला अमेरिकन शाळातून बोलावणी यायची. भारतीय विवाह व्यवस्था, शिक्षण पद्धती वगैरे विषयांचे वर्णन सर्वांना ऐकावेसे वाटायचे .. हळू हळू थोडे पैसे जमा झाले. मोटार घेता येईल का पाहू म्हणून गेलो पाहावयास .

संवाद असा झाला:

– आम्ही : गाडी घेण्याचा विचार आहे.
– तो: चार हजाराला नवी गाडी आहे.
– आम्ही: जुनी गाडी दाखवा.
– तो: हि गाडी एक हजाराला उत्तम आहे.
– आम्ही: आणखी स्वस्तं.
– तो: बरं तर ती गाडी पाचशे डॉलर्सला आहे.
– आम्ही: आणखी खूप स्वस्त असेल तरच थांबतो.
– तो: ती कोपऱ्यात शंभर डॉलर्सला आहे.
– आम्ही: तर ती घेतो असे करून १९५४ फोर्ड गाडी घेतली.

आणखी एक गंमत. दोन आठवडे गाडी चालवली. नंतर एक दिवस कॉलेजला जाताना गाडी एकदम थांबली. समोर दुरुस्तीचे दुकान होते. जाऊन विचारले. गाडी आत आणा म्हणाले. चालत नाही सांगितले. त्याने बाहेर येऊन हूड उघडले दांड्या हलवून म्हणाला सर्व्हिसिंग केव्हा केले होते ? सर्व्हिसिंग शब्दाचा अर्थ काय असे विचारले. तो म्हणाला कशाचाही थेंब गाडीत राहिलेला नाही. तेल नाही, ब्रेकचे तेल नाही, ट्रान्समिशनचे तेल नाही.. त्याने सर्व घातलें, पैसे फार घेतले नाहीत. परमेश्वर कृपा. अशा अनेक गंमती झाल्या.

माझे बिघडलेले पदार्थ

अविनाश कोल्हटकर
सिॲटल

मी आणि माझी पत्नी आम्ही दोघं बँकेतील प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झालो आणि तेव्हापासून सतत भारतात आणि विदेशात भ्रमंती करत असतो. आम्ही फुडी अजिबात नाही, पण वेगवेगळ्या ठिकाणचे वेगवेगळे पण शुध्द शाकाहारी पदार्थांची चव घ्यायला आम्हाला आवडते. वाढत्या वयानुसार जिभेवर येणारी बंधने पाळून स्वतःला फिट ठेवायचा प्रयत्न आम्ही सतत करतो. घरी असतो तेव्हां वेळ घालवायला म्हणून किचनमध्ये माझी सतत लुडबूड असते. त्यामुळे अनेकदा माझ्या आवडीचे पदार्थ तज्ञ पत्नीच्या हस्तक्षेपाविना करण्याचा प्रयत्न मी करतो. कधी जमतात तर कधी फसतात. आणि पदार्थ फसला की नंतरचे काही दिवस ''कुठे चूक झाली'' हे शोधण्यात जातात. दुसरीकडे घरातील तज्ञ पत्नी ''कुणाचं ऐकतच नाहीत, माझा सल्ला ऐकणं म्हणजे कमीपणा वाटतो आणि पदार्थ बिघडला की बसायचं कुठे चुकलो, कुठे चुकलो असा विचार करत'' अशी चर्चा सगळीकडे करताना दिसतात.

एकदा ताजा खवा मिळाला म्हणून फुल कॉन्फिडन्सने गुलाबजाम केले, पण त्या प्रयोगातून एक नवा पदार्थ जन्माला आला. त्यात एरव्ही तुकतुकीत गोलमटोल गुलाबजाम स्वतःचे अस्तित्व सोडून साखरेच्या गोडगट्ट पाकात मस्त पहुडलेले मला दिसले. अनेकदा मी शिरा, उपमा पोहे इ. पदार्थ करून पाहिले, पण शिरा आणि उपमा ह्यांची लापशी आणि पोहे जास्त भिजल्याने पोह्याची उकड झालेली मला दिसली. लग्नानंतर हौशीच्या काळांत दिवाळीला 'सौ' ने हौशीने केलेले चकली आणि पातळ पोह्याचा चिवडा हे पदार्थ चिवट झाल्याने मी त्यांची नावं चिवट चिवडा आणि चिवट चकली अशी ठेवली. मी हौशीने केलेले शंकरपाळे हे तर रायफलच्या बुलेटसारखे इतके कडक झाले की चावून खाणे तर दूर, ते तोडण्यासाठी अडकित्त्याचाच वापर करावा लागला. .

असाच एक पदार्थ मी दोन तीन वेळा करून पाहिला पण

तो बिघडतच राहिला. तो दगडासारखा कडक झाल्याने बत्त्याने फोडूनही फुटेना. म्हणून त्या पदार्थांचे नांव मी ''दगडी गुळपापडी'' असं ठेवलं. वास्तविक पाहता गुळपापडी हा आमच्या बालपणीचा पदार्थ. लहानपणी भूक लागली की आई आम्हाला गुळपापडीची एक वडी हातावर द्यायची आणि ती खाऊन पाणी पाऊन् भूक भागायची. मित्रांनो, त्या काळात आज बाजारात उपलब्ध असलेले 'रेडी टू ईट' पदार्थ कधीच उपलब्ध नसायचे. त्यामुळे लाडू, चिवडा, शंकरपाळे, गुळपापडीसारखे पदार्थ डब्यात साठवून ठेवलेले असायचे. तुम्हाला बाजारात मिळणारे पॅकेटस सोयीचे वाटत असले तरी ते खाऊन मुलांचं पोटही भरत नाही आणि त्यांना समाधान मिळत नाही. पण आपले पूर्वजांनी दिलेले पदार्थ हे पोटभरीचे

आणि पौष्टिक तर असतातच, पण घरातील उपलब्ध साहित्यात आणि फारच स्वस्तात तयार होतात आणि खूप दिवस टिकणारे असतात. आज मी तुम्हाला गुळपापडी ह्या विस्मरणात गेलेल्या पदार्थांची साधीसोपी रेसिपी इथे देणार आहे. मुलांमुलीनो, वेळात वेळ काढून तुम्ही हा पदार्थ नक्की करून पहा. मी दिलेली पद्धत आणि प्रमाण ह्यांचे काटेकोर पालन करा. तुम्हाला नक्की जमेल आणि तुम्हाला आणि तुमच्या लाडक्यांना नक्कीच आवडेल. मराठीत आपण ह्या पदार्थाला गुळपापडी म्हणतो. पण गुजराथी लोक ह्याला सुखडी म्हणतात. एका जुन्या पुस्तकातून ही रेसिपी मला मिळाली आणि असे पारंपरिक पदार्थ करून खाण्याची खूप आवड असल्याने मी त्यात थोडे बदल करून तिला थोडं पौष्टिक स्वरूप देण्याचा यशस्वी प्रयत्न केला आणि त्यात मी आता सफल झालो. गव्हाच्या पिठाऐवजी नाचणीचं पीठ वापरलं तर ती गुळपापडी अतिपौष्टिक होते पण मुलांना ती आवडत नाही. चला तर करून पाहूया मऊसूत आणि तोंडात विरघळणारी पण भूक शमवणारी गुळपापडी

साहित्य – २ कप गव्हाचे पीठ

१ कप साजुक तूप

१ कप किसलेला गुळ

२ टेबलस्पून पोहे किवा खाण्याचा डिंक

१ टेबलस्पून वेलची किवा सुंठ पावडर(पूर्णतः ऑप्शनल)

१/२ कप काजू बदामाची भरड

हे सगळं साहित्य हाताशी तयार ठेवा. तसेच एका केकट्रेवर वड्या थापण्यासाठी तूप लावून ग्रीसिंग करून ठेवा. कारण वेळ न घालवता एकामागे एक गोष्टी आपल्याला कराव्या लागतात. ही महत्वाची टीप.

गॅसवर थोड्या मोठ्या कढईत दोन चमचे तूप टाकून त्यात एकतर डिंक फुलवून घ्या किवा पोहे नीट भाजून घ्या आणि ते एका ताटलीत काढून ठेवा आणि गार झालं की हाताने चुरून ठेवा. त्याच तुपात काजू बदामाची भरड पण थोडी भाजून घ्या. आणि ती पण वेगळी काढून ठेवा.

आता त्याच गरम कढईत गव्हाचे पीठ भाजायला घ्या. पीठ भाजताना ते मंद आचेवर सतत पंचवीस तीस मिनिटे जाडसर उलथण्याने ते हलवत रहा आणि ते कढईला लागून जळणार नाही याची काळजी घ्या. आता काजू बदामाची भरड आणि पोहे अथवा डिंक चुरा पिठात घाला. हे घातल्याने वड्या खुसखुशीत होतात. पिठाचा रंग बदलून थोडा पिवळसर झाला की त्यात कपातील तूप पूर्ण संपेपर्यंत थोडे थोडे घालून ते पुनः ढवळत रहा. इथेही खाली लागणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. एक वेळ अशी येते की मिश्रण पूर्ण भाजलं गेल्यावर मिश्रण तूप सोडायला लागतं. इथे नेमकं ह्याच पॉइंटवर गॅस बंद करा आणि कढईतील भाजलेले पीठ थोडे बाजूला सारून रिकाम्या जागेवर सगळा गूळ टाकून ढवळा आणि काही क्षणांतच तो वितळला की वेलची पावडर/सुंठ टाकून ते मिश्रण एकजीव करून घ्या आणि गरम असतांनाच ग्रीसिंग केलेल्या ट्रेवर पसरून उलट्या वाटीने नीट थापून घ्या. सरफेस पूर्ण चिकणा दिसायला पाहिजे नंतर उलथण्याने किवा शार्प चाकूने हव्या त्या आकाराच्या वड्या पाडून घ्या. त्या पूर्णपणे गार झाल्यावर अलगद हाताने काढून त्या बंद डब्यांत साठवून ठेवा. संध्याकाळी आपण थकूनभागून घरी आल्यावर एक वडी खाल्ली तरी छान एनर्जी मिळते. लहान मुलांनाही ती आवडते.

मी गूळ टाकते वेळी गॅस बंद केला नाही आणि चार पाच मिनिटे मिश्रण हलवतच राहिलो आणि ह्या गुन्ह्याची शिक्षा म्हणून माझ्या वड्या इतक्या कडक झाल्या की दातांनी चावण्याचा प्रयत्न केला तर मला दुसरी शिक्षा मिळाली आणि दातांचा क्राऊन बाहेर आला म्हणून मी त्या बिघडलेल्या पदार्थाला ''दगडी गूळपापडी'' हे नांव दिलं.

तर मित्रांनो गूळपापडी नक्की करून पहा. तुम्हाला खूप आवडेल.

मन्या : आई, गांधींच्या डोक्यावर केस का नव्हते ?

आईः कारण ते फक्त खरं बोलत होते.

गण्या : आता समजलं की बायकांचे केस लांब का असतात.

गण्याला लई धुतलं आईनं....



– रेखा पै

प्रथम पारितोषिक – दिशा पुरदकर



द्वितीय पारितोषिक – अनिका कोषे

विशेष उल्लेखनीय – आदित्य जोशी



एक गुढीपाडव्याचा दिवस

आयुष करंदीकर
(१ली - ७ वर्ष)
लॉस एंजलिस

एके दिवशी राम, सीता, लक्ष्मण वनवासातून परत येतात. ही बातमी एका शेतकऱ्याला समजते. तो त्यांच्या स्वागतासाठी आंबे, सफरचंद आणि द्राक्षे घेऊन जाणार असतो, परंतु ते सारे सामान त्याला एकट्याला नेणे शक्य नसते.

तो असा विचार करत असतानाच त्याला एक गाढव आणि डुक्कर तेथे भेटतात. ते त्याला विचारतात ''तुला काही मदत हवी आहे का?'' शेतकरी आनंदाने हो म्हणतो. गाढव सारी फळे शेतकऱ्यास पाठीवर लादण्यास सांगते. डुक्कर गुलाबाची फुले आणते.

अशा प्रकारे सारे सामान घेऊन जात असताना मात्र ते रस्ता चुकतात. तेव्हा तेथे बसलेली एक चिमणी त्यांना विचारते ''तुम्ही कोठे जात आहात? मी काही मदत करू का?''. शेतकरी तिला सांगतो ''आम्ही रामाला भेटायला जात आहोत, परंतु आता रस्ता चुकलो आहोत''. चिमणी म्हणते ''चला, मी रस्ता दाखवते''.

अशा प्रकारे ते सारे रामाला भेटतात, भेटवस्तू देतात आणि नव वर्षाच्या शुभेच्छा सुद्धा देतात.

बोध : दुसऱ्यांची मदत घेतल्याने गोष्टी सहजपणे होतात.

सिनेमा

एक काजू नावाचे कुत्र्याचे पिल्लू असते. एक दिवस काजू सिनेमा पाहण्यास जाते. ज्याचे नाव असते ''राणा - वाईट लोकांशी लढणारा कुत्रा''.

चित्रपट असतो साडे आकाराचा. ते म्हणते ''अरे बापरे, माझ्याकडे फक्त अर्धाच तास आहे. मला लगेच निघाले पाहिजे.'' ते त्याच्या गाडी कडे धावते. वीस मिनिटात चित्रपटगृहात पोहोचते. त्याच्या लक्षात येते कि तिकीट घेऊन बसण्यासाठी त्याच्याकडे आता फक्त दहाच मिनिटे आहेत. ते परत धावाधाव करते. कसेबसे काजू सिनेमा चालू होण्यापूर्वी पोहोचते.

ते पहिला भाग पाहते, तो त्याला खूपच आवडतो. आणि मग राहिलेला सिनेमा देखील आनंदाने पहाते आणि मजेत घरी जाते.

बोध : उशीर करू नका, अन्यथा तुम्ही आयुष्यातील चांगल्या गोष्टी गमावू शकता.

माझी मोठी ट्रिप– पूर्व किनारा

अनिका कोषे
(इयत्ता पाचवी)
सिॲटल

''आई मी तयार झाले.'' आज, म्हणजे जुलै २५. आज मी, आई, बाबा, आव्हान, आजी आणि आबा विमानतळावर जात आहोत. आम्ही विमानात बसून डेट्रॉईट, मिशीगनला जात आहोत. तिथं माझा मामा आणि त्याचे कुटुंबीय राहतात. ४–५ तासानं आम्ही पोहोचलो आणि मध्ये आईने जेवायला दिलं. ५:३० वाजता आम्ही तिथं पोहोचलो. मग आम्ही बॅगा घ्यायच्या जागेवर पोहोचलो आणि तिथं आम्हाला मामा भेटला.

विमानतळ ते मामाचे घर १ तासाचा प्रवास आहे, त्यामुळे मी झोपून गेले. जेव्हा मी आतमध्ये गेले तेव्हा मला मामी, अरिहन, आणि नायरा भेटले. आम्ही एकमेकांना बघून खूप खुश झालो. सगळे आल्यावर आम्ही थोड्या गप्पा मारल्या आणि थोड्या वेळाने मी वर कपडे बदलायला गेले. कपडे बदलल्यावर मी खाली आले आणि मला मामा, मामी जेवण मांडतांना दिसले. माझ्या तोंडाला तर पाणी सुटले, जेव्हां मी छोले, पुरी, पुलाव, आणि गुलाबजाम पाहिले. खाल्यानंतर मी झोपायला गेले. सकाळी मला आईने उठवले. उठल्यावर मी माझे दात घासले आणि अंघोळ केली. नाश्त्यासाठी कांदे पोहे केले होते आणि मी ते खाल्ले. मग मामा, मामीने आम्हाला भेट वस्तू म्हणून कपडे दिले. सगळ्यांना त्यांचे कपडे खूप आवडले. सगळ्यांचे आवरून झाल्यावर आम्ही फोर्ड संग्रहालयामध्ये जायला निघालो. तिथे भरपूर गाड्या आहेत. आम्ही तिथे फोर्डच्या खूप जुन्या गाडीत बसलो. नंतर आम्ही ट्रेनमध्ये पण बसलो. ट्रेनमध्ये त्यांनी संग्रहालयाची बाहेरची टूर दिली. मग त्याच्यानंतर आम्ही जेवायला गेलो. संग्रहालयात जेवायची जागा होती. जायच्या आधी आम्ही एक ट्रेनचा चित्रपट पण बघितला. मग आम्ही घरी गेलो आणि थोडासा आराम केला. मामाने जेवायला पाव भाजी केली होती आणि ती सगळ्यांना खूप आवडली. जेवण झाल्यावर आम्ही थोड्या गप्पा मारल्या आणि मग झोपायला गेलो. दुसऱ्या दिवशी आम्ही एका मोठ्या बुफे मध्ये गेलो, सकाळी जेवायला. आणि मग संध्याकाळी मामाने बारबेक्यू केला. बारबेक्यूमध्ये आम्ही कणीस, बर्गर, आणि काटी रोल बनवले. दुसऱ्या दिवशी आम्ही पिट्सबर्गला जायला निघालो.

आम्ही मामा, मामी, अरीहन, आणि नायरला बाय म्हणालो आणि निघालो. पिट्सबर्गला जायला साडेचार तास लागले गाडीने जायला. आता आम्ही बाकी सगळी आमची ट्रिप गाडीने करू. पोहोचल्यावर आम्ही एका ट्रेनमध्ये बसलो. ती ट्रेन हळू वरती आणि खाली गेली. वरती पोहोचल्यावर आम्हाला मस्त सौंदर्य दिसले. नंतर आम्ही खायला गेलो आणि हॉटेलात झोपलो. दुसऱ्या दिवशी आम्ही तयार होऊन नाष्टा केला. आम्ही आता वॉशिंग्टन डीसीला जाणार. संध्याकाळी तिथे पोहोचलो आणि त्या दिवशी आम्ही फक्त आराम केला. तिथे जेवलो आणि झोपलो.

दुसऱ्या दिवशी आम्ही तयार होऊन नाष्टा केला. आम्ही घाईत होतो कारण आम्हाला व्हाईट हाऊसमध्ये जायचे होते. तिथे भरपूर पोलिस होते. व्हाईट हाऊस खूप मोठे आहे. व्हाईट हाऊस बघितल्यावर आम्ही वॉशिंग्टन डीसीच्या कॅपिटलची टूर घेतली. तेथे त्यांनी आम्हांला अमेरिकेचा इतिहास सांगितला. ते सगळे झाल्यावर आम्ही हॉटेलात गेलो. नाईट बस टूरमध्ये गेलो. तिथे आम्हाला भरपूर गोष्टी दाखवल्या. बाबा आणि आईने आधीच खायला घेतले होते, ते आम्ही खाल्ले. मला खूप झोप आली होती, म्हणून मी लगेच झोपले. दुसऱ्या दिवशी आम्ही भरपूर संग्रहालय बघितले. वॉशिंग्टन डीसी पाहून, तिसऱ्या दिवशी आम्ही न्यू यॉर्क मध्ये गेलो एक जागतिक वेधशाळा बघायला आणि नंतर आम्ही न्यू जर्सीला गेलो.

न्यू जर्सी ते न्यू यॉर्क १ तास आहे. न्यू जर्सी मध्ये आम्ही अक्षरधाम देऊळ मध्ये गेलो. ते देऊळ राजवाडा सारखे दिसत

होते. वातावरण पण शांत होते. आत तर अजूनच भारी दिसत होतं. देवाचं दर्शन घेतले आणि त्यांच्याच कॅफेमध्ये जेवलो. खाण्यात पण भरपूर पदार्थ होते. पोळी भाजी, पाव भाजी, डोसा, पिझ्झा, आणि अजून! मला तर खूप आवडलं! खाल्ल्यानंतर आम्ही हॉटेलात झोपलो. दुसऱ्या दिवशी मी जेव्हा तयार होत होते, तेव्हा माझा डावा पाय सुजला होता! ३ डासांनी मला चावले आणि त्याने माझा पूर्ण पाय सुजला! मला जास्त चालता येईना. पण आज आम्ही स्वातंत्र्याचा पुतळा बघणार. आम्ही क्रुझनी गेलो, आणि उतरल्यावर आम्हाला पुतळा दिसला. पुतळा मस्त होता, पण माझे पाय अजूनही दुखत होते. परत आल्यावर आम्ही डॉक्टरकडे गेलो. त्यांनी एक औषध, आणि मलम आणायला सांगितलं. ते सगळं झाल्यावर आम्ही एका स्पेस संग्रहालयात गेलो. तिथे आम्ही जेवलो आणि त्याच संग्रहालयात आम्ही प्लॅनेटोरियममध्ये ब्लॅक हॉलवरती एक लहान चित्रपट बघितला. ते झाल्यावर आम्ही परत अक्षरधाममधल्या दुसऱ्या मंदिरात गेलो. तिथे पण मस्त वाटले. अक्षरधाम बघितल्यावर आम्ही गजानन महाराजांच्या मंदिरात गेलो, तिथे त्यांनी मला इंग्लिशची पोथी दिली, आणि आम्हाला त्यांनी प्रसाद पण दिला. मस्त अनुभव होता. दर्शन घेतल्यावर आम्ही जेवायला सर्वांना भवनमध्ये गेलो. आणि मग हॉटेलात झोपलो. दुसऱ्या दिवशी आम्ही न्यू यॉर्कला जायला निघालो.

आवरून आम्ही एअरपोर्टला गाडी दिली, कारण न्यूयॉर्कमध्ये भरपूर ट्रॅफिक असते. नंतर आम्ही आमच्या बॅगा हॉटेलात ठेवल्या आणि निघालो चालत जेवायला. जेवल्यानंतर आम्ही टाइम्स स्केअरमध्ये फिरलो. आणि ब्रॉडवे नाटक बघायला गेलो. मग नंतर जेवलो आणि झोपलो. बाकीच्या दोन दिवसात आम्ही भरपूर संग्रहालयात गेलो. आणि एक रेस्टॉरंटमध्ये जेवलो. त्याचे नाव होते जझबाह. दुसऱ्या दिवशी आम्ही पटकन आवरले कारण आमचे फ्लाईट होते 'सिएटल' ला जायला. ५–६ तासांनी आम्ही घरी पोहोचलो.

Your **dream** home awaits you in the *Bay Area*

Buying a home in today's market takes more than just an agent. You need an advocate that protects your investment, negotiates like it's their own money on the line, and catches what others overlook.

I help buyers:
- Find off-market opportunities
- Avoid overpaying in competitive situations
- Understand true property value - not just list price
- Navigate every step with clarity and confidence

Message me to start your home search

Shweta Aphale
Realtor® | DRE #02208093
925-918-3885
ShwetaAphale@kw.com

पाककला

पारंपरिक गव्हाची खीर (हुग्गी)

अर्चना पर्वतकर
सिॲटल

परिचय

गव्हाची खीर ही पारंपरिक, पौष्टिक आणि पचायला हलकी अशी मिठाई आहे. गहू, गूळ आणि सुगंधी मसाल्यांचा संगम ही खीर चविष्ट आणि आरोग्यदायी बनवतो.

साहित्य

३ कप सुके खोबरे (काप किंवा खिस)
२ टीस्पून बडिशेप पावडर
२ टीस्पून सुंठ पावडर
१ टीस्पून खसखस
२ कप बारीक चिरलेला गूळ
१ टीस्पून तूप (तळण्यासाठी अतिरिक्त तूप)
गहू आवश्यकतेनुसार

कृती

१. गहू तयार करणे:

गहू स्वच्छ पाण्याने तीन वेळा धुवा.

कापडी कपड्यावर पसरवून थोडा ओलसर असतानाच जाडसर दळा.

पुन्हा सुकवून ७-८ तास भिजवा.

२. गहू शिजवणे:

भिजवलेला गहू कुकरमध्ये २-३ शिट्ट्या होईपर्यंत शिजवा.

गूळ आणि तूप घालून उकळी आणा.

३. फोडणी तयार करणे:

तुपात खोबरे आणि खसखस भाजा.

बडिशेप व सुंठ पावडर घालून परता.

हे मिश्रण खिरीत घालून एक उकळी आणा.

शेफची टिप

खीर घट्ट झाली तर थोडे गरम पाणी घालून सुधारता येते.

खसखस भाजल्याने खिरीला छान सुगंध येतो.

गूळ मंद आचेवर भाजल्यास रंग आणि चव उत्तम येते.

हवे असल्यास, ही रेसिपी गरम आणि गोड केशर दूधासोबत आस्वाद घेता येतो.

सर्व्हिंग सूचना

खीर १० मिनिटे झाकून ठेवल्यास मसाल्यांचा सुगंध अधिक खुलतो.

वरून तूपाचा चमचा घातल्यास चव वाढते.

गरम आणि थंड दोन्ही प्रकारे सर्व्ह करता येते.

पाककला

सोलापूर स्पेशल बाजारी आमटी
पारंपरिक सोलापुरी डाळ आमटी

अर्चना पर्वतकर
सिॲटल

परिचय

सोलापूर स्पेशल बाजारी आमटी ही महाराष्ट्रातील पारंपरिक आणि चविष्ट डाळ आमटी आहे. विविध डाळी, सोलापुरी काळा मसाला आणि बारीक वाटलेले मसाले यांचा संगम या आमटीला खास सोलापुरी चव देतो. ही आमटी गरम भाकरी किंवा भातासोबत अप्रतिम लागते.

साहित्य

डाळ मिश्रण:

तूर डाळ १ वाटी
चणा डाळ १ वाटी
मूग डाळ १ वाटी
उडीद डाळ १ वाटी
हळद १ टीस्पून
तेल १ टीस्पून (कुकरसाठी)
पाणी आवश्यकतेनुसार

फोडणी व मसाला:

तेल ३ टेबलस्पून
जिरे १/२ टीस्पून
मोहरी १/२ टीस्पून
हिंग चिमूटभर
लाल तिखट २ टीस्पून
सोलापुरी काळा मसाला २ टेबलस्पून
मीठ चवीनुसार

वाटण:

कांदे २ मोठे (बारीक चिरलेले)
सुके खोबरे अर्धा कप
लसूण ८-१० पाकळ्या
आले अर्धा इंच
टोमॅटो २ मोठे
कोथिंबीर थोडी

सर्व साहित्य परतून मिक्सर/फूड प्रोसेसरमध्ये बारीक वाटून घ्यावे

कृती

१. सर्व डाळी २-३ वेळा धुवून कुकरमध्ये हळद, तेल आणि पाणी घालून ३ शिट्ट्या होईपर्यंत शिजवा.
२. वाटणासाठी कांदा, खोबरे, लसूण, आले आणि टोमॅटो परतून थंड झाल्यावर बारीक वाटा.
३. कढईत तेल गरम करून जिरे, मोहरी, हिंग घालून फोडणी द्या.
४. त्यात वाटण घालून तेल सुटेपर्यंत परता.
५. लाल तिखट, काळा मसाला आणि मीठ घालून परता.
६. शिजलेल्या डाळीत थोडे गरम पाणी घाला, नीट मिसळा आणि उकळी येऊ द्या. यासाठी साधारण २० मिनिटे लागतील.
७. ही आमटी पारंपरिकरित्या थोडी पातळसर असते.
८. शेवटी कोथिंबीर घाला.

शेफची टिप

वाटण जितके बारीक तितकी आमटी मऊ आणि सुगंधी होते.

डाळ जास्त मऊ होऊ देऊ नका.
मध्यम आचेवर शिजवल्यास चव उत्तम येते.
सोलापुरी काळा मसाला चव वाढवतो.

जर तुमच्याकडे सोलापुरी काळा मसाला नसेल, तर त्याऐवजी गरम मसाला वापरू शकता.

सर्व्हिंग सूचना

बाजरीची भाकरी किंवा ज्वारीची भाकरीसोबत सर्व्ह करा.

वरून तूप घातल्यास चव दुप्पट होते.
गरम भात आणि पापडासोबतही उत्तम लागते.
कांदालिंबू सोबत दिल्यास सोलापुरी टच येतो.

थोडी वेगळी आख्ख्या मसुराची मसालेदार चविष्ट आमटी

रेखा पै
सिॲटल

पाककला

साहित्य:

१ वाटी आख्खा मसूर,१ मध्यम आकाराचा कॉलीफ्लॉवर, २ मध्यम आकाराचे कांदे, २ मध्यम आकाराचे बटाटे, २ मोठे टोमॅटो, अर्धी जुडी कोथिंबीर, अर्धा इंच आले, १० लसूण पाकळ्या, २ हिरव्या मिरच्या, १ वाटी सुके खोबरे, सुपारीएवढा चिंचेचा गोळा, ४-५ लाल सुक्या मिरच्या, २ तमाल पत्र, ७-८ काळी मिरी दाणे, ४-५ लवंगा, १ चमचा खसखस, पाव इंच दालचिनीचा तुकडा, १ छोटा चमचा हळद, अर्धा चमचा जिरे, अर्धा चमचा धणे, पाव वाटी तेल, मीठ चवीनुसार

कृती:

आख्खा मसूर आदल्या दिवशी भिज़त घालावा. बटाटे आणि फ्लॉवर यांचे उभे काप करावेत. टोमॅटो कापून घ्यावेत.

वाटण क्र. १

कोथिंबीर, आले, ओली मिरची, हळद, ५ लसूण पाकळ्या हे सर्व जिन्नस एकत्र करून बारीक वाटून घ्यावे.

वाटण क्र. २

कांदे चिरून घ्यावेत. एका मोठ्या भांड्यात तेल गरम करावे. त्यात चिरलेला १ कांदा गुलाबी रंग येईपर्यंत चांगला खरपूस भाजून घ्यावा. सुके खोबरे सोनेरी रंग येईपर्यंत भाजून घ्यावे. लाल मिरची देखील स्वतंत्रपणे भाजून घ्यावी. त्यानंतर गरजेनुसार थोडे तेल टाकूनकाळी मिरी, खसखस, लवंग, जिरे, धणे,दालचिनी, तमाल पत्र आणि ५ लसूण पाकळ्या या सर्व गोष्टी एकत्रित भाजून घ्याव्यात. मंद आचेवर या गोष्टी भाजणे आवश्यक आहे. हे भाजलेले जिन्नस थंड झाल्यावर एकत्रित करून मिक्सरच्या भांड्यात घालून घालून बारीक मसाला वाटून घ्यावा.

भांड्यात तेल घालावे. तेल गरम झाल्यावर उरलेला कांदा सोनेरी रंगाचे होईपर्यंत परतून घ्यावा. त्यानंतरवाटण क्र. १ घालून कच्चा वास जाईपर्यंत चांगले परतावे आता ह्या वाटणावर भिजवलेला मसूर घालून चांगले परतून घ्यावे. मसूर कांद्या बरोबर आणि वाटणाबरोबर मसूर परतल्याने त्याचा छान खमंग वास सुटतो. आता आमटी खूप पातळ होणार नाही इतपत पाणी घालून मसूर चांगला शिजू द्यावा. शिजलेल्या मसूरात बटाटे आणि फ्लॉवरचे तुकडे घालून ते पण शिजवावे. हे सर्व शिजत असताना यात मीठ आणि वाटण क्रमांक २ घालावे. गरज असेल तेवढे पाणी घालावे. बटाटे आणि फ्लॉवर फार मऊ शिजवू नये. अन्यथा चवीने ते खाता येणार नाहीत. १-२ कढ आल्यावर त्यात चिरलेले टोमॅटो घालावेत. झाकण ठेवून गॅस बंद करावा. आमटी उकळती असल्याने टोमॅटो वाफेवरच बेताचे शिजतात. वेगळे शिजवायची गरज नाही.

आमटी काहीशी थंड झाल्यावर पाव किंवा ब्रेड बरोबर खावी. चपाती किंवा भाकरी बरोबर ही छान लागते.ह्या आमटीचे वैशिष्ठय असे की ती दुसऱ्या दिवशी अधिक चवदार लागते. वरीलदिलेल्या साहित्यात ५-६ जणांना पुरेल एवढी आमटी होते. एकदा करून बघाच, तुम्हाला नक्की आवडेल.

तिखट आंबट गोड अननसाची मसालेदार चविष्ट आमटी

सुजाता परळकर
क्विटलॅम, ब्रिटिश कोलंबिया

पाककला

आज मी जी पाककृती सांगणार आहे ती एक पारंपारिक विशेषतः लग्नात केली जाणारी आहे. हल्लीच्या पदार्थांची सरमिसळ झालेल्या बुफे पद्धतीमध्ये हा पदार्थ हरवून गेला आहे. तर बघूया ही तिखट आंबट गोड चवीची अननसाची आमटी कशी करायची.

अननस – अर्धा किलो (चौकोनी तुकडे किंवा कॅन मधला सुद्धा चालेल)
जिरे – १ चमचा
राई – १ चमचा
मथी दाणे – पाव चमचा
हिरवी किंवा लाल सुफी मिरची – २
हिंग – पाव चमचा
हळद – अर्धा चमचा
काजू – ७ ते ८
नारळाचे दूध – २ कप (कॅन मधले सुद्धा वापरू शकता)
बेसन – १ मोठा चमचा
कढीपत्ता – १० ते १२ पाने
तेल – २ मोठे चमचे
मीठ – चवीप्रमाणे
साखर – चवीप्रमाणे

कृती –

प्रथम एका भांड्यात २ चमचे तेल टाकावे. तेल तापल्यावर त्यात राई, जिरे, मेथी दाणे, मिरचीचे तुकडे आणि कढीपत्ता टाकावा.

मोहरी तडतडल्यावर त्यात काजूचे तुकडे टाकावे. नंतर अननसाचे तुकडे ३ ते ४ मिनिटे टाकून परतून घ्यावे. अननसाचे तुकडे परतून झाल्यावर त्यात नारळाचे दूध टाकावे. एक उकळ आल्यावर त्यात बेसन आणि पाणी घालून तयार केलेले मिश्रण घालावे. आपल्याला हवे तसे पाणी घालून जाड किंवा पातळ कढी करू शकतो. चवीप्रमाणे मीठ घालावे. अननस आंबट गोड जसे असेल त्याप्रमाणे थोडी साखर टाकावी.
भात किंवा पोळीबरोबर छान लागते.

वारी

इये सिएटलचे नगरी
ऐसी देखियली वारी
धन्य झालासे विठोबा
धन्य झाली रखुमाई

माझा सखा रेनियर
त्याला सह्याद्रीची जर
इथल्या तळ्यात मळ्यात
दिसे भीमा कृष्णामाई

ऐशा पाचूच्या बनात
जागे मराठी मनात
राजे शिवाजींचा बाणा
मुखी ज्ञानोबा माऊली

–संजय राऊत (सिॲटल)

पोह्याचे लाडू

शारदा मनोहर गजभे
नैरोबी

पाककला

साहित्य:

गव्हाचे पीठ: २०० ग्रॅम
पोहे: २०० ग्रॅम
साजूक तूप: ३०० ग्रॅम
खोबरा कीस: १५० ग्रॅम
काजू: ५० ग्रॅम
बेदाणे: ५० ग्रॅम
बदाम: ५० ग्रॅम
हिरवी वेलची: ५ ग्रॅम
पिठी साखर: ३०० ग्रॅम
खारीक पावडर: १५० ग्रॅम

कृती:

१. प्रथम पोहे तुपात तळून घ्यायचे. तळले नाही तरी चालतील, पण ते खरपूस भाजून घ्यायचे व बारीक करून घेणे. पोहे भाजून घेतले तर ते लाडू तुपकट कमी होतील व हेल्दी होतील.
२. नंतर गव्हाचे पीठ तुपात गुलाबी रंगावर चांगले भाजून घेणे.
३. खोबरे कीस भाजून घ्या. थोडा झाल्यावर हाताने बारीक करून घेणे.
४. काजू व बदाम जाडसर भरड करून घ्या.
५. खारीक पावडर थोडे तूप घालून परतून घ्या.
६. वेलची पूड घालून घ्या.
७. सर्व वस्तू एकत्र करून पिठी साखर मिक्स करा.
८. हाताने चांगले चोळून घ्या व त्याचे लाडू करा.

टीप:

अंदाजे याचे ३० लाडू होतात.

विशेष टीप:

पोहे न तळता भाजून घेतले तरी चालेल, पण ते तूप घालून पीठ गरम करावेच लागेल. एवढाच फरक की आपल्याला पाहिजे तेवढेच तूप घालता येईल. लाडू तुपकट न होता हेल्दी होतील.

कथा स्पर्धा – प्रथम क्रमांक

कूटप्रश्न

अमृता काळे
ॲशबर्न

दरेगावातील त्या भल्या मोठ्या वाड्याच्या अजस्त्र ग्रंथालयात रोहित आणि त्याची पत्नी नंदिनी थकून बसले होते. भिंतीवरच्या घड्याळाचा काटा पुढे सरकत होता. दुपारचे दोन वाजले होते. त्यांच्याकडे आता फक्त एक तास उरला होता कोडं सोडवण्यासाठी!

रोहितच्या डोळ्यासमोरून काल संध्याकाळपासूनच्या घडामोडी तरळून गेल्या. काल दरेगावातून सबनीसांचा फोन आला होता, शंकरनाना गेल्याची बातमी सांगायला. रोहितचं बालपण दरेगावात गेलं होतं. शंकरनाना त्याच्या दूरच्या नातलगांपैकी. ते एकटेच होते आणि त्यांना वाचनाची, ग्रंथसंग्रहाची प्रचंड आवड. त्यांच्या वाड्यातच त्यांनी मोठं ग्रंथालय करून घेतलं होतं. वाचनाच्या आवडीमुळे रोहितचीही सुट्टीच्या दिवशी ग्रंथालयात हजेरी असायचीच. बाकी मुले फिरकतही नसताना रोहितची वाचनाची आवड पाहून शंकरनानांना त्याच्याविषयी विशेष आपुलकी वाटायची. वाचनाबरोबरच कोडी सोडवायचीही रोहितची आवड त्यांच्या लक्षात आली होती. पुढे दहावीनंतर बाबांची पुण्याला बदली झाली आणि दरेगाव कायमचं सुटलं. क्वचित एक-दोन वेळा परत जाणं झालं तेव्हा शंकरनानांची भेट झाली होती. पण पुढे गावातील इतर नातलगही विखुरले आणि नंतर कॉलेज, नोकरीच्या व्यापात दरेगावात कधीच जाणं झालं नाही. आज इतक्या वर्षांनी इथे फेरी झाली, ती ही शंकरनाना गेल्यावर!

शंकरनानांशी काही वर्षांपूर्वी झालेले फोनवरचे शेवटचे संभाषण रोहितला आठवले. शंकरनाना हसत म्हणाले होते, ''आता प्रत्यक्ष कधी भेटायचा योग येणार माहिती नाही. पण तुझ्यासाठी मी एक कूट प्रश्न रचला आहे. योग्य वेळी तुला कळेलच. तेव्हा बघू तुझी बुद्धी तितकीच तल्लख आहे का!''

रोहितला त्या वेळी ते अजब वाटलं होतं, पण आज त्याची प्रचिती येत होती. कारण आज हातात पडलेलं पत्र! सबनीसांनी दिलेलं. ते त्याने आत्तापर्यंत दहावेळा तरी वाचलं होतं.

प्रिय रोहित,

अनेक आशीर्वाद.

तुला हे पत्र मिळेल तेव्हा मी या जगात नसेन. मी जाताना तुझ्यासाठी एक कूट प्रश्न तयार केला आहे. तो तू बिनचूक सोडवलास तर त्याचं बक्षीसही तुला मिळेल. कूट प्रश्न असा – मी एक लेख लिहिला आहे. तो माझ्या ग्रंथालयात मी लपवला आहे. तो तू शोधून काढायचास. तुला तो मिळाला की सॉलिसिटर सबनीसांकडे द्यायचा. त्यांच्याकडे मी त्याच लेखाची अजून एक प्रत ताडून ठेवायला दिली आहे. पण हे सर्व करण्यासाठी तुझ्या हातात हे पत्र पडल्यापासून फक्त ३ तासांचा अवधी आहे. तुला तो लेख सापडायला मदत व्हावी, म्हणून मी एक गुरुकिल्ली म्हणजे क्लू देतोय. अस्ति कश्चिद वाग्विशेषः इथे तो आहे. तर तुझी कुशाग्र बुद्धी वापर आणि कूट प्रश्न सोडव. तुला माझ्या शुभेच्छा,

शंकरनाना

सबनीसांचा फोन आल्यावर रोहित आणि नंदिनी सकाळीच दरेगावात आले होते. बरोबर १२ वाजता सबनीसांनी शंकरनानाचं पत्र आणि ग्रंथालयाच्या किल्ल्या

त्यांचेकडे सोपवल्या होत्या. ३ वाजेपर्यंत तो लेख शोधून दिला तर नगरची शंकरनानांची जमीन रोहितच्या नावे होणार होती. रोहितला जमिनीची लालसा नव्हती पण शंकरनानांनी घेतलेल्या परीक्षेत त्याला उत्तीर्ण व्हायचं होतं!

''अस्ति कश्चिद वाग्विशेष: म्हणजे काय?'' नंदिनीने विचारलं होतं.

''कालिदास प्रसिद्ध संस्कृत नाटककार आधी एक अशिक्षित गुराखी होता. एका राजकन्येचं त्याच्याशी फसवून लग्न झालं. तिला वाटलं की तो मोठा विद्वान आहे. तो अडाणी आहे हे कळल्यावर तिने त्याला घराबाहेर हाकलून दिलं. कालिदास देवीच्या मंदिरात जीव द्यायला गेला आणि देवीने त्याच्यावर कृपा करून त्याला विद्वान बनवलं. कालिदास परत घरी आला तेव्हा राजकन्येने महालाचे दार बंद केले आणि आतूनच त्याला 'अस्ति कश्चिद वाग्विशेष:?' म्हणजे तुझ्या भाषेत विशेष सुधारणा झाली आहे का, असे विचारले. कालिदासाने त्यातील प्रत्येक शब्दापासून सुरू होणारी महाकाव्ये तिला ऐकवली. अस्ति शब्दापासून सुरू होणारे कुमारसंभव, कश्चिद शब्दापासून सुरू होणारे मेघदूत आणि वाग शब्दापासून सुरू होणारे रघुवंश ही ती काव्ये.'' रोहितने तिच्या ज्ञानात भर घातली होती.

''मग त्याच ग्रंथांमधे सापडेल लेख.'' नंदिनीने सुचवलं होतं आणि ते पटून रोहितने ते तिन्ही ग्रंथ शोधले होते. ग्रंथालयात हजारो पुस्तके असली तरी त्यांचा कॉम्प्युटरवर व्यवस्थित कॅटलॉग बनवला होता, त्यामुळे हवं ते पुस्तक लगेच सापडत होतं. पण तिन्ही ग्रंथांमधे त्यांना काहीच सापडलं नव्हतं. कालिदासाची इतर पुस्तकेही त्यांनी बघितली पण पुन्हा निराशाच पदरात आली. शेवटी हा क्लू संस्कृतमधे आहे तर ग्रंथालयातील सगळी संस्कृत पुस्तकेही त्यांनी उघडून पाहिली होती. पण काही उपयोग झाला नव्हता. लेखाचा पत्ता लागत नव्हता.

''मला वाटतंय आपण रॉंग अँगलने हे बघतोय!'' रोहित अचानक म्हणाला. ''ग्रंथालयात म्हणजे पुस्तकातच कशावरून? भिंतींमधे, जमिनीमधे कुठेही लपवलेला असू शकतो!''.

नंदिनीने नकारार्थी मान हलवली. ''मग शंकरनाना संस्कृत शब्दांचा संदर्भ का देतील? त्यांचा पुस्तकांकडेच निर्देश आहे. आणि ते पत्रात म्हणाले होते ना की तू तुझी कुशाग्र बुद्धी वापरावीस. अशा कुशाग्र बुद्धीचा मुलगा त्यांच्या लाडक्या ग्रंथालयाच्या भिंती आणि जमिनीची मोडतोड करतोय हे त्यांना नक्कीच आवडणार नाही. आणि समजा, अशी तोडफोड करायची म्हटलीच तरी त्यांनी तीन तासांची मुदत दिली आहे त्याच्या आत होणारे का ते काम?''

''खरंय. आता ग्रंथालयातील सगळीच पुस्तकं उघडून बघणं एवढंच राहिलंय. उरलेल्या वेळात त्यातून बघता येतील तेवढी बघू.''

नंदिनी विचारात गढली होती. ''प्रत्येक पुस्तक उघडून पाहावं अशी शंकरनानांची नक्कीच अपेक्षा नसणार. म्हणूनच त्यांनी क्लू दिला आणि वेळेचं बंधनही घातलं. मला वाटतंय आपण त्याचा चुकीचा अर्थ काढतोय आणि भरकटतोय. त्या क्लू कडे परत एकदा नव्याने बघायला पाहिजे. अस्ति कश्चिद वाग्विशेष: इथे तो आहे. असं होतं ना पत्रात? आपण फक्त पहिल्या तीन शब्दांवर फोकस दिला आणि अस्ति कश्चिद वाग्विशेष: हाच पूर्ण क्लू आहे असं समजत राहिलो. पूर्ण क्लू सगळ्या सहा शब्दांचा आहे! शेवटच्या तीन शब्दांकडे आपण लक्षच दिलं नाही. असंच समजत राहिलो की ते फक्त तो लेख कुठे आहे तिथे निर्देश करतायंत.''

''तेच सांगतायत ते! इथे तो आहे. म्हणजे इथे तो लेख आहे!''

''पत्रात लिहिलंय इथे तो आहे. लेख हा ॲडिशनल शब्द आपण घातलाय त्यात, शंकरनानांनी नाही!.''

''अर्थ तोच होतो ना?''

''तो अर्थ असता तर आत्तापर्यंत लेख सापडला असता! अस्ति कश्चिद वाग्विशेष: इथे तो आहे. पहिले तीन शब्द संस्कृत मधे आणि शेवटचे तीन मराठी मधे. क्लूच्या पहिल्या संस्कृत भागाचा दुसऱ्या मराठी भागाशी काहीतरी संबंध आहे!''

''काय संबंध आहे?''

''शेवटचे तीन शब्द. इथे तो आहे. ते इथे तो लेख आहे असं नाही सांगत. ते फक्त म्हणतात इथे तो आहे. या तीन शब्दांना वरकरणी विशेष असा अर्थ नाही. पण आपण आता पहिल्या तीन संस्कृत शब्दांना जे लॉजिक होतं तेच या मराठी शब्दांना लावलं तर?''

''कसलं लॉजिक?''

''पहिले तीन शब्द बघ. त्यातील प्रत्येक शब्दापासून लिहिलेलं एक प्रसिद्ध काव्य आहे. आपल्याला हेच लॉजिक त्या शेवटच्या तीन शब्दांनाही लावायचं आहे!''

''म्हणजे तुला असं म्हणायचंय की त्या शेवटच्या तीन शब्दांपासून लिहिलेली काव्यं आहेत? आणि ती मराठीतली आहेत? हे काहीतरीच! इथे तो आहे. किती कॉमन शब्द आहेत हे! या शब्दापासून सुरू होणारं असंख्य साहित्य, कथा, कविता, लेख सापडतील. कसं शोधणार?''

''पण असं काहीतरी असेल की जे शोधणं कमी अवघड, मुख्य म्हणजे शक्य असेल! विचार करू या.''

दोघेही विचारात गढले. अचानक टाळी वाजवून नंदिनी ओरडली. ''सापडलं!''

''काय सापडलं?'' रोहित दचकून म्हणाला.

''उत्तर सापडलं बहुतेक! ही पुस्तकांची नावं असू शकतील का? म्हणजे आपल्याला तीन मराठी पुस्तकं शोधायचीत, ज्या पुस्तकांची नावं त्या प्रत्येक शब्दापासून सुरू होतील. इथे तो आहे! आणि ही प्रसिद्ध किंवा साधारण सगळ्यांना माहिती असणारीच पुस्तकं असणार!''

रोहितचा चेहरा उत्साहाने उजळला. ''तो ने सुरु होणारं? तो मी नव्हेच! मी पाहिलेलं पहिलं नाटक. म्हणून पटकन आठवलं.''

''अरे वा! आणि आहेने सुरु होणारं...आहे मनोहर तरी! सुनीताबाई देशपांड्यांचं.''

''जबरी! इथे ने काय बरं सुरु होतं.. आठवलं! इथे ओशाळला मृत्यू! भन्नाट! मिळाली सगळी पुस्तकं!''

दोघांनी लगबगीने तिन्ही पुस्तके शोधली. आणि अहो आश्चर्यम! लेख मिळाला! पहिल्या पानाच्या आतमधे लेखाचं एकेक पान मिळालं. शंकरनानांनी तीन पानी लेख लिहिला होता आणि प्रत्येक पान एकेका पुस्तकात घालून ठेवलं होतं! पानांवर नंबर आणि पहिल्या पानावर सुरुवातीला आरंभ आणि तिसऱ्या पानाच्या शेवटी समाप्त असंही लिहिलं होतं म्हणजे शंकेला जागा नको!

रोहितच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान झळकत होतं. ''नंदिनी, तुझ्याशिवाय हे शक्य झालं नसतं! असं आऊट ऑफ बॉक्स थिंकिंग माझ्या डोक्यातच आलं नसतं. आता शंकरनानांना मी किती कुशाग्र बुद्धिचा आहे ते बघायचं होतं पण हा कूट प्रश्न सोडवायचं क्रेडिट तुला आहे!''

''तू कुशाग्र बुद्धि दाखवलीस ना!'' नंदिनी खट्याळ हसली.

'' कशी?''

''तुझी बुद्धि कुशाग्र नसती तर माझ्याशी लग्न करायला तिने तुला सांगितलं असतं का? आणि मग माझ्याकडून तुला हा कूट प्रश्न सोडवून कसा मिळाला असता? डेलिगेट करून आपलं काम यशस्वीपणे करवून घेणं हेही कुशाग्र बुद्धिमत्तेचे लक्षण आहे आणि ते तू दाखवलंस! शंकरनानांच्या परीक्षेत तू फर्स्ट क्लास फर्स्ट विथ डिस्टींक्शन पास झालास!''

रोहित खळखळून हसत नंदिनीच्या हसण्यात सामील झाला!

वृक्षाचे मूळ उंच वाढलेल्या झाडाला म्हणते...

तू तिथे दूर उंचावर, बाळा सुखी रहा
गाडलो जरी म्या, देखे कौतुके वृक्ष महा
शोषले पाणी, शेवटचा थेंब तुझ्या वाढीसाठी
नाही दिसलो जगी, तरी रूतलो तुझ्यासाठी
तू लहाना, कसे जपले हात नसताना
रस बनवला, पोहोचवे नस तान्हा
का रे कधी खाली बघत नाहीस मजकडे
इतके का मोठेपण होते, ताठ नि वाकडे
जरी माहीत मला, जीवन माझे मातीमय
वाटे क्षणी बघावे तुला, येते का माझी सय
हृदयच माझे पाझरे, पानांवर थेंबाचे
माझेच ते अश्रू असती रे दंव पहाटेचे
(झाडाचे मूळ कोण हे वाचकांनी ओळखावे आणि पुनः वाचावे)

– अजित नातू (सॅक्रामेंटो)

कथा स्पर्धा – द्वितीय क्रमांक

पंखांच्या सावलीत

कादंबिनी धारप
सिॲटल

"आँ...ऽऽऽ आँ ...ऽऽऽ"

झोपेतही अर्चनाला पंखांचा आवाज ऐकू येत होता. फडफडाट आणि कर्कश्श किलबिला, ती जीव खाऊन ओरडायचा प्रयत्न करत होती – पण घशातून आवाजच फुटत नव्हता. छातीवर प्रचंड दडपण आलं होतं. श्वास जड झाला होता.

This is how it begins, असा विचार तिच्या मनात क्षणभर चमकून गेला, आणि त्याच क्षणी ती दचकून जागी झाली. भीतीनं दरदरून घाम फुटलेली अर्चना ताडकन पलंगावर उठून बसली. काळोखात काही क्षण तिला काहीच कळेना. छाती जोरजोरात धडधडत होती. कानात अजूनही त्या कर्कश्श आवाजाचा प्रतिध्वनी घुमत होता.

Where am I? Why does this feel so... wrong?

तिनं घाबरून शेजारी पाहिलं. तिथं कोणीच नव्हतं.

अंधारलेल्या खोलीत तिची गोंधळलेली नजर फिरली. भिंती, पडदे, कपाट – सगळं ओळखीचं असूनही त्या क्षणी अनोळखी वाटत होतं. तिला Seattle downtown मधल्या apartment मधली रात्रीची शांतता आठवली – सुरक्षित वाटणारी एकाकी शांतता.

हे घर मात्र जरा जास्तच शांत होतं – भयाण शांतता!

आपण कुठे आहोत?

क्षणभर तिच्या मनाचा पूर्ण गोंधळ उडाला. दोन्ही हातांनी तिनं आपलं डोकं घट्ट दाबून धरलं, आणि डोळे मिटूनच तीन-चार वेळा दीर्घ श्वास घेतला a grounding technique that her friend had taught her.

Breathe in. Hold. Breathe out.

हळूहळू तिच्या काळजातली धडधड कमी झाली. तिनं हळूच डोळे उघडले आणि हात खाली घेतले. आता तिला सगळं व्यवस्थित आठवायला लागलं.

अथर्व ऑफिसच्या एका महत्त्वाच्या कॉन्फरन्ससाठी टेक्सासला गेला होता. अजून किमान चार दिवस तरी परत येणार नव्हता. आदित्य बॉय स्काऊटच्या बूट कॅम्पला गेला होता – तो आठवडाभर घरी नसणार होता. अनन्या मैत्रिणींबरोबर ट्रिपला गेली होती. ती पण चार-पाच दिवस तरी येणार नव्हती.

Atharva is in Texas... Aditya and Ananya—both are away.

It's just me.

एवढ्या मोठ्या घरात आपण एकट्याच आहोत, या जाणिवेनं तिच्या पोटात एकदम खड्डा पडला. शेजारच्या नाईटस्टँडवरचा मोबाईल उचलून तिनं वेळ पाहिली.

पहाटेचे ४:३७.

तिनं खिडकीतून बाहेर नजर टाकली. काळाकुट्ट अंधार होता. ती पलंगावरून उतरली. तिचे पाय थोडे थरथरत होते. कसंबसं स्वतःला सावरून आदित्यच्या खोलीत जाऊन तिनं एकदा खात्री करून घेतली – खोली रिकामीच होती. त्या शांततेत तिच्या पावलांचा आवाजही तिला बोचरा वाटत होता.

Why does this house feel so big all of a sudden?

आता पुन्हा झोप लागणं अशक्य होतं. ती जिना उतरून खाली आली. स्वयंपाकघरात जाऊन फिल्टर्ड वॉटरचा ग्लास

भरला. सोफ्यावर बसून गटागटा पाणी प्यायली, तरीही घसा कोरडाच होता. तिनं डोळे मिटले आणि सोफ्यावर अंग झोकून दिलं. मघाशी पडलेलं स्वप्न पुन्हा तिच्या डोळ्यांसमोर उभं राहिलं.

कावळे आणि चिमण्यांची एकत्र झुंबड! काळवंडलेलं आकाश. ते अक्षरशः किंचाळत होते. त्यांच्या डोळ्यांत विचित्र चमक होती. ते सगळे एकदम तिच्यावर झेप घेत होते. पंखांचा फडफडाट, चोचींचे टोचणारे घाव, नखांची ओरबाडणारी वेदना. ती त्यांच्या तडाख्यातून सुटण्याचा अतोनात प्रयत्न करत होती, पण ते तिला सोडायलाच तयार नव्हते. सगळे मिळून तिला कुठेतरी ओढत नेत होते.

पण कुठे? आणि कशासाठी? तिला उत्तर मिळालंच नव्हतं.

''मनी वसे ते स्वप्नी दिसे,'' असं म्हणतात. मग माझ्या मनात असं काय चाललं होतं?

It was just a dream, तिनं स्वतःलाच समजावलं.

A stupid dream.

I've lived alone for days before. I've handled worse.

गेली वीस वर्ष ती आणि तिचं कुटुंब Seattle मध्ये राहत होतं. दोन्ही मुलांचा जन्मही इथलाच. तिनं आणि अथर्वनं दोन्ही मुलांना चांगलं independent बनवलं होतं. अमेरिकेत करिअर करायचं तर ते आवश्यकही होतं. इथले thunderstorms, power cuts, wild fires, living alone in the house - सगळं तिनं हिमतीनं निभावलं होतं. मग हे काय? ही भीती कसली?

मी तर रोज घराबाहेर पक्ष्यांसाठी दही-भात, पोळी, ब्रेड.. काही ना काही न चुकता ठेवते. त्यांना पिण्यासाठी पाणी सुद्धा ठेवते. मग ते माझ्यावर हल्ला का करतील?

I feed them every day.

Why would they hurt me?

की माणसांसारखेच पक्षी सुद्धा कृतघ्न होतात? तिच्या डोक्यात प्रश्नांचं मोहळ उठलं. तिला अचानक आठवला काही वर्षांपूर्वी पाहिलेला आल्फ्रेड हिचकॉकचा 'द बर्डस' चित्रपट. याच घरात, एका rainy weekend ला पाहिलेला. त्यात पक्ष्यांच्या झुंडी माणसांवर हल्ले करतात आणि त्यामागचं कारण कुणालाच कळत नाही. त्या चित्रपटातलं शेवटचं दृश्य तिच्या डोळ्यांसमोर तरळलं शेकडो पक्षी ब्रेनरच्या घराच्या अवतीभवती बसलेले आहेत आणि मेलनी, लिडिया आणि कॅथी मिचच्या कारमध्ये बसताना ते भयावह नजरेने त्यांच्याकडे पाहत असतात. वातावरणात एक विचित्र ताण भरून राहिलेला असतो आणि त्याच तणावाच्या स्थितीत ती कार हळूहळू त्या पक्ष्यांच्या मधून निघून जाते...

त्या सीनच्या नुसत्या आठवणीनंही तिच्या अंगावर सर्रकन काटा आला. मनातली भीती झटकून टाकण्यासाठी तिनं मान इकडून तिकडे हलवली आणि स्वतःलाच झापलं - "How silly of you, Archana! एका स्वप्नाला घाबरतेस? तेही त्यातल्या पक्ष्यांना! आणि तो हीचकॉकचा सिनेमा.. तो फक्त एक काल्पनिक सिनेमा होता.. असं कुठे खरोखर झाल्याचं कधी ऐकलंस का? अगं, एकविसाव्या शतकातली सुशिक्षित, कर्तबगार स्त्री आहेस तू आणि हा कसला वेड्यासारखा भित्रेपणा?''

Don't be ridiculous, ती स्वतःशीच पुटपुटली.

You're not afraid of birds.

एव्हाना बाहेर उजाडायला लागलं होतं. खिडकीतून फिकट प्रकाश घरात उतरू लागला होता. सकाळचा पक्ष्यांचा किलबिलाट हळुहळू ऐकू येऊ लागला.

पक्षी!

तिच्या काळजात पुन्हा एक कळ उठली.

त्यांच्यासाठी दहीभात ठेवायचा आहे.

क्षणभर ती थबकली.

Don't do it today, एक आवाज कुजबुजला.

Just skip one day.

पण लगेच दुसरा आवाज उमटला.

You've done this most of your life.

Fear doesn't get to decide.

तिनं स्वयंपाकघरात जाऊन एक पसरट प्लेट घेतली. त्यात कालचा शिल्लक राहिलेला थोडा भात घातला, थोडंसं मीठ घातलं. फ्रीजमधून दह्याचा डबा काढून त्यातलं थोडं दही भातात घातलं आणि यांत्रिकपणे हातानं तो कालवला. एका बाउलमध्ये पाणी भरलं. घराचं मागचं दार उघडलं; एका हातात दही-भाताची प्लेट आणि दुसऱ्या हातात पाण्याचा बाउल घेऊन मगाचंच स्वप्न आठवून जरा घाबरतच ती बाहेर आली.

बाहेरचं वातावरण प्रसन्न होतं. आकाश निरभ्र होतं. हवेत आल्हाददायक गारवा होता. उगवत्या सूर्याच्या सोनेरी किरणांत भोवतीच्या झुडुपांवरचे दवबिंदु मोत्यांसारखे चमकत होते. आसपासच्या झाडांच्या फांद्यांवर पक्षी बसलेले होते, नेहमीप्रमाणे तिच्या दही-भाताची वाट बघत! तिच्या हातातली प्लेट बघताच एका कावळ्यानं काऽऽव काऽऽव करून इतर कावळ्यांना हाका मारायला सुरुवात केली, आणि लगेचच एक एक करून तिथे कावळे जमायला सुरुवात झाली. लागलीच चिमण्यांनाही चाहूल लागली आणि त्या सुद्धा चिवचिवाट करत घिरट्या घालू लागल्या. हे नेहमीचंच होतं. म्हणजे सारं काही नॉर्मल होतं तर. नकळतच तिच्या ओठांवर हलकसं हसू उमटलं. समोरच्या स्वच्छ, मोकळ्या आकाशाकडे बघताना मनातली भीती कुठच्या कुठे पसार झाली, ते तिचं तिलाही कळलं नाही.

तिनं मागच्या अंगणात दोन्ही भांडी ठेवली. एक नजर अवतीभवती फिरवली. घाबरण्यासारखं काहीच तिला जाणवलं नाही. गेली कित्येक वर्षं हा तिचा नेम होता रोज सकाळी पक्ष्यांसाठी दही-भात, पोळी किंवा ब्रेडचे तुकडे असं काही ना काही खायला ठेवायचं आणि पिण्यासाठी पाणीही ठेवायचं. आजपर्यंत या पक्ष्यांनी कधीच तिला disappoint केलं नव्हतं. रोज दुपारपर्यंत अन्नाची प्लेट अगदी साफ झालेली असायची. ती पाहून तिला रोजच मनापासून आनंद व्हायचा. तो तिचा त्यांच्याशी असलेला special bond होता – from one species to another... नाहीतर माणसांचे खाण्याचे नखरेही तिनं पुरेपूर बघितले होते. प्लेट भरून ढीगभर पदार्थ घ्यायचे आणि शेवटी संपत नाही म्हणून अर्ध्याहून अधिक टाकून द्यायचे... या प्रकाराचा तिला मनस्वी तिटकारा होता. आणि म्हणूनच या पक्ष्यांबद्दल तिला एक अनामिक जिव्हाळा वाटायचा. ते कधीच अन्न वाया घालवायचे नाहीत.

तिच्या मनात विचार आला, 'खरंच, human mind is so unpredictable.... कुठून कुठे उडी मारेल काही सांगता येत नाही.'

स्वतःशीच हसत हसत ती घरात आली. दाराला आतून latch लावलं आणि आपल्या रोजच्या कामाला लागली... व्यायाम, आंघोळ, पूजा, स्वयंपाक पाणी सगळं उरकून ती तिचा laptop घेऊन कामाला बसली. दोन दिवस ती घरूनच काम करणार होती. तसं तिनं ऑफिसमध्ये कळवलंही होतं. ऑफिसमध्ये तेवढी flexibility असल्यामुळे बरं होतं.

कामाच्या रगाड्यात ती सगळं विसरून गेली. दुपारी साडेबाराच्या सुमारास तिला तिच्या apple watch नं reminder दिला!– Its lunch time! त्याच वेळी एक online meeting चालू असल्यामुळे स्वतःचा video off ठेवून तिनं पटापट जेवण उरकलं, ताट विसळून dishwasher मध्ये ठेवलं आणि पुन्हा कामात गढून गेली.

दुपारी तीन साडेतीनच्या सुमारास तिला एकदम अंधार दाटून आल्याचं जाणवलं. अरे, आत्तापर्यन्त तर चांगला उजेड होता, असं मनाशी म्हणत तिनं खिडकीतून बाहेर नजर टाकली तर हवा एकदम बदलल्याचं तिला जाणवलं. आता आकाश एकदम ढगाळ झालं होतं. काळ्याकुट्ट ढगांनी सूर्याला जणू गिळून टाकलं होतं. सोसाट्याचा वारा सुटला होता आणि त्याचा जोरदार आवाज येत होता. Thunderstorm ची सुरुवात झाली वाटतं असं मनाशी म्हणत ती तिच्या जागेवरून उठली नाही तोच तिला घराच्या मागच्या गल्लीतून खूप कर्कश्श असा आवाज ऐकू येऊ लागला. सुरुवातीला तिला वाटलं बाहेर २-३ माणसं भांडताहेत, पण लवकरच तिच्या लक्षात आलं की तो आवाज माणसांचा नसून पक्ष्यांचा होता. पक्ष्यांच्या ओरडण्याचा इतका भयानक आवाज तिनं आजतागायत कधीच ऐकला नव्हता. ती क्षणभर जागेवरच थिजून उभी राहिली. पण लगेचच भानावर येऊन हा काय प्रकार आहे, बघायलाच हवं म्हणून ती मागचं दार उघडून धावतच बाहेर गेली आणि बाहेरचं दृश्य पाहून ती जागीच दगडासारखी स्तब्ध झाली... उभ्या जागीच तिला जाणवलं हे काहीतरी वेगळंच आहे. तिच्या शेजारपाजारची दोन-चार टाळकी थक्क होऊन उभ्यानंच समोरचं दृश्य पाहत होती. कुणालाच समजत नव्हतं नक्की काय चाललं आहे ते.

नेहमी तिनं ठेवलेला दही-भात खायला सात-आठ कावळे आणि काही चिमण्या यायच्या. आज मात्र त्या गल्लीत त्यांची अक्षरशः झुंडच जमली होती. एक-दोन.. दहा-पंधरा.. तिनं मोजण्याचा प्रयत्न केला. पण तिच्या लगेच लक्षात आलं की तो शुद्ध वेडेपणा होता. क्षणाक्षणाला त्यांची संख्या वाढतच चालली होती. आज त्यांचा नेहमीसारखा किलबिलाट चिवचिवाट नव्हता तर खूप विचित्र, भीतीदायक कलकलाट

चालला होता. आणि सगळे मिळून थव्याथव्यानं आकाशात वेगवान घिरट्या घालत होते. वर जात होते, खाली येत होते, पुन्हा वर जात होते... जणू काही air force च्या विमानांची formations करून हवाई कसरतच चालू होती.

तेवढ्यात तिची नजर दही-भाताच्या रिकाम्या प्लेटवर पडली. नेहमीच्या सवयीप्रमाणे ती नकळतच प्लेट उचलण्यासाठी पुढे आली मात्र... पक्ष्यांच्या त्या झुंडीनं तिलाच गराडा घातला.

तिच्या छातीत धस्स झालं. तिला पुन्हा ते स्वप्न आठवलं.

OMG! This is Déjà vu!

This isn't happening.

No. This cannot be happening.

ती मागे सरकू लागली. पण पक्षी पुढे सरकले. कोणी तिच्या खांद्यावर बसलं. कोणी हातावर, तर कोणी डोक्यावरही. काही पक्षी तिच्याभोवती गोल गोल फिरू लागले.

"No.. No.." ती जोरजोरात ओरडत दोन्ही हातांनी त्या पक्ष्यांना हाकलण्याचा प्रयत्न करू लागली.

"Go.... Go away....." तिचा आवाज थरथरत होता.

पण ते जात नव्हते. उलट तिच्याभोवती आणखीनच कोंडाळं करत होते. त्यांना हाकलण्याच्या नादात त्यांचे पंख तिच्या हातांना, गालाला घासून जात होते; त्यांच्या नख्या तिला ठिकठिकाणी बोचत होत्या; चोची टोचत होत्या.

जवळ जवळ दोन-तीन मिनिटं अशी धडपड करून ती दमली, तिच्या हातांचा वेग मंदावला आणि एकदम तिच्या लक्षात आलं की ते पक्षी तिच्यावर हल्ला करत नव्हते तर तिला तिच्या जागेवरून हलवून कुठेतरी नेण्याचा प्रयत्न करत होते. जणू तिला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होते. ती त्यांच्याबरोबर चालू लागली घरापासून दूर, रस्त्याकडे, मोकळ्या जागेकडे. तो सगळा प्रकार पाहून विस्मयचकीत झालेले तिचे शेजारीही भारावल्यासारखे तिच्यामागून चालू लागले.

लवकरच तिच्या लक्षात आलं की ते सगळे पक्षी जणू तिला पुढे ढकलून भराभर चालायला सांगत होते. तिनं जलद पावलं टाकायला सुरुवात केली, आणि तिच्या लक्षात आलं आपण चक्क पळतोय. तिच्या मनात भीती होती. पण त्याहून मोठा एक विचित्र विश्वासही होता.

They're not hurting me.

They won't hurt me.

Just... trust this.

ती पुढे जात राहिली. कॉलनीतल्या शाळेच्या मोकळ्या ग्राऊंडपाशी ती पोहोचली मात्र... ज्या वेगानं ते सगळे पक्षी झंझावातासारखे आले होते त्याच वेगानं ते कलकलाट करत आकाशात झेपावले आणि सोसाट्यासारखे काही क्षणातच दृष्टीआड झाले.

तेवढ्यात अचानक एक मोठा आवाज झाला. अर्चनाचे पाय थरथरले आणि ती तोल जाऊन जमिनीवर पडली. काही क्षण आख्खी जमीन थरथरत असल्याचं तिला जाणवलं. भोवतालचं सगळं जग गरगर फिरतं आहे... आपल्याला चक्कर येते आहे असं वाटून ती जमिनीवर तशीच निपचित पडून राहिली. थोड्या वेळानं सगळं शांत झालं. अर्चना भीतभीतच उठून बसली. जवळच काही अंतरावर तिच्या मागे धावत आलेले शेजारी तिला दिसले. तिनं मोठ्या आवाजात त्यांना विचारलं, "Hey, what was that sound? What just happened?" त्यांच्यापैकी एकानं उत्तर दिलं,"I have no clue! But it was quite terrifying."

अर्चनानं होकारार्थी मान डोलावली. आपल्या हातांच्या आधारानं ती हळूहळू उभी राहिली आणि आजूबाजूला पाहू लागली. आपण घराजवळच्या शाळेच्या ग्राऊंडवर आहोत हे तिच्या लक्षात आलं. तंद्रीतच ती घराच्या दिशेनं आपसूक चालू लागली. घडलेल्या प्रकारचा विचार करत करत ती घराजवळ आली आणि समोर नजर जाताच तिच्या पायाखालची जमीनच सरकली.... काही मिनिटांपूर्वी दिमाखात उभ्या असलेल्या तिच्या घराच्या जागी आता होता फक्त एक अवशेषांचा ढीग आणि हवेत उडणारी धूळ!

Earthquake! OMG!

झाला प्रकार आता तिच्या लक्षात आला. भूकंपाच्या तडाख्यानं तिचं घर पार जमीनदोस्त झालं होतं. भिंतींचे तुकडे एकमेकांवर कोसळून विचित्र कोनांत अडकले होते. छप्पर जमिनीवर कोसळून पडलं होतं. कौलांचा चुराडा झालेला, लोखंडी सळ्या उघड्या पडलेल्या. धुळीचे धूसर ढग अजूनही हवेत रेंगाळत होते; प्रत्येक श्वासाबरोबर तो धूर छातीत झिरपत

होता. खिडकीच्या ठिकाणी आता फक्त रिकामी चौकट दिसत होती – आत डोकावण्यासारखं काहीच उरलेलं नव्हतं.

स्वयंपाकघराची भिंत अर्धी कोसळलेली होती. फुटलेल्या कपाटांमधून भांडी, ताटं, वाट्या मातीमध्ये मिसळून पडलेली होती. लिव्हिंग रूमच्या जागी आता गोंधळलेली वस्तूंची रास होती – उलटलेला सोफा, मोडलेली टेबलं, जमिनीवर पडलेल्या घड्याळाच्या बंद पडलेल्या काट्यांनी जणू त्या क्षणाला कायमचं पकडून ठेवलं होतं.

आदित्यच्या खोलीतली निळी भिंत ज्यावर त्याच्या लहानपणीचे पोस्टर्स लावले होते – आता अर्धी जमीनदोस्त झाली होती. फुटलेल्या कपाटातून त्याचे कपडे, बॉय स्काऊटचा गणवेश, बूट, आणि एक मोडलेला टॉर्च ढिगाऱ्यात विखुरलेले होते. त्याचा बेड मधोमध तुटून त्याचे चक्क दोन तुकडे झाले होते.

अनन्याच्या खोलीतले गुलाबी पडदे फाटून लोंबत होते. तिचं स्टडी टेबल उलटलं होतं; वह्या-पुस्तकं मातीमध्ये मिसळून गेली होती. भिंतीवर चिकटवलेली तिची चित्रं, फोटो, कागदी फुलं – सगळं चुरगळलेलं, मोडलेलं होतं. एक छोटा टेडी बेअर अर्धा मातीखाली दबलेला दिसत होता – फक्त त्याचे उघडे डोळे, निर्विकारपणे आकाशाकडे पाहत होते.

घराभोवतीचं छोटंसं अंगणही उद्ध्वस्त झालं होतं. जमिनीत भेगा पडलेल्या, जिथे अर्चना रोज चालत असे त्या वाटा मिटून गेलेल्या. सगळीकडे शांतता होती – अस्तित्वाला मुळापासून हादरवणारी, भयाण शांतता!

अर्चनाचे गुडघे अचानक शिथिल झाले. तिला उभं राहणंच कठीण झालं. त्या ढिगाऱ्याकडे पाहताना अर्चनाला जाणवलं – हे फक्त घर नव्हतं उद्ध्वस्त झालेलं. त्या ढिगाऱ्याखाली तिचे दिवस, सवयी, आठवणी, आणि कालपर्यंत सुरक्षित असणारा संसार गाडला गेला होता.

What if kids and Atharva were at home today...

If I had stayed inside...

I would be dead.

ती मटकन जमिनीवर बसली. तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले – भीतीचे, धक्क्याचे आणि कृतज्ञतेचे.

हे पक्षी कृतघ्न नव्हते तर... तिच्या खाल्लेल्या दही-भाताला ते जागले होते. पुढे घडणाऱ्या आक्रिताची त्यांना आधीच चाहूल लागली असावी. आणि म्हणूनच तिला घरातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी जीवाचा एवढा आटापिटा केला होता. तिनं भरवलेल्या अन्नाचं ऋण त्यांनी पुरतं फेडलं होतं तिचा जीव वाचवून.

नकळतच तिचे दोन्ही हात जोडले गेले. आकाशाकडे पाहून ती हळूच म्हणाली,

"Thank you,"
पक्ष्यांना
निसर्गाला
आणि त्या अदृश्य करुणेला.

त्या क्षणी तिच्या मनात ज्ञानेश्वरांचे शब्द उमटले

''भूतां परस्परे पडो
मैत्र जीवांचे.''



श्रावण स्मृति

रिमझिम श्रावण
रुणझुण पैंजण
थेंबांची छनछन
पानोपानी

वाऱ्याची सळसळ
झऱ्याची खळखळ
पक्षांची किलबिल
रानीवनी

मेघांची गडगड
विजेची कडकड
उरात धडधड
क्षणोक्षणी

पावसाची भुरभुर
मनात हुरहुर
तुझाच विचार
ध्यानीमनी

भिजले अंगण
सुगंधी पखरण
तुझीच आठवण
रात्रंदिनी

–अश्विनी क्षीरसागर (सिअ‍ॅटल)

कथा स्पर्धा – तृतीय क्रमांक

सतरंज्या ते जाजम

प्रशांत कुलकर्णी
लेक फॉरेस्ट, कॅलिफोर्निया

तसं आपला व्यवसाय सुरू करून एका व्यवसायातून इतर अनेक व्यवसाय सुरु करायचं कसब फार लहानपणीच मी अंगी बाळगलं होतं. मिळालेल्या संधीचं सोनं करायचं आणि नवनवीन संधी शोधत रहायचं, हे यशस्वी होण्याचं सूत्र मला केव्हाच उलगडलं होतं. तशी सुरवात माझ्या मित्राच्या- पंकजच्या-मुंजीत ***'आता आलाच आहेस तर काहीतरी काम कर'*** असे सांगून मला सतरंज्या उचलण्याचं काम देण्यात आलं. हे काम मी खूप इमाने-इतबारे केले; अगदी सतरंज्या मोजून, त्यांची वर्गवारी लावून, घडी करून ठेवण्यात मी खूपच पुढाकार घेतला होता. इतकं की मुंज-मुलाची वरात निघाली तेंव्हाही मी सतरंज्यांचा हिशेब लावण्यात गुंग होतो. आता मुंजीला आलेल्या आमच्या वर्गातल्या आणि शाळेतल्या काही मुली मला सतरंज्या उचलतांना बघुन फिदी-फिदी हसत होत्या, त्याकडे मी दुर्लक्ष केलं. करायचं म्हटलं की अशा गोष्टींकडे बघून चालतं का? तर अशी ही वयाच्या १२-१३व्या वर्षी सुरुवात झाली आणि नंतर मी कधीही मागे वळून बघितलं नाही.

या कामावर मांडववाले-काका इतके खुष झाले की मला आपसूकच लग्ना-मुंजीत सतरंज्या उचलण्याची कामे मिळू लागली. हळू-हळू मी खूप तरबेज झालो. म्हणजे इतका की पत्रावळ्या घ्यायच्या आधी माझ्या सतरंज्या घालून तयार असत आणि पंक्ती-प्रपंच न पाळणाऱ्या, रेंगाळणाऱ्या पाहुण्यांना ढुशी देत त्यांच्या बुडाखालच्या सतरंज्या ओढून घेण्याचं माझं कौशल्य लाजबाब होतं. जसे-जसे माझे नाव सगळीकडे होऊ लागले तसे-तसे मला दूरदुरून मला सतरंज्यांची कामे मिळू लागली. उन्हाळ्यात घरात लोळत राहण्यापेक्षा लग्नाच्या जेवणाच्या बोलीवर काय वाईट होते हे काम? माझा व्याप खूप म्हणजे मोसमामध्ये जवळपास प्रत्येक मुहूर्ताला एक असा वाढला तसे मला राजकीय सभा, गाण्याचे प्रोग्राम्स, शाळा-कॉलेजातली संमेलने यांच्याकडून विचारणा होऊ लागली. शेवटी सतरंज्या उचलणं कोणालाही थोडीच जमतं हो! पण मी ठरवून घेतलं, लग्ना-मुंजी शिवाय इतर ठिकाणी सतरंज्या उचलायच्या नाहीत. उगाच फुकटात कोण काम करेल? आपला Market Segment ठरवणं आणि त्यातच Expertise वाढवणं, ही Business strategy मला त्या वेळेसही बरोबर जमली होती. अल्लाउद्दीन सारखं आपण उडत्या सतरंजीवरून फेरी मारत आहोत अशी स्वप्ने मला पडू लागली.

सतरंज्यात आपलं बस्तान बसलं असं वाटत असतांनाच अचानक हा धंदा बसू लागला. लोकांच्या आवडी-निवडी बदलल्या. त्यांना पंगतीत खाली बसून जेवणे प्रशस्त वाटेनासे झाले; त्या ऐवजी टेबल-खुर्चीच्या पंगती सुरू झाल्या. मग माझ्यासारख्या सतरंजीवाल्यांना कोणी विचारेनासे झाले. एका मोसमात तर केवळ २-३ मुहूर्तच मिळाले. आता राजकीय सतरंज्या उचलाव्या लागतात की काय, अशी परिस्थिती आली. या कठीण दिवसात माझा मित्र अनिरुद्ध अगदी देवासारखा धावून आला. त्याच्या मोठ्या बहिणीच्या लग्नात पाणी वाढण्याचे काम मला देऊ केले. तसा सतरंजीचा अनुभव पाणक्या बनण्यासाठी कुचकामी असला तरी मी अत्यंत मेहनत घेऊन अनिरुद्धचा विश्वास सार्थ ठरवला. फक्त पंगतीतच पाणी न वाढता, दिसेल त्याला मी पाण्याचा प्याला देऊ केला. उन्हाळ्याचे दिवस होते, लोकांना तहान लागत होती आणि माझ्या या सरबराईमुळे वरपक्ष-वधूपक्ष तर सोडाच पण बँडवाले, वाढपी, मांडववाले, सफाईवाल्या मावश्या या सगळ्यांची दुवा मला मिळाली. या कामांमुळे, आणि 'लाथ मारेन तिथे पाणी वाढेन' या माझ्या वृतीने मला बऱ्याच लग्नात

पाणक्या म्हणून बोलावणी येऊ लागली. काम वाढले तरीही मी माझी फी बिलकुल वाढवली नाही-लग्नाच्या जेवणाच्या बोलीवर मी आनंदाने पाणी वाढत असे. पाणक्याच्या कामांमुळे आता मागच्या - म्हणजे सगळ्यात शेवटच्या - पंगतीत मला मानाचे पान देण्यात येत असे. एकदा तर आमच्या कॉलेजच्या प्राचार्यांच्या मुलीच्या लग्नात खाशांना पाणी वाढण्यास मला पाचारण केले होते. मग कोठल्यातरी व्रात्य मुलाने 'इथे शिष्याच्या ओंजळीने गुरुजी पाणी पितात' असा फिशपाँड कॉलेजच्या गॅदरिंगमध्येमला दिला होता. एवढे होऊनही 'Above and Beyond' Customer service देण्याची माझी ऊर्मी मला स्वस्थ बसू देईना. पाणी वाढत वाढत मी पंगत कशी जेवते, याचा जवळून अभ्यास केला आणि वाढपी लोकांना पंगत बसल्यावर अंमळ उशिरानेच वाढावयास घेण्याचा सल्ला दिला. मग मधल्या वाचलेल्या वेळात मी गोड-गोड बोलत पंगतीला २-२ वाडगे पाणी पाजत असे. त्याचा व्हायचा तोच परिणाम होत असे. पाणी पिऊन पोट भरलेली माणसं काय जेवण करणार? त्यामुळे केटरिंगवाल्यांच्या आणि अनेक वधू-पित्यांच्या गळ्यातला मी ताईत बनलो नसतो तरच नवल! अनेक वधू-पिते तर मुहूर्त काढायच्या आधी 'प्रशांत पाणक्या' ची availability बघत असत. साहजिकच वर-पक्ष मला, मी वाढलेल्याच पाण्यात बघत असे आणि मी नसेन तर वधू-पक्षाच्या गायी पाण्यावर येत असत. माझ्याविषयी कहाण्या तयार होत असत. लोक आपापसात बोलतांना म्हणत, 'त्या प्रशांत पाणक्याच्या किरकोळ दिसण्यावर जाऊ नका; भल्या भल्यांना त्यांनी पाणी पाजलं आहे'. अन् ते खरंही होतंच की!

एकंदरीत पाणी मला तरून नेईल असे वाटत होते. पण नव-नवी क्षितिजे काबीज केल्याशिवाय स्वस्थ बसणारा माणूस मी नव्हतोच! पुढील शिक्षणासाठी मी पुण्याला जायचे ठरवले, त्याची दोन कारणे होती. चांगल्या कॉलेजची admission हे तर होतेच पण त्याही पेक्षा ज्यास्त पुण्यातल्या लग्नाच्या पंगती मला जास्त खुणावत होत्या. आमच्या वाढप्यांच्या मध्ये पुण्यातल्या पंगती वाढण्याचा अनुभव म्हणजे Google किंवा Apple मध्ये काम करण्याच्या अनुभवासारखे! कारण पुण्यातले पंगतभाऊ अत्यंत चोखंदळ (म्हणजे बेरकी), आणि एकदा का पुण्यातल्या पंगतींचा अनुभव गाठीशी असला म्हणजे त्या जोरावर कोणतीही पंगत मारता येते. हा ठोकताळा आमच्या मध्ये होता. झाले, दाखल झालो पुण्यात; तिथल्या पंगती मारायच्याच या ठाम निर्धाराने. हल्ली Management मध्ये ज्याला 'Go-To Market strategy' म्हणतात तसा यशस्वी होण्याचा आराखडा इंग्लिश शब्द माहीत नसतांनाही मी आखून ठेवला होता.

पण माणूस ठरवतो एक आणि प्रत्यक्षात होते दुसरे. पुण्यात थोडेफार बस्तान बसल्यावर मी आता पुण्यातील लग्ने-मुंजीच्या मागे लागलो. पुण्यात मी आलो खरा पण हे पुणेरी लोक काही ताकास तूर लागू देईनात. अनेक मंगल कार्यालये, मांडववाले, वाड्यातले छोटेखानी हॉल पालथे घालून झाले पण कोणी जवळपास फिरकू देत असतील तर शपथ! त्या सगळ्यांचे म्हणणे एकच, ''तुम्हा मराठवाड्याच्या लोकांना कधी खऱ्या पंगती बघून माहीत नाही. पंगतीत काय खावे आणि काय वाढावे हे तुम्हा दुष्काळी भागातल्या लोकांना काय माहीत? अन् ते तुझे पाणी पुराण आम्हाला सांगू नकोस! आम्ही ते सगळे इथे करून बसलो आहोत. हे शनिवारातले काय तुझ्या अशा पुळचट पाण्याला दाद देतील?'' हे 'शनिवारातले' काय प्रकरण आहे ते काही केल्या कळेना. शेवटी कोणीतरी खुलासा केला, की हे शनिवारातले म्हणजे अगदी भोजनभाऊ असतात. त्यांच्यासमोर, पंगतीची कोणतीही युक्ती चालत नाही. यांच्यातला अगदी किरकोळ दिसणाराही सहज ताटभर जिलेब्या अन् चार वाडगे मठ्ठा फस्त करूनच उठतो; आणि जोवर हे तृप्त होत नाहीत, तोवर विहिणींची पंगत बसत नाही. हल्ली - हल्ली यांचे इतके प्रस्थ राहिले नाही पण आदल्या पिढीपर्यंत पंगतीत ८-१० शनिवारातले असतील तर वधूपिते अगदी काकुळतीला येत असत. अच्छा, म्हणजे इथले Business Environmemt असे आहे तर! Business म्हणजे वेगवेगळी Challenges असणारच आणि अशा Challengesवर मात करावी लागते हा व्यवसायाचा मूलमंत्र आपसूकच ध्यानात आला.

हे सगळं ठीक पण मुख्य बाबीचं म्हणजे वाढप्याच्या

कामाचे काय? ते तर अजुनी काही मिळायला तयार नव्हते. अनेक मिनतवाऱ्या केल्या, कुठून-कुठून ओळखी काढल्या तेंव्हा कोठे एका प्रसिद्ध मंगल कार्यालयात काम मिळाले! 'पडेल ते काम आणि देऊ तो दाम' या बोलीवर. यशस्वी माणसाची Startup अशीच उदयास येते, असे तुम्ही वाचले असेल. काम तर मिळाले पण ही बेरकी मंडळी मला मीठ, चटणी आणि लिंबापलीकडे जाऊ देईनात. आमच्या वाढप्यांच्या मध्ये मीठ-चटणी वाढणाऱ्याला तेवढाच मान मिळतो जेवढा बँडवाल्यांच्या कंपूत एका छेना वाजवणाऱ्याला मिळतो. वर १-२ वर्षे मीठ-चटणीत काढली तर पुढे Career संपल्यातच जमा. नवीन जागा, नवीन शहर, Business ची काय स्वप्ने पहावीत आणि कसा चालवावा? 'इकडे आड अन् तिकडे विहीर' अशी स्थिती आली. पण अशा गोष्टींना डगमगणारा मी नव्हतो. हे मीठ-चटणी वाढण्यात एक मोठा फायदा होता. एकदा सुरुवातीची चक्कर झाली की परत कोणी मागत नसे आणि मग मला अनेक पंगतींचा अभ्यास (म्हणजे Observation) करायला भरपूर वेळ मिळत असे. अनेक पंगतीचा व्यवस्थित अभ्यास करून मी अनेक क्लृप्त्या आमच्या मालकांसमोर, अनेक वधुपित्यांसमोर मांडल्या पण त्या सगळ्यांचा एकच सूर- 'हे सगळे इथे चालत नाही. जे आहे ते उत्तम आहे, काऽऽऽही बदलायची गरज नाही'. पण मग मीही विक्रमादित्याप्रमाणे आपला हट्ट सोडला नाही.

कधी कधी संधी आपले घर शोधत येते असं म्हणतात, ते मला अगदी जाणवलं. एक मुहूर्त होता आणि नेमके आमचे मालक बाहेरगावी गेले होते अन् सगळी जबाबदारी त्यांच्या मुलावर आली होती. हा मुलगा तसा जरा बरा होता. थोडं-फार आपले ऐकत असे. मी त्याच्यासमोर एक योजना मांडली. म्हणालो, ''छोटे-मालक पार्टी बाहेरगावची आहे. नाव खराब होण्याची Risk नाही. तुम्ही माझी idea वापरून तर बघा. निदान २५% केटरिंगमध्ये वाचतात की नाही बघा!''. संध्याकाळी मुलाने मला मिठी मारली म्हणाला, ''गुरू, इतके दिवस कोठे होता?''. मी मनात म्हटलं, ''तुझ्या बापाला विचार''. तर माझी idea काय होती? माझ्या पंक्ती-संशोधनाने मी वाढण्याचा एक pattern शोधून काढला होता. आम्ही आधी भात-वरण वाढायचो, वर एक पोऱ्या थोडं तूप उडवत जायचा. मग अंमळ उशिराने आम्ही परत भातच आणायचो; तोही जरा सढळ हातानेच वाढायचो. दुसरा भात संपता-संपता आम्ही मसालेभात आणायचो. मग मसालेभात खाऊन लोकांची पोटे भरून जात असत आणि नंतर श्रीखंड-पुरी किंवा जिलेब्यांसाठी फार जागा राहत नसे. या प्रकाराला आम्ही 'अस्सल पेशवाई थाटाची मेजवानी' असे गोंडस नाव दिले होते. वधू-पिते खूष, catering वाले खूष आणि विहीणबाई तोरा मिरवायला तयार, 'आमच्या बंड्याच्या लग्नात तर बाई, आम्ही पेशवाई थाटाशिवाय कशाला ऐकलं नाही!' अर्थात हे मुरलेले 'शनिवारातले' काय असेच हार मानतील? पण आमच्याकडे सगळे उपाय होते. आम्ही आमचे ४-६ भिडू पंगतीत बसवत असू. पंगतीला जरा कोठे श्रीखंड-पुरीचे दर्शन होते न होते तोच हे भिडू 'लक्ष्मीरमण गोविंदा' असा पुकारा करत उठायला सुरुवात करत असत. मग पंक्ती-प्रपंचानुसार इतरांनाही उठणे भाग पडत असे.

अशा रीतीने मी वाढप्यापासून अचानक 'पंगत-सल्लागार' म्हणजे Consultant च्या भूमिकेत आलो. Value Chain मध्ये वर वर कसे जावे, हा business चा मूलभूत मंत्रच जणू मला गवसला! आता पुण्यातीलच नव्हे तर बाहेरीलही अनेक नामांकित मंगल कार्यालये माझा 'पंगत-सल्लागार' म्हणून सल्ला घेत असत. मराठवाड्यात मी पाणी पाजून पंगती चालवल्या तर पुण्यात आमटी-भात खाऊ घालून तर वऱ्हाडातले वेगळे खटकेच जाणून मी अनेक strategies develop केल्या. तसा मी अजून student च होतो पण लग्नाच्या line मध्ये मला मोठा मान मिळत असे. पण एवढे होऊनही मी माझी फी बिलकुल वाढवली नव्हती. लग्नाच्या जेवणाच्या बोलीवर मी आनंदाने सल्ले देत असे आणि प्रसंगी मीठ-चटणीही वाढत असे. Business म्हणजे 'No job is samll' हे ठामपणे अंगी बाळगावे लागते, याची जाण अगदी त्या वयातही मला आली होती.

आमच्या वाढप्यांच्यामध्ये गर्भश्रीमंत पंगतीत चांदीच्या भांड्यातून तूप वाढण्याचे काम मिळणे म्हणजे career चा परमोच्च बिंदू. आता तुम्ही म्हणाल की त्यात काय एवढे? पण

यजमान स्वतः कद नेसून, खाशांच्या पंगतीत मोदकांचा आग्रह करत आहेत किंवा यजमानीणबाई खुद्द आपली अत्यंत भरजरी पैठणी सांभाळत, हिऱ्यांच्या बांगड्या मागे सारत विहिणीच्या पंगतीत मांडे वाढत आहेत, आपण अदबीने मागे चांदीच्या ताटावर साजूक तुपाचे चांदीचे भांडे तोलत उभे आहोत आणि यजमान म्हणत आहेत, 'प्रशांत, अप्पासाहेबांचे मोदक कोरडे दिसतात. जरा नीट बघ त्याच्याकडे.' मग आपणही आधीच वाढलेल्या दोन चमचे तुपावर अजुन एक चांदीच्या चमच्याची धार धरतो. एवढा मोठा माणूस पण आपले नाव त्याला माहीत असणे हे काय कोणत्याही वाढप्याला जमते का? म्हणजे माळीकाम ते माळीकामच हो, पण सोसायटीचा माळी अन् राष्ट्रपती भवनाचा माळी, काही फरक आहे की नाही? या वयातच माझे अनेक business contacts झाले होते, कितीतरी थोरा-मोठ्यांच्या पंगती माझ्या हाताखालून त्या कॉलेजच्या चार वर्षात गेल्या ते मलाच माहीत.

हळू-हळू माझ्या वर्गातील मुलींची लग्ने ठरू लागली. त्यांचे आई-वडील अगदी हक्कानी माझ्याकडे पंगतीची जबाबदारी देत असत. आता तुम्हीच सांगा, एकाच प्लेटमध्ये भेळ-पुरी खाल्लेल्या, सोबत सिनेमाला गेलेल्या मैत्रिणीच्या लग्नात पंगत वाढतांना मनाला किती यातना होत असतील? आणि या मैत्रिणी पण पंगतीत जवळ बोलवत नी नवऱ्याची ओळख करून देत असत. मग तो नवरा अत्यंत विचित्र नजरेने मला न्याहाळत त्यांना विचारत असे, 'तुझे कोणीही ओळखीचे असतात का?' पण मी हे असे काही मनावर घेत नसे. Emotions आणि Business कधी बरोबर जात नाहीत हे मी Hard Way म्हणजे छातीवर धोंडा ठेवून शिकलो.

तसे माझे बस्तान ठीक बसले होते पण काळाची पावले कोणत्या दिशेने पडणार आहेत हे एक मुरलेला व्यावसायिक अगदी ओळखून असतो, आणि त्याला तसे कायम राहावे लागते. हा माझा पंगतींचा प्रपंच फार चालणार नाही हे माझ्या ध्यानात येत होते, आणि शेवटी तशी वेळ आलीच. पंगतीची पद्धत मागे पडत आता बुफेची सोय मध्यमवर्गातही रुळू लागली होती. माझ्यासारख्या वाढप्यांची कामे हळुहळू कमी होत चालली. मग मी एक धाडसी निर्णय घेतला. पंगतीची Line सोडून मी चक्क फोटोग्राफीमध्ये शिरलो. तसा वाढप्याच्या कामाचा आणि फोटोग्राफीचा काही संबंध नाही, पण या मुळे मी Back Office मधून एकदम Front Office मध्ये आलो. अर्थात लग्न-मुंजीचे कार्यक्रम सोडून इतर ठिकाणी फोटोग्राफी करायची नाही, हे मी आधीपासून ठरवले. तसेच आता मलाही लग्न करावे असे वाटत होते. तेंव्हा असा लग्नात वावर असेल तर काय माहीत एक दिवस आपलेही असेच जुळून जाईल, अशी आशा मला वाटत होती. लग्नाचा फोटोग्राफर बनण्यामध्ये 'फायदोही फायदो' होता. एकतर फोटोग्राफरला कोठेही जायची मुभा असायची. मेहंदीपासून बिदाईपर्यंत सगळे विधी attend करावे लागत असत. अनेक सुंदर चेहरे आसपास बागडत. कित्येकजणी फोटोत आपली एकतरी छबी यावी म्हणून आसपास घुटमळत असत. तो काळही तसाच होता. Digital फोटोग्राफी अजून सुरू झाली नव्हती. लोक २४, ३६ Photos चे रोल्स वापरत असत. आमची लग्नाची बोली पण ३६ चे चार रोल्स किंवा ३६ चे ३ रोल्स, अशी असायची. साहजिकच फोटोग्राफर हा अगदी हवा-हवासा माणूस वाटायचा. अनेक सुंदर मुली हळूच माझ्याकडून फोटो काढून घेत असत तर त्यांच्या आया उघडपणे मुलीचा 'दाखवण्याचा ' फोटो माझ्याकडून काढून घेत असत. अर्थात मला आनंदच होता आणि आशा होती की 'कभी अपनी बारी भी आयेगी!'

बहुतेक लग्नातली अत्यंत नाठाळ जमात म्हणजे 'दुल्हे के दोस्त'! एकवेळ विहिणींचे रुसवे-फुगवे परवडले किंवा मुलाच्या दूरच्या आत्याचे मानापमान करणे सोपे पण या नाठाळ जमातीच्या खोड्या आणि मागण्याने सगळे त्राही भगवान होत असत. विशेषतः North Indian लग्न असेल तर विचारूच नका! यांना सर्व काही करण्याची मुभा आणि कधी काय demand करतील याची सोयच नसे. कधी पान मागवतील तर मध्येच Shoe Polish करण्याची मागणी तर कधी ताटभर 'पनीर के पकोड़े' किंवा 'Chainies चकली' वर room मध्ये मागवतील. कधी कोणत्या करवलीची छेड काढतील तर कधी अत्यंत साळसूदपणाचा आव आणतील, हे सांगणे कठीण. माझ्यासमोर मात्र ही जमात अगदी नरम होत असे. अगदी अदबीने माझ्याशी ते वागत. म्हणजे माझ्याकडे

काही Special Powers नव्हत्या पण 'आवडणारे' असे काही फोटो काढावेत, असे त्यांना वाटत असे. मग मीही बरेच आढेवेढे घेत कोणी दूर, ओझरतं दिसणारा फोटो काढत असे आणि त्यातच ही मंडळी खूष असत. कधी कधी, 'प्रशांत-भाई, यार जरा उस लाल लेहंगावालीसे प्लीज introduce करवाओगे?' अशी अजीजी करत असत. १-२ लग्ने अशाच ओळखीतून जमली होती, त्यामुळे मला बराच मान देत असत. अनेक वधुपितेही 'दुल्हे के दोस्त' control करायला माझी मदत घेत आणि मीही ती आनंदाने करत असे. एवढे होऊनही मी माझी फी बिलकुल वाढवली नव्हती. लग्नाच्या जेवणाच्या बोलीवर मी आनंदाने ही कामे करत असे.

असे म्हणतात की मागील ५० वर्षात तंत्रज्ञानाचा जेवढा वेग होता, त्यापेक्षा कितीतरी जास्त मागील २ वर्षात होता. कितीतरी तंत्रे मागे पडली. आता फोटोग्राफी पण मागे पडणार, आपला Business परत एकदा बदलणार हे वेगळं सांगायची गरज नव्हती. आधी Digital कॅमेरे आले. नंतर तर Smart phone मध्येच फोटोची सोय झाली. त्यांचा इतका सुळसुळाट झाला की अगदी लहान मुलांच्या हातातही कॅमेरा आला. अर्थात मी हा बदल बघून डगमगलो नव्हतो. या आधीच मी माझी नवीन line शोधून ठेवली होती, आणि तीही या लग्न-मुंजीच्या field मधीलच!

माझ्या एवढ्या वर्षांच्या अनुभवात मी लग्नाच्या अनेक गोष्टी बदलतांना बघितल्या, पण एक गोष्ट मात्र बदलली नव्हती किंवा बदलण्याची शक्यता नव्हती, ती म्हणजे लग्न लावणारे गुरुजी. In fact यांची Demand वाढतच होती. या Line मध्ये आपण शिरलेच पाहिजे, असे मला राहून राहून वाटत होते. यासाठी नाही की एक शाश्वत काम येत राहील; पण यासाठी की यात काही नाविन्य आणता येते, आपली Traditions नव्या पिढीला Connect व्हावी, ही Challanges बघून. आता तुम्ही म्हणाल यात नवीन काय करणार? पूर्वापार चालत आलेले मंत्र, विधी थोडेच बदलता येतात? म्हणजे ठरवलेले लग्न असो की प्रेमविवाह शेवटी बोहल्यावर तेच Rituals होणार ना? माझा एवढ्या लग्नांचा अनुभव, नवीन पिढीला काय आवडते याचा अभ्यास आणि बदलते विचार यांची सांगड घालत मी लग्न लावायची एक सुटसुटीत पण प्रभावी पद्धत शोधून काढली. माझी एक अट मात्र असायची. जोवर माझे विधी चालू आहेत तोवर सगळी पाहुणे मंडळी बसून असतील आणि शांतपणे भारतीय लग्न कसे लावतात ते बघतील. बोहल्यावरही फक्त नवरा-मुलगा आणि नवरी-मुलगी आणि मुलीचे आई-वडील असतील; बाकी कोणी नाही. हल्ली तसेही Instant Gratification म्हणजे क्षणिक समाधानाचे युग, फारसा कोणाला वेळ नाही म्हणून वाङनिश्चय, वरमाला, मंगळसूत्र, कन्यादान, सप्तपदी, पाणिग्रहण आणि लक्ष्मी-पूजन हे सगळे विधी मी एका तासात बसवल्या. या प्रत्येक विधीचा अर्थ मी हिंदी आणि इंग्लिशमध्ये समजावून सांगतो. तसेच प्रत्येक पाहुण्याला एक लग्नपत्रिका दिलेली असते. त्यामध्ये क्रमाने कोणता विधी आहे, त्याचे आपल्या हिंदु प्रथेचे महत्व, हे थोडक्यात लिहिलेले असते. म्हणजे पाहुण्यांचाही सहभाग आपसुकच येतो. हळूहळू सगळे यात इतके involve होऊन जातात की जेंव्हा मी सप्तपदीच्या एक एक पावलाचा अर्थ विषद करतो तेंव्हा तर अगदी इथे अमेरिकेत वाढलेल्या मुलींच्याही डोळ्यात पाणी येते, नवरा-मुलगा भावुक होतो तर पाहुणे मंडळी मंत्रमुग्ध!

अशी अनेक लग्ने मी या पद्धतीने लावली. एका लग्नातून आपसुकच इतर लग्नाचे निमंत्रण मिळते. पण कधीच एक लग्न दुसऱ्यासारखे वाटत नाही. कसलेल्या गवयाची मैफिल जशी कधीच सारखी नसते, तसेच काहींसे ते असावे. एवढे होऊनही मी माझी फी बिलकुल वाढवली नाही. लग्नाच्या जेवणाच्या बोलीवर मी आनंदाने दूरच्या शहरातही लग्ने लावतो. Excellent Customer Experience हे माझे ध्येय आजही कायम आहे, अगदी इतक्या वर्षानंतरही. हल्ली लग्न लावल्यानंतर अनेक जण मला भेटायला येतात. काही तर चक्क पायावर डोके ठेवायलाही मागे पुढे बघत नाहीत. कोणी माझ्यासाठी जाजम पसरतो, कोणी म्हणतो, 'पंडितजी, आपके लिये कुछ फल लाये?' तर कोणी विचारतो, 'पंडितजी पंडिताईन कहीं नहीं दिखाई देती?'

मग मात्र मला माझा सतरंजीपासून सुरू झालेला आणि या जाजमापर्यंत आलेला प्रवास आठवतो आणि मनात नकळत येऊन जातं, या सगळ्या धबडग्यात तेवढी एक गोष्ट मात्र राहून गेली!

मंदार

रजनी अपसिंगेकर
सिअ‍ॅटल

खरंतर,तिला मी रोज बघत होते. कारण ती रोजच आमच्या दारावरून जायची. सकाळी अकराच्या सुमारास आणि संध्याकाळी सहा वाजता. तिची नीटनेटकी राहणी, तिच्या सुंदर आणि स्टार्च केलेल्या कडक इस्त्रीच्या साड्या मला फार आवडायच्या. तिच्याशी ओळख करून घ्यावी असं मला फार वाटे. तिला दारावरून जाताना हाक मारावी असं वाटे पण ती नेहमीच घाईत असे. असे रोज होत असे.

मंदार इंजिनियर झाला आणि आता तो एम. एस. करण्यासाठी अमेरिकेला गेला, दोन वर्षे झाली. मोठ्या कंपनीत त्याला नोकरी सुद्धा मिळाली.

वंदना त्याच्या लग्नाचा विचार करू लागली की वेळकाळ विसरत असे. आजही तेच फोनवर अलार्म वाजला आणि ती एकदम विचारातून जागी झाली.

''अग बाई, अकरा वाजले वाटतं,'' वंदनाताई अचानक उठल्या आणि खिडकीतून रस्त्यावर बघायला लागल्या, त्याच वेळेस.. ती तिकडनं घाईतच घरासमोरून निघून गेली. रोजच वंदना तिला पाहत असे आणि आपली सून अशी असावी म्हणून स्वप्न बघत असे. काल सुचिताशी फोनवर बोलत असताना अचानक अलार्म झाला आणि तिने नंतर बोलते, नंतर बोलते म्हणून फोन ठेवून दिला. लगेच ती खिडकीतून ती मुलगी दिसते आहे का ते पाहू लागली.. कारण अकरा वाजले होते ना, ती मुलगी निघून गेल्यानंतर तिने परत सुचिताला फोन लावला आणि काय ते सांगितलं.. सुचिता म्हणाली,''अगं ताई, असं काय करतेस तू? अगं, अशा खूप मुली असतात सुंदर, याच मुलीचं काय घेऊन बसलीस आणि तिला पाहण्यासाठी अलार्म वगैरे काय लावतेस, काहीही हं तुझं ताई!'' आणि नंतर त्यांच्या या विषयावर बराच वेळ गप्पा सुरू झाल्या. ऋषिकेश आला आणि दोघेजण जेवले, एक वाजला होता, आज मिनूचा फोन कसा नाही आला म्हणून तिने मिनूला फोन लावला तर सुचितांनी फोन करून तिला सांगितलं होतं की असं त्या मुलीला पहाण्यासाठी तुझी आई अलार्म लावते.. आणि धावत जाऊन त्या मुलीला पहाते. मिनल फोन वर बोलत होती. आई, अगं, काय चाललंय तुझं! आपली ओळख नं पाळख एवढं काय तुला त्या मुलीचं!''.

''काय म्हणजे काय, आता घाई नको का करायला.. डिसेंबर महिन्यात मंदार आला की उरकून टाकू लग्नं...''

मंदार आता सेटल झाला आहे तर त्याचे लग्न केले पाहिजे.. नाहीतर तिथलीच कुठलीतरी मुलगी लग्न करून आणायचा,''बरं, आई अगं! दुसरा फोन येतो आहे, बोलते नंतर'' असे म्हणून मिनलने फोन ठेवला.

वंदनाला वाटत होतं घरंदाज छान अशी मुलगी वाटते ती. असे असले तरी अनुरूप विवाह मंडळात तिने मंदारचे नाव सुद्धा नोंदवलं होतं. मंदारचा फोन आला की त्याला

मुलींविषयीच बोलत असे , ''अरे! ही मुलगी बघितलीस का? मी शॉर्टलिस्ट केलेली आहे, अजून कुणी तुला आवडत असेल तर जरूर सांग. लक्ष कुठे तुझं...मुली जरा बघं आणि मला सांग मग मी त्यांच्या आईंशी बोलेन आणि मग तू त्या मुलीशी बोल, कळतंय ना! मी वाट पहाते आहे.'' वंदना बोलत असे. पण मंदार चे लक्षच नसे...तो म्हणायचा ''आई,मला ऑफिसचा कॉल येत आहे, बोलतो नंतर..''

ती मुलगी मात्र वंदनाच्या मनातून जातच नव्हती. तिला वाटायचं की ती किती सुंदर आहे, किती छान टापटीत राहते आणि वेळेचं नियोजन! तिला आश्चर्य वाटायचं अगदी परफेक्ट .. अकराच्या ठोक्याला म्हणजे अकरा वाजताच या रस्त्यावरून जाते आणि सहा वाजता परत येते! कुठे जात असेल , तिचं लग्न झालं असेल का ?

आजकालच्या मुलींना साडी तरी कुठे आवडते, पण ही रोज साडी नेसते छान. तिला ड्रेस आवडत नसतील का?, कुठे जॉब करत असेल?,काय बर शिकली असेल? नाव काय असेल तिचं?, तिच्या आई-बाबाच्या विषयी, कुटुंबाविषयी, माहिती आपल्याला मिळायलाच पाहिजे. कसं शोधू मी.तिला.. वंदनाला पुन्हा पुन्हा तिची आठवण येत होती.

ऋषिकेश कंपनीतून एक वाजता घरी आला आणि दोघेजण गप्पा मारत जेवत होते. ऋषिकेश म्हणाला, ''आई, आता आपली ही जी बिल्डिंग आहे ना आपण राहतो ती, रिकन्स्ट्रक्शनला आली आहे. आपल्या सेक्रेटरीचा फोन आला होता की दोन वर्षापासूनच पेंडिंग काम आता बिल्डरने हो म्हणून सांगितलं आहे. आता रिकन्स्ट्रक्शनसाठी आपल्याला बिल्डिंग द्यायची आहे, तर आता भाड्याने कुठेतरी राहावं लागेल. बिल्डर सुचवेलच आपल्याला कुठे राहायचे ते. आत्ताच मला सेक्रेटरीचा फोन आला होता.''वंदना ऐकंतच राहिली, अगं बाई! हो का! कधी रे होणार आपलं कन्स्ट्रक्शन पूर्ण?

''अगं! आत्ताच मीटिंग झाली. आता कन्स्ट्रक्शन करायचे ठरलंय, होईल दोन चार वर्षात!''

खरंतर खूप जुनी बिल्डिंग झाली होती!. वंदनाताई अचानक हळव्या झाल्या. मंदारच्या जन्मापूर्वीच फ्लॅट भाड्याने घेतला होता आणि छोट्या मंदारला घेऊन बिल्डिंग मध्ये प्रवेश केला होता. त्यांच्याच कडून, म्हणजे मालकाकडूनच तो विकतही घेतला होता. या बिल्डिंगमध्येच ऋषिकेश चाही जन्म झाला. दोघांमध्ये पाच वर्षाचा अंतर. दोघांच्या शिक्षणानंतर मंदार अमेरिकेत गेला. त्यांच्या बाबांचे अचानकच ॲक्सिडेंटमध्ये निधन झालं. कंपनी ऋषिकेशला सांभाळावी लागली.

वंदना ताई म्हणाल्या, ''ऋषिकेश,अरे! तुझे बाबा होते म्हणून मनालीच लग्न तरी लवकर झालं. आता तुमची लग्नं केव्हा होत आहेत, मी अगदी वाट पाहून आहे बघ, मला तर थकल्यासारखे झाले आहे. तू असं कर, तुझंही नाव नोंदवून टाक अनुरूप विवाह मंडळात, म्हणजे मग मंदारच्या बरोबर तुझंही लग्न होऊन जाईल. आता आपली बिल्डिंग, रिडेव्हलपमेंट होईल, आपला फ्लॅटही मोठा होईल, हो की नाही.. एफएसआय मिळेल आपल्याला, हो नं! मला ह्यांची खूप आठवण येते रे ,काय ,काय करू!''

''आई, हे बघ काळजी करू नकोस प्लीज! आता दादा पण येईल डिसेंबरमध्ये आपण करूया सगळं नीट. ओके'' ऋषिकेश म्हणाला.

''अरे, आता हा सगळा पसरा आवरायचाय आपल्याला, आत्ताच काय पाहिजे सामान, काय नकोय ते नीट बघून घे, कित्येक वर्षाचे पडून आहे सामान.. माळ्यावरती सुद्धा. आता कधी वेळ काढशील तू... आपण रविवारी एकदा बसून सगळं काढू.. बघू काय आहे, काय नाही म्हणजे मग घर मिळाले भाड्याचे की लगेच तिथे राहायला जाता येईल. सांग मला, घर बघू या आधी आपण..कसे काय आहे ते, भाड्याचं असलं तरी काय झालं आपल्याला नीट राहायला पाहिजेना, आणि तुम्हाला मुली बघायला आल्या तर तेही आपल्याला चांगले नीटनेटक ठेवावे लागेल.''

वंदनाताई आणि ऋषिकेश यांनी सगळी आवरावरी केली. भाड्याचं घर बघून घेतलं. खूप छान मिळालं होतं, त्यामुळे त्यांना हायसं वाटलं, मीनलसुद्धा आली होती मदतीला. आता नवीन भाड्याच्या घरात जायचं म्हणून वंदनाला करमेनासे झालं, कारण ती अकराची वेळ, रोज ती

मुलगी दिसत असे. ती आता दिसणार नव्हती. कोण असेल ती.. कसं कळेल आपल्याला, आता ती परत उद्या नाही दिसणार आपल्याला कारण आपण इथे कुठे राहतोय त्यांना खूप आठवण आली तिची.

त्यांचेच त्यांना हसू आलं, काय ऋणानुबंध असेल माझा तिच्याशी ..की मीच तिच्या प्रेमात पडावं. अंबाबाई ऽ तुलाच काळजी..

पाहता पाहता डिसेंबर महिना आला. मंदारसाठी मुली पाहायच्या होत्या आणि मंदार आता पुढच्या आठवड्यात येणार होता. चार–पाच मुलींची एक शॉर्टलिस्ट करून वंदनानी ठेवली होती, त्यांना फोन केला होता. फक्त वेळ ठरवायची होती आणि दिवस ठरवायचं होता, की या दिवशी आपण भेटूया, असं सगळं होत असलं तरीदेखील त्यांना त्यांच्या जुन्या घराची आणि तिकडून जाणाऱ्या त्या सुंदर युवतीची आठवण मात्र मनातून जात नव्हती.

घर नीट लावलेलं होतं, मंदार येण्याचा दिवस उजाडला दारावरची बेल वाजली. दार उघडताच मंदार आत आला आणि त्याच्याबरोबर...त्याच्याबरोबर ती मुलगी होती! वंदनाताईंना आश्चर्याचा धक्काच बसला.. कसं शक्य आहे, मी तिला त्या आपल्या जुन्या घराच्या रस्त्यावर जाताना रोज पाहत होते.. आज ही मंदारच्या सोबत कशी काय? भास होतोय वाटतं, माझ्या मनात आहे म्हणून ती मला पुढे समोर दिसतेय का! काहीच कळेना..

त्यांनी ऋषिकेशला हाक मारली. अरे ऋषिकेश हा बघ मंदार आलाय..

ऋषिकेश धावतच बाहेर आला. मंदारला त्याने मिठी मारली. त्याची बॅग आत घेऊन गेला. वंदनाताई एकदा मंदार कडे, एकदा त्या मुलीकडे बघत होत्या. आनंद, आश्चर्य, कौतुक असे वेगवेगळे भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

मंदार म्हणाला, आई, हे बघ मी तुला म्हणालो होतो ना की जास्त मुली बघण्याच्या भानगडीत पडू नकोस. मी तुझ्यासाठी सरप्राईज आणेन म्हणून.. त्याने आईला नमस्कार केला. तिने सुद्धा केला..वंदना बघतच राहिली, तिला कळेच ना, की ही मुलगी रोज आपल्या जुन्या घराच्या तिकडनं रोज जात होती आणि ती हीच आहे. का मला भास होतोय. तिने ऋषिकेशला सांगितलं, मनुला बोलवलं.. अग मनिषा ही बघ ..सगळेच आश्चर्यचकित झाले. देवी अंबाबाईची कृपा! माझ्या मनात हीच मुलगी ठसली होती, म्हणूनच देवीने हा प्रसाद म्हणून मला सून दिली. वंदनाने देवापुढे साखर ठेवली, आणि ऋषिकेशला ''जा रे बाळा, पेढे घेऊन ये म्हणून सांगितलं''. वंदनाचा आनंद गगनात मावत नव्हता. मंदार म्हणाला,''अगं आई,हिला ओळखलंस का? ही श्रुती! माझ्या क्लासमध्ये होती. कॉलेजमध्ये असताना. आम्ही एकत्रच अभ्यास केला आणि ती इथे तिच्या वडिलांच्या बिझनेसमध्ये मदत करते. तिची आणि माझी भेट झाली ती फेसबुकवर.. जुन्या मैत्रीचे रूपांतर प्रेमात झालं आणि आता लवकरच तुझी सून म्हणून ती आता या घरात येणार आहे. आवडली ना तुला सून!''

वंदना अवाक झाली होती. तिची इच्छाशक्तीप्रमाणे तिला सून मिळाली होती ..ऋणानुबंध म्हणतात तो असाच असतो की काय, मागच्या जन्मीचं माझं तिचं काहीतरी नातं होतं म्हणूनच..ती पुन्हा मला अशी सून म्हणून माझ्या घरात आली, खरंच गं अंबाबाई ! अशीच कृपा असू दे घरावर! त्यांनी देवापुढे हात जोडले..ऋषिकेशने पेढे आणले आणि नैवेद्य दाखवून सर्वांनी पेढे खाल्ले आणि आनंद साजरा केला. वंदनाच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहत होते.

वंदनाताई, श्रुतीला भेटायला किती आतुर झाल्या होत्या. तो किस्सा मिनुने मस्तच रंगवून सांगितला आणि एकच हशा पिकला होता. हे पहाताना, ऐकताना श्रुती भारावलेली होती. तिच्याही डोळ्यात आनंदाश्रू तरळले, नकळतच देवघरातील अंबामायला तिने हात जोडून नमस्कार केला. देवघरातील अगरबत्तीचा मंद सुवास किती तरी वेळ दरवळत राहिला.

पोलिस : काय रे, कुठं चाललास एवढ्या रात्री?
बेवडा : प्रवचन ऐकायला!
पोलिस : कोणत्या विषयावर प्रवचन आहे?
बेवडाः दारूपासून होणारे दुष्परिणाम...
पोलिसः एवढ्या रात्री कोण देतं प्रवचन?
बेवडा : माझी बायको!!! लय भारी

– रेखा पै

एक सोनेरी संध्याकाळ

अभय जोशी
रेडमंड, सिअॅटल

रंगमंच मंद रंगीत प्रकाशात न्हाऊन निघाला होता. कृत्रिम धुराच्या लाटांमुळे सारे वातावरण मंतरलेले वाटत होते. मंचाच्या छतावर लावलेले आर्क-लाईट्स संथपणे आणि अनियमित गतीने फिरत होते आणि छोट्या रंगीबेरंगी, गोल किंवा अंडाकृती प्रकाशबिंबांची बरसात करत होते. संपूर्ण स्टेज गिटार, कीबोर्ड, ड्रम्स अशा वाद्यांनी व मायक्रोफोन स्टँड, स्पीकर्स अशा विविध प्रकारच्या ध्वनि उपकरणांनी व्यापले होते.

लाल मखमली गादीच्या खुर्च्यांनी सजलेले व स्टेजच्या दिशेने तीव्र उतार असलेले प्रेक्षागृह प्रेक्षकांनी खच्च भरलेले होते. शुक्रवारची उबदार संध्याकाळ होती आणि साऱ्या आठवड्याचा ताण घालवण्यासाठी शेकडो स्त्री-पुरुष या कार्यक्रमासाठी आले होते. स्त्रिया विविध रंगीबेरंगी, चमचमणाऱ्या पोशाखांत आणि केशभूषांमध्ये सजून आल्या होत्या. पुरुष मात्र त्यांचे सुरकुतलेले, घामट टी-शर्ट्स डिनर जॅकेटच्या आत कसेबसे लपवून आणले होते. लहान मुले कधी किंचाळत, कधी भोकाड पसरत, तर कधी वेगवेगळ्या पट्टीत चित्रविचित्र आवाज करत होती. प्रेक्षक सारखे माना वळवून इकडेतिकडे पाहात होते. ओळखीचे चेहरे दिसतात का हा त्यांचा हेतू असावा, पण प्रामुख्याने इतर स्त्रियांना न्याहाळणे हेच त्यांचे उद्दिष्ट दिसत होते. मंचावर हालचाल सुरू झाली आणि मग हळूहळू सगळ्यांचं लक्ष तिकडेच केंद्रित होऊ लागलं.

मंचाच्या मध्यभागी एक सुंदर स्त्री उभी होती. तिच्या हातात मायक्रोफोन होता आणि ती मधुर स्वरात गात होती. तिची अंगकांती तांबुस सोनेरी होती आणि तिचे गडद तपकिरी केस तिच्या खांद्यांवरून अगदी कमरेपर्यंत पोहोचले होते. तिने मान वळवली की तिचे ते रेशमी केस पुढे येऊन तिच्या उरोजांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करत, तेव्हा ती पटकन मानेला अलगद झटका देऊन त्यांना मागे ढकलत होती. तिच्या अंडाकृती चेहऱ्यावर गडद लाल ओठ होते आणि गात असताना ते ओठ विलग होऊन तिचे मोहक मुख एखादे कमळ उमलल्यासारखे दिसे. तिचे मोठे काळे डोळे प्रेक्षागृहावरून फिरत असताना मध्येच प्रेक्षकांचे स्वागत करत असल्यासारखे मंद स्मित करत. तिच्या शरीरावर एकच सोनेरी पोशाख खांद्यांपासून पायापर्यंत बिलगलेला होता. त्या पोशाखावर चमकणारे रेखीव नक्षी

असलेले आरसे होते. संगीताच्या लयीवर ती डोलू लागली की ते आरसे विविध रंगांची झळाळी इतस्ततः फेकत.

खांद्यांपासून पूर्ण अनावृत असलेले तिचे सडपातळ सोनेरी हात हवेत हळुवार लाटांसारखे फिरत होते आणि गाण्याच्या सुरांबरोबर तिची नाजुक बोटेही वळत किंवा सरळ होत होती. तिच्या अंगावरचा पोशाख अत्यंत सुरेख होता आणि तिच्या कमनीय बांध्याला अगदी साजेसा होता.

तिच्या सभोवती –तिच्या थोडेसे मागेच – काही गिटारवादक, काही कीबोर्डिस्ट आणि एक ड्रमवादक असे सर्व पुरुष सहकारी आपापल्या वाद्यांतून तिच्या गाण्याला संगीताची साथ देत होते. ते त्यांच्या वाद्यांवर त्यांची बोटे फिरवत जादुई संगीत निर्माण करत होते आणि अधूनमधून त्या गाणाऱ्या स्त्रीच्या सौंदर्याकडे मंत्रमुग्ध होऊन पाहात होते. त्यांच्या वाद्यांतून निघणारे सूर आणि ठोके जणू तिच्या आवाजाशी समरस होत होते, तिच्या ऊर्जेत मिसळून जात होते. आणि ती गायिका ती सर्व ऊर्जा घेऊन तिचे प्रेमगीत गात होती –– कोणा अज्ञात, अनामिक प्रियकरासाठी.

या रंगमंचावर येण्याआधीचा तिचा पूर्ण दिवस शहरातल्या एका बँकेत टेलरवर काम करण्यात गेला होता. कामावरचा औपचारिक पेहराव आणि कंटाळवाणा लांबलचक दिवस वरकरणी तरी तिने हॉलच्या बाहेरच फेकून दिला होता. पण दिवसभराचा कामाचा आणि दगदगीचा थकवा यांचा निचरा तिच्या शरीरातून आणि चेहऱ्यावरून हळूहळू होत होता. तिने दिवसभर प्रत्येक ग्राहकाच्या आर्थिक विवंचना आपुलकीने ऐकून घेतल्या होत्या व त्याच्या गरजेप्रमाणे सेवा दिली होती. तिची महिला वरिष्ठ अधिकारी अधूनमधून येऊन कठोर शब्द वापरून तिचा ताण वाढवायची. ते शब्दही तिने शांतपणे झेलले होते. तिच्या सहकाऱ्यांच्या तक्रारीही तिने सहानुभूतीपूर्वक ऐकल्या होत्या व त्यांचे सांत्वन केले होते.

पण आता हे सगळं मागे पडत चाललं होतं, फिकं होत होतं, आणि आता तिचे शरीर आणि मन संगीताच्या सुरांमध्ये विरघळू लागले होते.

या वादक–गायकांच्या संगीत ग्रुपविषयी तिला एक–दोन वर्षांपूर्वीच माहिती मिळाली होती. सुरुवातीला तिचा नवरा व ती असे दोघेही त्यांचे कार्यक्रम ऐकायला–पाहायला जात. कार्यक्रमाच्या शेवटी संगीताचा जल्लोष वाढत गेला की कलाकारांबरोबर प्रेक्षागृहातले लोकही नाचू लागत. तिच्याबरोबर तिचा नवराही उत्साहाने हातवारे करत नाचायचा. पण जेव्हा तिने या गटात सहभागी होण्याची व त्यांच्याबरोबर कार्यक्रम करण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा मात्र त्याने हरकत घेतली. या लोकांचं गाणं–वाजवणं–नाचणं विकृत असून ते काहीतरी वेडीवाकडी गाणी म्हणतात आणि अनैतिक प्रेमचाळ्यांना प्रोत्साहन देतात, असे तो म्हणाला. त्यापेक्षा दुसऱ्या एखाद्या, खाली बसून शास्त्रीय संगीत गाणाऱ्या गटात सामील होण्याचा त्याने सल्ला दिला.

त्याची ती हरकत अजूनही तिच्या मनाला टोचत होती. पण ते शब्दही संगीताच्या सुरांत विलीन होत गेले, क्षीण होत गेले.

हळूहळू तिचे शरीर व मन दोन्ही पूर्णपणे त्या गाण्यात विलीन झाले, संगीताशी एकरूप झाले. बीट्सच्या चढत्या–उतरत्या लयीसह तिचं तरुण शरीर सौम्य झटके देत डोलू लागलं आणि तिला भोवतालचं भान उरलं नव्हतं.

ऐकतो आहेस का रे माझ्या सख्या?
माझं संगीत तुझ्या हृदयाला स्पर्श करतंय का?

प्रेमाच्या आतुर आणि विरहाच्या तळमळीच्या त्या शब्दांमध्ये ती बुडून गेली. मान वर करत व छाती पुढे करत तिने आपले दोन्ही हात छताकडे फेकले व जणू आकाशातल्या ईश्वराची करुणा भाकली. तिचे सोनेरी सँडल्स लाकडी स्टेजवर नृत्याच्या ठेक्यावर टकटक करू लागले आणि तिच्या सुडौल मांड्या गाण्याच्या बीटबरोबर कधी विलग होत तर कधी एकमेकांना गच्च आलिंगन देत ठेका देऊ लागल्या.

गाण्याचा ठेका जसजसा वाढत होता तसतसे तिचे वेलीसारखे शरीर एखाद्या तरुण सर्पासारखे सळसळू लागले आणि प्रेक्षागृहातल्या सर्वांच्या हृदयाचे ठोके वाढत गेले. पुरुष स्तब्ध होऊन तिचे सौंदर्य तहानलेल्या चातकासारखे पित राहिले. काहीजण प्रेमात होते ते आपापल्या प्रेयसीच्या जगात हरवून गेले. इतरांच्या मनात कामुकता जागृत झाली व गायिकेचे ते प्रेमगीत ऐकताना त्यांच्या धमन्यांतून अभिलाषा चरचरू लागली. प्रेक्षागृहातल्या स्त्रिया तिचे सुडौल शरीर व अनिर्बंध अंगविक्षेप पाहून अवाक झाल्या. आपले पुरुष

कुठेतरी दुसरीकडे असते तर बरे झाले असते, असे त्यांना वाटू लागले.

पण त्याचबरोबर प्रेक्षागृहातल्या या स्त्रियांचं मन तिच्या मोकळेपणावर आणि बेधडक मुक्ततेवर मोहून गेलं. तिच्या टवटवीत आणि काळजीपूर्वक जपलेल्या तरुण शरीराचे त्यांना कौतुक वाटले. गतायुष्यात कुठेतरी रुतलेले, गमावलेले तारुण्य पुन्हा त्यांच्या हृदयात उसळले आणि बंडखोरीचे विचार त्यांच्या सुस्त पडलेल्या पंखांवर फडफडले. एकेकाळी रसरशीत असलेल्या पण निष्काळजीपणामुळे बेडौल झालेल्या शरीराची त्यांना लाज वाटू लागली. त्यांच्या थकलेल्या छातीशी चिकटलेल्या, अखंड मागण्या करणाऱ्या लहान रडक्या चिलटांची त्यांना चीड वाटू लागली. गाणाऱ्या आणि मोकळेपणाने झुलणाऱ्या त्या स्त्रीच्या हृदयाशी त्यांचेही हृदय जुळले आणि त्याही काही क्षण का होईना, मोकळ्या झाल्या, मुक्त झाल्या. त्याही मनोमन उभ्या राहिल्या आणि प्रेमाची गीते गाऊ लागल्या, नाचू लागल्या, जरी त्यांची शरीरे अजूनही खुर्चीतच अडकून पडलेली होती.

गाणे जसे उत्कटतेच्या शिखरावर पोहोचले तसे गायिकेच्या कपाळावर घामाचे अगदी लहानसे शेकडो थेंब चमकू लागले. ती डोळे मिटून तिथेच उभी राहिली. तिच्या चेहऱ्यावर समाधान, आनंद, जणू ईश्वरभेटीचे तेजच झळकत होते. प्रेक्षक टाळ्या, शिट्ट्या वाजवू लागले व तिच्याकडे अनिमिष नेत्रांनी पाहात राहिले. तिने झुकून त्यांना अभिवादन केलं. तिचं गाणं संपलं होतं. आता दुसरे कलाकार मंचावर येऊन त्यांचे आयटेम पेश करणार होते. कदाचित ती नंतर पुन्हाही येणार असेल, पण आतापुरते तिचे काम झाले होते.

तिची थोडीशी क्लांत पण बरीचशी समाधानात भिजलेली नजर तिने आधी प्रेक्षकांकडे व नंतर मंचाच्या उजव्या बाजूकडे वळवली. तिथे दोन लहान मुली, आश्चर्याने डोळे विस्फारून तिच्याकडे पाहात होत्या. त्यांनी आपल्या स्कर्टची एक कड हातात धरली होती व थोड्याशा गोंधळलेल्या नजरेने त्या डोलत होत्या. सोनेरी पोशाख घातलेली, तांबुस, सोनेरी कांतीची ती गायिका -- आता एक आई -- आपल्या त्या मुलींकडे धावत गेली आणि तिने त्यांना आपल्या प्रेतमळ हृदयाशी कवटाळले!

माहेर

किती सांगू या ''माहेराची कवतिके''
उपमा रूपके, शब्द पडतात फिके

माहेर म्हणजे जिथे जाऊन आपण
अगदी 'खुल्ले' ठेवतो आपले चलन-वलन

माहेर म्हणजे जिथे ''असे का केले, तसे का केले''
भले कुणाचे ऐकावे लागत नाही

माहेर म्हणजे जिथे लोक चहू दिशा
उत्सुक पूर्ण करण्यास आपल्या मनीषा

माहेर म्हणजे जिथे कुणी कधीही
आपल्याला कमी लेखत नाही

माहेर म्हणजे जिथली हवा देखील
असते मुक्त प्रसन्न अवखळ सलिल

माहेर म्हणजे जिथे कुणी सांगत नाही काम
आणि रागावतही नाही जर केला आराम

माहेर म्हणजे जिथे नसते काही शिस्त
चालते तुम्ही केले तूप सारे फस्त

माहेर म्हणजे जिथे होतात सुहृदांच्या गाठी भेटी
हवे त्याला आपण मारू शकतो मिठी

माहेर म्हणजे जिथे खाण्यापिण्याची चंगळ
''जाड होशील'' असले बोलत नाहीत अमंगळ

माहेर म्हणजे जिथे हवे तितके झोपा
छे आळस नाही, हा तर सासुरवासाचा वचपा

-अभय जोशी (सिॲटल)

भय इथले संपत नाही...

अभिजीत जोशी
मॉरिसविले, नॉर्थ कॅरोलिना

काही आठवड्यांपूर्वीची गोष्ट आहे. काही किरकोळ सामान आणायच्या निमित्ताने भार्गवला किराणा दुकानात जायचे होते. भार्गव आणि त्याचे कुटुंब गाडीतून बाहेर निघाले. थोड्याच वेळात तो दुकानापर्यंत पोचला. जास्त काही घ्यायचे नव्हते त्यामुळे कुटुंबीय गाडीत बसले होते. भार्गवने गाडी दुकानाच्या समोर लावली आणि सामान आणायला दुकानात गेला.

दुकानात जाण्यासाठी सरकता दरवाजा होता. भार्गव पायऱ्या चढून दुकानाच्या दरवाजासमोर गेला. दरवाजा सरकला आणि तो आत शिरला. तेवढ्यात त्याच्या समोरून एक माणूस दोन मोठी खोकी घेऊन गेला. भार्गवला वाटले की तो माणूस पैसे देऊन बाहेर पडेल. पण तो सरकणाऱ्या दरवाजातून पैसे न देता बाहेर पडला. चिंधीचोर असावा बहुतेक. तिथे काम करणाऱ्या माणसाने त्याला अडवायचा प्रयत्न केला. तिथल्या धक्का-बुक्की मध्ये एकाने बंदूक काढली आणि गोळ्या झाडल्याचा आवाज आला.

भार्गवचे कुटुंबीय गाडीतून हे सर्व बघत होते. त्यांनी भार्गवला आत जाताना बघितले होते. त्यानंतर त्यांनी फक्त बंदुकीचा आवाज ऐकला.

भार्गवची बायको माधवी पॅनिक झाली आणि तिने लगेच पोलिसांना फोन लावला. तिची मनःस्थिती अतिशय दोलायमान झाली होती. विहान, त्यांचा मुलगा तर सतत रडत होता. गाडीत ते दोघेही लपून बसले होते. विहानच्या शाळेत असे मॉक ड्रिल होत असल्यामुळे त्याला तशी सवय होती. पण शाळेतले प्रसंग काही खरे नसतात. इकडे मात्र हा खराखुरा प्रसंग होता.

भार्गव माधवीला फोन करत होता पण तिचा फोन व्यस्त होता. दोघांना एकमेकांचे फोन लागत नव्हते. ती भार्गवला फोन करत होती आणि तो माधवीला. अचानक तिला आठवले की जर त्याचा फोन चुकून वाजला तर काहीतरी गडबड होईल. ती गाडीत बसून फक्त देवाचा धावा करत होती.

इकडे भार्गवने दुकानाच्या आत देखील गोळीचा आवाज ऐकला आणि तो लपण्यासाठी पळू लागला. त्याच्या सोबत दुकानात आणखी काही लोक होते. ते पण सैरावैरा पळत होते.

तेवढ्यात कोणीतरी सांगितले की दुकानाच्या मागच्या बाजूला आणखी एक दरवाजा आहे. गोळ्यांच्या आवाजाचा वेध घेता घेता भार्गव लपत छपत दुकानाच्या मागच्या बाजूला पोहोचला. दुकानात काम करणारे लोक देखील त्याच्यासोबत होते. बाहेर पडायचे का लपून राहायचे, हा विचार चालू होता. तेवढ्यात दुकानात काम करणारा माणूस म्हणाला की बाहेर पडा. हा दुकानाच्या मागचा दरवाजा बऱ्याच लोकांना माहिती नाही. तुम्ही सुरक्षितपणे बाहेर पडा. पळत पळत भार्गव गाडीपर्यंत पोचला. तोपर्यंत पोलीस गाडीचा सायरन ऐकायला मिळाला. आता जरा सगळ्यांनाच धीर आला.

भार्गव पटकन गाडीत बसला आणि स्टार्टर मारून गाडी सुरू केली. त्याला लवकरात लवकर तिथून बाहेर पडायचे होते. ३० सेकंदाच्या आत तो त्या परिसराच्या बाहेर पडला देखील. गाडीत नुसती रडारड आणि भीतीचे वातावरण होते. ७-८ किलोमीटर गेल्यानंतर एके ठिकाणी गाडी थांबवली. भार्गव , माधवी आणि विहान या तिघांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली. ते अजूनही त्या धक्क्यातून सावरले नव्हते. विहानची रडारड चालूच होती.

भार्गवने त्यांना सांगितले की आता काळजीचे कारण नाही. आपण सगळे एकत्र आहोत. एकमेकांसोबत आहोत. २० मिनिटापूर्वी जे काही झाले ते एक वाईट स्वप्न होते असे समजा. सगळेजण शांत झाल्यावर त्याने गाडी सुरू केली आणि पुढील प्रवासाला लागले.

भार्गवने अमेरिकेतील अशा घटनांबद्दल फक्त ऐकले होते पण प्रत्यक्ष अनुभव आज पहिल्यांदा आला. दुकानात गोळ्या बिस्कीट विकत घ्यावे तसे इकडे बंदुका मिळतात. आई वडील मुलांच्या १७-१८ व्या वाढदिवसाला भेट म्हणून देतात. इथल्या मुलांना काय, मोठ्या माणसांना देखील सारासार विचार करायची वृत्ती नाही.

त्याच्या मनात कितीतरी वेळ हाच विचार चालू होता की आज काहीही होऊ शकले असते. देवाची कृपा आणि वाडवडिलांची पुण्याई यांच्या जोरावर आपण सर्व कठीण प्रसंगातून बाहेर पडलो.

''घेतला जो श्वास आता तो पुन्हा न लाभणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे'' या गाण्याच्या ओळी त्याला गाडी चालवताना आठवत होत्या.

एकंदरीतच अमेरिकेत राहताना त्याला सतत वाटत होते, ''भय इथले संपत नाही...!!'' आणि आता पुढे काय करायचे या विचारात त्यांनी पुढचा प्रवास सुरु केला.

त्यानंतर २-३ आठवडे घरात एकप्रकारची शांतताच होती. नाही म्हणायला भार्गवचे ऑफिसच्या गप्पा, माधवीच्या चर्चा आणि विहानच्या शाळेच्या गप्पा व्हायचा. पण नकळत गप्पा गोळीबाराच्या प्रसंगावर यायच्या आणि सगळे जण सुन्न व्हायचे. विहान तर एकदम रडायला लागायचा.

घरी सांगायची भीती होतीच. आधीच आई बाबा एवढ्या लांब राहतात. त्यांचे देखील वय झालंय. अशा वेळी अशी बातमी सांगणे अवघडच होते. भार्गवचे आई बाबा आजकाल दर दोन दिवसांनी ''आता परत ये भारतात'' अशी गळ घालत असत.

परवाच्या या गोळीबाराच्या प्रसंगानंतर तर त्याला बराच मोठा प्रश्न पडला होता. इथे राहावे की परत जावे? अमेरिका म्हणजे एक सोन्याचा पिंजरा बनला आहे, असं त्याला सारखे वाटत होते. नुसते डॉलर मिळत आहेत पण देशाबाहेर जायचे म्हणजे व्हिसा स्टॅम्पिंग बघा, बदलते नियम बघा आणि कुढत बसा.

माधवीला तर भारतात जायला हवंच होतं. तिथे निदान घरकामाला मदत मिळते. आई वडिलांसोबत कधीही जायला मिळते. सगळे सण-वार, समारंभ साजरे करायला मिळतात. आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे थंडीचा, बर्फाचा त्रास नाही. डॉक्टर पटकन उपलब्ध असतात.

विहानला अजूनही भारत म्हणजे आपल्या कौतुकाचा देश वाटत असे. त्याला बऱ्याचदा वाटायचे की आजी आजोबा इकडे आपल्या सोबत असते तर किती मज्जा आली असती. त्याने भार्गव आणि माधवीला हा प्रश्न देखील विचारला होता. बाकीच्या मित्रांचे आजी-आजोबा इथेच असतात. ते त्यांच्या घरी जाऊन केवढी धमाल करतात. आपण का नाही करू शकत? माझे आजी आजोबा फक्त २-३ महिने येतात आणि लगेच परत जातात. मला पण त्यांच्यासोबत राहायचे आहे. सगळी धमाल मस्ती करायची आहे.

भार्गवला एकदम त्याने १० वर्षांपूर्वी म्हणजे अमेरिकेत आल्यानंतर लिहिलेली एक कविता आठवली.

अजून कळत नाही मजसी, For Here OR To GO

दिवसांमागुनी दिवस चालले, उलटली दिनदर्शिकेची पाने,
ना भ्रमंतीचा मोह सुटेना, वा पैशाचा भ्रम तुटेना,
वाटेवरती सदैव दिसे, मृगजळाचा भासच हो,
अजून कळत नाही मजसी, For Here OR To GO १

सहजपणाची अनुभूती येथे, भविष्याची भ्रांत नसे,
दूरदेशीचे अडसर सरले, गुणवत्तेला स्थान असे,
आरक्षणाचे बंध नसती, मुक्तपणाची जाणीव हो,
अजून कळत नाही मजसी, For Here OR To GO २

नात्यांचे या काय करावे, विचारांचे वादळ यावे,
दुधावरच्या सायीसाठी, वृद्धत्वाने किती झुरावे ?
या प्रश्नांचा उपाय सुचेना, चक्रव्यूहात अडकलो हो,
अजून कळत नाही मजसी, For Here OR To GO ३

कर्तृत्वाची नवीन संधी, वा कर्तव्याचा वेध भला,
रोज मनातून ठिबकत राही, ओला थेंब डोळ्यांमधला,
सगे सोयरे सोबती सारे, भेटती आभासी पटलावरती हो,
अजून कळत नाही मजसी, For Here OR To GO ४

भार्गवचे बरेचसे भारतातील मित्र दरवर्षी नवीन देश हिंडून यायचे. त्यांच्या जगभ्रमंतीच्या पोस्ट्स बघून मनाला एक प्रकारची खंत देखील वाटायची. आपण इकडे नुसते पाट्या टाकत बसलो आहे आणि जग केवढे पुढे जात आहे. पूर्वी भारतात संधी नसायची, किंवा इतर राजकीय आणि सामाजिक कारणांमुळे लोक भारत सोडून इकडे यायचे. पण आजकाल वाढत चाललेले व्हिसाचे निर्बंध, तंत्रज्ञानाचा वाढता वेग आणि महागाई यामुळे त्याला मोठा प्रश्न पडला होता.

इतक्यात भार्गवला एक कटू बातमी कळली. AI च्या वाढत्या वापरामुळे त्याची नोकरी धोक्यात आली होती. त्याच्या कंपनीने त्याला भारतात परत जायला सांगितले होते. त्याच्या डोळ्यासमोर एकदम अंधारी आली. एवढ्या पटकन एखादा निर्णय घ्यायचा म्हणजे बराच मनस्तापच.

एका दृष्टीने त्याला आनंद होता की भारतात एक प्रकारचे शांत आयुष्य जगता येईल. निदान कुठल्या शाळेत, दुकानात गोळीबाराच्या घटना घडणार नाहीत. विहानच्या शाळेचा थोडा प्रश्न येईल पण त्याच्या पुढील शिक्षणासाठी तो कधीही अमेरिकेत येऊ शकेल.

त्याने ही बातमी माधवी आणि विहानला सांगितली. त्यांना मोठा धक्का बसला होता. पण व्हिसाच्या चक्रव्यूहात आणि ग्रीन कार्डच्या साठमारीत थांबण्यापेक्षा भारतात जाणे कधीही चांगले असे त्यांचे एकमत बनले. शिवाय भार्गवला भारतात चांगलाच पगार मिळणार होता. त्यामुळे आर्थिक गाडी देखील एकदम फास्ट ट्रॅक वर जाणार होती. त्यामुळे सगळे खुश होते.

भारतातील नवीन आव्हानांची, बदलत्या परिस्थितीची त्याला कल्पना होतीच पण मनात एक प्रकारची भीती देखील होती. आणि तेवढ्यात वर भार्गवच्या आवडीचे गाणे लागले होते.

भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते !!

गोळीबाराची भीती, सामाजिक व्यवस्थेची भीती, bullying आणि वर्णभेदाची भीती, व्हिसा आणि स्टॅम्पिंगची भीती, AI ची भीती. या सगळ्या भीतीत जगण्यापेक्षा आपला देश कधीही बरा. असे म्हणून तो भारतात परत जाण्याच्या तयारीला लागला सुद्धा.

राजदूत

छोड़ के रिश्ते नाते घराने रिश्ते नए बनाने हैं
खून के रिश्ते हुए पुराने प्रेम के रिश्ते सुहाने है

स्वदेश से जब दूर जाते विदेश में नजदीक आते हैं
भाषा प्रांत रिश्ते नाते बस कहने की यह बातें है

मिलजुल कर सब रहना है इतना ही हमें कहना है
भेद नहीं कुछ बाहर अंदर तन से भी मन सुंदर है

रंग भले हो भिन्न हमारे ईश्वर को है सब ही प्यारे
यूएस रहो या इंडिया प्यारों कोई फर्क नहीं पड़ता यारो

देश विदेश में बिखरे बच्चे भारत के हैं राजदूत सच्चे
श्रद्धा से फूल हम चढ़ाएंगे शान देश की हम बढ़ाएंगे

–प्रा.अरुण सु.पाटील (असु)
(न्यू जर्सी)

रात्रपाळी

अरुण निसरगंड
बेलव्ह्यू, वॉशिंग्टन

''उठो, भाई उठो'' कुणीतरी मला हलवून जागे केले.

थोडा वेळ मी कुठे आहे हेच माझ्या लक्षात येईना. एक पांढऱ्या मिशा असलेला भय्या मला उठवत होता. पुन्हा ''उठो'' म्हणून तो खाली उतरला. लोकल पूर्ण रिकामी झाली होती.

मी पट्कन खाली उतरलो आणि ती रिकामी लोकल उलट्या दिशेने निघाली. मी प्लॅटफॉर्मववर इकडेतिकडे बघितले. कोणीच दिसत नव्हते. चहाचा स्टॉल बंद झाला होता. सगळीकडे अंधार पसरला होता. वर घड्याळात एक वाजला होता. रात्रीचा. मी अंधेरी स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर उभा होतो हे स्टेशनची पाटी वाचल्यावर कळले.

हा घोटाळा काही माझ्या लक्षात येईना. शिफ्ट संपल्यावर मी अंधेरीहून गोरेगांवला घरी निघाल्याचे आठवत होते. ते संध्याकाळी आठच्या सुमारास. मग मी रात्री एकला अंधेरीलाच कसा काय आलो?

बाकावर बसून तिथे विचार करायला सुरुवात केली. बहुतेक अंधेरीत गोरेगांवला जाणारी लोकल पकडल्यावर मला झोप लागली असावी. नंतर बोरिवली ते चर्चगेट आणि पुन्हा बोरिवली अशा किती चकरा झाल्या होत्या कुणास ठाऊक. त्या भय्याने जागे केलं ती बहुतेक शेवटची लोकल असावी. त्याने उठवले म्हणून बरे झाले. नाहीतर लोकल कुठेतरी सायडिंगला गेल्यावर जाग आली असती.

फॅक्टरीत कालचा दिवस एकामागे एक आलेले धक्के खाण्यात गेला होता. दोन दिवसात झोप मिळाली नव्हती. म्हणूनच अंधेरीत लोकलमधे बसल्यावर गाढ झोप लागली होती.

नेहमी उशिरा घरी जाणारे अर्ल-साहेब काल लवकर, पाहिली शिफ्ट संपल्यावर तीन वाजताच गेले होते.

शॉपमधे काम करणारे सोडून बाकी सगळ्यांना शनिवार रविवार सुट्टी. त्यामुळे दोन दिवस तरी साहेबांची कटकट नव्हती. कधी ते त्यांच्या मर्सिडीजमधे बसून जुहूच्या वाटेला लागतात, असे मला झाले होते.

पण त्यांच्या इन्स्ट्रक्शन्स संपता संपत नव्हत्या.

''यु सी अर्विन, सोमवारी शिपमेंट जायलाच हवी''

''अर्ल-साहेब'', मी त्यांना आठवण करून दिली, ''आपले तीनही मेटल-प्रेसेस फुल तीन शिफ्ट सुरू आहेत. प्रॉडक्शन रेट आणखी कसा वाढवणार?''

''I know it. पण काहीही करून सोमवारी शिपमेंट गेलीच पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे उद्या कामगार सभेच्या पुढाऱ्यांनी आपल्या वर्कर्सची सभा बोलावली आहे. आपल्याकडे आतापर्यंत युनियन नाही. त्याचाही बंदोबस्त करायला हवा. त्या सभेच्या भाषणांकडे लक्ष ठेव आणि मला फोन करून सांग.'' साहेब गाडीत बसत म्हणाले.

''Mr. Earl.'' मी त्यांना थांबवले. ''मी आपला

इलेक्ट्रिक मीटर वॉच करतोय. आपला या महिन्याचा कोटा संपत आला आहे. शनिवारी, रविवारी संपला तर?''

''यु नो व्हॉट टु डू'' साहेबांनी हातानेच मला थांबवले. ब्रीफकेस उघडून पाकीट माझ्या हातात दिले आणि ड्रायव्हरला गाडी सुरू करायला सांगितली. पाच मिनिटात ती साकीनाक्याच्या रस्त्याला वळली आणि मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

पण ते सुख फार वेळ टिकले नव्हते. साहेब जुहूपर्यंत पोहोचायच्या आधीच पॉवर गेली आणि सगळी मशीन्स थांबली. इलेक्ट्रिशियन नेल्सनने आपला इलेक्ट्रिसिटीचा या महिन्याचा कोटा संपल्याची वर्दी दिली. पॉवर नसताना सोमवारची शिपमेंट कशी होणार? माझी शिफ्ट संपली होती. पण रात्रपाळीच्या केव्हिनचा पत्ता नव्हता. तो आल्याशिवाय मला निघणे शक्यच नव्हते. म्हणजे त्याचा प्रॉब्लेम माझाच प्रॉब्लेम झाला होता.

पॉवर गेल्याने सेकंड शिफ्टच्या वर्कर्सना ''लंच ब्रेक आत्ताच घ्या'' सांगितल्यावर ते सिगरेट, चहा घ्यायला पसार झाले. वर केबिनमधे जाऊन मी इलेक्ट्रिसिटी बोर्डाच्या माणसाला फोन लावला आणि त्याला प्रॉब्लेम सांगितला.

कमाईचा दिवस. त्यामुळे बोर्डाचा माणूस लगेच टॅक्सी करून आला. मी काही सांगायच्या आधीच त्याने इलेक्ट्रिक मीटरचे लॉक उघडले. खिशातून स्क्रू ड्रायव्हर काढून कामाला लागला. पॉवर शेडिंग की ऐसी तैसी. पंधरा मिनिटात त्याने मीटर ''रिपेअर' करून दिला. शॉपमधले सगळे प्रेस सुरू झाल्याची घरघर ऐकू आली. मीटरचे रीडिंग '००००' आहे याची खात्री करून घेतल्यावर मी पाकीट त्याच्या हातात दिले.

''मोजून घ्या'' मी म्हणालो.

''त्याची काही गरज नाही अरविंद-साहेब'', तो सलाम करून जाताना म्हणाला. ''आणखी दोन-तीन आठवडे तरी पॉवर जाणार नाही''

मी अर्लसाहेबाना फोन करून पॉवर मीटरचे काम झाले असे सांगितले.

''गुड वर्क, अर्विन'' त्यांनी शाबासकी दिली.

Irwin अर्ल साहेब केरळचे ॲंग्लो-इंडियन होते. त्यामुळे फॅक्टरीमधले एकूण एक वर्कर्स केरळमधून आलेले. काही गोव्याचे ख्रिश्चन. सायमन, नेल्सन, ॲंथनी अशी वेस्टर्न नावे असलेले. त्यामुळे मी अरविंदचा अर्विन झालो होतो. अकाऊंटंट आंबेकर, ड्राफ्टस्मन वरळीकर, मी आणि दोनतीन वर्कर्स एवढेच मराठी होतो.

केव्हिनचा पत्ता नव्हता. तो येईपर्यंत शिफ्टवर थांबणे भाग होते. शॉपमधे प्रॉडक्शनची माणसे ब्रेकवरून परत आली होती. मी खाली शॉपमधे चक्कर टाकून सगळे काही ठीक चालले आहे याची चौकशी करून खात्री केली. शॉप फोरमन बेगला अर्लसाहेबांची ''सोमवारी शिपमेंट झालीच पाहिजे'' ही ऑर्डर सांगितली. बेगला ते नवीन नव्हते. दर महिना अखेरीला आमचे हेच संभाषण व्हायचे.

''अर्ल साबको पूछा क्यूँ नही, पॉवर नही तो प्रेस कैसा चलाएंगे? यहाँ वर्कर कम्पलेन करते है. प्रेस बंद, तो उनकी कमाई बंद. उधर अर्लसाब कम्पलेन करता है, शिपमेंट करो, नही तो बँक क्रेडिट नही देती है.''

''यह साला रोजका झंझट है'' बेग चिडून म्हणाला. ''लगता है केव्हिनसाब तो आज नही आएंगे. घरकी रातपाली शुरू होगी. चलो, हम खाना खाँके आएंगे''

केव्हिनने दांडी मारल्याचे आश्चर्य वाटले नव्हते. केव्हिनचे दोन आठवड्यापूर्वीच लग्न झाले होते. नवीन लग्न झाल्यावर घरची रात्रपाळी करायचे सोडून चारकोपच्या इंडस्ट्रियल एरियात रात्रपाळीला कोण येईल?

माझी सकाळची शिफ्ट होती. आज पहिल्यांदाच रात्रपाळी करायची वेळ आली होती.

संध्याकाळचे सात साडेसात वाजले होते. साकीनाक्यावरची वर्दळ कमी झाली होती. इंडस्ट्रियल एरियामधल्या फॅक्टऱ्यांजवळच्या टपऱ्यातून कंदील, बत्त्या लागायला सुरुवात झाली होती. रस्त्यावरच्या झोपडपट्ट्यात कामगारांच्या बायका रात्रीच्या जेवणाची तयारी करत होत्या. एकमेकांशी कचाकचा भांडत होत्या. लहान मुले टपरीतल्या किराणा विकणाऱ्या सिंध्याकडे उधारीवर तेल, मीठ, पीठ द्यायची विनवणी करत होती.

सात तारखेचा पगार आणि एकवीस तारखेच्या ॲडव्हान्सवर जगणारे हे कामगार. युनियन झाली, संप झाला तर खाणार काय? पण उद्या युनियन लीडरचे भाषण आणि

धमक्या झाल्यावर युनियन होणार, यात शंकाच नव्हती. कामगारांना किती फायदा होणार आणि युनियनच्या खिशात किती जाणार? अर्ल-साहेबांना दर महिन्याला आणखी एक पाकीट तयार ठेवावे लागणार होते.

''क्यूं लालाजी, आज आपको खुद आना पडा?'', बेगने समोरून येणाऱ्या पठाणाला विचारले.

''क्या करें भाईसाहब, लोग पैसे लेते है, लेकिन टाइमपर ब्याज नही देते. वो अँथनी कहां दिखाई नही देता?''

''लगता है अँथनी तो अपने गांव चला गया, लालाजी. दोन-तीन हप्तेसे कामपे नही आया'' बेगने सांगितले.

पठाण अँथनीला बरोबर शोधून काढेल, बेगने थोडे पुढे गेल्यावर सांगितले. याच पठाणाने मागच्या महिन्यात आमच्या एका माणसाचे दात पाडून त्याला हॉस्पिटलमधे पाठवले होते. दोन महिन्याचे व्याज चुकले म्हणून.

अंधार पडायला लागला तसा विहार लेक - साकीनाका रोड जागा व्हायला लागला होता. हातगाड्यांवरून शेंगा विकणारे, सँडविच विकणारे, आमलेट आणि बनपाव देऊन ''हाफ प्लेट'' करणारे, वडापाव, पावमिसळ, पावभाजी वाल्यांच्या रांगा लागल्या होत्या आणि त्यांची नेहमीची गिऱ्हाइकं घोळका करून ऑर्डर देत होती.

पहिल्या धारेची पावशेर घेऊन अर्धाशेराचा आव आणणारे बडबड करत तोल सांभाळत चालले होते. पान विकणारे, मालिश करणारे, रस्त्यावरच सतरंज्या अंथरून गॅसच्या बत्तीच्या प्रकाशात पत्त्याची पाने ठेवून पिंजऱ्यात रामपक्षी ठेवलेले भविष्य सांगणारे गिऱ्हाइकाची वाट बघत होते.

तोकडे कपडे घालून, चेहऱ्यावर पावडर फासून रस्त्यात उभे राहून गिऱ्हाइक बघणाऱ्या मुलींना हुसकावून लावत बेग मला आमच्या नेहमीच्या टपरीवर जेवायला घेऊन गेला. मी नको म्हणत होतो. पण तो ऐकणाऱ्यातला नव्हता. ''अर्विनसाब आप कितने दिन खाना-पिना छोड देंगे? अब आपकी माँ तो नही रही. आपकी ये हालत देखकर ऊनको अच्छा लगेगा क्या?

रस्त्यात ट्रॅफिक जॅम झाला होता. ढोलकीचा आवाज येत होता. पुढे एक प्रेतयात्रा चाललेली होती. दोन तीन जण दारू पिऊन ढोलकीच्या तालावर पुढे नाचत होते आणि मागे रडत जाणाऱ्या बायका.

''ये लोग खोपडी पीके मर जाते है, और उनके दोस्तलोग पिके नाचते है. खुदा जाने कब सीखेंगे'' बेग म्हणाला.

गेले दोन आठवडे मी फ्युनरल विसरायचा प्रयत्न करत होतो. पण त्यात हे.

''अर्विनसाब, निकालो आजके नंबर'' नेहमीच्या जेवणाच्या टपरीवर जाऊन बसल्यावर बेग, प्रल्हाद आणि इतर तिघे माझ्याभोवती घोळका करून म्हणाले.

शुक्रवार संध्याकाळ म्हणजे मुंबई मटक्याचा मोठा दिवस. डबल आकडा लागला तर रोजचे नऊपट न मिळता एक रुपयाचे एक्यांशी रुपये मिळणार.

''प्रल्हाद, मी मटका किंग नाही. आणि वरळीत बसलेल्या मटका किंगलाही आज आकडा काय येणार हे माहीत नसते. उगीच का पैसे वाया घालवता तुम्ही लोक?'' मी म्हणालो.

''ये क्या बोलनेकी बात हुई अरविंदसाब? आपका दिया नंबर तो आताही है'' बेग म्हणाला. ''निकालो आपकी जादुई पट्टी''.

मी खिशातून स्लाइड रुल काढला. मधली पट्टी मागे पुढे करून स्लाइड वाचल्यासारखे करून ४, ५, ८ असे आकडे सांगितले. मटक्याच्या नऊ आकड्यातला फक्त एक आकड्यापेक्षा तीन पैकी एक आकडा यायची शक्यता तिप्पट.

''थँक यू, अरविंद साब.'' प्रल्हाद म्हणाला. प्रल्हाद मराठी होता. बाकी केरळाइट्स म्हणायचे तसे तो मला अर्विन म्हणत नसे. धिप्पाड पहिलवानासारखा होता. पठाणी व्याजाने पैसे देऊन तो सावकारीपण करायचा. सगळ्या शॉप लेबरवर त्याचा दरारा होता.

परत फॅक्टरीत येईतो रात्रीचे दहा वाजले होते. आता केव्हिन नक्कीच येणार नव्हता. म्हणजे मला सकाळपर्यंत बसणे भाग होते. केबिनमधे बसून प्रॉडक्शन शीट्स चेक केल्या. सप्लायर्सची बिलं चेक करून सह्या केल्या. ड्रॉइंगवर शिक्के मारून सकाळच्या शिफ्टला येणाऱ्या ड्राफ्टस्मन वरळीकरसाठी ठेवून दिली. झोप यायला लागली होती म्हणून खाली शॉपमधे चक्कर मारली. नंतर परत वर येऊन डोके धरून आईचे शेवटचे

क्षण कसे गेले असावेत याचा पुन्हा एकदा विचार करत बसलो.

आईशी दर आठवड्याला फोन करून बोलायचो. हार्ट अटॅक येईपर्यंत तिने तब्येतीची तक्रार कधी केली नव्हती.

गेले महिनाभर मला नीट झोप लागत नव्हती. रात्री चमत्कारिक स्वप्नं पडत होती. अंधारे रस्ते, रिकामी घरं. बंद पडलेली दुकाने. एक दिवस स्वप्नात आई आली होती. लहान असताना चुलीजवळ बसून पोळ्या करणारी. पण या स्वप्नात ती श्राद्धाचे पिंड करून मला देत होती.

दुसऱ्या दिवशी सकाळी फोन आला. फोन आल्यावर लगेच निघालो. पण तोपर्यंत उशीर झाला होता.

एकदम किंचाळल्याचा आवाज आला.

''प्रेस बंद करो, प्रेस बंद करो'' कुणीतरी ओरडले आणि सगळे प्रेस बंद झाले. मी धावत मशीनकडे गेलो.

प्रेस ऑपरेटर करूणाकरन जोरजोरात ओरडत होता, त्याचे हात रक्तबंबाळ झाले होते. प्रेसबेडवर रक्ताचा सडा पडला होता आणि तुटलेल्या बोटांची पेरं. स्टील प्लेट कट करणाऱ्या प्रेसने त्याची चार बोटे क्लीन कट केली होती.

''अरे इसको दवाखाना ले चलो'' म्हणत दुसऱ्या ऑपरेटरने त्याच्या हाताला कापड गुंडाळले आणि कुणीतरी बोलावलेल्या टॅक्सीत घातले आणि अंधेरीच्या हॉस्पिटलला घेऊन गेले.

प्रॉडक्शनचा स्पीड वाढवण्यासाठी प्रेसचे सेफ्टी इंटरलॉक कुणीतरी डिसेबल केले होते. ऑपरेटरने हात मागे करायच्या आधीच प्रेसचा पिस्टन खाली आला असणार. मी बेगकडे बघितले. त्याने माझी नजर टाळली.

वर जाऊन मी फॅक्टरी इन्स्पेक्टरला फोन लावला.

''मी लगेच येतो,'' तो म्हणाला, ''पोलिस रिपोर्टचे नंतर बघू''

दुसरा फोन अर्ल-साहेबांना.

"What do you want at this hour, Irwin" अर्लसाहेबांनी चिडून विचारले. मी सगळा वृत्तान्त दिल्यावर आणि फॅक्टरी इंस्पेक्टरचा निरोप ऐकल्यावर ते शांत झाले. "Good job, Irwin. Just another day in a factory owner's life" म्हणून त्यांनी फोन बंद केला. सोमवारी त्यांना बँकेतून पैशाचे पाकीट नाही पुडकेच आणावे लागणार होते.

सकाळी फॅक्टरी इन्स्पेक्टर आल्यावर त्याने जुजबी चौकशी केली. ''ऑपरेटर एरर'' असा रिपोर्ट लिहिला आणि पोलिस बोलावले. पंचनामा करून झाल्यावर प्रेस पुन्हा सुरू झाली.

हे सगळं संपेतो दुपार होऊन गेली होती, माझी नेहमीची आठ तासाची शिफ्ट रात्रपाळी धरून चोवीस तासाची झाली होती. आज संध्याकाळी मदनच्या लग्नाच्या रिसेप्शनला जायचे होते. ते राहून गेले. त्याच्या नव्या मेव्हणीशी तो ओळख करून देणार होता. गोवनीज ख्रिश्चन होते ते लोक. मी आईला काही सांगितले नव्हते. आणि आता काही फरक पडणार नव्हता.

टॅक्सी करून मी अंधेरी स्टेशनवर आलो. विरार फास्ट लोकल जवळ जवळ रिकामीच झाली होती. खिडकीजवळ जागा मिळाली. आणि नंतर मला झोप लगली. ती त्या भय्याने हलवून उठवेपर्यंत.

स्टेशनच्या बाहेर एकच टॅक्सी होती. गोरेगांव म्हटल्यावर तो तयार झाला. पण ''स्टेशनपेही छोडूंगा, गोरेगांवके गलीगुडीमे नही जाऊंगा'', तो गुरकावला. एका भैय्याने जागे करून वाचवले होते. पण हा दुसरा बाळासाहेबांना शिवसेनेची गरज का वाटली, याची आठवण करून देत होता.

टॅक्सीवाल्याने गोरेगांव स्टेशनवर सोडल्यावर मी रोजची वाट धरली. टोपीवाला टॉकीज ते सिद्धार्थनगर. दोन तीन पानवाले आणि सँडविचवाले याशिवाय कोणीही दिसत नव्हते. रात्री दोन वाजता कोण उघडे असणार? चटणी सँडविच आणि पान खाऊन मी घरची वाट धरली.

सगळीकडे शुकशुकाट होता. विवेकानंद रोडवर तुरळक ट्रॅफिक होती. चोवीस तासात सलग तीन शिफ्ट झाल्याने, कधी फ्लॅटवर जाऊन झोपतो असे झाले होते.

जिन्यात अंधार होता पण चार जिने सवयीचे होते. जिन्यातल्या दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात मी कुलूप उघडले. फ्लॅट एकदम गार पडला होता. बहुतेक बाल्कनीच्या खिडक्या उघड्या राहिल्या होत्या.

ट्यूब लावली. ब्रीफकेस आणि किल्ल्या टेबलावर ठेवल्या. मघाशी पानवाल्याने बांधून दिलेले पान लिबलिबीत व्हायला लागले होते. गुंडाळलेला कागद खाली फेकून मी ते तोंडात टाकले. गेले अठरा तास उभाच होतो त्यामुळे खुर्चीवर

बसल्यावर बरे वाटले. सिगरेट ओढावी म्हणून पाकीट उघडले तर त्यात दोनच उरल्या होत्या.

आत्ता एक ओढली तर उद्या सकाळी एक कमी पडणार. पानवाल्याकडून आणखी एक पाकीट विकत घ्यायला हवे होते. Would have, could have, should have, must have. Life was turning out to be a string of regrets.

नोकरी लागून दोन वर्षे झाली होती. प्रमोशनही मिळाले होते. पगारवाढ चांगली झाली होती. पण सगळे दिवस आजच्यासारखेच असणार असे दिसत होते. मुंबईत काय किंवा गावाकडे काय?

''आपल्या नगरला पण आहे,'' आई आठवण करून द्यायची. ''तेथेच फॅक्टरी काढ. व्हिडीओकॉनने काढलीच की.''

''हे असेच चालायचे'' फॅक्टरीचे रोजचे प्रॉब्लेम्स् सांगितल्यावर ती म्हणायची. ''पण निदान माझ्याजवळ तरी राहशील. नगरचीच एखादी मुलगी बघ. आपली ज्योति आहे. छाया आहे.'' ती स्वप्नं बघायची. ''मुंबईच्या मुलींच्या भानगडीत पडू नकोस. त्यांची आणि आपली काय बरोबरी आहे का? कुठे जाऊ नकोस.''

''अजून एक-दोन वर्षांचा अनुभव मिळाल्यावर नगरच्या फॅक्टरीचे बघू.'' मी लांबण लावायचो.

पॉवर शेडिंग. लेबर युनियन्स. संप. मुंबई बंद. फॅक्टरी इन्स्पेक्टर्स. पैशाची पाकिटं. बँक ऑफिसर. बँक क्रेडिट. कटकट करणारे टॅक्सीवाले. पठाण, पठाणी व्याज, हॉस्पिटलमधे पाठवणारी पठाणी वसुली. बोटे तुटली? Just another day झोपडपट्ट्या. रस्त्यावरच मुलांना, बायकांना लाथा मारणारे, दोन आठवड्याचा पगार एका दिवसात हातभट्टी आणि मुंबई मटक्यावर उडवणारे बाप. शाळेत जायच्याऐवजी रात्री अंधारात गिऱ्हाइकं बघणाऱ्या मुली.

जिन्हें नाज है हिन्द पर, वो कहाँ है, कहाँ है, कहाँ है?

दाराखालच्या फटीतून जिन्यातल्या दिव्याची तिरीप येत होती. त्या प्रकाशात मला पोस्टमनने फ्लोअरवर सारलेली आजची पाकिटं दिसली. त्यांच्यावर पाय ठेवून आत आलो होतो तरी लक्षात आले नव्हते. लहानपणी नगरच्या घरात जाताना दाराखाली अंधारात पायाला काहीतरी मऊमऊ लागले होते. दुसऱ्या दिवशी तेथे मोठा साप निघाला होता.

मेलमधे एक जाड पाकीट दिसल्यावर मी लगेच उठलो. घाईघाईने उघडून बघितले. बरेच दिवस वाट बघत होतो तेच होते.

“Congratulations! We are pleased to inform you that you are accepted in our Graduate Program in Structural Dynamics.”

मला थंडी भरून आली.

बाल्कनीची खिडकी बंद करायला उठलो. पण खिडक्यांची दारे तर बंदच होती. बाहेर खाली शास्त्रीनगरची रांगेने बांधलेली एकमजली घरे पसरलेली होती. लांब लोकलचा धडधडाट ऐकू येत होता. सांताक्रूझहून निघालेल्या विमानाचे लाल दिवे वर आकाशात चमकत होते. लंडन? पॅरिस? सिॲटल?

आज एवढी थंडी कशी? फ्लॅटमधे एवढी थंडी डिसेंबर-जानेवारीतही कधी वाजली नव्हती. आज बहुतेक स्वेटर घालून झोपावे लागणार होते. सँडविच खायच्या आधी हात धुवायला मी सिंककडे वळलो.

अंधारात काहीतरी हलल्याचा भास झाला.

आई खुर्चीवर बसली होती.

''किती उशीर करायचा रे, बाळा? कालपासून वाट बघतेय मी तुझी.'' ती म्हणाली.



प्रीतिगाथा

सांज सावळी येई गोकुळीं, मधुर मुरली वाजवी कान्हा
सूर वेणुचे ऐकता ऐकता तहानभूक विसरे राधा

सूर बासरीचे मंतरलेले, छेडितो श्याम भोळा साधा
यमुनेतीरी उठती तरंग, सुरांसवे डोले वेडी राधा

कान्हा कान्हा साद घालते, सावळ्याची झाली बाधा
हरिविना त्या चैन पडेना, मनी हुंदके देई राधा

जीवाशिवाचे जडले नाते, अनोखी ही प्रीतिगाथा
''राधा राधा'' करी बासरी अन कृष्णनामात रंगते राधा

अश्विनी क्षीरसागर (सिॲटल)

घर

मंजिरी खारकर
रेडमंड, वॉशिंग्टन

किल्लीने दार उघडून सुगंधा घरात आली. आज बाजारहाट करून बाकी कामं आटपून घरी यायला उशीरच झाला होता तसा. पाण्याचा ग्लास घेऊन हाश-हुश करत ती सोफ्यावर टेकली. समाधानाने तिने एकदा घरावर चौफेर नजर फिरवली. एक आनंद तिच्या मनात झिरपत गेला. माझे घर, आमचे घर! आमच्या स्वप्नातले हे घर!

१० एक मिनिटं घराकडे मनसोक्त नजर फिरवल्यावर ती उठून मागीलदारी गेली. मागचं अंगण, झाडं, तिथे असलेला झोपाळा - सगळं बघून तिच्या मनातून एक आनंदाची लहर उमटून गेली. हे घर म्हणजे तिच्या सुखाची परमावधी होती.

खालचा मजला न्याहाळून झाल्यावर ती वरती गेली. मास्टर बेडरूममध्ये चक्कर मारून ती बाजूच्या स्पेशल बेडरूममध्ये गेली, बाळाची खोली! खोली कशी सजवायची, काय-काय घ्यायचं, कसं-कुठे ठेवायचं मनातल्या मनात ठरवत ती खोलीत फिरत राहिली.

आणि मग एकदम भानावर येऊन ती स्वतःशीच पुटपुटली... चला कामाला लागायला हवं. काय अवतार करून ठेवलाय माझ्या या घराचा. लगोलग तिने स्वयंपाकघर आवरायला घेतले. पडलेली भांडी घासून टाकून तिने ओटा, टेबल सगळं स्वच्छ करून घेतलं. आणि मग झाडू घेऊन सगळं घर झाडून काढलं. एवढं सगळं झाल्यावर ती थकून गेली. ''लवकरच कोणीतरी मदतनीस बघावी लागेल. हे काही रोज-रोज जमणाऱ्यातलं काम नाही. थकवणारं आहे पण हे घर साफ करताना मिळणारा आनंद, स्वच्छ झालेलं घर बघणं हे सुखावून टाकणारं, थकवा पळवून लावणारं आहे हे देखील खरं.'', ती मनाशी विचार करत होती.

एक कप कॉफी करून घेत सुगंधा परत एकदा सोफ्यावर टेकली. बाजूच्या टीपॉयवर कॉफीचा मग ठेवून शांतपणे ती परत एकदा घराकडे नजर फिरवत बसून राहिली, अधून मधून कॉफीचे घुटके घेत! दुपार टळून गेली होती. एकाएकी भानावर येत तिच्या लक्षात आलं, आता निघावं लागेल. वेळ झालीच की! घाईघाईने पर्स उचलून ती बाहेर पडली. दार लावून किल्ली परत किल्ली बॉक्समध्ये ठेवून ती गडबडीने गेली..

....

''ह्या शांताचं हल्ली काय चाललंय काही कळत नाही. एक वस्तू हल्ली नीट जागेवर ठेवत नाही. आत्तापर्यंत तर सगळं ठीक होतं, आत्ताच काय बिनसलंय कोण जाणे!'' स्नेहा उरलेलं जेवण फ्रीजमध्ये टाकताना निलेशशी बोलत होती.

''जाऊ देत गं, एखादं वेळी होतं कमी-जास्त... त्याचा कशाला एवढा त्रास करून घ्यायचा? तू म्हणत होतीस ना, तिला अलिकडे तिच्या गावाकडच्या म्हाताऱ्या आईच्या तब्येतीची काळजी लागून राहिली आहे. त्यामुळे थोडं पुढे-

मागे होत असेल कामात. बरं ते जाऊ देत..... काय छान थंडी पडली आहे, बाहेर झोपाळ्यावर बसू चल थोडा वेळ'' निलेश म्हणाला.

''हो आईला बरं नाही, तिला भेटायला जायचंय असं म्हणत होती खरं शांता'', बोलता बोलता स्नेहा बाहेर अंगणाकडे वळली.

शांता त्यांच्याकडे गेली ५-६ वर्षं मदतीला येत होती. स्नेहाच्या आईकडे अनेक वर्षं येणारी शांता, स्नेहाचं लग्न झालं आणि ती आणि निलेश इथे लांबवर रहायला आले तसे स्नेहाच्या आईच्या सांगण्याखातर एवढ्या लांब स्नेहाकडेही कामाला यायला लागली. खरं तर या इतक्या लांबवर असलेल्या त्यांच्या घरी यायला तिला दोन-दोन बसेस बदलून यावं लागायचं. पण स्नेहाकरीता म्हणून ती येत होती.. तशी तिने मग या बाजूलाच २-४ अजून कामं घेतली होती. फक्त शनिवार-रविवारी मात्र फार बसेस या बाजूला यायच्या नाहीत. त्यामुळे शनिवार-रविवारी मात्र जमणार नाही हे तिने आधीच सांगितलं होतं आणि ते स्नेहालाही चालणारं होतं. इतर पाच दिवस ती घर आवरून, झाड-लोट करून जातच होती. दोन दिवस न आल्यानी तेवढं काही अडायचं नाही.

इतक्या वर्षांची ओळख आणि अगदी प्रामाणिकपणे काम करणारी, उगीच सुट्ट्या न घेणाऱ्या शांतामुळे स्नेहाला निर्धास्त वाटायचं. ते दोघं दुपारी ऑफिसमध्ये असताना शांता येऊन तिचं काम करून जायची. त्यामुळे स्नेहाला ती देखील काळजी नव्हती. नाहीतर यांच्या वेळात येणारं कोण इथे मिळणार? आणि स्वतः घरात नसताना आपलं घर दुसऱ्याच्या हाती देता यावं इतकी विश्वासू बाई कुठून मिळणार होती स्नेहाला?

....

''सुगंधा, होतीस तरी कुठे दुपारी आज? फोन केला तर घेतला नाहीस.'' रात्री जेवताना सुयशने विचारले.

''अरे, जरा घर आवरत होते. काय तो पसारा, मला बघवत नाही'', सुगंधा उत्तरली. आता यावर अधिक काही बोललं तर गाडी आपल्या अजागळपणाकडे वळेल, याची सुयशला खात्री होती. त्यामुळे हं असं म्हणत त्याने पुढे बोलायला सुरुवात केली.

ऑफिसमधल्या गोष्टी, मग तिला गोळ्या नीट घेतल्या का याची चौकशी, ती करताना तिला त्रास तर होणार नाही पण खातरजमा तर करून घ्यायची त्याची धडपड - पण तिचं धड लक्ष कुठे होतं! हे हल्ली नेहमीचंच झालं होतं. घरी बसल्यापासून सुगंधा बाळ या विषयामध्ये जास्तच बुडून गेली होती. आधीच बाळाचं दडपण आणि आता घराचं. मिळू देत बुवा लवकर मनाजोगतं घर. एक चिंता तर दूर होईल. दुसरी परिस्थिती आपल्या हातात नाही तशीही.

सुगंधा आणि सुयश! दोघांमध्ये तिसऱ्याला आणण्याच्या दोघांच्या अथक प्रयत्नांना दोन वर्ष झाली तरी यश हुलकावणी देत होतं. यामुळे दोघंही उदास-निराश होते. दोनदा चांगली बातमी हाती लागली नाही तर लगेच होत्याचं नव्हतं होऊन गेलेलं याने तर सुगंधा आणखीनच खचून गेली होती. दोघांमध्ये काही दोष नाही, काही वेळेला असं होतं. आणि दबाव, ताण, मानसिक औदासिन्य यामुळे ही गोष्ट आणखी कठीण होऊन बसते. असे डॉक्टरांनी सांगितले होते. दोघांना त्यांच्या रोजच्या धकाधकीच्या जीवनामधून, नोकऱ्यांमधून कुठेतरी महिना-दोन महिने जाता आलं तर पहा, असंही डॉक्टरने सुचवून बघितलं होतं. आणि एकंदरीत विचार करून सुगंधाने खरोखरच ऑफिसमधून सहा महिन्यांची सुट्टी मिळवली होती. रोजची धावपळ आणि ताण-तणाव तरी नकोत.

पण घरी बसल्यापासून सुगंधाला नवीनच चाळा लागलेला - बाळाची रूम सजवणे! दिवसा सुयश ऑफिसकरिता बाहेर पडला की मॉलमध्ये जाणे, दुकानांमध्ये बेबी सेक्शनमध्ये जाऊन निरनिराळ्या वस्तू बघत बसणे, बाळाकरिता कपडे बघत बसणे ह्यात तिला विलक्षण आनंद मिळू लागला होता. अर्थात सुयश घरी यायच्या आधी घरी पोहोचून तसा फार काही सुयशला कल्पना नसली तरी संध्याकाळी सुयशशी बोलताना तिचं -बाळाकरिता हे करणार - ते करणार, बाळाच्या खोलीची तिने चालवलेली सजावट, खोलीत आणून लावलेली नवीन कार्टून्स-चित्रं हे सारं त्याला अस्वस्थ करत होतं. बाळाचा अजून पत्ता नाही आणि सुगंधाचं जणू आता काही महिन्यांत बाळ येणारच, असं चाललेलं वागणं त्याला चिंतेत टाकत होतं. डॉक्टरांशी या विषयावर बोललं पाहिजे हे त्याने ठरवलं.

....

''निलेश, काय नवीन अपडेटस घराचे?'', ''गेला होतास का आज साईटवर?'', जेवून उठताना स्नेहाने विचारले.

''हो, अजून दोन महिने तर नक्की. इलेक्ट्रिकल काम व्हायचंय सगळं, फरशा, रंग आणि अजून छोट्या- मोठ्या गोष्टी आहेतच.''

''कधी एकदा घर पूर्ण होतंय आणि कधी आपण जातोय असं झालंय मला. ह्या घरापेक्षा छोटं असलं तरी नवीन घर ऑफिसच्या जवळ म्हणजे बराच वेळ वाचेल जाण्या-येण्यातला. हे घर मात्र वेळच्या वेळी नीट विकलं गेलं म्हणजे झालं.'', किचन आवरता आवरता स्न्हेहा उद्‌गारली.

''छे बुवा! बघ बरं. एक भांडं जागेवर सापडेल तर शप्पथ'', एकदम आवाज चढवत स्नेहा म्हणाली, ''सकाळी ऑफिसला जायच्या घाईत पण तोच गोंधळ. सगळे कपडे जागा सोडून कुठेतरी ठेवलेले. शांताचं काही कळेना झालंय. आता तो बघ, तू कॉफी मग तिथे कॉफी टेबलवरच टाकून गेलास सकाळी, तो पण उचलला नाहीये.''

''अरे हो, तिच्या आईचं कसं आहे ते विचारायला फोन करायचा राहूनच जातोय माझा. उद्या नक्की करते'', एकाएकी आठवण झाल्याने ती जरा नरमाईच्या सुरात म्हणाली.

....

अचानक सुयशने ठरवले की बस्स, ही जागाच बदलायची. तसंही घर घ्यायला हवं, भाड्याच्या घरात किती काळ राहणार असं दोघांच्या मनात होतंच. छान नवीन, मोठ्या घरात गेल्यावर सुगंधा पण थोडी खुष होईल. जरा बदल होईल, बाळ या विषयापासून थोडी फारकत होईल. तसंही गावाबाहेर, शांततेत आपला एक टुमदार बंगला असावा, असं स्वप्न सुगंधा आणि सुयश मनाशी बाळगून होते. सुयशने विचार केला, स्वतःच्या हक्काचं घर आता या निमित्ताने घेऊ.

मनात आल्यावर बाकीचे सगळे तपशील बघा, आपलं बजेट, किती लोन मिळेल, त्याची बँकेकडून पूर्व मान्यता घ्या, मग हे असं मनासारखं घर कुठे मिळेल, सगळ्या सोयी, ऑफिस- बाजार बऱ्यापैकी अंतरावर असेल पण तरीही आपल्याला हवं अशा शांत, निसर्गरम्य परिसरात असेल अशा सगळ्या अटींत बसणारं, आखूडशिंगी-बहुगुणी घर शोधणं म्हणजे सोप्पं काम नव्हतं. पण चांगला एजंट मिळाल्याने काम थोडं सुकर झालं होतं.

एजंटच्या मदतीने तीन-चार घरं पाहून झाली पण मनासारखं, स्वप्नातलं घर अजून सापडलं नव्हतं त्यांना. आणि एक दिवस एजंट त्यांना घेऊन गेला ते घर बघताक्षणी दोघं हरखून गेली. अगदी त्यांच्या मनातल्यासारखं घर. सुगंधा तर हरखूनच गेली. पुढील-मागील दारी असलेलं सुंदर अंगण, झाडं, मागच्या दारी झोपाळा. व्वा! बघताक्षणी सुगंधाच्या मनाने ग्वाही दिली की ह्या घरात आपली मनोकामना नक्की पूर्ण होणार. बाळाचं स्वागत करायचं ते या घरात हे तिने मनोमन ठरवून टाकलं.

''सुयश, हेच घर हवं आपल्याला. हेच ते माझ्या मनातलं/ स्वप्नातलं घर!'' असं म्हणत ती वर-खाली, मागील दारी, पुढील दारी हरखून फिरत राहिली.

''या घराचे मालक-मालकीण, त्यांना हे गावाबाहेर राहणं नको आहे. शहरात मध्यवर्ती भागात त्यांनी हाय-राईझ मध्ये फ्लॅट बुक केलाय. अजून दोनेक महिन्यांनी त्यांना त्याचं पझेशन मिळणार आहे. तोपर्यंत हे त्यांना विकायचं आहे. थोडा वेळ हाताशी असल्याने त्यांना घाई नाहीये. चांगली किंमत मिळणार असेल तर ते थोडं थांबायला तयार आहेत.'' एजंट एकीकडे माहिती देत होता.

''घर मार्केटमध्ये येऊन ४ दिवस नाही झालेत तर १०-१२ जणं हे घर बघून गेले आहेत. आणि निदान ३-४ पार्टीजना तरी घरात खूप स्वारस्य आहे, असं कळलं आहे. त्यामुळे, साहेब, तुम्हाला आवडलं असेल तर किंमतीत आणखी थोडं वर जायची तयारी ठेवा.'', तो पुढे म्हणाला.

खरं तर घर आधीच त्यांनी ठरवलेल्या बजेटच्या बाहेरच होते. पण सुगंधाकडे बघून सुयशने ठरवले की जमवायचं काहीही करून, थोडं जास्ती असलं तरी. लोन जास्त घेऊ, शिवाय आई-बाबा पण म्हणाले होतेच की थोडी मदत करतील. त्यांनाही विचारता येईल, त्याने विचार केला.

पुढल्या आठवड्याभरात त्याने जास्तीचे लोन मिळवणे वगैरे कामं पार पाडून त्यांनी घरावर थोडी चढीच ऑफर दिली. आता पुढे आठ- दहा दिवस वाट पाहणे आले.

पण घर बघितल्यापासून सुगंधाकडे मात्र बोलायला दुसरा विषयच नव्हता. घर आणि घर. बस्स!

....

''आज तर आता हद्द झाली शांताची. आज बुधवार, तिला चांगलंच माहिती आहे मला बुधवारी माझे फॉर्मल्स नीट,

कडक इस्त्री करून हँगरवर लावून ठेवलेले लागतात, बोर्ड मीटिंगसाठी. कित्येक महिने प्रत्येक आठवड्यात न चुकता करतेय हे शांता. आता काल कशी विसरली देव जाणे! तू सकाळी लवकर निघून गेलास... माझी किती गडबड झाली माहिती आहे? शांतानी फॉर्मल्स तयार ठेवले नव्हते तर...कसेबसे बरे कपडे मिळवले, इस्त्री करायला वेळच नव्हता... टॅक्सी बुक करायला फोन केला तर ह्या भागात तुला माहितीच आहे टॅक्सी यायला किती वेळ लागतो ते... नशिबानेच जेमतेम पोहोचले मीटिंगला. दुपारी शांताला फोन केला मी, तर फोनच लागेना. Out of Range मेसेज येत होता.'', स्नेहाचा त्रागा चालू होता निलेशकडे. आज नेमकी त्याची सकाळी लवकर मीटिंग असल्याने तो गाडी घेऊन गेला आणि स्नेहा टॅक्सीने जाणार असं ठरलं होतं...पण आता शांतानी तिचे फॉर्मल कपडे नीट इस्त्री करून ठेवले नाही, याची चीड-चीड आपल्यावर निघणार, हे वास्तव त्याला कळून चुकले होतं. त्यामुळे घाईघाईने विषय बदलत तो म्हणाला, ''आता शहरात मध्यवर्ती राहायला गेलो की हे टॅक्सीचे गोंधळ आणि लागणारा वेळ सगळेच प्रॉब्लेम्स निस्तरतील बघ...थोडाच काळ धीर धर आता!'', त्याने समजावले.

''हं खरं आहे तुझं म्हणणं. बरं, बायिंग पार्टीचे काय अपडेटस?''

''अगं एवढ्या इंटरेस्टेड पार्टीजमधून चांगली भरवशाची पार्टी निवडली आहे आपण. त्यामुळे लोन वगैरे नक्की सँक्शन होणार. काही अडचण येणार नाही. हा थोडा वेळ लागेल कारण हल्ली लोनची प्रोसेस जरा धीमीच चालते. पण एक-दीड महिन्यात होईल सगळं''

....

''अगं आज पण तुला फोन करत होतो, ऑफिसमधून निघण्याच्या आधी. रात्री मस्त त्या नविन इटालिअन रेस्टॉरंटला जायचं का, हे विचारायला. पण तू फोनच घेतला नाहीस. तू हल्ली गेले काही दिवस माझे फोनच घेत नाहीस'', सुयश तक्रारीच्या सूरात म्हणाला.

'' हं! ऐक ना, मी किनई, आपल्या घरी पुढील दारी मस्त पारिजातक लावणार आहे. रोज सकाळी त्या फुलांचा पडलेला सडा मी उचलणार. मागील दारी मी मधुमालती आणि बोगनविलीयाच्या वेली चढवणार आहे. कोणी माळीबुवा मिळाले तर बरं. बाळाला सांभाळून, ऑफिस-घर सगळं सांभाळून एवढी बाग नीट राखणं आपल्याला कसं जमणार? आणि मी सामान काय-काय कुठे लावायचं ते पण ठरवून टाकलंय. बाळाची खोली पण ठरवली मी.'' सुयशच्या बोलण्याकडे लक्षच नसल्यासारखंआपल्यात तंद्रीत सुगंधा सुयशला सांगत राहिली.

''बाळाला खेळायला आजूबाजूला किती मस्त जागा आहे. झोपाळ्यावर बसून मी बाळाला जेवू घालेन, काऊ-चिऊच्या गोष्टी सांगत आणि काऊ-चिऊ दाखवत!'', सुगंधा परत एकदा स्वप्नात हरवून गेली.

''घराचं नाव पण कसं मस्त आहे ना, मांगल्य-सदन! सगळं कसं मंगल होणार बघ आपलं तिथे.'', तिच्या मनाने हे ठरवून टाकलेलं.

सुयश घरी आला की सुगंधाकडे हल्ली बोलायला दुसरा विषय नसायचा.

''अगं हो जरा दमानं तर घे. अजून आपली ऑफर ते स्वीकारतात की नाही हेही माहिती नाही.'', सुयश उद्गारला. ''अजून ३-४ पार्टीज आहेत ऑफर्स दिलेल्या, माहिती आहे ना? आणि हे घर नाही मिळालं तर मिळेल दुसरं, आज ना उद्या!'', सुगंधाला समजावण्याच्या निमित्ताने सुयश स्वतःला पण समजावत होता.

....

''निलेश, निलेश...'', ऑफिसमध्ये आलेल्या फोनवर घाबरलेल्या स्नेहाचा आवाज ऐकून निलेशही धसकला. ''काय गं, काय झालं तरी काय, त्याने घाबरून विचारले.

''अरे निलेश, शांता तर गावाला गेलीय'', स्नेहा भेदरलेल्या स्वरात उत्तरली.

''ओह! आईला फार बरं नाहीये का तिच्या?'', त्याने विचारले.

''अरे आईला बरं नाही म्हणूनच गेलीय ती गावाला .पण आठ दिवसांपूर्वीच!''

''अगं आजारी आहेत ना, होतील बऱ्या. आता शांता गेलेय तर होईल सगळं ठीक.'' तो समजावत म्हणाला.

''निलेश, अरे मी काय म्हणतेय? शांताशी बोलावे, तिची आई कशी आहे हे विचारावे म्हणून तिला फोन केला तेव्हा कळलं की आईची तब्येत एकाएकी खालावली म्हणून

ती ८ दिवसांपूर्वीच गावाला गेलीय. मला फोनवर मेसेज ठेवलेला म्हणाली. मी कसा बघितला नाही, कोण जाणे. पण...पण...मग गेले आठ दिवस रोज आपल्या घरातली आवरा-आवरी, झाडू- भांडी कोण करतंय?'', स्नेहाचा आवाज पारच खाली गेला होता.

स्नेहा काय म्हणते आहे, त्याचा काय अर्थ आहे, हे समजायला निलेशला जरा वेळच लागला. आणि तिला काय म्हणायचेय ते समजल्यावर त्याच्याही चेहऱ्याचा रंग उडाला.

....

''अगं सुगंधा होतीस तरी कुठे आज दुपारी?'', सुयशने घरी आल्या-आल्या सुगंधाला विचारलं, ''आज पण दुपारी ३-४ वेळा फोन केला होता पण तू फोनच घेत नाहीस.'' ''गेले काही दिवस बघतोय, मी ऑफिसमधून दिवसा कधीही फोन केला की तू उचलत नाहीस. काळजी वाटते, फोन घेत जा ना माझे!''

''अरे जरा आवरा- आवर करत होते आपल्या घराची'', सुगंधाने उत्तर दिले, ''काय झालं इतकं. एवढे वेळा फोन करायला?''

प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पाहात तो म्हणाला,''अगं आपल्या एजंटचा फोन आलेला. एक चांगलं घर मार्केटवर आलं आहे. तर आज बघायला जायचं का विचारायला फोन आलेला त्याचा. घर चांगलं आहे अगदी आपल्याला आधी आवडलेल्या त्या घराइतकं प्रशस्त नसलं तरी आपल्या बऱ्याच अटी पूर्ण होतील असं म्हणतोय तो. फक्त या लोकांना विकण्याची जरा घाई आहे. घर विकून चंबू-गबाळं बांधून त्यांना परदेशात जायचंय राहायला. त्यामुळे आपण घाई केली तर मिळण्याची शक्यता आहे, तो म्हणत होता. म्हणून संध्याकाळी तुला तयार राहायला सांगायला, घर बघायला जायला सांगण्याकरिता तुला इतका घाई-घाईने फोन करत होतो.''

''काही नको, आपल्याला एवढं छान घर मिळालंय. आता कशाला दुसरं बघायचंय. मी तर आपलं नवीन घर सजवायला पण सुरुवात करतेय.'', सुगंधा सहजपणे म्हणाली.

चक्रावून सुयश पाहतच राहिला.

''किती एंजॉय करते मी आपलं नवीन घर आवरणं. शी! ती लोकं काय अवतार करून ठेवतात घराचा. आपण राहायला गेलं की मला आपलं घर पसरलेलं, घाण झालेलं मुळीच नको आहे हं. हा आता बाळाचा पसारा, त्याची खेळणी हे सगळं निराळं हा...ते चालेल...'', सुगंधा परत स्वतःतच रममाण होत बडबडत होती.

''काय बोलतेयंस तू सुगंधा हे? कुठल्या घराचा, कोण अवतार करून ठेवतं? कुठलं घर आवरून ठेवल्याच्या गोष्टी करतेयंस तू?'', सुयशने चक्रावून विचारले.

''अरे, मांगल्य-सदन. आपलं नविन घर! आपलंच ते आता. मग आपणच आवरून ठेवलं नाही तर कसं चालेल?''' सुगंधा अजूनही तंद्रीतच बोलत होती.

''सुगंधा, सुगंधा! अगं काय बोलतेयंस? त्या घरावर आपण ऑफर दिलेली, पण आठवडाभरापूर्वीच आपल्याला कळलंय ना की आपली ऑफर न स्वीकारता त्यांनी दुसरी ऑफर घेतली आहे. ते घर आपलं नाहीये. आपल्याला ते मिळालं नाहीये. आपण तिथे राहायला जाणार नाही आहोत आणि तुला हे माहिती आहे. मग हे काय बोलतेयंस? तू मांगल्य-सदन मध्ये जातेस? त्या घरात आवरा-आवरी करतेस? कधी? दुपारी? मी ऑफिसमध्ये असताना? अगं काय बोलतेस काय तू हे? मी हल्ली दुपारी फोन करतो तेव्हा तू घेत नाहीस. विचारलं की धड सांगत नाहीस.'', सुयशला काय बोलावं हे कळेना झालेलं. सुगंधा म्हणते ते खरं असेल तर त्या घराचं घेतलेलं नवीन ऑब्सेशन, असं दिवसा-ढवळ्या दुसऱ्यांच्या घरात शिरणं - सारं फारच घाबरवून टाकणारं होतं. ''अगं खरंच का त्या घरात जातेस तू? पण शिरतेस तरी कशी त्या घरात? घरात कोणी असतं की नाही? अगं चोर म्हणून पकडून तुला पोलिसात देतील ना....काय करतेस तरी काय हे?'', सुयशने काही न सुचून एकापुढे एक प्रश्नांची सरबत्तीच लावली.

''अरे, त्यात काय, आपलंच तर घर आहे! एजंटने नाही का घराच्या एका बाजूला असलेल्या की-बॉक्स मधून किल्ली काढलेली, मी तेव्हा कोड नीट बघून ठेवलेला! आपलंच तर घर आहे ना ते आता! फक्त आपलं!'' ''अरे हो, आपल्या घरचा झोका कुरकुरत होता काल. ऑईलिंग केलंय. आता बघ कसा न कुरकुरता उंच जाईल झोका तो!''

चमत्कार

नीला सहस्त्रबुध्दे
सिॲटल

आज सगळे अन्विच्या लग्नाच्या निमित्ताने एकत्र जमले होते. खूप मजा, मस्करी, चिडवा-चिडवी सुरू होती. मोठ्या मुलीच्या सुवर्णाच्या सासरचेही सगळे आले होते. ती मंडळी खूप हौशी होती. हे लग्न होतं ते हैद्राबादला. कारण अन्विच्या सासरचे सगळे हैद्राबादचे होते. सगळे नातेवाईक, मित्रमंडळी सगळेच आले होते. काही जवळची ठिकाणं बघून येत होते, भटकत होते. मोठ्ठा हॉल, मिठाई, डेकोरेशन बघून सगळे खुष होत होते. सुवर्णाचा अनय पण बागडत होता. मग शुभांगी मध्येच गंभीर का होत होती? ती घटना अजूनही विसरू शकत नव्हती, आणि विसरणार तरी कशी?

शुभांगीला आठवत होतं, सगळ्या माहेरच्यांचं चार धाम यात्रेला जायचं ठरत होतं. पुण्याहून सगळे ग्रुपबरोबर निघणार होते. तिचे आई-बाबा, आत्या-आत्याचे यजमान, काका-काकू आणि काकूची बहिण असे सात जण. सगळी तयारी झाली. सगळे शुभांगीकडे जमले. बरोबर न्यायचा खाऊ तयार झाला, बॅगा भरून झाल्या. थंडीसाठी कपडे बरोबर घेतले. सुवर्णा, जावई, अनयही आले होते. आईने अनयला एक सोन्याची साखळी दिली पणतु म्हणून आणि दुसरी दिली अन्विला. म्हणाली ''ही तुला. माझी आठवण!'' ''ए आजी तू यायचं आहेस लग्नाला.. ताईच्या होतीस तशी!''. शुभांगीला मनात चर्र झालं. पण आजी नातीला कधीही काहीही देऊ शकते.

अधून मधून बातम्या येत होत्या उत्तराखंडाच्या. केदारनाथच्या आजूबाजूच्या डोंगरांवर हिमस्खलन सुरू झालं आहे. मंदिराच्या मागच्या टेकड्यांवरून बर्फ वेगाने खाली येतो आहे. तिथले चोरबारी ग्लेशियर पाणलोट क्षेत्र म्हणून ओळखले जाते. वित्तहानी, जीवितहानी झालेली नाही. पण हवामान बदलते आहे सतत. ''बापरे! मग यात्रेला जायचे की नाही? रद्द करायचे का?'' ''छे छे! आता रद्द नाही करायचे. देवाला निघालोय ना? मग देवाचे नाव घेऊन निघायचे''

सगळे उत्साहात होते. दिल्लीपर्यंत मंडळी विमानाने गेली. दिल्लीला दोन दिवस फिरले. आग्र्याचा ताजमहालही बघून आले. थोडी खरेदीही केली. मग निघाले केदारनाथला जायला. केदारनाथाचे दर्शन झाले. धो धो पाऊस पडू लागला. साल होतं २०१३. थंडीने सगळे कुडकुडत होते. पाय दुखत होते. पावसाचा जोर अधिकाधिक वाढत होता. चोरबारी ग्लेशियर वितळले होते. मंदाकिनी नदीने पाण्याची पातळी ओलांडली होती. विसर्ग एवढा जास्त होता की नदी पात्र सोडून वाहू लागली. धोक्याची पातळीही कधीच ओलांडली होती. सगळीकडे पाणीच पाणी झालं. अर्ध्यापर्यंत पोचलेले यात्रेकरू मिळेल त्या वाहनाने दिल्लीपर्यंत परतले आणि तिथून आपापल्या गावी.

सगळे इकडे बातम्या बघत होते. फोन लागत नव्हते. ह्या भीषण पुरामुळे केदारनाथच्या खोऱ्यात खूप जीवितहानी, वित्त हानी झाली. ५०००हून अधिक लोकं मरण पावले. बरेच वाहून गेले. केदारनाथ मंदिर परिसराचे खूप नुकसान झाले. पण मंदिर

वाचले कारण डोंगरावरून एक खूप मोठ्ठी शिळा खाली आली आणि ती मंदिराच्या मागच्या बाजूला थांबली. त्यामुळे पाण्याचे लोट देवळाच्या बाजूनी वाहू लागले. देवळातले यात्रेकरू सुखरूपच राहिले. ज्या शिळेने देवळाचे नुकसान वाचवले, त्या शिळेला भीमकाय शिळा म्हणून भीमशिळा नाव पडले.

शुभांगीच्या डोक्यात सारखे तेच ते विचार होते. असं वाटायचं कुठेतरी अडकले असतील. रेंज नसल्यामुळे फोन लागत नसेल. येतील थोड्या दिवसांनी परत. पण जसे जसे दिवस जाऊ पुढे लागले तसतशी काळजी वाढू लागली. देव पाण्यात ठेवून झाले. नवस बोलून झाले. सगळीच माणसं जवळची. शेजाऱ्या पाजाऱ्यांकडून चौकशी होऊ लागली. काय सांगणार ?

काही दिवसांनी शुभांगीच्या मैत्रिणीचे आई-बाबा, मावशी-मावशीचे मिस्टर परत आले म्हणून ती त्यांनाही भेटायला गेली होती. ते म्हणाले फार अवघड आहे सगळं. त्यांनी माणसं वाहून जाताना पाहिली होती. पेपरला रोज वेगवेगळ्या बातम्या येत होत्या. हवामानात अचानक झालेल्या प्रतिकूल बदलामुळे केदारनाथ परिसरातील एक महाकाय हिमनग वितळला. त्याचे वितळलेले पाणी आणि धुवाँधार पडणारा पाऊस ह्यामुळे मंदाकिनी दुथडी भरून वाहू लागली. पाण्याचा विसर्ग एवढा मोठा की नदी पात्र सोडून वाट फुटेल तिकडे वाहू लागली. भाविकांचा मृत्यू ओढवला, पुजारी पण वाहून गेले. बरीच घरे वाहून गेली, बऱ्याच घरांचे नुकसान झाले. रस्ते सगळे वाहून गेले, मोठे मोठे खड्डे पडले.

हे हिंदू धर्मातील पवित्र मंदिर, चारधाम यात्रेत बद्रिनाथ, गंगोत्री, यमनोत्री, केदारनाथ ह्यांचा समावेश असतो. केदारनाथ हे १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे. हे १००० वर्षांपूर्वीचे देऊळ. हे ४०० वर्षे बर्फाखाली गाडलेले आहे. ह्या मंदिरातले शिवलिंग हे त्रिकोणी आकाराचे आहे असे म्हणतात. बर्फामुळे हे लिंग उरवी मठ येथे दर्शनासाठी असते.

मैत्रिणीचे आई-बाबा, मावशी, मावशीचे यजमान दिल्लीपर्यंत विमानाने गेले. आणि पुढे गढवाल टुरिझमच्या बसने पुढे गेले होते. ते आधी जम्नोत्रीला गेले. तिथे दर्शन घेतले आणि तिथल्या यात्रीनिवासात राहिले. वीज गेली, पाणी गेलं. पागोळ्यांचं पाणी भरून प्रातर्विधी उरकले. आजूबाजूचे सृष्टीसौंदर्य मोठमोठ्या खिडक्यांतून पहात होतो. पण पाऊस वाढतच होता. संपर्क तुटत होता. भीती वाटू लागली. काहीच समजेनासं झालं. तीन दिवस तिथेच अडकले आणि मग परत जायचे ठरले. पण रस्ते बंद! परत कसे जाणार? तिथल्या जवानांनी एक एक पाऊल टाकता येईल अशी वाट करून दिली. तीस चाळीस फुट मोठा एक खड्डा होता. तिथे फक्त खेचरंच जाऊ शकत होती. त्यांच्या पाठीवरून कसेबसे बाहेर आले. मग प्रायव्हेट बसनी मसुरी, तिथून हरिद्वार आणि मग दिल्ली आणि पुढे विमानाने पुणे. साक्षात मृत्यू समोर पाहिला. घरी सगळे प्रचंड काळजीत होते. त्या काकूंची आई ९० वर्षांची ती तर खूप घाबरली होती. दैव बलवत्तर म्हणून ते सुखरूप घरी आले. नंतरही बरेच दिवस खूप घाबरलेले होते.

शुभांगी हळव्या दुखावलेल्या मनाने, उसन्या उत्साहाने संध्याकाळच्या सीमांत पूजनाची तयारी करू लागली. तिच्या मैत्रिणींना तिची मानसिक अस्वस्थता कळत होती. पण झालेल्या गोष्टीला कोणाचाही इलाज नव्हता. दैवगती दुसरं काय? एवढ्यात अन्वि आली. म्हणाली ''आई, आजीने यात्रेला जायच्या आधी मला दिलेली साखळी मी घातली आहे बघ! अगं ती आपल्या बरोबरच असणार आहे. आशीर्वादाच्या रूपाने!''

शुभांगीने अश्रू वाहू दिले. मन घट्ट केले आणि हसतमुखाने तयारीला लागली!

मास्तर

१) त्याने भांडी घासली.

२) त्याला भांडी घासावी लागली.

या दोन वाक्यात काय फरक आहे?

बंड्या

पहिल्या वाक्यात कर्ता अविवाहित आहे

दुसऱ्या वाक्यात कर्ता विवाहित आहे

– रेखा पै

ती अदृश्य होताना...

पल्लवी शिंदे माने
डेनव्हर कोलोराडो

कॅमेऱ्याची लेन्स धूसर होत होत डोळ्यांच्या अश्रुंमधून अलगद वाहू लागली. तिच्या चितेच्या ज्वाळा, धुराने भरून निघालेलं वातावरण आणि आजूबाजूला पसरलेली भयानक शांतता. नेमकं काय खरं? काय खोटं? की हे आपले भास आहेत? प्रीतीला काहीच उमगत नव्हतं. आठ दिवसांपूर्वी तर आईबरोबर बोलणे झाले माझे. आणि आज ती माझ्यासोबत नाहीये, हे सत्य पचवणं किती कठीण आहे. आजच्या डिजिटल युगात माणसं व्हिडीओ कॉलवर दिसतात, पण नुसती दिसतात. ना त्यांना आपण स्पर्श करू शकत, ना त्यांच्या भावना समजून घेऊ शकत. नेमकं काय असतं त्यांच्या अंतरंगात...

प्रीतीला राहून राहून खंत जाणवत गेली. अगदीच महिनाभरापूर्वी आईबरोबर बोलताना तिला जाणवलं होतं, आई फारच मिस करतेय तिला. आठ वर्ष हा काही थोडा थोडका काळ नाहीये. आठ वर्ष माझ्या माणसांपासून दूर इथे मी अमेरिकेत आलेय. कसे सहन केले असेल आईने? आधीच तर इतकी हळवी, निरागस आणि जगरहाटीपासून दूर असणारी. आज आता या क्षणी हे सगळे विचार मनात येत होते. संवेदना आणि वेदना या दोन्ही भावनांनी ती फार हताश झाली होती. सत्य पचवता येणं कठीण झालं की मन मग असंच भासाआभासाचे खेळ खेळू लागतं. बघता बघता आठवडा सरत आला पण प्रीती अजूनही या अचानक झालेल्या घटनेतून सावरली नव्हती. आई तिचं सर्वस्व होतं. आधारवड होती. प्रीती वडिलांना दादा म्हणायची. दादांशी तिचं जेवढं बॉडिंग नव्हतं तेवढं तिचं आईशी होतं. आईच्या आठवणीने तर ती व्याकुळ व्हायचीच. पण वडिलांच्या आठवणीनेही तिच्या काळजात धस्स व्हायचं. कारण वडिलांचं आईवाचून पान हलत नव्हतं. आता बाबांचं कसं होणार? दादांनी वयाची सत्तरी गाठली. भावाचा संसार विस्कटलेला. घरात काम करणारं कोणीच बाई माणूस नाही. स्वयंपाक करणं, पाणी भरणं, भांडी घासणं, लादी स्वच्छ करणं... अशी कितीतरी कामे आता दादा कसे करणार? बरं घरात मोलकरीण ठेवायची तर दादांची पेन्शन तुटपुंजी. कसं होणार या बापलेकांचं? बहीण सात स्टेशन सोडून दूर राहते. ती तरी कशी रोज येणार. तिचाही संसार. शिवाय सासूचा वॉच. नोकरी आणि नवऱ्याचं हवं नको ते पाहणं. निसर्गाने असा सूड तरी का घ्यावा? या जगात देव आहे तर मग तो आमच्यावरच इतका का कोपला? असे कित्येक प्रश्न तिच्या मनात वादळ घालत होते. विचार करून करून ती खंगत चालली होती. काय घडतंय हेच तिला कळत नव्हतं.

आईचं शेवटचं दर्शनही तिला घेता आलं नाही. ती स्वतःला अभागी समजत होती. भावासारखा असलेला मित्र श्याम होता म्हणून किमान आईशी आदल्या रात्री बोलू तरी शकली होती . तिला व्हिडीओ कॉलवर पाहू शकली होती. दुसऱ्या दिवशी म्हणजे ती गेली त्या दिवशीही तिचं बोलणं

झालं. पण तिला शेवटचं पाहिलं ते रात्रीच्या व्हिडीओ कॉलवर. त्यामुळे तिचा जीव कासावीस होत होता. काही केल्या आईचा चेहरा डोळ्यासमोरून जात नव्हता. घर खायला उठलं होतं. असं वाटायचं कुठे तरी निर्जन ठिकाणी जावं आणि जोरजोरात टाहो फोडत रडावं. मनातील वेदना दूर करावी. मोकळं व्हावं. पण जाणार तरी कुठे? प्रीती चांगलीच द्विधा मनःस्थितीत अडकली होती.

नातेवाईक, मित्र तिला फोन करून धीर देत होते. चार समजुतीच्या गोष्टी सांगत होते. हे किती दिवस चालायचं? यातून बाहेर पडावंच लागेल ना? प्रत्येकाच्या समजावण्याच्या सुरात काळजी होती. शामही तिला रोज मेसेज करायचा. रोज फोन करायचा. तिला आत्मविश्वास द्यायचा. चार समजुतीच्या गोष्टी सांगायचा. कधी तिच्या सुरात सूर मिसळायचा. दोघांच्याही चर्चेत आई होती. आईविषयीची आपुलकी होती. शामला तर आई गेल्याचा धक्का अनपेक्षित होता. कारण आदल्या रात्री तोच आईला हॉस्पिटलला जाऊन भेटला होता. आई हॉस्पिटलमध्ये थांबण्यास नकार देत होती. तेव्हा पोटच्या मुलासारखं त्याने आईचा हात हातात पकडून तिला समजावलं होतं. तू मला दिवाळीत फराळाला बोलावलंय, त्यामुळे तू बरी हो. मी घरी तुझ्या हातचा फराळ खायला येईन, असं सांगत होता. मध्येच डॉक्टरांचे उपचार किती महत्त्वाचे आहेत, हेही सांगत होता. आजूबाजूच्या पेशन्टस्‌नाही त्याने आपल्या सुरात सूर मिसळायला भाग पाडलं. तेही आईला समजावू लागले होते. खरं तर शाम प्रीतीचा आधार होता. तो मोठ्या भावा सारखा तिला होता. त्याच्यासाठी प्रीती वाट्टेल ते करायला तयार होती. त्याची प्रत्येक गोष्ट ती मानत होती. पण शाम गेल्या सहा महिन्यात लहरी झाला होता. अधूनमधून तोच रागवायचा. काही दिवस बोलणं बंद करायचा. पुन्हा तोच बोलायचा. हे त्याचं नेहमीचं झालं होतं. त्याची सवयही झाली होती. पण काहीही असेल, तो निर्मळ मनाचा होता. आणि प्रीतीच्या शब्दाबाहेर नसायचा. प्रीतीवर त्याचा लहान बहिणी प्रमाणे जीव होता.

नातेवाईक आणि शामने सतत समजावल्याने प्रीतीच्या मनात दुसऱ्या विचारांनी काहूर माजलं होतं. मन सावरावेच लागेल, असं तिलाही पटू लागलं होतं. या भावनेतूनच तिने ऑफिसला जाणं सुरू केलं होतं. प्रवास जसा सुरू होतो, तसा प्रवासाला अंतही असतो. प्रत्येकाची जर्नी वेगळी असते. या जर्नीत भेटणारी माणसेही वेगवेगळी असतात. आणि त्यांना येणारे अनुभवही वेगळे असतात. कधी हार तर कधी जीत. पण काहीही असो जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत चालत राहायचे आणि हाच निसर्गाचा नियम आहे.

घरात थांबले तर घर खायला उठेल हे तिला आता एव्हाना कळलं होतं. त्यामुळेच ती रोज ऑफिसला जात होती. कामात तरी मन रमेल आणि दिवस निघून जाईल असं तिला वाटत होतं. म्हणून ती रोज ऑफिसला जाऊ लागली. स्वतःला गुंतवून ठेवण्यासाठी. पण कसलं काय? तिथेही प्रत्येक ठिकाणी आईचा भास होत होता. कामात लक्ष लागत नव्हतं. सहकाऱ्यांच्या बोलण्यात, हसण्यात ती सहभागी होत नव्हती. तिच्या डेस्कवर आईचा एक छोटासा फोटो होता, ज्याकडे ती अधूनमधून पाहायची आणि डोळ्यात पाणी तरळायचं. कामात मन लागत नव्हतं अन् घर खायला उठत होतं. काय करावं हेच कळत नव्हतं. मन चिडचिडं झालं होतं. अन्नावरचीही वासना उडाली होती. म्हणजे ती काही खातच नव्हती. शरीर खंगलं होतं. तरीही शरीराचं मुटकुळं बांधून तिला राबणं महत्त्वाचं होतं. तिची अधिक चिडचिड झाली होती. डोकेदुखीचा त्रास वाढला होता. डोक्यात विचारांचं काहूर माजलं होतं. झोप उडाली होती. त्यामुळे डोळे सूजले होते. लाल झाले होते. आता प्रीतीला नैराश्याने पछाडलं होतं. काय करावं हे कळायला मार्ग नव्हता. कुणाच्या तरी खांद्यावर डोकं ठेवून रडावं असं वाटत होतं. पण अमेरिकेत आपलं म्हणावं असं कोणीच नव्हतं, ज्याला भाव भावना समजतील असं आपल्या हक्काचं कोणीच नव्हतं. नवऱ्यालाही तिच्या वेदनेचं काही पडलं नाही. दिवसभर कॉम्प्युटरच्या डेस्कवर तो कामात गढून जायचा आणि संध्याकाळ झाली की ड्रिंकचे ग्लासावर ग्लास रिचवायचे हेच त्यांचं रोजचं सुरू होतं. म्हणूनच प्रीती मेटाकुटीला आली होती. कुठे जाऊ अन् ढसाढसा रडू असं तिला झालं होतं.

घरात असताना कितीवेळ टीव्ही बघायची? मन रमत नव्हतं. पुस्तक वाचावं तर पुस्तक हातात घ्यायचीही इच्छा होत नव्हती. त्यातच तिचं शामशी बिनसलं होतं. तोही बोलेनासा

झाला होता. बहिणीचा फोन यायचा. पण ती तिच्याच संसाराच्या कटकटी सांगायची. त्यामुळे चिडचिडं व्हायला होत होतं. दादांना फोन केला तर ते आईच्या आठवणीने व्याकुळ झालेले दिसायचे. प्रत्येक फोनवेळी दादांना आई नव्याने समजलेली दिसायची. आई होती तेव्हा दादांनी तिचा फार विचार केला नाही. दादा चळवळे होते. समाजाची कामे करणं त्यांना आवडायचं. रात्री अपरात्री लोकांसाठी धावून जायचे. त्यामुळे त्यांनी आईचा कधी विचारच केला नाही. बिनधास्त होते ते. आता मात्र रोज ते आईचं गुणगान गात होते. तुझी आई चारित्र्यवान होती. गुणसंपन्न होती. हुशार होती. सुगरण होती. रोज तुळशीची पूजा करायची. झाडांना पाणी घालायची. अंघोळ केल्याशिवाय ती कधीच स्वयंपाकाला हात लावत नव्हती, इतकी ती स्वच्छताप्रिय होती. नावाप्रमाणेच ती सगुणा होती. वय झालं तरी तिचा हा गुण आणि रतीब काही गेला नव्हता. दादा भरभरून बोलायचे. आईची एक एक खासियत सांगायचे. ती श्रीमंताच्या घरात गेली असती तर आज तिचं समाजात नाव असतं. ती नक्कीच कोणी तरी मोठी व्यक्ती झाली असती... आईबद्दल बोलताना आपल्याशी लग्न झाल्याने तिचं नुकसान झालं की काय, अशी खंतही दादा बोलून जायचे.

दादांशी बोलल्यावर काही काळ प्रीती गुंतून जायची. कारण दादाच एकमेव व्यक्ती होते की त्यांच्या सोबतच्या संवादात फक्त आई... आई आणि आई हाच विषय होता. बाकी कोणताही विषय नव्हता. त्यामुळे आईविषयी दादांच्या तोंडून ऐकताना बरं वाटायचं. दादा कधीच आईबद्दल एवढं भरभरून बोलले नव्हते. त्यामुळे दादांची काय घालमेल होतेय, त्यांच्यावर काय आभाळ कोसळलं याची कल्पना यायची. त्यामुळे त्यांच्याशी बोलायला आवडायचं. पण त्यांनी फोन ठेवल्यावर मग मात्र जीव खायला उठायचा. पुन्हा आईच्या आठवणीची तडप यायची आणि छातीत कळ यावी तसं दुःख अंगावर यायचं. यातून काही तरी मार्ग काढलाच पाहिजे. कुठे तरी स्वतःला गुंतवून ठेवलंच पाहिजे. असं प्रीतीला राहून राहून वाटू लागलं. मोबाईल सहज चाळत असताना तिला व्हॉट्सअपवरच तिच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं. तिच्या घराच्या हाकेच्या अंतरावर मनःशांती केंद्र होतं. मनःशांती केंद्राने एक आध्यात्मिक शिबीर ठेवलं होतं. प्रसिद्ध गुरू विश्वासजी आध्यात्मिक मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईहून अमेरिकेला येणार होते. तीन दिवस हे शिबीर चालणार होतं. प्रीती तशी धार्मिकच होती. आईचं धर्मकर्म तिच्या वाट्याला आलं होतं. त्यामुळे प्रीतीने या शिबीराला हजेरी लावायचं ठरवलं. आणि ती शिबीरात गेली.

पहिल्या दिवशी तिला फार बरं वाटलं. मन गुंतून गेलं. तीन तास कुठे गेले ते कळले नाहीत. पुढचे दोन दिवसही तसेच गेले. चौथ्या दिवशी मात्र ती बेचैन झाली. कारण जोपर्यंत आपण शिबिरात होतो आणि शब्द कानावर पडत होते, तोपर्यंत ठीक होतं. मन रमून जात होतं. त्या वातावरणात आपण संमोहित झालो होतो. पण आता शिबीर संपलं आणि संमोहन निघून गेलं. आता काही नाही. तिने फक्त एक स्मितहास्य केलं.

प्रीती... नॅन्सी तिला म्हणाली. आय नो, तुला प्रचंड दुःख झालंय. आई गेल्याच्या सेंटिमेंट्स काय असतात, हे मीही जाणून आहे. मलाही कळतंय. गेलेला माणूस परत तर येऊ शकत नाही ना? अरे आयुष्य हे असंच आहे. अनप्रेडिक्टेबल... अननोन... आणि आभासी... आज ना उद्या आपणही जाणारच आहोत. गेलेल्या माणसाचं दुःखं वाटणं स्वाभाविक आहे. पण त्यातून आता सावरलं पाहिजे. किती दिवस असं राहणार. आता जी माणसं आहेत, त्यांच्याकडे लक्ष दिलं पाहिजे ना? नॅन्सी बोलत होती आणि प्रीती केवळ ऐकत होती. ऐकता ऐकता प्रीतीच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते.

तू अशीच सॉरो करत राहिलीस तर कसं व्हायचं? तुला एक लक्षात येतंय का? तुला संसार आहे. मुलं आहेत. नवरा आहे. त्यांच्याकडे कोण पाहणार? कमॉन गर्ल... अरे यू आर लिव्हिंग इन फॉरिन कंट्री. धिस इज नॉट इंडिया. सो यू मस्ट गेट आऊट ऑफ धिस मिसरी यार... चल ऊठ. ये माझ्यासोबत काही तरी खाऊन घे. आणि हो. आजपासून रडू नकोस. आईच्या नावानेच आता नव्या आयुष्याला प्रारंभ कर. जग सुंदर आहे रे. थोडा त्याचा आनंद घे. आई असती तर तुझं असं दुःखी होणं तिलाही आवडलं नसतं... ऊठ ऊठ... चल आईच्या नावानेच... तिची इच्छा म्हणून नव्याने जगायला सुरुवात कर. कमॉन यार... नॅन्सी बोलत होती. तिचा बिनतोड

युक्तिवाद ऐकून प्रीतीही अवाक झाली. नॅन्सीचं म्हणणं तिला पटलं. अन् प्रीती डोळे पुसतच जेवायला उठली.

नॅन्सी तिला नेहमीच आधार द्यायची. तिच्यासोबतच जेवायची. शॉपिंगला एकत्र जायची. नॅन्सी तशी खट्याळ आणि मस्तीखोर. प्रीती नेहमी तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगायची. पण आज ती खूप मॅच्युअर्ड वागली. प्रीतीला ती चार समजुतीच्या गोष्टी सांगत होती. नॅन्सीतील हा बदल तिला अनपेक्षित होता आणि दिलासा देणाराही. त्यामुळेच त्या दिवशी प्रीतीने ठरवलं की, ती आईच्या आठवणींना एक सकारात्मक रूप देईल. ती आपल्या भावनांना व्यक्त करण्यासाठी लेखन सुरू करेल. तिने एक डायरी विकत घेतली आणि दररोज रात्री त्यात आपल्या भावना, आठवणी, आणि विचार लिहायला सुरुवात केली.

डायरी लिहितांना प्रीतीला अनेक गोष्टी आठवल्या. आईसोबत घालवलेले लहानपणीचे क्षण, तिचं प्रेमळ हसणं, तिच्या हातचं जेवण, तिच्या गोष्टी. तिचं तुळशीला पाणी घालणं, कपाळभर कुंकू लावणं आणि निंबोणीच्या झाडामागे, चंद्र झोपला गं बाई... गाणं गुणगुणणं... ती आठवणींमध्ये हरवून जायची आणि त्या क्षणांना पुन्हा अनुभवायची.

एक दिवस, तिने डायरीत लिहिलं: ''आई, तुझं शरीर नसेल इथे, पण तू आहेस माझ्यात. माझ्या स्वप्नांमध्ये, माझ्या निर्णयांमध्ये, माझ्या श्वासात आणि माझ्या आयुष्यात. आजपासून मी तुला आठवून रडणार नाही, तुला आठवून जगणार.''

ही ओळ तिला एका नवीन प्रवासाची सुरुवात वाटली. ती आता आईच्या आठवणींना एक प्रेरणा मानून पुढे जायला तयार होती. प्रीतीने ठरवलं की, ती आईच्या आठवणींना एकत्र करून एक स्मृतींचं संग्रहालय तयार करेल. तिने आईचे फोटो, तिच्या हस्ताक्षरातले पत्र, तिच्या आवडत्या वस्तू, आणि तिच्या आवडत्या गाण्यांची यादी एकत्र केली. तिने एक स्क्रॅपबुक तयार केलं, ज्यात ती या सगळ्या गोष्टी जपून ठेवू लागली. प्रत्येक पानावर ती आईबद्दलचे विचार, आठवणी, आणि भावना लिहायची. हे स्क्रॅपबुक तिच्यासाठी एक प्रकारची थेरपी बनलं. प्रीतीच्या लक्षात आलं की, तिच्यासारखे अनेक लोक आहेत ज्यांनी आपल्या जवळच्या व्यक्तीला गमावलं आहे. ती त्यांच्या भावना समजू शकते आणि त्यांना मदत करू शकते.

आईच्या नावाने आणखी काही तरी केलं पाहिजे असं तिला वाटत होतं. त्याचक्षणी मुंबईत एकता संस्थेने विविध क्षेत्रात काम करणाऱ्यांना पुरस्कार देण्याची घोषणा केली होती. तिला व्हॉट्सअपवर तसा मेसेज आला होता. त्यामुळे प्रीतीच्या डोक्यात चक्र फिरले. आपण आपल्या आईच्या नावाने का बरं पुरस्कार देऊ नये? आईला अमर करण्याचा हा एक मोठा मार्ग आहे, असं तिला वाटू लागलं अन् तिने शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्यांना आईच्या नावाने पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला. संस्थेला त्याबाबतची विनंती केली. संस्थेनेही प्रीतीची ही कल्पना उचलून धरली आणि आईच्या नावाने पुरस्कार जाहीर केला. कार्यक्रमही थाटात झाला. बाबा त्या कार्यक्रमाला गेले होते.

पण एवढं करून चालणार नाही. अजून वेगळं काही तरी केलं पाहिजे असं प्रीतीला राहून राहून वाटू लागलं. तेवढ्यात शामचा मेसेज आला. त्याने आईवर पुस्तक लिहिण्याची कल्पना सांगितली. अन् प्रीतीला काही तरी हरवलेलं सापडल्याचा भास झाला. अरे हेच तर हवं होतं. आईचं जीवन चरित्र आणायचं. तिला कायमचं अमर करायचं. येणाऱ्या सतरा पिढ्या तिचा संघर्ष वाचतील. अनेक पिढ्या येतील जातील, पण आईची कहाणी अमर राहील... अन् मग ठरलं... अदृश्य झालेली आई पुन्हा जिवंत करायची, तीही शब्दांच्या माध्यमातून. आणि प्रीतीने शामच्या मदतीने आईवर पुस्तक लिहायला घेतलं... पुस्तकाचं नाव होतं, ती अदृश्य होताना...

शिक्षक- उशीर का झाला शाळेत यायला?
चिंटू- आई, बाबा भांडत होते.
शिक्षक- त्याचा उशिरा येण्याशी काय संबंध?
चिंटू- माझा एक बूट आईच्या हातात
तर दुसरा बाबांच्या हातात होता.

- रेखा पै



गावची शाळा आणि आमचं बालपण

प्रसाद केसकर
कूपरटिनो, कॅलिफोर्निया

आमच्या गावची शाळा म्हणजे खरी गंमतच. आजच्या पोरांकडे भारी बॅगा, बूट, बाटल्या असतात. आमचं काय? अंगावर झब्बा, पायात मातीवर सरळ बोट, खांद्यावर स्लेट, आणि ''उशीर होतोय!'' म्हणत धावत शाळेकडे.

शाळेच्या अंगणात एक मोठं आंब्याचं झाड. पावसाळ्यात हिरवीगार पानं, उन्हाळ्यात आंब्यांचा पाऊस. सर शिकवतायत, बाहेर आंबा पडला की आम्ही डोळ्याने खूण करून पळायचो. एकदा सरांनी पकडलं. म्हणाले, ''शाळेत आंबे खायला आलात का शिकायला?'' गण्या लगेच, ''सर, आंबे खाल्ल्याशिवाय ऊर्जा नाही, मग पाढे कसे म्हणू?'' वर्ग हसून लोटपोट.

गणिताचे पाढे म्हणजे भयंकर. आई दारात उभी राहून म्हणायची, ''चल, नऊचा पाढा म्हण.'' मी अडखळायचो. एकदा सरांनी गण्याला विचारलं, ''आठचा पाढा म्हण.'' गण्या म्हणाला, ''आठ एके आठ, आठ दुनी सोळा, आठ तिन्ही बावीस.'' सर डोळे वटारून, ''काय बावीस रे?'' गण्या शांतपणे, ''सर, ही माझी नवी पद्धत. सरकारने मंजूर केल्यावर पुस्तकात येईल!'' पुन्हा पोट धरून हसणं.

सुटी झाली की सरळ शंकराच्या टपरीकडे. चिंचेची गोळी, गुळशेंग, भेळ - अहाहा! एकदा हेडमास्तर आले. विचारलं, ''कोण आलं शाळेतून?'' गण्या पुढं म्हणाला, ''सर, भूगोलात नद्या शिकवता ना, इथे आम्ही चिंच आंबट की गोड – तो प्रयोग करतोय!''दुसऱ्या दिवशी गावभर चर्चा – ''गण्या वैज्ञानिक झालाय!''

पावसाळ्यात शाळेच्या मागं मोठं डबकं. तिथं बेडूक पकडायचो. गण्यानं एकदा वर्गात टेबलावर बेडूक सोडला. सर उडी मारून खुर्चीवर चढले. ''कोण हा खोडकर?'' सगळी बोट गण्याकडे. शिक्षा झाली, पण गावात टोपणनाव पडले– ''बेडूक सर!''

वार्षिक स्नेहसंमेलनात मला कविता म्हणायला लावली. स्टेजवर घाबरलो. तोंडातून निघालं, ''चांदोबा, चांदोबा भागलास का?'' आणि थांबलो. पुढं विसरलो. मग म्हणालो, ''बाकी पुढच्या वर्षी सांगतो.'' संपूर्ण गाव हसून हसून लोळलं. नंतर मला ''चांदोबा'' म्हणायला लागले.

खेळही भन्नाट. घंटेला दोरी बांधून खेचायचं आणि ''भूत आलं!'' म्हणून पळायचं. वहीत उंदीर काढून सरांच्या आठ्या वाढवायच्या. उन्हाळ्यात विहिरीत डोकं बुचकळून ''आम्ही डॉल्फिन!'' ओरडायचं. शाळा सुटली की बैलगाडीत बसून ''फास्ट लोकल'' पकडल्यासारखा थाट. आमच्या बालपणाचे हे मसालेदार कॉमेडी शो, आणि रंगमंच म्हणजे शाळाच!

त्या काळात पायात चप्पल नव्हती, पण मनात स्वप्नं होती. स्लेट होती, पण कल्पना हजारो होत्या. शिक्षकांनी रागावलं, कधी मारलंही, पण तीच खरी जीवनशाळा होती.

आता मोठे झालो– कामधंदा, मोबाईल, एसी ऑफिस. पण ती गावची माती, आंब्याचं झाड, शंकराची टपरी, गण्याचा बेडूक - आठवलं की अजूनही हसू फुटतं आणि डोळ्यात पाणी येतं.

गावची शाळा साधी होती, पण आठवणी श्रीमंत. खरंच, शाळा सुटली, पण बालपण कधीच सुटणार नाही.

चार शेपट्यांची गोष्ट

सौ. रसिका नेर
स्प्रिंग हिल, टेनेसी

माणूस कितीही मोठा झाला, कितीही जबाबदाऱ्यांच्या ओझ्याखाली दबला, तरी मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्यात लपलेलं बालपण कधीच संपत नाही. ते बालपण कधी आठवणींच्या रूपाने डोकं वर काढतं, तर कधी स्वप्नांतून. मला लहानपणापासूनच कुत्र्यांची प्रचंड आवड होती. रस्त्यावर एखादा कुत्रा दिसला, की नकळत माझी पावलं त्याच्याकडे वळायची. त्याच्या डोक्यावरून हात फिरवताना, त्याच्या डोळ्यांत पाहताना मनात एक वेगळाच विश्वास जागा व्हायचा. आई नेहमी काळजीने सांगायची, ''जपून, चावा घेईल,'' पण मला त्या निष्पाप नजरेत कधीच भीती दिसली नाही. उलट, तिथे मला आपुलकी, न बोलता व्यक्त होणारी मैत्री आणि निष्ठेची हमी दिसायची.

उन्हाळ्याची सुट्टी लागली की आम्हाला वेध लागायचे ते आजीकडे जाण्यासाठी. मामाचं गाव म्हणजे आमच्यासाठी एखाद्या स्वप्ननगरीसारखं होतं. माझं आजोळ म्हणजे विद्येचं माहेरघर 'मुळा' आणि 'मुठा' या नद्यांच्या संगमावर वसलेलं, संस्कृतीने समृद्ध असलेलं पुणे. आधी आजोळ नारायण पेठेत होतं. आजीचं घर, आजूबाजूची गर्दी, जुन्या वाड्यांचे दरवाजे, आणि त्या सगळ्यांत भर घालायचे ते शेजारचे प्राणी. आजोबांच्या निधनानंतर मामा डहाणूकर कॉलनीत राहायला गेला. तरी आजीकडे जाण्याची मजा काही कमी झाली नव्हती. तिथे जाण्याचा प्रवाससुद्धा तितकाच आनंददायी असायचा. महाराष्ट्र एक्सप्रेस किंवा झेलम एक्सप्रेसने बॅगा भरून आम्ही निघायचो. ट्रेनच्या खिडकीतून धावणारी झाडं, स्टेशनवरची गडबड, आणि ''आजीचं घर कधी येणार?'' हा सततचा प्रश्न, सगळंच मनात साठत जायचं. आजीचं घर म्हणजे मायेचा ओलावा. तिचा आवाज, तिच्या हातचं जेवण, तिची शांत पण आधार देणारी उपस्थिती हे सगळं जसं खास होतं, तसंच तिच्या घराभोवतालचं जगही वेगळंच होतं.

आजीच्या घरासमोर रिसबूड नावाचं कुटुंब राहत होतं. त्यांना प्राणी आणि पक्ष्यांची अतोनात आवड होती. त्यांच्या अंगणात नेहमीच कबुतरं, चिमण्या, कधी एखादा मोरही दिसायचा. सकाळी त्यांचा मुलगा ''गूटर-गू'' म्हणत कबुतरांना दाणे टाकायचा आणि त्या आवाजानेच आमची गाढ झोप मोडायची.

रिसबुडांकडे काळू आणि डुमा हे दोन कुत्रे होते. नावावरूनच त्यांची ओळख पटायची. काळू काळ्या रंगाचा, तर डुमा पांढराशुभ्र. डुमा मातीमध्ये लोळला, की त्याच्या अंगावर मातीची काळी नक्षी उमटायची. हे दोघे माझ्या बालपणीचे जिवलग मित्र होते. सकाळी उठल्याबरोबर त्यांना शोधायला बाहेर पडायचं, त्यांच्याबरोबर खेळायचं, पळायचं, कधी त्यांच्या पाठीवर हात ठेवून शांत बसून राहायचं. ते काही बोलत नसले, तरी त्यांची साथ खूप काही सांगून जायची. त्यांच्याशी गट्टी जमल्यामुळे मनात कायम एकच इच्छा निर्माण व्हायची आपल्याही घरी एक कुत्रा असावा. पण त्या काळी कुत्रा पाळणं काही सोपं नव्हतं. समाजात मोजक्याच लोकांकडे कुत्रे असायचे.

म्हणतात ना, दुधाची तहान ताकावर भागवावी.

आमच्या कॉलनीतल्या एका कुत्रीला पाच-सहा पिल्लं झाली. त्यातलं एक तिने दुर्दैवाने मारून खाल्लं. उरलेली पिल्लं इकडे-तिकडे पळाली, आणि एकच पिल्लू तिच्याजवळ राहिलं. ते पाहून मनात विचार आला आपला काळू आणि डुमा

यातच सापडला तर?

आई रोज सकाळी अंगणात त्याला दूध आणि पोळी द्यायची. हळूहळू तो आमच्या घरचा भागच बनला. त्याची लहानशी शेपटी हलवणं, त्याची घराभोवतीची धावपळ, त्याची नजर सगळंच घरात चैतन्य आणू लागलं आणि त्याचं नाव ठेवलं पीटू. पीटू काही साधा नव्हता. तो खूपच चंचल, लहरी आणि हट्टी होता. घरात कुठेही काही घडलं, की संशयाची सुई थेट पीटूकडेच वळायची. संक्रांत आली, की तिळगुळावर ताव मारलेलाच असायचा. हळदीकुंकवाला आलेल्या बायकांना शेवटी वाटायचं आपला तिळगुळ पीटूनेच फस्त केला असणार!

पण पीटू फक्त खोडकर नव्हता; तो आमच्या घरातला एक सदस्य होता. त्याच्या नजरेत न बोलता व्यक्त होणारं प्रेम होतं. पण एक दिवस असा आला, जो कधीच विसरता येणार नाही. पीटू हरवला. त्या वेळी मी सहावीत होते. सायकलवर दिवसभर गल्ल्या-गल्ल्यांत फिरत ''पीटू पीटू'' अशी हाक देत मी त्याला शोधत राहिले. संध्याकाळ झाली, अंधार पडला, पण पीटू काही सापडला नाही. रोज आशा घेऊन बाहेर पडायचं आणि हताश होऊन घरी परतायचं. हळूहळू सगळ्यांनीच आशा सोडली.

पण नशीब अजून एकदा आमच्या बाजूने होतं. दत्त मंदिरात दर्शनासाठी गेलेल्या बाबांना पीटूसारखाच एक कुत्रा दिसला. ''पीटू पीटू'' अशी हाक मारताच तो बाबांच्या मागे-मागे तब्बल दोन-तीन किलोमीटर घरापर्यंत चालत आला. घर ओळखताच तो इतका आनंदी झाला, की बाबांना घरातसुद्धा येऊ देईना.

पण हा आनंद फार काळ टिकला नाही. एके दिवशी म्युनिसिपालिटीने गटारी साफ करण्यासाठी टाकलेली विषारी गोळी पीटूने खाल्ली. आमच्या डोळ्यांसमोरच पीटूने प्राण सोडले. त्या दिवसाने मला खूप काही शिकवलं. त्या दिवसापासून मनाशी घट्ट गाठ बांधली, आपल्याला कुत्रा नकोच.

आयुष्य पुढे सरकलं. लग्न झालं. जबाबदाऱ्या वाढल्या. अमेरिकेत आले. इथे पाहिलं, तर जवळजवळ प्रत्येक घरात कुत्रा किंवा मांजर असतंच. लोकांचा त्यांच्या पाळीव प्राण्यांशी असलेला जिव्हाळा पाहिला, आणि जुन्या आठवणी पुन्हा ताज्या झाल्या. मुलंही मागे लागली. आपल्याही घरी एक कुत्रा असावा आणि शोध सुरू झाला.

एक दिवस आम्ही दोन कुत्र्यांना पाहायला गेलो. पारकर आणि पेरी. पेरी शांत, थोडा अलिप्त वाटत होता; पण पारकरने पहिल्याच क्षणापासून मन जिंकलं. जवळजवळ एक तास आम्ही त्यांच्यासोबत होतो. खेळलो, त्यांना निरखलं, त्यांच्या डोळ्यांत डोकावून पाहिलं. त्या नजरेत मला माझ्या बालपणाचा पीटू दिसत होता.

मी मनाशी विचार करत होते ''पारकरला आत्ता घ्यायचं का? नाहीतर आधी घराची साफसफाई करावी आणि मग आणावं का?'' घरातल्या जागा, खेळणी ही सगळी तयारी मला डोळ्यासमोर येत होती.

अखेर ठरवलं, पारकरला दोन दिवसांनी आणायचं. या दोन दिवसांच्या प्रतीक्षेत सगळीकडे पारकरची चर्चा सुरू झाली होती.

त्या दोन दिवसांमध्ये घरात आम्ही पूर्ण तयारी सुरू केली. कुत्र्यासाठी खेळणी घेतली, कोपऱ्याची सफाई केली, पाण्याच्या, अन्नाच्या सोयीसुविधा तपासल्या. प्रत्येक खोलीत पारकरच्या यशस्वी आगमनाची कल्पना करत आम्ही उत्साहाने वाट पाहत होतो. अमेरिकेत कुत्रा आणायचा तर आधी कुत्र्यांचा डॉक्टर शोधावा लागतो, तोही शोधला. पण दोन दिवसांनी कळलं पारकरला आधीच कोणीतरी घेऊन गेलं होतं.

मन खूप खट्टू झालं. इतक्या कमी वेळात इतकं नातं जुळेल, याची कल्पनाही नव्हती. पुन्हा एकदा वाटलं कदाचित आपल्यासाठी कुत्रा नाहीच.

पण आयुष्य पुन्हा वळण घेणारच होतं. वेगवेगळ्या जाती, वेगवेगळी नावे पाहत असताना अखेरीस आमच्या आयुष्यात आला 'ऑस्कर'. पहिल्याच दिवसापासून त्याने घरात चैतन्य आणलं. त्याच्या खोडकर नजरेत पीटू, त्याच्या निष्ठेत काळू-डुमा, आणि त्याच्या शांत सहवासात पारकरची आठवण सापडली. ऑस्कर येऊन आता जवळजवळ दोन महिने झाले, पण त्याच्या प्रत्येक क्षणाने आमचे जीवन इतके आनंददायी बनवले आहे की वेळ कसा जातो ते कळतच नाही. छोटासा, गोंडस वाटणारा हा प्राणी आता आमच्या घराचा आणि हृदयाचा अविभाज्य भाग बनला आहे. दिवसभर त्याच्या गमती जमती, खेळ, आणि प्रत्येक छोटीशी हरकत पाहताना हसणे, प्रेम करणे आणि आनंद अनुभवणे याचा संपूर्ण

अनुभव मिळतो. कधी लपाछपी खेळतो, तर कधी आपल्या प्रेमळ नजरेतून गोड संदेश देतो असे क्षण आमच्या आयुष्यातल्या प्रत्येक दिवसाला खास बनवतात. आता एक दिवस किंवा क्षण असा नाही, जो त्याशिवाय पूर्ण होतो.

चार शेपट्या नाहीत तर आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेले चार प्रेमळ सोबती आहेत. ज्यांनी मला प्रेम, विरह, जबाबदारी आणि नात्यांचा खरा अर्थ शिकवला आणि ज्यांनी मला माणूस म्हणून घडवलं. त्यांच्या निःस्वार्थ प्रेमामुळेच प्रेम म्हणजे काय हे शब्दांशिवाय मला समजलं. विरहाच्या क्षणांनी शिकवलं की नातं संपत नाही, ते आठवणींतून अधिक घट्ट होतं. जबाबदारी म्हणजे ओझं नाही, तर प्रेमातून स्वीकारलेली कर्तव्यभावना असते.आणि नाती ही रक्ताचीच असावी लागतात असं नाही तर मनाने जुळलेली नातीदेखील आयुष्य समृद्ध करतात.

ही आहे माझ्या आयुष्यातील
काळू-डुमा, पीटू, पारकर-पेरी आणि ऑस्कर
चार शेपट्यांची, पण अखंड प्रेमाची गोष्ट.

संगीत

निःशब्द रात्री बर्फाने जड झालेली सूचिपर्णी
काचेवरील किचकिच संगीत ऐकले आहे कुणी
प्रखर उन्हाने टपटपत वितळणाऱ्या बर्फाचे
झुळूझुळू पाणी वाहताना ऐकले आहे कुणी ?
घोंगावणाऱ्या वाऱ्याबरोबर हेमंतातल्या
ॲस्पेनची सोनपाने सळसळणाऱ्या संगीताने शहारले आहे कुणी ?
समुद्रकिनाऱ्यावरील दगडांवर आदळणाऱ्या लाटा
सकाळी किलबिल करणाऱ्या पक्ष्यांचा साज
दूर वाजणाऱ्या घंटेचा नाद
त्याचे उठतात हृदयात पडसाद
मनात उठतो सोहम्
सर्व निसर्ग संगीतातला एकच राग ॐ

– **मनिषा भिडे** (कोलोरॅडो)

झोका

झुई झुई झोका
झोक्यावर बसू
दोरी धरा घट्ट
खुदुखुदू हसू

उंच उंच नभात
झोका जाई वर
लावू ढगांना हात
येई आता भुईवर

वाऱ्याच्या लहरीवर
आनंदाला उधाण
झोका जाता वर
झाडे दिसती लहान

झोका असा घेईन
जाईन मी उंच
ताईसाठी तोडेन
कैऱ्या आणि चिंचा

झाडावरचा पक्षी
मारतोय मला हाका
चिव चिव बोलीवर
धरीन छान ठेका

झुई झुई झोका
वाऱ्याशी सलोखा
सपा-सप चाले पहा
वाऱ्यावर नौका

–**अश्विनी क्षीरसागर** (सिॲटल)

पाठवण

संजय राऊत
सिॲटल

नजर पुन्हा एकदा भिरभिरली. सगळी तयारी झाली होती. जीवापलिकडे जपलेल्या नात्यांचा, अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसंग... जसजशी वेळ जवळ येत होती तसतशी हृदयाची धडधड वाढू लागली...

''हॅलो, हो मी मृण्मयी....तुम्ही कुठवर आलात? ... सगळे वाट बघतायत. खूप वेळ नाही थांबू शकत. जरा लवकर या.'' मृण्मयीने फोन ठेवला. वन रूम किचनच्या घरात स्वयंपाकघरात देव्हाऱ्यावर एकटक नजर लावून मृण्मयी शांत बसून होती. डोळे डबडबलेले आणि कंठ दाटून आला होता. नातेवाईक, शेजारी सतत आतबाहेर करत होते. एवढ्या छोट्या घरात सगळं शक्य नव्हतं म्हणून सगळे विधी चाळीतील मधल्या मोठ्या जागेत करण्याचं ठरलं होतं.

इतक्यात हेमांगी आत आली. ''मावशी, सखीची साडी कुठे ठेवलीये? आणि हळद कुंकू सुद्धा मागितलंय.''

''साडी तिथे बेडवर काढून ठेवली आहे. आणि हळद कुंकू इथून देव्हाऱ्यातून घेऊन जा.''

''तुला पण बोलावलंय'' जाता जाता हेमांगी सांगून गेली.

''हं. आले'' म्हणत मृण्मयी उठणार इतक्यात दरवाज्यात अरुण आला. ''मृण्मयी, अगं चलतेस ना. बाहेर सगळे खोळंबलेत तुझ्यासाठी.'' मृण्मयीने साश्रू नयनांनी एकवार अरुणकडे पाहिले आणि म्हणाली, ''अहो, मला जरा तुमच्याशी बोलायचंय. आपल्या सखीबद्दल''

''आता वेळ आहे का? सगळे तुझी वाट बघतायत बाहेर आणि आत्ता ?''

''हो. आत्ताच बोललं पाहिजे. नंतर खूप उशीर होईल.'' मृण्मयीच्या डोळ्यातील अस्वस्थता बघून, अरुण दोन क्षण तसाच थांबला. सगळं धैर्य एकवटून मृण्मयीने बोलायला सुरुवात केली ''आपली सखी.. म्हणजे.. सखी आपल्याच सोबत..'' इतक्यात खालून कोणीतरी अरुणला हाक मारली. अरुणने खाली पाहिले, मृण्मयीच्या खांद्यावर हात ठेवून म्हणाला, ''एक मिनिट दे. खाली बोलवतायत. मी आलोच. हं.'' म्हणत अरुण निघून गेला आणि त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत मृण्मयी तिथेच बसून राहिली. डिलीव्हरीनंतर वॉर्डबाहेर डॉक्टरांशी हुज्जत घालणारा पाठमोरा अरुण आठवला. एक दीर्घ श्वास घेऊन मृण्मयी विचार करत बसली. लहानपणी चाळीत पडद्यावर चित्रपट बघताना जशी एखादी संपत असलेली रीळ बायोस्कोप समोरून सर्रकन निघून जावी तशी सखीची बावीस वर्षे तिच्या डोळ्यासमोरून जात होती. म्हणता म्हणता सखी बावीस वर्षांची झाली.

''सखीची आई, सखीचा हिरवा चुडा कुठेय..'' शेजारच्या काकूंनी विचारलं.

''हा बघा इथेच टेबलवर आहे, घेऊन जा.'' मृण्मयी चुडा त्यांच्याकडे देत म्हणाली.

''सखीची आई''.. तिला आठवले सखीचे चिमुकले, लुकलुकणारे डोळे. जन्मानंतर तब्बल चार दिवसांनी सखीने डोळे उघडले होते. एवढ्या चार दिवसात नको नको त्या शंका मनात येऊन गेल्या. मात्र आता सगळं जीवनच सखीमय होऊ लागलं होतं. तिचं खाणं, पिणं, बाळूती, दुपटी सगळं एक नवीन आनंद घेऊन येत होतं. एखाद्या परीसारखी दिसायची सखी. गोड हसायची. डोळ्यात एक वेगळीच चमक होती तिच्या. सगळ्यांना नुसत्या नजरेनेच आपलसं करायची. चाळीतल्या लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांची एकदम लाडकी झाली होती. सगळ्यांचीच सखी झाली होती. आणि माझी ओळख ''सखीची आई''

''सखीची आई, मी सखीबरोबर थोडा वेळ खेळू?''

''सखीची आई, अहो आज सखीचा आवाज नाही आला, आजीकडे गेलीय का?''

''सखीची आई, सखी बोलत का नाही? म्हणजे आता चार वर्षाची झाली ना? तिला पोपटाचा उष्टा पेरू द्या.''

''सखीची आई माझ्या ओळखीचे एक डॉक्टर आहेत. त्यांना दाखवता का?''आणि मग पोपटाचा उष्टा पेरू, डॉक्टर, सगळं केल्यावर, साडेचार वर्षाची असताना सखी पहिल्यांदा आई म्हणाली. ''आई''. इतकी वर्ष हा शब्द ऐकण्यासाठी कान आतूर झाले होते.

एक दिवस डॉक्टरांनी फक्त दोघांना घरी बोलावलं. चहा वगैरे झाला. थोडा वेळ सखीशी खेळल्यानंतर डॉक्टरांनी बोलायला सुरुवात केली. ''हे बघा, खरं तर गेले पाच महिने मी सखीला तपासतोय. आणि तिच्या वेगवेगळ्या चाचण्या देखील केल्यात. तुम्हीही बघताय की सखीची शारीरिक वाढ हळू होतेय. पण बरेच वेळा तिचा मानसिक रिस्पॉन्स चांगला येत होता आणि म्हणून मलाही नीट कळत नव्हतं. गेल्या आठवड्यात मी तिचे केस पेपर एका तज्ञ न्यूरोलॉजिस्टना दाखवले. त्यांनीही तिचे परीक्षण केले. सखीची आई, सखी बॉर्डर केस आहे. म्हणजे, तिला तुमचं सगळं कळेल. पण तिची वाढ हळू हळू होईल.''

''नाही. असं कसं शक्य आहे. ती व्यवस्थित आहे. तिला काही नाही झालंय.'' एका बापाला आपल्या मुलीचं हे असं असणं मान्य होत नव्हतं. अरुण डॉक्टरांना पटवून द्यायचा प्रयत्न करत होता... मृण्मयी मात्र दिग्मूढ होऊन तशीच बसून राहिली. अडीच वर्ष उभं न राहता येणं, चार वर्षं बोलता न येणं, तिच्या दातातील वाढत्या फटी या सगळ्याचा अर्थ आता लागत होता. अचानक भानावर येऊन तिने डॉक्टरांना विचारलं, ''हळूहळू का होईना तिची वाढ तर होईल ना?''

''हो. होईल. पण म्हणजे...'' डॉक्टर काही काळ शांत झाले.

''म्हणजे? म्हणजे काय डॉक्टर?''

''म्हणजे आम्ही ज्या केसेस आतापर्यंत पाहिल्यात, त्यात अशी मुलं पंधरा वर्षाच्या वर... सखीची आई, सखी जितकी वर्ष आहे तिच्या सोबत आनंदात रहा.''

आणि मृण्मयी कोसळली. तिला रडू आवरेना. ओक्साबोक्शी रडली, ती शेवटची. त्यानंतर पुढले बावीस वर्ष तिने अश्रूंचा टिपूसही पडू दिला नाही. अरुणनेही कालांतराने वस्तुस्थिती स्वीकारली. सखीसाठी दोघांनी स्वतःचं आयुष्यच वेचलं. तिच्यावरील लक्ष कमी होऊ नये, प्रेम वाटलं जाऊ नये म्हणून त्यांनी नंतर मूल होऊ दिलं नाही.

आज बावीस वर्षात संपूर्ण परिसरात आणि नातलगांमध्ये सखीने जिव्हाळ्याने आणि आपुलकीने इतकी माणसं जोडली होती, की तिला शेवटचा निरोप देण्यासाठी सर्व हजर होते. सगळी तयारी झाली होती. काही गोष्टी अरुण दुसऱ्यांकडे सोपवून मृण्मयीकडे परतला आणि म्हणाला, ''हं, बोल''

जिवापलिकडे जपलेल्या नात्यांचा आणि अनुभवांचा कस पाहणारा हा प्रसंग होता. कसं बोलावं तेच मृण्मयीला कळेना पण सगळा धीर एकवटून ती म्हणाली ''अहो, मी तुम्हाला न विचारता आज एक निर्णय घेतलाय. सखीचे डोळे दान करण्यासाठी मी नेत्रदान संस्थेच्या लोकांना इथे बोलावलंय. ते अर्ध्या वाटेत आहेत. मला वाटतंय आपण अजून थोडा वेळ थांबावं. आपल्या चिमुकलीचे डोळे कुणाच्यातरी उपयोगी यावे आणि तिचं अस्तित्व या जगात अजून काही दिवस टिकावं यासाठी...''

अरुणने मृण्मयीचा हात हातात घेतला. दोघे तसेच बसून राहिले. थोड्याच वेळात बाहेर गाडीचा आवाज आला.

काजव्यांच्या त्या त्यागाने
त्याचे डोळे दीपले! मन भरले!

पहिल्यांदा एकटाच, मग पर्यटकांसमवेत
तो अनेक वेळा तिथे आला
ती जादू त्याने अनेक वेळा पाहिली

पण पहिल्या अनुभवाइतकी
मजा कधीच नाही आली
पर्यटनामुळे तो श्रीमंत झाला.

तो फक्त अंधारातून दिव्याकडे
तिमिराकडून तेजाकडे जात राहिला.

– मनिषा भिडे (कोलोरॅडो)

व्यक्ती आणि वल्ली – बंड्या बोपर्डीकर

– श्रीवास अष्टपुत्रे
बॉयझी, आयडाहो

आज बऱ्याच वर्षांनी गावाकडे पाडव्यासाठी म्हणून आम्ही सगळे जमलो. सालाबादप्रमाणे गुढी उभारून पूजा वैगेरे आटोपल्यावर माजघरात गप्पा रंगल्या. साहजिकच लहानपणीच्या आठवणी निघाल्या आणि बंड्याची आठवण झाली. बंड्या बोपर्डीकर, लहानपणीच्या आठवणीतलं लक्षात राहिलेलं एक व्यक्तिमत्व. आता बंड्याला व्यक्तिमत्व म्हणण्या इतका भारदस्तपणा त्याच्यामध्ये नव्हता किंवा त्याचं तेवढं कर्तृत्वही नव्हतं. पण काही माणसं उगाचच आपल्या आठवणीत राहतात, त्यापैकी एक म्हणजे बंड्या बोपर्डीकर. कुठलाही सण आला की बंड्या मनात डोकावून जातो याचं कारण म्हणजे प्रत्येक सणाच्या दिवशी अगदी तसाच तो डोकवायचा, आमच्या पेठेत राहणाऱ्या प्रत्येकाच्या घरात. याचा कधी कोणाला राग आला नाही. उलट एखाद्या सणाला बंड्या आला नाही तर आमची आजी आवर्जून विचारायची ''अरे, ते बंडोपंत आले नाहीत आज'' मग आम्ही पोरं त्याला शोधायला बाहेर पळत असू .

आमचं गाव तसं बऱ्यापैकी मोठं होतं. चार पाच पेठा, दोन तीन आळ्या आणि तीन चार वाड्या होत्या गावात. दहा बारा हजारांची वस्ती असेल तेव्हा. गावाच्या मध्य भागातून कृष्णा नदी वाहते. नदी काठावर पुरातन अशी बरीच मंदिरे आहेत. आमची पेठ गावाच्या एका बाजूला होती. पेठेत खूप जुने वाडे होते. प्रत्येक वाड्यातून एखादं चिंचेचं नारळाचं झाड दिसायचं. झेंडू, गुलाब, तगर, सदाफुली तर प्रत्येक वाड्याच्या परसात असायचीच. आमच्या वाड्याच्या बाहेर रस्त्याच्या वळणावर एक मोठं बकुळीचं झाड होतं. येणाऱ्या नवीन पाहुण्यांना घराची तीच खूण होती. उन्हाळ्याच्या सुरुवातीला त्याच्या फुलांचा सडा आमच्या दारात पडलेला असायचा. शाळांना सुट्या लागल्या की पेठेतली आम्ही समवयस्क पोरं त्या झाडाच्या बुंध्याला स्टंपा आखून क्रिकेट खेळायचो. तेव्हापासून बंड्या मला आठवतो. आमच्या क्रिकेट मॅच मध्ये अम्पायरिंगचं काम बंड्या आवडीने करायचा. कदाचित त्याला क्रिकेट खेळता येत नसावं. पण लहान मुलांवर हुकूम गाजवायची ही एक संधी म्हणून तो हे काम करत असावा. अरे हो, सांगायचं राहिलं. बंड्या तेव्हा तिशीत होता. लग्न झालं होतं त्याचं पण आम्ही सगळी लहान पोरं त्याला ''अय बंड्या, चल क्रिकेट खेळायला'' अशा हाका मारून बोलवायचो. तो ही ''तुम्ही व्हा पुढं, आलोच चहा पिऊन'' असं सांगून नक्की यायचा. बंड्याचं पाळण्यातलं नाव नारायण होतं हे बऱ्याच नंतर आम्हाला कळालं होत. खरंतर खुद्द बंडोपंतांनाही त्या नावाचा विसर पडलेला असणार कारण वर्षातून कधीतरीच म्हणजे ज्यावेळी त्याची बायको हळदीकुंकवाच्या कार्यक्रमात किंवा सणासुदीच्या दिवशी उखाणा घ्यायची तेव्हाच या नावाचा उल्लेख व्हायचा. पण त्या शरीराला नारायणराव यापेक्षा बंड्याचं जास्ती शोभायचं. सडपातळ बांधा त्याच्या सरासरीपेक्षा जास्ती असलेल्या उंचीमुळे अधिकच सडपातळ दिसायचा. मुळात गौर असलेला पण उन्हात तापून तांबूस झालेला त्याचा वर्ण, अंगकाठीला शोभेल असा लंबुळका आणि पुढचे दात बाहेर असल्यामुळे सतत हसरा दिसणारा

त्याचा चेहरा, सतत विस्कटलेले केस आणि मळकट कपडे, पाठीला थोडा बाक काढून चालायची त्याची सवय; हे एकंदर त्याच्या व्यक्तिमत्वाला वेगळेपण द्यायचे. त्याच्या सदऱ्याचा खिसा नेहमी फाटलेलाच असायचा, विचारले तर म्हणायचा ''खिशात लपवण्याइतकं धन अजून मिळायचंय, ते मिळालं की शिवून घेईन, तोपर्यंत खिसा असला काय अन नसला काय''...

पेठेतल्या सगळ्या वाड्यांमध्ये बोपर्डीकरांच्या दोन खोल्या तेवढ्या वेगळ्या दिसायच्या. रंग नसलेल्या भिंती, जुन्या पत्र्याचं छप्पर, रात्री घरात एकच दिवा लावल्यामुळे असलेला अगदी मिणमिण प्रकाश. भाऊबंदकीमध्ये घराचा तेवढाच भाग बंडोपंतांच्या खाती आल्याचं नंतर कधीतरी आम्हाला समजलं होतं. बाकीचे बोपर्डीकर कधी पाहिल्याचं माझ्या स्मरणात नाही, असं ऐकलं होतं की सगळे पुण्या मुंबई कडे कामानिमित्त गेले होते. बरं ते असो, सांगायचा मुद्दा म्हणजे बंड्याची आर्थिक स्थिती तशी बेताचीच होती. शाळा अर्धवट सोडल्यामुळे कुठे नोकरी मिळेना. धंदा करावा तर त्यासाठी भांडवल नाही आणि धंद्यासाठी लागणारा स्वभावही नाही. दर दिवाळीला आणि पाडव्याला बंड्या स्वच्छ धुतलेले आणि उसनवारीवर इस्त्री करून आणलेले कपडे घालून लॉटरी ची टिकेट्स आणि पंचांग विकायचा. माझे वडील दर दिवाळीला त्याच्याकडून ते लॉटरी तिकिट विकत घ्यायचे. तिकीट निवडीसाठी बंड्या नेहमी माझ्या लहान बहिणीला बोलवायचा आणि म्हणायचा ''काका, तिकीट ताईला निवडू द्या, तिच्या नशिबात भाग्य आहे म्हणून तुमचं सगळं छान चालू आहे, घरची लक्षुमी आहे ताई''. आम्हाला तिकीट निवडता न आल्यामुळे बंड्याचा इतका राग यायचा तेव्हा. आईने त्याला द्यायला दिलेल्या दोन लाडवातला एक त्याच्यावरच्या तत्कालीन रागामुळे आम्ही खात असू. इतरवेळी हा माणूस उदरनिर्वाहासाठी काय काम करायचा हे अजूनही कोडंच आहे. त्याची बायको चार घरी स्वयंपाक करायची आणि त्यावरच त्यांचा संसार चालत असावा कदाचित.

आम्हाला आमचा मित्रच वाटायचा तो, पण कधी बंड्या दिवेलागणीला आणि आम्ही नुकतेच शुभंकरोती म्हणून मोठ्यांच्या पाया पडत असताना जर घरी आला तर आमच्या काकांमुळे आम्हाला त्यालाही नमस्कार करावा लागायचा. ''मोठे व्हा, श्रीमंत व्हा'' असा आशीर्वाद देताना त्याच्या डोळ्यांच्या कडा ओल्या व्हायच्या आणि मग ''काकू येतो बरं'' असं म्हणून तो पटकन बाहेर पडायचा. तो असं का करतो विचारलं तर काका म्हणायचे ''अरे त्याला बरं वाटतं तुम्ही पोरांनी नमस्कार केला की, आपुलकी वाटते. दुसरं कोण आहे त्याला?'' खरंच, त्याला आपलं वाटेल असं दुसरं कोणीच नव्हतं. आमच्या पेठेबाहेर त्याला कोणी ओळखत होतं की नाही याचीही शंका आहे. याची कदाचित त्यालाही जाणीव असेल आणि म्हणूनच होती तेवढी नाती त्याने अगदी घट्ट धरून ठेवली होती. शेजार पाजाऱ्यांच्या प्रत्येक आनंदात आणि दुःखात तो नेहमी हजर असायचा. बरं, त्याला कधी आवर्जून बोलावणं असेलच असं नाही किंवा कधी तसा मानही मिळाला नसेल पण त्याला आमंत्रणाची कधी गरजच वाटली नाही आणि कोणी मान द्यावा या अपेक्षांचं ओझं विनाकारण बाळगावं असं कधी त्याच्या ध्यानीही आलं नसेल. पेठेत कोणाकडे लग्न किंवा मुंज असेल तर त्याच्या पत्रिका वाटपाचं काम बंडोपंतांकडे असायचं. स्वच्छ कपडे, डोक्यावर गांधी टोपी आणि कपाळाला गंध लावून तो दारात दिसला म्हणजे आम्ही समजायचो कि कोणाच्या तरी घरचे आमंत्रण द्यायला तो आला असेल. मग ''काका, देशपांड्यांच्या लग्नाची पत्रिका घेऊन आलोय'' असं दारातूनच ओरडायचा. ''आज फार घाई आहे बरं'' असं म्हणून चांगला वीस पंचवीस मिनिटे प्रत्येक घरात घालवायचा. ''देशपांड्यांच्या कवितेने नशीब काढलं, पुण्याला दिलीये तिला, नवरा कुठल्याशा कंपनीत इंजिनीअर आहे, तीन चार वेळा परदेशी सुद्धा जाऊन आला आहे म्हणे, स्वतःचं घर आहे पुण्यात, घरची मंडळीही चांगली आहेत स्वभावांनी, सासरे सरकारी नोकरीत आहेत, सासू शिक्षिका आहे हुजूरपागेत आणि मुलाच्या बहिणीचं लग्न झालंय, अजून काय हवं?''. अशी मुलीच्या होणाऱ्या सासरची माहिती पुरवल्यावर ''कवितेच्या मानाने चांगलंच म्हणायचं हे स्थळ'' असं उगाचच एखादं वाक्य फेकायचा. मग चहा बशीत ओतून भुरके मारत प्यायचा आणि पुढच्या घरी पळायचा .

या माणसाच्या आयुष्यात कोणतीच अडचण नव्हती का? हा इतका निश्चिंत कसा असतो याचं आहाला नेहमी

कोडं पडे. पण महिन्यातून एक दोनदा, संसाराचा भार अनावर झाला आणि नवऱ्याचा निष्काळजीपणा असह्य झाल्यावर त्याची बायको बंड्याचा यथेच्छ पाणउतारा करायची. मग सगळ्या पेठेला बोपर्डीकरांच्या मागच्या बऱ्याच पिढ्यांच्या एकंदर कर्तृत्वाची आणि इतिहासाची पुनःश्च ओळख व्हायची. पण या सर्व प्रकारात बंड्या त्याच्या बायकोला कधीच उलटून किंवा रागावून बोललेला मला आठवत नाही. त्यानंतर बराच वेळ तो पायरीवर बसलेला असायचा. गल्लीतील काही टवाळ पोरं मग त्याला ''काय रे बंड्या, बायको ओरडत होती होय रे?'' म्हणून डिवचायची. त्यालाही तो निर्विकारपणे खांदे उडवून ''चालायचंच'' असं उत्तर द्यायचा. पण त्याच्या डोळ्यात त्यावेळी दुःखाची छटा आणि असहायपणाचे भाव नक्की जाणवायचे, अशावेळी आम्हा मुलांना त्याच्याशी बोलावंस वाटायचं नाही.

काही वर्षांनी शिक्षणासाठी म्हणून आम्ही पुण्याला आलो आणि गावाकडे जाणं कमी होऊ लागलं. अधूनमधून पेठेतलं कोणी भेटायचं आणि तिथल्या सगळ्या वार्ता कळायच्या. अर्थात कधीतरी सणासुदीला गावाला चक्कर व्हायचीच पण मग दिवस त्यातच निघून जायचे आणि परत पुण्याला जायची वेळ यायची. एकदा असाच मी गावाला जाण्यासाठी स्वारगेटवर एसटीची वाट बघत उभा होतो. मागून अचानक पाठीवर थाप पडली, बंडोपंत उभे होते. एसटीला उशीर असल्यामुळे मग आम्ही चहा प्यायला कँटीनमध्ये गेलो. गप्पा चालू झाल्या. मी म्हणालो ''काय बंडोपंत कसं काय म्हणतंय गाव, क्रिकेट चालू आहे की नाही अजून?'' त्यावर तो म्हणाला ''रस्ता रुंदीकरणात आपलं बकुळीचं झाड तोडलं, आता रस्त्याला दुतर्फा गाड्या उभ्या असतात आणि हल्ली पोरांना बाहेर खेळण्यापेक्षा टीव्ही बघण्यात जास्ती मजा वाटतीये, कसलं क्रिकेट आणि कसलं काय. तुमच्यासारखे मित्र नाही उरले आता तिकडे'' एकंदर त्याच्या बोलण्यात पूर्वीचा उत्साह नव्हता, त्याच्या हसऱ्या चेहऱ्यावर कुठेतरी काळजी जाणवू लागली होती. कपाळावर आठ्यांची संख्या वाढली होती आणि पिकलेले केस एकंदरच त्याच्या वयाची जाणीव करून देत होते. बोलता बोलता मग त्याच्या बायकोचा विषय निघाला. ''खूप आजारी असते रे ती हल्ली''. डोळ्यात आलेलं पाणी लपवायचा अतोनात प्रयत्न करीत तो म्हणाला. ''माझ्याकडे जेवढं होत ते सगळं दिलं मी तिला'' बंड्याच्या या वाक्याने जरा दचकलोच मी, पण मग कुत्सित हसत तो म्हणाला ''कष्ट आणि गरिबी'' तो बोलत होता, म्हणाला ''मी तिला कधीच वटसावित्रीचं व्रत करू दिलं नाही. कसंय; त्या देवाला कधी जाग येईल याचा नेम नाही. मी आयुष्यभर रोज पूजा केली पण त्यानं ऐकलं नाही, अन बरोबर हिच्याच व्रताला प्रसन्न व्हायचा तो. बरं, देवाचं काय जातंय; पण पुढचे सात जन्म कष्टात जातील तिचे.'' यानंतर पूर्ण प्रवासात आम्ही काही बोललो नाही. तो खिडकीतून एकटक बाहेर बघत बसून होता.

दीड दोन वर्षांनी बंड्याची बायको गेल्याची बातमी मिळाली. फोनवर बोलताना काकू म्हणाली ''सुटली रे बिचारी, फार कष्टात गेलं तिचं सगळं आयुष्य. देव कोणाची इतकी परीक्षा का बघतो हे त्यालाच ठाऊक''. बंड्याच्या बायकोचा चेहरा डोळ्यापुढे आला. नेहमी तिच्या चेहऱ्यावर गंभीर भाव असायचे, कमी उंची आणि सडपातळ बांधा यामुळे असेल पण तिला बघितलं की तिची दयाच यायची. आमच्याकडे काही कार्यक्रम असेल तर यायची ती पण नेहमी कोणाशी न बोलता कोपऱ्यात उभी असायची. आयुष्यभराच्या कष्टाचा आणि एकंदर परिस्थितीचा परिणाम तिच्या वागण्या बोलण्यात जाणवायचा. असो !

आता बंडोपंत खूप थकलेत असं काकांकडून कळलं. त्याला भेटून यावं असं वाटलं. त्याचं घर अजूनही तसंच होतं. आत अंधाऱ्या खोलीत हा भिंतीला टेकून बसला होता. बऱ्याच वर्षांनी पाहिल्यामुळे खूप म्हातारा वाटत होता तो. मी आलोय असं म्हणल्यावर ''काय म्हणतंय काम? किती दिवस मुक्काम?'' अशी चौकशी त्याने केली. दहा पंधरा मिनिटे गप्पा मारल्यावर मी जाण्यासाठी उठलो. निरोप घेताना तो म्हणाला ''येत जा रे वरचेवर, बरं वाटतं आपली माणसं भेटली की. पुढच्या वेळी याल तेव्हा मी असेन नसेन'', त्याला पुढे बोलवेना आणि मलाही तिथे थांबवेना. येतो, असं म्हणून मी जाण्यासाठी वळलो, माझी नजर खुंटीवर टांगलेल्या त्याच्या सदऱ्यावर पडली, त्याचा खिसा आताही फाटलेलाच होता.

आरंभ

स्मिता जाधव
पुणे

साधारण संध्याकाळी ६ ची वेळ, पंकज स्वातीशी फोनवर बोलत होता, ती मात्र त्याच्याशी बोलण्याच्या मनःस्थितीत नव्हती. ''स्वाती बोल ना गं!,'' ''अरे आत्ता नाही बोलू शकत''- स्वाती. ''का नाही बोलू शकत?'' पंकजचा प्रश्न. ''अरे.. मावशीकडे कार्यक्रमात आहे.'' स्वाती उत्तरली. मग काय झालं? तू टाळू नकोस. पंकज नाराजीच्या सुरात म्हणाला. शेवटी वैतागून स्वाती वडिलांकडे फोन देत म्हणाली. ''पप्पा सांगून टाका त्यांना एकदाचं.'' पप्पा पंकजला म्हणाले.''अहो.. आम्ही दवाखान्यात स्वातीला घेऊन आलोय, कोणत्याही क्षणी तुम्ही आई-वडील व्हाल!'' तुम्हाला सरप्राईज द्यायच होतं..!! पण आनंदाने वेडा झालेल्या पंकजचा राग एकदम मावळला. त्याचे पप्पांच्या बोलण्याकडे बिलकुल लक्ष नव्हते. त्याचे लक्ष त्याच्या बाळाच्या जन्माकडे लागले होते. तो पप्पांना म्हणाला, ''फोन ठेऊ नका, चालूच राहू द्या'' मला माझ्या लेकीचा आवाज ऐकायचाय आहे....!! जणू त्याला तिने आधीच सांगितले होते पप्पा, मी येणार आहे!! पंकज आज स्वातीजवळ नव्हता पण तिच्यावर वेड्यासारखा प्रेम करत होता!! बाळ त्याच्यासाठी लक घेऊन आलं होतं!! संध्याकाळी ७:२० मि. त्यांच्या लेकीचा जन्म झाला!! तिला कुशीत घेण्यासाठी तो आतुर होता, मात्र प्रचंड संघर्षानंतर तो नोकरीत स्थिरावणार होता. दुसऱ्याच दिवशी त्याचा नामांकित कंपनीत पर्मनंट होण्यासाठीचा इंटरव्ह्यू होता, नाहीतर तो वाऱ्याच्या वेगाने मागे फिरला असता, आदल्या रात्रीच तर तो स्वातीला भेटून पुण्याला परतला होता. इंटरव्ह्यूनंतर जराही वेळ न दवडता तो ३ तास प्रवास करत लेकीजवळ पोहोचला.

स्वातीच्या कुशीत विसावलेल्या तिला अलगद उचलून घेताच पंकजचे डोळे झरझर वाहू लागले!! एखाद्या आईप्रमाणे तो तिचे पटापट पापे घेत होता!! तीही ९ महिन्यांनतर प्रत्यक्षपणे त्याच्या कुशीत विसावली होती!! कारण तोपर्यंत तिला बाबाची ओळख फक्त बाह्य स्पर्शातूनच होती. एव्हाना तिचे गोबरे मुलायम गाल लालबुंद झाले होते!! गुलाबाच्या रंगाचे, प्राजक्ताच्या देठासारखे नाजुक ओठ थरथरत होते!! मात्र तो इवलासा जीव अजिबात म्हणून रडत नव्हता. पंकजच्या झरणाऱ्या डोळ्यातून लेकीवरचं प्रेम, आनंद, अन् त्याचबरोबर दुःखदायक आठवणीच ओघळत होत्या. स्वातीला त्याच्या भावना समजत होत्या. लेकीकडे पाहत तो मात्र २२ वर्षे मागे भूतकाळात गेला.

३१ मे १९८८ काळा दिवस!! त्याच्या आयुष्यातील आईचं प्रेम, बहिणीची माया, वडिलांचा सहवास हिरावून नेणारा अपघात आठवला. हसतं खेळतं घर उध्वस्त झालं. त्यानंतर हसणं काय की रडणं काय सर्व काही सारखंच.. १० वर्षाच्या त्याला आई, बहीण हिरावून नेणाऱ्या देवाचा राग येत होता. त्याहून वाईट झाले ते वडिलांच्या दुसऱ्या लग्नानंतर, कोवळ्या वयात समजूतदारपणा दाखवला. वडिलांनी विचारलेल्या मी लग्न करू का रे बाळ? या प्रश्नाला बाबा तुम्हाला बरं वाटत असेल तर करा, असे उत्तर दिले. तो अकाली प्रौढ झाला, सगळ्यांचा ओरडा खाणारा, आईच्या गळ्यातला ताईत असणारा अल्लड पंकज कुठे हरवला कोणास ठाऊक? आता तो एकटा, एकाकी झाला, सर्कशीतील विदुषकासारखा मनात अतीव दुःख असताना

आनंद शोधणारा, दुसऱ्यांना आनंद देणारा, हास्याचा, उत्साहाचा जणू खळखळता झराच....!! गोष्टीमधल्या सिंड्रेलासारखं त्याचं आयुष्य दु:खात, वडिलांच्या सहवासासाठी आसुसलेले चाललं होतं. वडिलांचे हात बांधल्यासारखे झाले होते, पण ते काहीच करू शकत नव्हते. एक मात्र त्यांनी केले. त्याला उच्चशिक्षित केले. या सगळ्यात तो कधी घरापासून, वडिलांपासून दूर फेकला गेला त्यालाच कळले नाही.

आयुष्याच्या खडतर प्रवासात १० वर्षांचा पंकज तरुणपणाच्या उंबरठ्यावर पोहोचला, आणि त्याला स्वाती भेटली. त्याच्या आयुष्याला जणू अर्थच आला. मात्र दोघांच्याही मनात फुलणारं प्रेम कधी ओठांवर आलंच नाही. प्रेम होते पण त्यात एकमेकांबद्दल आदर होता, सहवासाची ओढ होती, पण मर्यादेचा बांध होता. न बोलता प्रेमाचा प्रवास ९ वर्षे चालला. कुणीच व्यक्त झालं नाही. दरम्यान पंकज उच्चशिक्षित झाला. पुन्हा स्वातीच्या आठवणींनी मनात काहूर माजलं, वाटलं तिला भेटावं!!; पण मनात असंख्य प्रश्न होते. तिचं लग्न झालं असेल का छे!! या विचारांना छेद देत तो स्वातीच्या घरी पोहोचला, त्याला पाहून तीही स्तब्ध झाली, त्याने प्रथम तिच्या गळ्याकडे पाहिले. हुश्श. मंगळसूत्र नाही!! म्हणजे ती जणू माझीच वाट पाहत आहे, अरे व्वा.!! तो स्वतःशीच पुटपुटला. घरातल्या गलक्यात न बोलताही दोघे बरंच काही बोलून गेलेली. त्याने ठरवून टाकले. आता तिच्यासमोर मनातलं प्रेम व्यक्त करायचं!! एकदा तरी बोलायचं, तिचं मन जाणून घ्यायचं.. त्याच्या येण्याने स्वातीची काही वेगळी अवस्था नव्हती!! अचानक तिच्या ह्रदयाची गती वाढली होती. वातावरण आल्हाददायक झाले होते!! मन तिच्या ताब्यातच नव्हते मुळी!! तीही तोच विचार करत होती की जो पंकजच्या मनात घोळत होता. अगदी सिनेमात होतं ना तशी अवस्था होती दोघांची!!

अखेर पंकज आणि स्वाती व्यक्त झाले!! स्वातीच्या घरचे स्थळ घेऊन पंकजच्या वडिलांकडे गेले, मात्र पंकजच्या घरचे ''आय. ए. एस.'' च्या अभ्यासाचं कारण देत म्हणाले, ''एकदा का तो आय. ए. एस. झाला की प्राधान्य तुम्हालाच....!!'' थोडक्यात नकार दिला. स्वातीच्या आई वडिलांनी पंकजला धीर देत सांगितले, ''जरी तुमचे लग्न नाही झाले स्वातीशी, तरी आमच्या घराची दारे तुझ्यासाठी सदैव उघडी असतील....!! पण स्वाती आणि तिच्या कुटुंबाकडून मिळालेल्या प्रेमाला पारखे होण्याच्या विचाराने पंकज पूर्णपणे कोलमडला..!! स्वातीने तर त्याला सांगूनच टाकले. ''हे बघ पंकज.. आता आपले मार्ग वेगळे, माझ्या पाठच्या बहिणींमुळे माझे आई वडील थांबू शकत नाहीत, पण प्रेम फक्त तूच असशील, आपण आयुष्यात पुढे जाणे योग्य.!!''

आयुष्य पुढं चाललं होतं, पंकज अभ्यासात तर स्वातीचे आईवडील तिला स्थळ पाहण्यात व्यस्त होते. एक दिवस संध्याकाळी पंकज मित्राबरोबर फिरायला बाहेर पडला, तोच त्याचा फोन वाजला., हॅलो.!!.... पंकज.!!

पंकज आवाज ऐकून त्याला आकाश ठेंगणं वाटू लागलं, त्याच्या ह्रदयाची गती वाढली.!!

हैलो.!!, स्वाती.!! खूप बरं वाटलं गं तुझा इतक्या दिवसानंतर आवाज ऐकून.!! क्षणभर शांतता पसरली. ती काहीच बोलली नाही....!! पंकज पुन्हा म्हणाला, ''स्वाती. कशी आहेस? ''अरे, माझं लग्न ठरतंय..!! बाबा गेलेत बोलणी करायला. पुन्हा लग्न झाल्यावर मी काय किंवा तू काय. काहीच करु शकणार नाही, म्हणून एकदा तुला शेवटचं सांगितलं.!!'' भरल्या आवाजात ती म्हणाली.

पंकजला मात्र काय बोलावे ते सुचले नाही आणि तो काही बोलणार तोच फोन बंद झाला होता. आता मात्र त्याच्या पायाखालची जमीन सरकली, डोळ्यासमोर अंधार दाटू लागला. क्षणाचाही विलंब न करता, त्याने वडिलांना फोन लावला. पंकज बोलत होता. स्तब्ध होऊन वडील ऐकत होते. ''बाबा.!! आई -दिदी गेल्यानंतर मी तुम्हांला माझ्यासाठी म्हणून हट्टाने काही मागितले का?''

बाबा म्हणाले, ''अरे आज तू असं का बोलतोयस?'' पंकज म्हणाला. ''आज मला एकच गोष्ट द्या, माझी स्वाती.!! तुम्ही नाही म्हणालात तरीचं मी काहीच म्हणणार नाही, मी तुम्ही सांगाल त्या मुलीशी लग्न करेन.!! मात्र. ती तुमची सून असेल पण माझी पत्नी मात्र नसेल..!! आता निर्णय तुमचा असेल, स्वातीचं लग्न ठरतंय..!!'' एवढे बोलून पंकजने फोन ठेवला. वडिलांचा १५ मिनिटात फोन आला. तो तुझं लग्न

स्वातीशी ठरले आहे, हे सांगणारा!!

पंकजच्या सावत्र आईच्या विरोधात प्रथमच त्याचे वडील त्याच्या पाठीशी उभे राहिले. कारण तो तेव्हा तरी सुशिक्षित बेरोजगार, स्पर्धा परीक्षा देणारा तरुण होता. वेळेपरत्वे त्याच्यासह स्वातीची जबाबदारी आपल्या नवऱ्यावर असणे सावत्र आईला असह्य होते. पण नियतीच्या मनात त्या दोघांचे एकत्र येणे निश्चितच होते!!

पंकज स्वातीच्या संसारला सुरूवात झाली!! त्याने प्रयत्न करून नामांकित कंपनीत नोकरी मिळवली. दोन वर्षांनी अनेक चढ–उतार पाहत दोघेही संसारात स्थिरावले. हे सिद्ध झालं. त्याचं प्रेम हे फक्त स्वाती आणि त्याच्या हातातील इवल्याशा आर्णासाठीच होतं. आज मात्र देवाचा राग राग करणाऱ्या, वारंवार मलाच त्रास का, मला प्रेम का नाही मिळत? असे प्रश्न विचारणाऱ्या पंकजने देवाचे भरभरून आभार मानले!!

स्वातीकडे वळून तो म्हणाला, ''माझ्या जीवनाचा, त्यातील प्रेमाचा खऱ्या अर्थाने आज आरंभ झालाय गं!!'' कारण आज माझ्याकडे तुझ्या रूपाने माझी आई!! आणि आर्णाच्या रूपाने दिदी!! माघारी दिल्यात देवाने!!

आणि दोघांनी इवल्याशा अपर्णाला घट्ट धरून,अश्रू अन् भावनांना वाट करून दिली!!

गणेश : डॉक्टर सकाळी उठल्यावर श्वास घेणं अत्यंत जड जातं.

डॉक्टर : किती वाजता उठता?

गणेश : आठ वाजता

डॉक्टर : लवकर उठत जा ना....
रामदेव बाबांचे लोक सहा वाजताच सगळा ऑक्सिजन ओढून घेतात.

– रेखा पै

मुंगीबाई

मुंगीबाई मुंगीबाई
नेहमीच असते तुला घाई
सदा तुझे काम सुरू,
चालत असते तुरूतुरू.

तोंडात धरून साखरेचा कण,
रांगेत चालते, नाही तणतण
केवढा तरी कामाचा भार!
कधीच नाही तुझी तक्रार.

मुंगीबाई मुंगीबाई,
कसे कळते तुला बाई,
गोड धोड कुठे ठेवले?
लगेच रांग दिसू लागते.

किती शिस्त तुझी बाई,
रांग कधी मोडत नाही
वारूळात तुझ्या किती,
खाऊची असतील पोती.

धान्यसाठा उद्यासाठी,
संकटकाळी कामी येई,
मेहनत करा, आळस सोडा,
मुंगीबाई सांगते सदा.

–अश्विनी क्षीरसागर (सिॲटल)

क्षमा

वासंती मुदकण्णा
मिनेसोटा

अमृताचा फोन वाजला. कणिक तिंबतातिंबता तिने फोनकडे कटाक्ष टाकला. विनीतचं नाव पाहून तिनं करंगळीनं फोनचं बटन दाबलं आणि आनंदानं म्हणाली, ''हॅलो विनीत! आज अमेरिकेची कशी काय आठवण काढलीस?'' विनीत लंडनमधे होता. तो म्हणाला, ''आजकाल तुमचा देश सगळ्यांवर दादागिरी करतोय. म्हटलं बघावं तुझं काय मत आहे''.

अमेरिकेत जे चाललं होतं त्याबद्दल बोलून अमृताला स्वतःला कटकट करून घ्यायची नव्हती. ती म्हणाली, ''माझे उदारमतवादी विचार तुला माहीतच आहेत. देशात जे काही चाललं आहे त्याचा मला खूप मनःस्ताप होतो, कारण मी काही करू शकत नाही. पण ते जाऊ देत. माझ्या जीवनात अशी एक घटना घडली आहे, त्यात तुला नक्कीच रस वाटेल. तुला संजीव मिश्रा आठवतो का?''

विनीतचं मन एकदम भूतकाळात गेलं. तीस वर्षांपूर्वी अमृता आणि विनीत लंडनमधे एकाच प्रोजेक्टवर होते. प्रोजेक्ट त्यांच्या भारतीय कंपनीनं चालवलेला होता. तीस पुरुष आणि एक स्त्री म्हणजे अमृता असे सगळे दिवसरात्र काम करत होते.

तीस वर्षांची अमृता अविवाहित होती तर काही वरिष्ठांची आणि काही २५-२६ वर्षांच्या मुलांची लग्नं झाली होती. त्यांच्या बायका 'भारतीय नारी' ह्या संकल्पनेप्रमाणे मुलांना जन्म देणे, स्वयंपाक करणे आणि घर सांभाळणे यातच आपल्या जीवनाची सफलता शोधत होत्या पण अमृता वेगळी होती. एकटी राहायला शिकली होती. पुरुषांच्या बरोबरीनं आणि कधीकधी त्यांच्यापेक्षा जास्त सरसतेनं काम तर करायचीच पण परदेशात कसं राहायचं आणि वागायचं हे पण शिकली होती. हायवेवरून सर्रास आपली गाडी जोरात हाणायची. तिची भरारी आकाशाकडे होती, पण भारतातून पहिल्यांदाच बाहेर पडलेल्या पुरुषी मनाला तिनं केलेली प्रगती पचायची नाही आणि त्याची परिणती काहीतरी खुसपटं काढून तिला त्रास देण्यात व्हायची.

फक्त विनीतच असा एक होता की जो अमृताला माणसाप्रमाणे वागवायचा. स्त्रीकडून असणाऱ्या पारंपरिक अपेक्षा त्याच्या मनाला शिवायच्या देखील नाहीत. पण जेव्हा वरिष्ठांची फूस टीममधल्या तरुणांना मिळू लागली तेव्हा विनीत फारसं काही करू शकला नाही.

तो म्हणाला, ''संजीव? हो थोडाफार आठवतो आहे. चांगला गुबगुबीत होता ना? आणि त्याची बायको त्याला साजेशी होती!'' हे वर्णन ऐकून अमृता हसली. अगदी चपखल वर्णन होतं दोघांचं! म्हणाली, ''हो. तो दुसऱ्या तुकडीबरोबर लंडनला आला होता. तो माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान होता आणि इतर नवीन प्रशिक्षणार्थ्यांबरोबर मुंबईत आमची ओळख झाली होती. हे सगळे प्रशिक्षणार्थी आमच्या घरी खूपदा यायचे. त्या सगळ्यांची ओळख माझ्या आईवडिलांशी झालेली होती''.

विनीत म्हणाला, ''तुमची घरची ओळख होती हे मला माहीत नव्हतं. बरं, तर इतक्या वर्षांनी तुला त्याची का आठवण झाली?''

अमृता म्हणाली, ''तुला माहीतच आहे की मी फेसबुकवर गेली पाच वर्षं 'डॉरमन्ट' म्हणजे झोपी गेलेली आहे. माझं अकाउंट आहे पण मी कधी फेसबुक ॲप उघडत नाही. परवा काही कारणानं मला फेसबुक पाहावं लागलं. बरेच मेसेज होते आणि माझी नजर सहज एका मेसेजवर पडली. तो मेसेज संजीवनं दोन वर्षांपूर्वी पाठवलेला होता. मी तो वाचला आणि मला प्रचंड धक्का बसला!''

अमृता बोलायची बंद झाली म्हणून विनीत म्हणाला, ''असं काय लिहिलं होतं त्यानं? आणि हो, त्यानंच भारतातून

तुपाचा मोठा डबा चेक-इन केलेल्या बॅगेतून आणला होता आणि तूप वितळून बॅगभर पसरलं होतं ना?''

ती मजेदार घटना आठवून विनीत हसला पण अमृता दबलेल्या आवाजात म्हणाली, ''होय. तोच तो. मेसेजमधे त्यानं लिहिलं होतं की 'आजकाल मला आपले लंडनमधले दिवस खूपदा आठवतात आणि मनात विचारांचं काहूर माजतं. त्यावेळी मी तुझ्याबरोबर वाईट वागलो. माझी वागणूक अगदी असभ्य होती, हे मला आता कळतं आहे. तुझ्या आईवडिलांना तुझ्याकरता काही वस्तू पाठवायच्या होत्या, पण त्या न्यायला मी नकार दिला आणि त्यांना दुखावलं. नंतर प्रोजेक्टमधेही मी इतरांबरोबर तुला त्रास दिला. मी त्या काळी सव्वीस वर्षांचा होतो पण तरी माझ्यात बालिशपणा खूप होता. त्याबद्दल आणि तुला दिलेल्या त्रासाबद्दल मी तुझी क्षमा मागत आहे. मी तुला खूप मनःस्ताप दिला. जर घड्याळाचे काटे मागे फिरवून मी भूतकाळ बदलू शकलो असतो तर मी ते केलं असतं पण ते काही शक्य नाही. आयुष्याच्या अखेरपर्यंत ही गोष्ट मला जाचत राहणार आहे''.

अमृता बोलायची थांबली. काही क्षण शांततेत गेले. मग विनीत म्हणाला, ''मग तू काय केलंस?''

अमृता म्हणाली, ''हे पत्र पाहून मला आधी आश्चर्य वाटलं. आजपर्यंत त्या प्रोजेक्टमधील कोणीही असे विचार व्यक्त केले नाहीयेत. आणि कोणी करेल अशी माझी अपेक्षा पण नाही. मला नेहमी वाटतं की लोक आपल्या खऱ्या अपराधाबद्दल कधीच क्षमा मागत नाहीत. कुठल्या तरी फालतू गोष्टीबद्दल क्षमा मागतील पण खरंच काही चूक केली असेल तर मात्र त्याबाबतीत ब्र सुद्धा काढत नाहीत. आणि इथे तर हा माणूस तीस वर्षांपूर्वी केलेल्या चुकीची माफी मागतो आहे! मला हे जरा 'अल्कोहोलिक्स अनॉनिमसच्या १२-स्टेप प्रोग्रॅम' सारखं वाटलं. कदाचित त्याच्या मानसशास्त्रीय थेरपिस्टनं त्याला हा मार्ग सुचवला असेल''.

विनीत परत म्हणाला, ''तू काय केलंस?''

अमृता आपल्याच जगात होती. म्हणाली, ''मी जॉनला काय करावं असं विचारलं. तो लगेच म्हणाला 'तू त्याला मेसेज पाठव की झालं-गेलं विसरून जा. मी पण विसरून गेले आहे'. माझा नवरा अगदी शुद्ध मनाचा आहे. पण मला ते पटलं नाही. आणि परत संजीवचा मेसेज पाहिला तर त्यात तो कुठेही माझ्याकडून काहीही अपेक्षा करत नाही. ह्याचा अर्थ हा मेसेज लिहिण्यात त्याला नक्कीच त्याच्या थेरपिस्टनं मदत केली आहे''.

अमृता बोलायची थांबली. विनीत म्हणाला, ''म्हणजे तू काहीच केलं नाहीस तर!''

इतका वेळ अमृता शांतपणे बोलत होती पण आता एकदम उद्वेगानं म्हणाली, ''हा संजीव आधी खूप साधाभोळा होता. मुंबईत इतर प्रशिक्षणार्थी त्याच्या साधेपणाचा फायदा घेऊन त्याची टर उडवायचे, रेस्टॉरंटमध्ये सगळ्यांचं बिल भरायला लावायचे, त्याला चुकवून सिनेमा बघायला जायचे. अगदी कॉलेजमधे रॅगिंग करतात तसं. मला वाईट वाटायचं म्हणून मी त्याची बाजू घेऊन बोलायची आणि इतरांना रागवायची. ते सगळे माझ्यापेक्षा लहान असल्यामुळे बऱ्याचदा माझं ऐकायचे. मी लंडनला गेल्यावर ह्या मुलांशी माझा फारसा संबंध राहिला नाही''.

ती बोलायची थांबली म्हणून विनीत म्हणाला, ''आणि मग तो लंडनला आला?''

अमृता म्हणाली, ''मला लंडनमधे दोन वर्षं झाली होती. नवीन प्रोजेक्ट सुरू झालं आणि सगळे वरिष्ठ अधिकारी आले. आल्याआल्याच त्यांनी माझा दुःस्वास सुरू केला कारण दोन वर्षं परदेशात एकटीनं काढून मी स्वतंत्र झाले होते. त्यानंतर आठ महिन्यांनी कनिष्ठ कर्मचाऱ्यांचा गट आला. त्यात संजीव होता. मला वाटलं की हा माझा मित्र आहे. प्रोजेक्टमधल्या विचित्र वातावरणात मला पाठिंबा देईल. बायकोशी ओळख करून देईल. पण झालं भलतंच! प्रोजेक्टमधील भांडाभांडी आणि पडलेले गट, वरिष्ठ अधिकारी त्यांना न आवडणाऱ्या लोकांना कसे वागवतात, प्रोजेक्ट मॅनेजर कशी मनमानी करतो, हे सगळे पाहिले आणि मग कोणाशी मैत्री करायची आणि कोणापासून दूर राहायचे हे त्यानं ठरवले. आणि अर्थात मी त्याची शत्रू ठरले. दोन-अडीच वर्षांत भोळ्या सांबाचा चाणक्य झाला होता!''

तिचा आवाज चढला होता म्हणून तिला शांत करण्यासाठी विनीत म्हणाला, ''अगं, मला माहीत आहे. पण त्याला दोष देऊ नकोस. प्रत्येक माणूस आपलं भलं कसं होईल हेच बघत असतो. परदेशात एकत्र राहणारी आणि एकत्र काम करणारी तीस माणसं, त्यांनी तिथे एक छोटा भारतच निर्माण केला! आपला फायदा कसा होईल आणि जास्तीत जास्त

दिवस आपण लंडनमधे राहून पैसे कसे कमवू, एवढा एकच ध्यास सगळ्यांना होता''.

पण अमृता आणखीनच उद्विग्न झाली, ''ते कळतंय रे मला सगळं! पण प्रत्येक वेळी त्यांचा गट काही ना काही उचापती करून मला त्रास द्यायचा तेव्हा हा पण त्यात सहभागी होतो आहे हे पाहून मला खूप राग यायचा. शेवटी मी प्रोजेक्ट सोडला, लंडन सोडलं आणि भारतात घरी परत गेले. मला वाटलं की कटकट संपली. पण मनावर झालेला परिणाम मी आजवर भोगते आहे. अजून कोणावर विश्वास ठेवायला माझं मन कचरतं; मित्र–मैत्रिणींनी माझ्याविरुद्ध काही केलं, मग ते किती का क्षुल्लक असेना, की माझा राग एकदम शिगेला पोचतो! आणि आता हा संजीव चार ओळींची माफी मागून स्वतःला मक्त करू पाहतो आहे. आणि मला मात्र आयुष्यभर ह्या जखमेची जोखीम मनावर आणि प्रकृतीवर वागवावी लागते आहे!''

तिचा हुंदका ऐकून विनीतला तीस वर्षांपूर्वीची साधी पण हुशार आणि स्वतंत्र विचारांची अमृता आठवली. तो तिला पहिल्यांदा भेटला होता तेव्हा ती खूप हसरी होती आणि भारतातील संकुचित वातावरण सोडून लंडनमधील स्त्रियांना मिळणाऱ्या स्वातंत्र्याचा आनंद उपभोगणारी एक तरुणी होती. आणि तेव्हा झालेले आघात संजीवच्या मेसेजमुळे परत तिला रडवत होते! तो म्हणाला, ''अमृता, रडणं थांबव आणि डोळे पूस! संजीव, त्याचा मेसेज, आणि लंडन, हे सगळं विसरून जा! जॉन कुठं आहे? त्याच्याबरोबर सुखी जीवन जगते आहेस ना? मग झाल्या गेल्या गोष्टी, ज्यांच्यावर तुझं काही नियंत्रण नव्हतं, त्यांच्या आठवणी उरात ठेवून स्वतःला आणि आपल्या प्रियजनांना का त्रास देतेस?''

अमृतानं एक निःश्वास टाकला आणि म्हणाली, ''बरोबर आहे तुझं! तू माझ्यावरचं दडपण कमी केलंस. वाटलंच कधी तर जॉन म्हणतो त्याप्रमाणे मी पण संजीवला दोन ओळी लिहीन आणि सांगीन की मी तुला कधीच विसरले आहे. मी तुला क्षमा केली आहे, असं खोटं बोलणार नाही. बरं, तू इथे कधी येतो आहेस?''

आणखी गप्पा मारून विनीतनं फोन ठेवला. पण अमृताची जखम अजून दुखरी आहे, हे पाहून विनीतला वाईट वाटलं.

खारूताई

खारूताई खारूताई
किती चपळ ग बाई
इकडे तिकडे वर खाली
जरा देखील उसंत नाही

शेपटी तुझी झुपकेदार
उभी राहतेस ऐटदार
झाडावर चढते झरझर
फांदीवर धावते सरसर

कशी लुकलुक बघते,
काय सारखी शोधते?
फळे, बिया, कोवळे कोंब
किती खाऊ गोळा करते!

झाडावर छोटंसं घर
उड्या मारतेस खाली वर
चाहूल लागता होते पसार
क्षणात होई नजरे पार

माझ्याशी मैत्री करतेस का?
लपाछपी खेळतेस का?
लपू दोघे झाडाच्या ढोलीत
आई मग बसेल शोधीत.

– **अश्विनी क्षीरसागर** (सिॲटल)

मिठाने उडवलेली ब्रिटिश साम्राज्याची दांडी

- जय मसुरेकर
सोलोन ओहायो

एक साठीचा म्हातारा वकील खादीचे कपडे आणि हातात काठी घेऊन अहमदाबादवरून अरबी समुद्राकडे २४० मैलांची पदयात्रा करायला निघाला तेंव्हा प्रश्न मिठाचा कधी नव्हताच. प्रश्न होता ब्रिटिश साम्राज्याने भारताला मारलेल्या मगरमिठीचा. १८८२ च्या ब्रिटिश सॉल्ट ॲक्टद्वारे भारतीयांना मीठ बनवायला किंवा विकायला बंदी घातली गेली होती. भारतीय जेवणातील कदाचित सर्वात महत्त्वाचा घटक असलेले मीठ अव्वाच्या सव्वा भावाने मिठाची संपूर्ण मक्तेदारी असलेल्या ब्रिटिश व्यापाऱ्यांकडूनच विकत घ्यायची सक्ती होती. ब्रिटिशांनी भारतावर विजय हा बंदुका, लष्करी तंत्रज्ञान आणि नौकादलाच्या जोरावर मिळवला असला तरी त्यांनी भारताला आपल्या नियंत्रणात ठेवलं होतं ते आर्थिक पायाभूत सुविधांच्या मार्फत. ह्यासाठी मिठासारखे दुसरे परिपूर्ण शस्त्र नव्हतं.

पण मग मीठच कां? कारण मिठाची गरज ही सगळ्यांनाच असते. श्रीमंत शेठ असो वा गरीब मजूर, सगळ्यांनाच मिठाद्वारे सरकारला कर भरावाच लागणार शिवाय मीठ नैसर्गिकरित्याच भारतीय किनाऱ्यांवर बनते म्हणजे सरकारचा खर्च शून्य. अंमलबजावणीलाही विशेष खर्च नाही म्हणजे कमीत कमी खर्चात प्रचंड प्रमाणात सरकारची आमदनी. ब्रिटिशांना एक मूलभूत सत्य समजलं होतं, ते म्हणजे जनतेच्या गरजेच्या गोष्टींवर नियंत्रण ठेवलं की लोकांवरही नियंत्रण ठेवता येते. भारतीयांच्याच संसाधनांचे (रिसोर्सेस) वित्तियकरण करून चालवलेल्या ह्या साम्राज्याला आव्हान देणं जवळपास अशक्य होत चाललं होतं. पण व्यापारी राजसत्तेला आव्हान देण्याची शक्कल शेवटी एका बनियालाच सुचणार ना? ती शक्कल होती मिठाचा सत्याग्रह.

प्रत्यक्ष गांधीजींचे अनुयायी देखील ह्या सत्याग्रहाबद्दल साशंक होते. स्वतः पंडित नेहरूंनी कबुली दिली होती की स्वातंत्र्याच्या चळवळीचा आणि मिठाचा काय संबंध हे त्यांना आणि इतर सहकाऱ्यांना कळत नव्हते. पण मिठाचे एकाधिकरण हे ब्रिटिशांच्या भारतावरील सत्तेच्या मूलभूत

अवैधतेचे सर्वात जळजळीत उदाहरण होते. आता प्रश्न सैन्यबळ अथवा लष्करी तंत्रज्ञानाचा नव्हता तर भारतीयांची दौलत लुटून ब्रिटनला पाठवणाऱ्या जुलमी आर्थिक व्यवस्थेचा होता.

१२ मार्च १९३० ला गांधीजी त्यांच्या ७८ अनुयायांसमवेत २४ दिवसांच्या दांडी यात्रेवर निघाले. वाटेत खेडीच्या खेडी, गावंच्या गावं त्यांच्या सोबत पदयात्रेत सामील झाली. ६ एप्रिलला गांधीजींनी सागरी किनाऱ्यावर मूठभर मीठ उचलले, तेंव्हा संपूर्ण जगाची नजर त्या मुठीवर होती.

त्या पदयात्रेमुळे लाखो भारतीय सविनय कायदेभंगाच्या चळवळीत सामील झाले. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी ६०,००० हुन अधिक लोकांना तुरुंगात टाकलं. ब्रिटिशांची कागदोपत्रे दर्शवतात की ह्या पदयात्रेने ब्रिटिशांना हादरवून सोडलं होतं; गोंधळून टाकलं होतं. युध्दात मातब्बर असलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांना अहिंसात्मक प्रतिस्पर्ध्यांना कसे नामोहरम करावे, तेच कळेना. समुद्रकिनाऱ्यावर नुसतं मीठ उचलणाऱ्या माणसाला तुम्ही प्रत्युत्तर काय देणार? हिंसा केली तर अत्याचार करणारे जुलमी शासक अशी प्रतिमा होते; वाटाघाटी केल्या तर तुम्ही विरोधकांना कायदेशीर मान्यता देता आणि तुमची मक्तेदारी अन्यायकारक आहे हे मान्य करता. काहीच केलं नाही तर तुमच्या साम्राज्याची संपूर्ण कायदेशीर प्रणाली कोसळते.

ह्या घटनेपूर्वीच्या काळात भारतीय हे गृहीत धरूनच चालत होते की ब्रिटिश हे भारतीयांहून श्रेष्ठ आहेत. पण मिठाच्या सत्याग्रहाने हा दृष्टिकोन बदलला. मिठासारख्या छोट्या पण अत्यावश्यक गोष्टीबाबत ब्रिटिशांनी दाखवलेली अविचल कठोरता आणि क्रौर्य पाहून लाखो भारतीयांचे हृदयपरिवर्तन झाले. गांधीजींनी काही केवळ दांडीयात्रेद्वारे ब्रिटिश सत्ता उलथली नाही पण चाणक्यनीतीतील ''प्रजाभि: पिड्यमानो हि राजा ना चिरंजिवती'' म्हणजे जुलमी शासक फार काळ राहात नाहीत ह्या वचनाची जाणीव त्यांनी भारतीयांना प्रखरतेने करून दिली आणि ब्रिटिश साम्राज्याचा सूर्य मावळायला सुरुवात झाली.

अधिवेशनानंतर

(अधिवेशनात दिवसरात्र नि:स्वार्थ भावाने मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी, स्वयंसेवकांसाठी आणि त्यांचे नेतृत्व करणाऱ्यांसाठी)

पडदा पडला, सूप वाजले
अधिवेशन संपले खरे
रित्या रित्या त्या सभागृहातून
अजून घुमती तानपुरे

हार जयाचे, पै-पैशाचे
हिशेबही निपटले जरी
अजून येते जाग रातीला
काम राहिले किती तरी

वळून मागे बघता दिसते
आठवणींचे इंद्रधनु
सुखद:खाचे अनुभव अपुले
ऊनपावसापरी जणू

रूसलो, फुगलो, रडलो, हसलो
किती शिणवली काया
एक आपुले घरकुल आणिक
एक आपुला पाया

मंचावरती जरी उभी मी
ही तुमचीच साथ
मनात स्मरतो अडचणीत जो
दिलात मजला हात

पुन्हा न येती गेलेले क्षण
पुन्हा न ती अनुभूती
शिदोरी परी अनुभवांची
देई मनास शक्ती

वर्षे सरतील तरी ओठांवर
राहतील ही गाणी
डोळ्यांमधुनी दाटून येईल
परिपूर्तीचे पाणी
परिपूर्तीचे पाणी

– **अनिता कांत** (कॅलिफोर्निया)

वारी अंतरंगाची

सुप्रसाद बारपांडे
अंधेरी, मुंबई

इंजिनिअर झाल्यावर आदित्यला मुंबईला एका नामांकित कंपनीत नोकरी मिळाली. मुळातच हुशार व मेहनती असल्याने त्याला भराभर बढती मिळत गेली. मॅनेजमेंटचा लाडका असं त्याला म्हटलं जाई. वेळोवेळी बढती व घसघशीत पगारवाढ त्याला मिळत होती. गेली चार पाच वर्षे आदित्य प्रोजेक्ट मॅनेजर म्हणून मोठ्या जबाबदारीचे काम करत होता.

आज मात्र संध्याकाळी आपला लॅपटॉप बंद करून भिंतीवरील घड्याळाकडे नुसताच बघत बसून राहिला होता. ऑफिसमधून घरी जाता जाता आदित्यच्या केबिनमध्ये स्वप्नील, आदित्यचा मित्र डोकावला. आदित्यला तसा बसलेला बघून स्वप्नील आत आला. ''काय रं? असा का बसला आहेस? सब कुछ ठीक चल रहा है ना?'' आदित्यकडून काहीही प्रतिसाद आला नाही. स्वप्नीलने त्याच्या खांद्यावर हात ठेवला. म्हणाला,''आदित्य, तू थोडा अस्वस्थ वाटतोस. चल, खाली जाऊन एक मस्त कडक कॉफी घेऊ. मग तुला फ्रेश वाटेल. मग सावकाश सांग तुझ्या मनात काय वादळ चालू आहे ते.'' स्वप्नीलच्या शब्दाखातर आदित्य उठला. दोघेही ऑफिस जवळच असलेल्या कॉफी शॉपमध्ये गेले.

स्वप्नीलने दोघांसाठी नेहमीची आवडीची कॉफी मागवली. कॉफी येईपर्यंत आदित्य काहीही बोलला नाही. कॉफी आल्यावर कॉफीचा घोट घेऊन मनाला तरतरी आल्यावर स्वप्नीलनेच सुरवात केली. ''आदित्य गेली आठ वर्षे आपण as team member म्हणून एकत्र काम करत आहोत. आपण नुसते कलीग नाही तर आता चांगले मित्रही आहोत. मोकळेपणाने सांग काय झालंय? का एवढा अस्वस्थ झाला आहेस? मनात काय वादळ चालू आहे?'' कॉफीचा गरम घोट पोटात जाताच अदित्य बोलू लागला. ''अरे! मला या कॉर्पोरेट जीवनाचा अगदी कंटाळा आला आहे. काम करायचे ते अमेरिकन वेळेनुसार. सतत लॅपटॉप वर काम, सतत कॉल्स, आणि मिटींग्ज. मनाला जरा उसंत म्हणून नाही. या सगळ्याचा आता ताण जाणवायला लागला आहे. मनावर आणि शरीरावर पण.'' '' अरे आदित्य, अरे, आपल्याला याचाच तर भला भक्कम पगार मिळतो ना!'', स्वप्नील आदित्यच्या खांद्यावर हात टाकत म्हणाला. तो हात बाजूला सारत आदित्य त्याला तोडत म्हणाला, ''असा पगार काय कामाचा, जो वेळ नसल्यामुळे स्वतःच्या आनंदासाठी वापरता येत नाही. घराचे हप्ते, विम्याचे हप्ते, गाडीचे हप्ते आणि घरखर्च यातच निम्म्याहून अधिक पगार खर्च होतो. जो उरतो तो मनाप्रमाणे खर्च करायचा तर वेळच नाही. सुरुवातीला मोठ्ठं आकर्षक पॅकेज म्हणून मी हा जॉब स्वीकारला, पण आता त्या टार्गेट्सच्या विळख्यात असा काही अडकलो आहे, की माझा जणू अभिमन्यू झाला आहे. बाहेरच पडता येत नाही.''

स्वप्नीलने सुचवले, ''अरे, अशा वेळा येतातच कॉर्पोरेट जीवनात. माझ ऐक. तू थोडे दिवस सुट्टी घे. हल्लीच्या ट्रेंड प्रमाणे मस्त एक सोलो ट्रीप कर. स्वतःच्याच संगतीत राहा. फोन आणि लॅपटॉप काही दिवसांसाठी बंद ठेव. बघं कसं जमतंय? कसं वाटतय ते''

आदित्याला ही कल्पना खूपच आवडली. घरी आल्यावर, रात्री त्याने आपल्या लॅपटॉपवर अशा सोलो ट्रीपची माहिती मिळवण्यास सुरवात केली. फेसबुकवर त्याला 'दिंडी फॉर युथ' या ग्रुपबद्दल माहिती मिळाली. 'दिंडी फॉर युथ' ही संकल्पना पुण्यातील डॉ. राणे यांची. डॉ. राणे दरवर्षी २० ते ३५ वयोगटातील तरुण तरुणींना एकत्र घेऊन आषाढी एकादशीच्या निमित्ताने पुणे ते पंढरपूर पायी वारी घडवतात. आदित्याने डॉ. राणेंना आपल्या सहभागाविषयी ई- मेल केला. डॉ. राणे यांनी आदित्याला भेटायला बोलावले.

दुसऱ्याच दिवशी आदित्य डॉ. राणे यांच्या दवाखान्यात पोहोचला. दवाखाना होता छोटासाच, पण अगदी व्यवस्थित लावलेला. दवाखान्यात शिरताच समोरच होती विठ्ठलाची मोठी मनमोहक फ्रेम. जिच्यावरून डोळे बाजूला करणे अशक्य वाटले आदित्याला. भिंतीवर वारीच्या असंख्य फोटोंचे कोलाज होते. तेवढ्यात पेशंट तपासून झाल्यावर डॉ. राणे आले, नि आदित्याचा हात हातात मिळवत म्हणाले,''विठ्ठलाचे भक्त आहात असे दिसते.'' आदित्याला बसण्याची खुण करून त्यांनी दोन कप चहा मागवला. आदित्य पटकन म्हणाला, ''मी काही देवावर फारसा विश्वास ठेवतनाही.'' त्यावर डॉ. राणे हसून म्हणाले, ''बरं, बरं. ... काही हरकत नाही. माणसांवर तुमचा विश्वास आहे ना?'' आदित्याने ''हो'' म्हणत मान हलवली. राणे पुढे सांगू लागले. ''तुमची मेल मिळाली. पण तुम्हाला वारीत का सहभागी व्हावेसे वाटते? हे जाणून घ्यायला मला आवडेल.'' तेव्हा आदित्याने आपल्या मनातील घालमेल, नोकरीविषयी आपले विचार मोकळेपणाने मांडले. डॉ. राणेंनी त्यावर काहीही प्रतिक्रिया दिली नाही. ते वारी विषयी सांगू लागले. ''ही दिंडी तुमच्यासाठी सोलोट्रिपचा अनुभव देणारी असेलही. पण दिंडी किंवा वारीतील प्रवास हा ज्याचा त्याचाच आतला प्रवास असतो. आध्यात्मिक प्रवास म्हणा हवं तर.'' यावर आदित्य काहीच न कळल्यासारखे नुसताच बघत बसला. त्यावर डॉ. हसून म्हणाले, ''तुम्हाला कदाचित आता मी काय म्हणतो आहे ते कळणार नाही पण तुमच्या मनातील गोंधळ ही वारी केल्यानंतर काही प्रमाणात कमी होईल याची मला खात्री वाटते''.

डॉ. राणेंनी आपला लॅपटॉप त्याच्या समोर उघडून दिला आणि त्याला वारीच्या संपूर्ण प्रवासाची माहिती दिली. आपल्या सर्व शंका आदित्याने विचारल्या.. आपल्या शंकांचे निरसन झाल्यानंतर आदित्याने लगेच पैसे भरून स्वतःचे जाणे निश्चित केले. आता तो वारीच्या प्रस्थानाच्या दिवसाची वाट पाहात मनोमन स्वप्ने रंगवू लागला.

१० जुलैला ठरल्याप्रमाणे वारीला जाणारे सर्वजण पुण्यातील हॉटेलच्या हॉलमध्ये जमले. जणु वारकऱ्यांचा मेळावाच. सर्वजण जवळपास एकाच वयाचे होते. काही परदेशी तरुण, तरुणीही होत्या.

या सर्व वारकऱ्यांचे स्वागत डॉ. राणेंनी तुळशीहार घालून व हातात झांजा देऊन केले. परत एकदा सर्वांना वारी दरम्यान घ्यायची काळजी, मुक्कामाची ठिकाणे इत्यादी माहिती दिली. त्यांच्याबरोबर वैद्यकीय टीम सुद्धा होती. डॉ. राणेंच्या मागोमाग सर्वांनी ''पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'' हा जयघोष केला. परदेशी पाहुण्यांनी पण आपला स्वर त्यात मिसळला.

आता आदित्यचा वारीतला प्रवास सुरू झाला. सर्वजण आपापल्या गतीने चालत होते. डॉ. राणेंनी सुरवातीलाच सगळ्यांना एक कानमंत्र दिला होता, तो म्हणजे चालताना वायफळ बडबड करायची नाही. आपल्या चालण्याच्या लयीत आपल्या आवडीच्या देवाचे नाव घ्यायचे. सुरवातीला आदित्यला असे नाम घेणे जड गेले. प्रथम त्याचे मन वारीचे फोटो काढण्यातच गुंतले होते. पण पुढे पुढे आजूबाजूला चालणाऱ्या वारकऱ्यांकडून होणारा विठ्ठल नामाच्या गजरामुळे त्याची ही पाऊले आपोआप तालात पडू लागली. आपण आजपर्यंत देवाचे नाव कधी घेतले नाही, तरीही हे नाव घेणे आपल्याला का आवडते आहे याचे त्याच्या मनात कोडे पडले.

या वारीचा प्रवास पुणे ते पंढरपूर सुमारे २१४ किलोमीटर होता. अंतर त्यांना आठ दिवसात पूर्ण करायचे होते. दिवसभर पायी चालणे, रात्री वाटेवरच्या गावात मुक्काम. तिथे भजन, कीर्तन व नंतर शेवटी डॉ. राणेंचे विचार ऐकणे, असा कार्यक्रम असे.

रात्री वारीचा मुक्काम ज्या गावात असे तेथील गावकरी वारीची आतुरतेने वाट बघत. रात्री जेवणासाठी बायका सर्वांसाठी जेवण आणत व प्रेमाने, आपुलकीने विचारून

वाढत. कोणाचाही कोणाशीही संबंध नसताना हे सर्व कोणत्या भावनेने करतात असा प्रश्न आदित्यच्या मनात आला. डॉ. राणेंनी जणू त्याचे मन जाणले, कारण त्या दिवशी रात्रीच्या वेळी आपले विचार मांडताना, ते म्हणाले त्यांच्या मनी एकच भाव असतो तो म्हणजे विठ्ठल. वारकऱ्यांची सेवा ही जणू विठ्ठलाचीच सेवा असा भाबडा भाव गावकऱ्यांच्या मनात असतो.

आदित्यला कधीही इतकी चालायची सवय नव्हती. आजचा प्रवास पुण्याहून पुढे हडपसरमार्गे पुढे पंढरपूरकडे जाणारा होता. प्रवासाचा हा टप्पा लांब होता. एका क्षणी त्याला वाटू लागले आपण हे का करतो आहोत? कां इतके चालतो आहोत?

तेवढ्यात त्याची नजर आजूबाजूला गेली. सर्वच जण चालण्यात तल्लीन झाले होते. बायका, पुरुष, तरूण आणि वृद्ध, मुले आणि मुली, डोक्यावर तुळशी वृंदावन घेतलेल्या बायका ही हसत मुखाने चालत होत्या. सर्वांच्या मुखात विठ्ठलाचे नाव होते. सर्वांच्याच चेहऱ्यावर समाधानाचे स्मित होते. त्यामुळे आदित्यच्या चालण्यात उत्साह आला आणि वेगळाच आनंद आदित्यला जाणवला.

रात्री मुक्कामावर पोहोचल्यावर आदित्यला जाणवले, की आपले पाय सुजले आहेत. अति वेदनेमुळे पायाची संवेदना गेली कि काय असेही एका क्षणी आदित्यला वाटले. आराम करताना आदित्यला डॉ. राणेंचे वाक्य आठवले वारकऱ्यांचे पाय पांडुरंग चेपतो.

जेवणे झाली. आराम करतांना गावातील काही तरूण मुले व मुली वाटीत तेल घेऊन आले. वारकऱ्यांच्या पायाला मालिश करू लागले. आदित्यचे पायही एक तरुण मुलगा मालिश करत होता. त्याला आदित्यने विचारले, ''अहो, तुमची कोणाशीही ओळख नसतांना तुम्ही असे कसे पाय चेपून देता?'' ''अहो, तुमचे पाय विठ्ठलाच्या देवळाला लागणार त्यात आमचा हा खारीचा वाटा. त्याला डॉ. राणेंच्या शब्दाची प्रचिती आली. दुसऱ्या दिवशी सकाळी तो एकदम ताजा तवाना होऊनच उठला. पायाचे दुखणे कुठच्याकुठे पळाले होते.

आता वारीचा प्रवास संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोबत होता. संत तुकाराम व्यवसायाने वाणी होते, पण त्यांच्या भक्तीने कळस गाठला होता, हे आदित्यला ठाऊक होते. त्यांच्या पालखी सोबत शे–सव्वाशे वारकरी चालत होते. मधे महाराजांची पालखी व भोवती ''निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम'' असे भजन व मधूनच ''तुकाराम महाराजकी जय'' असा अखंड नामघोष वातावरणात भक्तीभाव निर्माण करत होता.

वारकरी स्त्रिया, पुरुष आनंदाने फुगड्या घालत होते. आदित्यने मग एका परदेशी पाहुण्याला फुगडी घालायला शिकवली; आणि त्याच वेळी त्याचा पाय एकदम मुरगळला. तो एकदम खालीच बसला. एकही पाऊल त्याल पुढे टाकता येईना. डॉक्टरांच्या टीमने त्याच्या पायाला मलम लावले पण पाय दुखतच होता. त्याल औषधाच्या गोळ्या देऊन विश्रांती घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. डॉ. राणेही त्याच्या जवळ आले. त्यांनी जवळच्या तेथे राहणाऱ्या त्यांच्या मित्राला फोन केला व व्यवस्था केली. आदित्यला सांगितले कि माझा मित्र कोणाला तरी गाडी घेऊन पाठवेल व तुला मुक्कामाला पोहोचवेल. तू आता इथेच थांब. आम्ही आता वारीबरोबर पुढे जातो.

वारी पुढे गेल्यानंतर आदित्य रस्त्याच्या कडेला असलेल्या एका लहान दुकानाच्या बाकड्यावर टिकला. आता बऱ्यापैकी माणसांची वर्दळ कमी झाली होती. संध्याकाळ सरत आली होती. आदित्यला आता मुक्कामाच्या ठिकाणी जावेसे वाटू लागले. कोणाचीतरी मदत मिळाली पाहिजे असे आदित्यला वाटू लागले. डॉ. राणेंनी फोनवरून सांगितलेल्या माणसाची वाट पाहू लागला. फोनची बॅटरी संपत आल्याने तो डॉ. राणेंना फोन करू शकत नव्हता. दुकान बंदच होते. आजुबाजुलाही वस्ती दिसत नव्हती. काय करावे ते आदित्यला सुचेना. लांबून एक रिक्षा येताना त्याने पाहिली. रिक्षा त्याच्या समोरच येऊन थांबली. रिक्षावाला उतरून त्याच्या जवळ येऊन म्हणाला,'' माउली नमस्कार.! मी रंगा. मी पंढरपूरला चाललो आहे. जरा उशीरच झाला मला. तुम्ही एकटेच बसलेले दिसलात म्हणून थांबलो. तुम्ही वारकरी दिसता, मग बाकीचे

साथीदार कुठे आहेत?'' आदित्यने आपला पाय दाखवत थोडक्यात रंगाला उद्भवलेल्या अडचणीची कल्पना दिली. रंगा म्हणाला अहो, तुम्ही चालणार तरी कसे? बसा कि माझ्या रिक्षात. नेऊन सोडतो तुमच्या पुढच्या मुक्कामाच्या ठिकाणी.'' '' अहो, मला न्यायला येणार आहेत. त्यांचीच मी वाट पाहात आहे.'' आदित्यने सांगितले. रंगा म्हणाला,''माऊली, रात्र वाढत चालली आहे. फार विचार करू नका. बसा रिक्षात, सोडतो तुम्हाला. वाटेत दोघांनीही चहा घेतला. मुक्कामाचे ठिकाण आले. लांबूनच विसावलेली वारकरी मंडळी दिसू लागली. पैसे किती देऊ असं आदित्यने विचारताच रंगा म्हणाला,''राहू दे माउली; तेवढी सेवा हातून घडली. पुढच्यावेळी भेटू तेव्हा नक्की घेईन तुमच्याकडून.'' असे म्हणून रंगा रिक्षा घेऊन गेला दिसेनासाच झाला.

उद्या आदित्यचे पाय पंढरपूरला लागणार होते. डॉ. राणे व त्यांच्या टीममधले सर्वचजण आदित्यची वाट पाहत होते. डॉ. राणे शांत होते परंतु बाकीची मंडळी काळजी करत होती. आदित्यला पाहताच डॉ. राणे जवळ जवळ धावतच त्याच्याकडे आले आणि त्यांनी आदित्यला मिठी मारली. आदित्यला सुखरूप पाहून सर्वांनाच बरे वाटले. त्याला काही कळेना. तो म्हणाला, ''मी खूप दमलो आहे. उद्या बोलतो चालील ना?''. डॉ. नी सर्वांना गप्प राहण्याची खुण केली, मग कोणीही त्याला काहीच विचारले नाही.

दुसऱ्या दिवशी सकाळी तयार होऊन डॉ. राणेंची सर्व टीम पंढरपूरकडे रवाना होण्यासाठी तयार झाली. आज सर्वांना एक वेगळाच उत्साह जाणवत होता. वाटेत जाताना प्रथेप्रमाणे घोड्याचे रिंगण आदित्यला बघायला मिळाले. त्या दृश्याने आदित्य भारावून गेला. पंढरपूरला तर वारकऱ्यांचा महासागर होता. अनोळखी असणारे वारकरी एकमेकाना मिठी मारत होते, माऊली म्हणून पाया पडत होते. चंद्रभागेत हातपाय धुतल्यावर आदित्य आपल्या सर्व वारकरी टीम बरोबर दर्शनाच्य रांगेत उभा राहिला. तो जेव्हा विठुरायाच्या समोर आला तेव्हा त्याला रंगाचाच चेरा दिसू लागला. त्याला वाटले आपल्याला काहीतरी भास होत असेल, पण रंगाचा चेहरा त्याच्या डोळ्यासमोरून जात नव्हता. संध्याकाळी डॉ. राणेंनी प्रत्येकाला वारीतला आपले अनुभव सांगायला, विचार मांडायला सांगितले. आदित्यने स्वार्थरहित प्रेम, लोकांनी दिलेली सेवा हे सांगतांनाच आपल्याला रंगाची मदत कशी मिळाली व इथे कसे पोहोचलो तेही सांगितले.

दुसऱ्या दिवशी सर्वजण तयार होऊन परतीच्या प्रवासाला लागले. आदित्यच्या पाठीवर थाप पडली. मागे वळून पाहतो तो डॉ. राणे. ते म्हणाले,'' तू अनुभव छान सांगितलास. आता परतीच्या वाटेवर तू जिथे रंगाबरोबर चहा घेतलास तिथेच आपण सर्व चहा घेऊ. तुझ्या लक्षात आहे ना ती जागा?'' आदित्य आनंदाने तयार झाला. परतीच्या वाटेवर चालताना आदित्य म्हणाला आता ४/५ मिनिटात येईलच ते चहाचे दुकान. बरं, डॉक्टरांनी हसून होकार दिला. ५/७ मिनिटे झाली तरी चहाचे दुकान येईना. सगळीकडे नुसताच मोकळा परिसर व चहूकडे गवत वाढलेले होते. आदित्य डॉक्टरांच्या चेहऱ्याकडे नुसता बघत बसला. डॉक्टरांनी त्याला कडकडून मिठी मारली. म्हणाले,''आदित्य तू खूप भाग्यवान आहेस. विश्वाच्या निर्मात्याने तुला दिलेला हा अनुभव समज. त्याचे अस्तित्व तुला दाखवून दिले.'' आदित्य म्हणाला, ''हे असं शक्य आहे? तुम्ही असं का म्हणत आहात?. मला तर काहीच कळत नाही.'' डॉ. राणे म्हणाले,''काल तुझा फोन लागत न्हवता. माझा मित्र गाडी घेऊन इकडे येणार होता, पण अर्ध्या वाटेवर त्याची गाडी बंद पडली. तो तुला घ्यायला आलाच नाही. हे सर्व तुला कसे कळवावे याच विवंचनेत आम्ही होतो, आणि अचानक तुला पाहून आम्ही सर्वच आश्चर्यचकित झालो.

हे ऐकल्यावर आदित्यचे डोळे भरून आले. त्याने एकदम डॉक्टरांचे पाय धरले. त्याच्या बहुतेक प्रश्नांची उत्तरे त्याला मिळाली होती आणि वारीमुळे आयुष्याची दिशा सुद्धा. पुढल्यावर्षी वारीतील अनुभवावर एक शॉर्ट फिल्म करायचे त्याने ठरवले. आणि याच क्षेत्रात पुढे प्रगती करण्याचे सुद्धा घरी आल्यावर, या वारीरतील अनुभवामुळे आदित्यला स्वतःमध्ये झालेला बदल जाणवला. मनातील गोंधळ बराचसा दूर झाला आहे असे वाटले. आपल्या जीवनाचे लक्ष काहीचे त्याला दिसत होते. आता पूर्ण मनाने पुढल्या वर्षी वारीचा परत एकदा अनुभव घ्यायला आदित्य तयार झाला होता.

आजोबा-एक अजूबा

संध्या सामंत
ठाणे

१७ डिसेंबर २०२५...

सकाळी उठल्यावर काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. आईने आधीच कळवल्याने तो दिवस मनात कोरला गेलेला होता. आज आजोबांची शंभरी असणार होती.

आयुष्यातून एखाद्या व्यक्तीची जागा रिक्त होते तेव्हा त्याची कमतरता जाणवते असे म्हणतात. माझे आजोबा कोणाच्याही आठवणीत राहतील असे इतरांपासून फारच वेगळे होते, म्हणूनच हे लिहिण्याचा प्रपंच.

तसे सगळेच आजोबा म्हातारे असतात नाही का! डोक्यावर चांदी आणि हृदयात सोने...

चेहऱ्यावर सुरकुत्या, आणि बोलण्यात जुने-जाणतेपणाचे टोमणे.

एक टोमणे सोडलं, तर बाकी काही माझ्या आजोबांशी जुळेल असे फारसे वाटत नाही. मुळात डोक्यावर टक्कल त्यामुळे चांदीचा प्रश्न नाही आणि हृदयातले सोने ओठांवर कधी अवतरले नाही. शरीरयष्टीचं वर्णन करायचं झालं तर दिसायला देखणे छाप पडणारे. गोरा वर्ण, उंच शरीरयष्टी, सळपातळ पण पिळदार शरीर, अतिशय ताठ बाणा, लांबट चेहरा, धारदार नाक, लांब हात ...!

त्यांच्या घाऱ्या डोळ्यांची नजरही करडी होती.

ते म्हणतात ना ''नयनांची भाषा, नयनांनी समजावे, नयनांनीच समजवावे''अशी नयनांची जादुगरी त्यांच्या डोळ्यात होती.

१९२५ साली जन्मलेल्या 'शांताराम' नामक या तरुणाचा काळ्या कोटातला, केस मागे फ़िरवून ऐटीत काढलेला फोटो खुंटीला सदैव टांगलेला होता. त्यामुळे अनेकांना नजरेने घायाळ केले असणार, हा अंदाज आम्हाला यायचाच पण त्या नजरेला जोडलेला तिखट स्वभाव यामुळे घायाळ झालेल्यांना लवकर मलमपट्टी करावी लागली असणार हे ही नक्की. कुठेही बाहेर जाताना आजोबा कायम पांढराशुभ्र सदरा व लेंगा घालत. आजीला अत्तर किंवा कोणत्याही सुगंधाची ॲलर्जी तर आजोबांना सुगंध पसंत असल्याने, घराबाहेरील खळ्यात तुळशीकडे जाऊन ते अत्तर मारून बाहेर पडत. याविरुद्ध सकाळी कामासाठी निघताना त्यांचा अवतार म्हणजे चट्टेरी पट्टेरी गुढघ्यापर्यंतची निळी चड्डी, खपाटीला गेलेल्या पोटावर कमरेला दोरखंड बांधलेला आणि त्यात घुसवलेला धारधार कोयता! रात्रीस खेळ चाले मालिकेतला घाऱ्या डोळ्याचा (मिशी आणि डोक्यावरचे केस वजा) अण्णा नाईकच जणू.

तसे म्हातारपणी, आजोबा 'ए. के. हंगल' सारखे दिसत. त्यांचा आवडता कलाकार मात्र 'प्राण'. प्रेमाला त्यांनी इतकं दूर ठेवलेलं की चित्रपट देखील मारामारीवालेच आवडायचे. कृष्णधवल दूरदर्शनवरील प्रणय प्रसंगाला ते सतत नावच ठेवायचे, प्राण आला की त्यांचे डोळे चमकायचे, ''हा बघ, खरा हिरो!''

ते म्हणतात ना ..

''प्रत्येक कुटुंबात सांगण्यासाठी एक कथा असते आणि बहुतेकदा आजोबाच पाने उलटतात.''

''कुटुंबाच्या झाडाची मुळे आजोबांच्या प्रेमाने सुरू होतात.''

''आजोबा, माझे सर्वात चांगले मित्र.''

यातलं काहीही माझ्या आजोबांना लागू होत नाही. त्यांना एक गोष्ट जमलीच नाही ते म्हणजे प्रेम दाखवणे. त्यांचं प्रेम बोलण्यातून नाही, अंगावरून हात फिरवण्यात नाही किंवा कौतुकाची पाठ थोपटण्यातही नव्हतं. ते अधून मधून परिस्थितीतून डोकावायचं, नव्हे आम्हाला समजून घ्यावं लागायचं! आजोबा आज थोडे मोकळे दिसतायत, म्हणजे जवळ जाऊ शकतो. तो 'मूड' म्हणजे आमच्यासाठी हिरवा कंदील. सहसा ती वेळ म्हणजे जेवण झाल्यावर दुपारची वामकुक्षी घेण्या आधीची. तेव्हा आम्ही नातवंडे, खास करून मीच, (कारण इतर बरेच जण त्यांच्या जवळ जायला घाबरायचेच) त्यांच्या जवळ जाऊन थोड्याफार गप्पा मारून, गुळगुळीत टक्कलावरून हात फिरवत असे. ते म्हणजे आजोबांसोबत घालवलेले सर्वोच्च आनंदाचे क्षण. प्रेम व्यक्त न करता येणारे, असे हे वडिलांचे वडील आणि तिच्या लहानपणीच गमावलेले आईचे वडील, यामुळे माझे आजोबांचे प्रेम हे इतरांनी अनुभवलेल्या प्रेमापेक्षा वेगळे होते. आजोबा अखंड प्रेमाचा झरा नातवंडांच्या ओंजळीत रिक्त करतात असे काही मला जाणवले नसले, तरी त्यांची कमी सतत मनात खलते हे नक्की. कारण आजीचे प्रेम हे घरच्या दिव्यावर जास्त असल्याने पणती दुर्लक्षित राहिली होती.

आजोबा कोकणातले, अस्सल मालवणी बोलणारे होते. त्यांच्या बोलण्यात गोडवा कमी, धार जास्त. ती धार माणसाला कापण्यासाठी नव्हे, तर सरळ करण्यासाठी होती. कायम अलंकारयुक्त मालवणी भाषा ते वापरत. एखादी गोष्ट सांगताना त्यात रूपक, उपमा, टोचणी सगळं आपोआप यायचं. बोलणं म्हणजे निव्वळ संवाद नव्हता; तो एक प्रकारचा अनुभव असायचा. ऐकणाऱ्याला कधी हसायला यायचं, अनेकदा तर गप्पच बसायला लागायचं. उदाहरणार्थ साधं जरी विचारलं ''हे की कुठे ठेवू?'' त्यांचं उत्तर ठरलेलं ''घाल माझ्या कपळावर''. जाड माणूस दिसला की त्यांना रागच यायचा. ''मेलो रेड्यासारखो फुगलोकामा करुक नको ह्यांका'' हे एचजी ठरलेलं!

त्यांच्या भाषेत गोडी नव्हती, पण चव होती. तिखट, खारट, थोडीशी कडू, क्वचितच गोड आणि हीच चव माणसाला आठवत राहायची. आजोबा नसल्यावर जाणवतं, शब्द अजूनही आहेत; पण त्या शब्दांना लागलेली चव कुठेतरी हरवली आहे.

संपूर्ण कुटुंबात आजोबांचा खूप दबदबा होता. कडक व तापट स्वभावाचे असल्याने, अनेक लोक त्यांना 'जमदग्नी' म्हणत. अनेकांनी त्यांचा तो अवतार पाहिला होता. कित्येकदा रागाचा उद्रेक केवळ शब्दांपुरता मर्यादित नव्हता; त्याची झळ घरातही बसली होती. उदाहरणार्थ एखादी गोष्ट पटली नाही, की हातात असेल ते फेकून देत. अनेकदा त्यांनी ताट, थाळी, काठी, पाट फेकलेला आहे. एकदा आजी मटणासाठी वाटण बनवत होती, तेवढ्यात ते बाहेरून आले आणि आजीला हाक ऐकू आली नाही. त्यांनी हातातली थाळी जी फेकली ती थेट पाण्याच्या मडक्यावर आदळली आणि ठिकऱ्या त्याच वाटणात जाऊन पडल्या जे फेकून द्यावं लागलं. (असो आजी वाचली!) आजीने तर अनेकदा त्यांच्या रागाचा थेट सामना करून वार झेललेत. त्यांच्या रागाचा सामना त्यांच्या मुलांनी तर अनेकदा केला आहे. पाच भावंडांपैकी एका मुलीने घर देखील सोडले होते. तो काळ असाच होता पुरुषी मक्तेदारीचा, त्यामुळे त्यांचे निभावले नाहीतर आता काही खैर नव्हती.

स्वभावाने बिनधास्त असल्याने आजोबानी कोणाची पर्वा केली नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात जिथे बायकांना बाहेर पडण्याची किंवा नवऱ्याने रात्री सोबत नेण्याची प्रथा नव्हती तेव्हा ते आजीला सायकलवर डबलसीट बसवून रात्रीचे नाटकाला नेत. त्यांच्या या दुर्मिळ प्रेमाचे काही साक्षीदार पण गावात आढळतात.

आजोबांना दोन गोष्टींचे व्यसन एक विडी आणि काम! विडीने कोणाला त्रास दिला नाही, पण कामाच्या व्यसनामुळे कधी कधी माणुसकीची किंमत मोजावी लागली होती. ते घड्याळाप्रमाणे चालत नसत तर घड्याळ त्यांच्याप्रमाणे चालत असे. त्यांना जाग आली की ते कामाला निघत मग ते पहाटेचे चार वाजलेले असोत की तीन. शेतावर नांगरणी,

मळणी, पेरणी सगळी कामे ते करत आणि इतरांनाही करायला लावत. त्यांची मुले (माझे बाबा आणि भावंडे) लहान असताना ही कामे लागू नये म्हणूनच काय ती शाळेत जात! लग्नानंतर माझी आई गरोदर असताना, नवव्या महिन्यात देखील तिने त्यांच्यासोबत कामे केली आहेत. कामाच्या वेळी दया, माया, क्षमा, शांती सगळ्या कशा दडून बसलेल्या असत आणि बाकीच्या तर पळून जात. त्यांचा कामातला विराम म्हणजे चहा आणि सोबत कुरमुरे किंवा भाजलेला उडदाचा पापड.

अतिशय स्वाभिमानी असल्याने त्यांना लाचारी किंवा कोणावर अवलंबून राहणे पसंत नव्हते. आयुष्यभर स्वतःच्या पायावर उभं राहिलेल्या माणसाला शेवटच्या टप्प्यावर कोणाचा आधार स्वीकारणं कठीण गेलं आणि त्या हट्टात, त्या एकाकी निर्णयातच त्यांचा अंत झाला. त्यांची दृष्टी जेव्हा हळूहळू अधू होऊ लागली, तेव्हा ते घाबरले. आपली सेवा कोणाला करावी लागता कामा नये, किंबहुना कोणी करू नये म्हणून त्यांनी टोकाचा विचार केला. त्याची संपूर्ण पूर्वतयारी त्यांनी करून ठेवली होती. चार पाच चिठ्ठ्या, ज्यात एक पोलिसांना देखील लिहून ठेवली होती. जेणेकरून कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीला त्रास होऊ नये. १७ डिसेंबर २००७ रोजी आजीचा डोळा चुकवून, घराच्या माडीवर जाऊन त्यांनी गळफास लावून आपले जीवन स्वतःच्या हाताने राजीखुशी संपवले. तो एका कणखर माणसाच्या आतल्या एकाकीपणाचा पराभव होता असेही म्हणू शकतो किंवा कोणास ती जीतही वाटू शकते. (हे लिहिताना एक गोष्ट ठामपणे सांगावीशी वाटते, अशा निर्णयाचे समर्थन कोणीही करत नाही.)

कुठलाही त्रास, कुठलीही कमजोरी, कुठलाही टप्पा असा नसतो की ज्यात माणसाने स्वतःला संपवणं हा पर्याय असावा. आधार घेणं हे अशक्तपणाचं लक्षण नाही; ते माणूस असल्याचं लक्षण आहे. दुःखाला शेवट नसतो, पण आयुष्याला असतो आणि तो शेवट आपण ठरवायचा नसतो, ही अजून तरी समाजाची रीत आहे.

माझ्या पदरात नुकतेच जन्मलेले बाळ असल्याने,मला जाता न आल्याने, मला त्या प्रसंगाचा सामना करावा लागला नाही. आज मागे वळून पाहताना जाणवतं स्वाभिमान आणि एकटेपणा यातली सीमारेषा फारच नाजूक असते.

मला आठवतात ते कधीही न दमलेले आजोबा. अतिशय हलाखीच्या परिस्थितीतून जीवनाला आकार कसा द्यावा हे आजोबांकडून शिकावे. कष्ट केल्याने नाही तर आळसाने माणूस नक्कीच मरतो, असे त्यांचे म्हणणे होते. रस्त्यावरील भिकारी किंवा कामचुकार व्यक्ती त्यांना अजिबात पसंत नव्हती. कारण ते कोणतेही काम त्यांनी हाती घेतले की ते तडीस नेत. कामात त्यांचा हात कुणी धरत नसे.

शेतीतून घर सांभाळणे कठीण झाल्याने त्यांनी बैल विकले, जमिनीचा काही भाग विकला, त्यांनी वेगवेगळे व्यवसाय देखील केले. सायकल रिपेअर, स्टोव्ह रिपेअर हे व्यवसाय केले. त्यापुढे जाऊन त्यांनी छोटी खानावळ सुध्दा सुरू केली. म्हशीचे दूध काढून डेअरीमध्ये द्यायला ते स्वतः सायकल वरून जायचे. पण (प्रेमाचा लवलेश नसल्याने) म्हैस सुद्धा तोंड वाकडं करू लागली, तेव्हा ते काम त्यांनी आजीकडे दिले.

एक काळ असा होता, की ते एक उत्तम आणि प्रसिद्ध टेलर होते. त्यांनी त्यांची कला मुंबईपर्यंत नेली होती. १९५०च्या दशकात ते चित्रपटसृष्टीतल्या नट्यांचे ब्लाऊज शिवत. चुनाभट्टीला गोदामासमोर त्यांचे 'सुहास लेडीज टेलर' नावाचे दुकान होते. असे म्हणतात की त्यांच्या कलेला इतकी मागणी होती की आतापर्यंत आम्ही मनीष मल्होत्राच्या पंक्तीत आलो असतो. असो, स्वभावाला औषध नसल्याने ते तडकाफडकी मुंबई सोडून पुन्हा गावी आले आणि 'ये रे माझ्या मागल्या' झाले.

एक विमान सोडले तर त्या काळातल्या सगळ्या प्रकारच्या गाड्या त्यांनी चालवल्या होत्या. कुठचेही प्रशिक्षण न घेता हात लावेन ते शिकण्याची विलक्षण कसब त्यांच्यात होती. ट्रॅक्टर भाड्याने घेऊन स्वतः चालवून त्यांनी शेती तर केलीच पण डंपरसुद्धा ते स्वतः चालवून आणत.

अभियांत्रिकी कामात देखील त्यांचा हातखंडा होता. ऐंशी पार केली तरी घराचे नळे (कौले) ते स्वतः वर चढून बदलत. भाडोत्र्यांसाठी चाळी, घराच्या टाक्या, संडास हे सगळे

बांधकाम त्यांनी स्वतः केले. अख्ख्या पंचक्रोशीत पहिले शौचालय बांधण्याचे काम आजोबांनी केले. अत्याधुनिक विचारांच्या आमच्या आजोबांनी त्या काळात जेव्हा गावातच काय शहरात देखील नव्हती अशी सोय आपल्या आणि आजीच्या म्हातारपणाची केली होती. त्यांनी त्या मातीच्या, माडीच्या घराच्या, न्हाणीघरात एक प्रसाधनगृह बनवले ज्याच्या आत संडास बांधला, जो वापरण्याची परवानगी कोणालाच नव्हती. कारण जेव्हा वृद्धपकाळात घराच्या पडवीमागील बांधलेल्या ते देखील अनोख्या वातानुकूलित/हवेशीर शौचालयात जाणे अशक्य होईल, तेव्हाच हा वापरला जाईल अशी सख्त ताकीद सगळ्यांना होती.

बहुप्रतिभावान, बहुआयामी व्यक्तिमत्व असलेल्या आजोबांनी अनेक समाजोपयोगी कार्ये देखील केलीत. स्वातंत्र्य लढ्यासाठी लढणाऱ्या व्यक्तींचा त्यांना सदैव अभिमान होता. त्यांचे मित्र विनोबा भावेंच्या विचारांनी प्रेरित होते, ज्यांचा गांधीजींच्या कार्यात सहभाग होता. साधी राहणी उच्च विचारसरणी असलेले, मधू दंडवते देखील सपत्नीक आमच्या घरी चहापानासाठी येऊन गेल्याचे आमच्या ऐकिवात आहे. जेव्हा पंचक्रोशीत शाळा सुरू करायला जागा नव्हती, तेव्हा आजोबानी स्वतःच्या घराच्या माडीवर फुकटात जागा उपलब्ध करून दिली होती. आज ती शाळा फार नावाजलेली आहे. आजोबांनी रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्यांसाठी पाणपोई बांधली होती. आजोबा जास्त धार्मिक नव्हते, अंधश्रद्धेच्या तर ते पूर्ण विरोधात होते. त्यामुळे गावात कोणी साधू, बुवा येऊन जम बसवण्याआधीच त्यांनी थारा दिला नाही. गावात होणारी कर्मकांड, अंधश्रद्धा, थोतांड याच्या ते नेहमीच विरोधात राहिले. एकदा एका बुवाच्या नादी लागून गावातल्या (म्हणजे मत्स्याहारी: Pescatarian) लोकांनी मांसमच्छी सोडली, त्या बुवाला त्यांनी हाकलवून लावले.

त्यांच्या शरीराचा काटकपणा एवढा होता, की एकदा त्यांच्या पायाला एकदा कोयता लागला आणि ते रक्तबंबाळ झाले. माझी आई त्यांच्या सोबत काम करत असल्याने तिने घाबरून मालमपट्टीसाठी विचारले, तर उलट तिलाच ओरडा मिळाला. एवढंसं लागलं तर काय काम बंद करणार, असे म्हणत त्यांनी साधी हळद देखील लावायला दिली नाही. एकदा वस्तीवर चोर आले होते, बऱ्याचदा असे होते माणसे आपापला जीव वाचवतात....पण आजोबा घराबाहेर पडले ते चोरांना सामोरे गेले, वय वर्षे ७०+.

कष्टकरी कसा असतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे आजोबा होते. आजोबा म्हणजे चालतं-बोलतं सरकार. नुसते उभे राहिले तरी माणसं सरळ उभी राहायची.

आयुष्यभर मेहनतीवर विश्वास ठेवलेल्या माणसाने परिस्थितीसमोर कधीही हात टेकले नाहीत फक्त मार्ग बदलले. अफाट, अभेद्य, उंच उसांड्या घेत खळखळणारा समुद्र ज्याप्रमाणे किल्ल्याच्या बुलंद तटबंदीवर चालून येतो आणि तटबंदी आतील किल्ल्याला संकटाची कणभरही जाणीव होऊ न देता ताठ बाणा ठेऊन संकटाला निधड्या छातीवर पेलून माघारी फिरवते तसे आयुष्य ते जगले!

आजोबांची शंभरी झाली नाही. पण त्यांचं आयुष्य आपल्याला बरंच काही देऊन गेलं. कष्टाचं मोल, स्वाभिमानाची किंमत आणि शिस्तीचं महत्त्व. त्यांचा शेवट मात्र एक गोष्ट स्पष्टपणे सांगून जातो : कुठलाही माणूस इतका स्वयंपूर्ण नसतो की त्याला कधीच आधार लागणार नाही.

मदत स्वीकारणं हे हार मानणं नसतं; तो आयुष्याशी केलेला प्रामाणिक करार असतो. आजोबांची आठवण जपत असताना, त्यांच्या आयुष्याकडून शिकायचं आणि त्यांच्या शेवटापासून सावध व्हायचं. हीच त्यांना दिलेली श्रद्धांजली ठरेल.

आजोबांचं प्रेम सोपं नव्हतं. ते सरळ नव्हतं. पण ते खोटंही नव्हतं. माझे आजोबा-एक अजूबा होते असे म्हटले तर वावगे नाही ठरणार.

एका ट्रॅफिक सिग्नलवर एका भिकाऱ्याला पाहून माणूस बोलला...
''तुला कुठं तरी पाहिलं आहे''
भिकारी खूप खूप हासला.. आणि म्हणाला,
'' साहेब.. आपण फेसबुक फ्रेंड आहोत.''

– रेखा पै

सीता सामर्थ्य

दीप्ती चाफेकर
सॅन होझे

संपूर्ण संकल्पना

गर्भवती सीतेला जेव्हा समजते की ती ज्या रामाची पूजा-भक्ती करत आली होती, त्याच पतीने तिला त्यागले आहे, तेव्हा तिच्या मनात अनेक भावना उसळतात. ती हादरते आणि अतिशय दुःखी होते. एका क्षणी तिच्या मनात राग उसळतो ज्या रामासाठी तिने अखंड श्रद्धा ठेवली, त्याच्याकडून असा अन्याय होतो याची तीव्र खंत वाटते. तरीही ती रामाच्या द्विधा मनःस्थितीला समजून घेण्याइतकी परिपक्व आहे. रामाला हा कठीण निर्णय का घ्यावा लागला, हे ती जाणते.

ती अजूनही निराशेच्या अवस्थेत आशा धरते की राम परत येऊन तिला घरी नेईल. पण जेव्हा राम परत येण्याची चिन्हेही दाखवत नाही, तेव्हा ती सर्व आशा गमावते आणि धरतीमातेला आपल्याला आपल्या कुशीत सामावून घेण्याची प्रार्थना करते.

त्या क्षणी तिच्या अंतःकरणातील आवाज तिला हार मानू देत नाही. तिला आपल्या गर्भातील बाळांची हालचाल जाणवताच, आणि त्या क्षणी तिला मातृत्वाची जाणीव होते. हाच मातृत्वाचा भाव तिला अद्भुत ''**समर्थ्य**'' देतो आणि ती स्वतःच्या परिस्थितीचा ताबा घेते.

एक अर्थाने ती नव्या ''प्राण''सह मातृत्वात पुन्हा जन्म घेते. ती आपल्या मनातील राग, दुःख, भीती आणि खोट्या अपेक्षा झटकून टाकते आणि अपार धैर्य शोधते. मातृत्वाच्या माध्यमातूनच तिला आपला उद्देश, आपला **मार्ग** आणि आपली **साधना** सापडते.

ती ठरवते की आपल्या मुलांना योग्य ''**रघुवंशी**'' पुत्र म्हणून वाढवेल. सीतेचे अमाप ''**सामर्थ्य**'' तिच्या पावित्र्याचे, तिच्या निर्दोष चरित्राचे आणि तिच्या धर्मनिष्ठेचे खरे प्रमाण आहे.

सीता सौंदर्य, सामर्थ्य आणि शौर्य यांची अद्वितीय प्रतिमा म्हणून उभी राहते. सीतेची ही ताकद आणि स्थैर्याची कथा पिढ्यान्‌पिढ्या स्त्रियांना प्रेरणादायी ठरते आहे.

सीता सामर्थ्य

शोक

सांग लक्ष्मणा हे झाले कसे?
प्रकाशाला का अंधाराने गिळले?
सूर्याला का दीर्घ ग्रहण लागले?
कमख का दलदलीत मिटले?
सांग लक्ष्मणा हे झाले कसे?

धरतीचे आकाश सुटले
पैलतीराचे क्षितिज मिटले
श्वासांचे धागे तुटले
सांग लक्ष्मणा हे झाले कसे?

रौद्र

शील ते निर्मख कनकाचे
अग्निपेक्षा तेजस्वी ठरे
पण बंद दाराच्या तळी
अंधाराची सावली वसे

दुष्ट असुरांचा ज्याने
सहज केला घात

का करता आली नाही
तुच्छ विचारांवर मात?

सूर्याचा स्वयं अंश
वंश ज्याचा थोर रघु
का घ्यावी मग त्याने
अंधाराची बाजू?

एका हृदयाच्या ठोक्यात
अर्पिले जिने सारे श्वास
का तोडला हे प्रभु
तिचा दृढ विश्वास?

प्रगल्भता

घनघोर ते युद्ध भिडले
शूर पराक्रमी नाथ लढले
पतिधर्म पूर्ण निभावले
आज राजकर्तव्य पाळले

विरह

आले नाही परत प्रभु माझे
आशेचे सारे दीप विझले
जीवनाचे सर्व मार्ग खुंटले
मज आता उराशी घे माते

मातृशक्ती

तूही जननी, तूही माता
तुझ्या उरात वसे विधाता
तुझ्या देहात एक गाभारा
तूच तुझे सामर्थ्य आता
ऊठ सीता, तू ऊठ आता
गायीच्या पान्ह्यात
वाहे अमृताच्या धारा
काड्यांच्या घरट्यात
असे शक्तिचा लोहा
मायेच्या पंखानेच
झेप घेती पाखरा
तुझे मातृत्व, तुझी आभा
ऊठ सीता, तू ऊठ आता

साधना

इवल्या बीजाला दे अंकुर झाडाचा
मातीच्या गोळ्याला दे आकार मूर्तीचा
पाषाणाला पैलू पाड हिऱ्याचा
पसरव चोहींकडे, प्रकाश रघुकुलाचा
तुझे सारस्वत, तुझी साधना
ऊठ सीता, तू ऊठ आता



कविता

सूर्योदयी होते भूपाळी अन् दुपारी सावली
सांजवेळी विरहिणीच्या मंदावलेल्या पाऊली
अंगाई होते नीज येता माऊली ती होऊनी
गंधार घुमवित येतसे कविता कवीच्या मन्मनी..

होते सखी सहचारिणी ती रागिणी स्वरमोहिनी
भवताल ती, झपताल ती, कधी चांदणे संजीवनी
सनई कधी, कधी बासुरी, ये ताल ठेका साथीला
हात हाती घेऊनी कविता कवीच्या बाजूला .

ठिबकते रेंगाळते मग बरसते शब्दातूनी
वीज होऊन तळपते विद्युल्लता ये जीवनी
कविता कवीचा अंतरात्मा शब्दाविना बघ सांगतो
जग दिले खेळावया ध्यानस्थ मी तुज पाहतो .

– ज्योति राम (सिॲटल)

हिंदु संस्कृति पाठशाळा, एक प्रयोग

(आपल्या भावी पिढ्यांसाठी)

सदाशिव गोडबोले
नॉर्थ कॅरोलिना

प्रेरणा:

मुले स्पंजसारखी असतात, त्यांना जे काही दिसेल ते ती टिपून घेतात. ती त्यांच्या आयुष्याच्या प्रभावसुलभ आणि असुरक्षित (vulnerable) टप्प्यावर असतात. आपली मुले हुशार आहेत; ती उच्च SAT स्कोअर मिळवू शकतात, स्पेलिंग बी जिंकू शकतात, व्हॅलिडिक्टोरियन बनू शकतात, CEO सारखी उच्च पदे मिळवू शकतात, ... परंतु त्यांना त्यांच्या समृद्ध ओळखी (Identity), मुळे आणि वारसा (Heritage) यांची जाणीव आणि अभिमान नसेल तर त्यांच्या जीवनाला पूर्णत्व येणार नाही. आदि शंकराचार्यांची ''ततः किं, ततः किं, ततः किं, ततः किं?'' (''so what'') ही कविता त्यांना लागू पडेल. सुदैवाने आपल्या मुलांना आपली समृद्ध ईश्वर-केंद्रित हिंदु सांस्कृतिक मुळे, वारसा, आणि ओळख आपल्यापासून उपलब्ध होऊ शकतात.जर आपण त्यांना या गोष्टी आपली जबाबदारी आणि देणगी समजून सक्रियपणे शिकवल्या नाहीत तर सांप्रतच्या गुंतागुंतीच्या सामाजिक वातावरणात वाढताना आपल्या पुढील पिढ्या त्यांची हिंदू नीव उगीच गमावून बसतील. त्यांना ते हिंदु आहेत, त्यांचे पूर्वज भारतीय होते, ते एक प्राचीन उच्च संस्कृतीचे घटक आहेत, वगैरे गोष्टी कळणारच नाहीत! योग, प्राणायाम, संस्कृत भाषा, अध्यात्म ज्ञान, प्रगत पाककला, शाकाहारीत्व, वगैरे गोष्टी हिंदूंनी निर्माण केल्या, हे पण त्यांना माहीत नसणार.

आपल्या मुलांची ज्यात वाढ होत आहे, त्या जटिल वातावरणाचा आणि छापसुलभ माध्यमांद्वारे होणाऱ्या चुकीच्या माहितीचा धोका लक्षात घेता, हिंदु-इतरांना संभाव्य विकृतीयुक्तरित्या हिंदु सांस्कृतिक माहिती शिकवू देण्याऐवजी आपल्या मुलांना ती अस्सल माहिती आपणच शिकवली पाहिजे. असे केल्याने आपल्या मुलांना ताठ उभे राहून अनेक देवता, जातिव्यवस्था, धर्म यांसारख्या लोकप्रिय प्रश्नांना धैर्याने तोंड देण्यास आणि उत्तरे देण्यास सक्षम होण्यासाठी भक्कम आधार मिळेल.

जर आपण हे केले नाही, तर आपली मुले एकतर हिंदु संस्कृती कधीच शिकणार नाहीत किंवा हिंदु-इतर लोकांकडून शिकतील, आणि त्यांच्यांत कमीपणा आणि अधो-आत्मसन्मान निर्माण होण्याची शक्यता राहील; त्याहूनही वाईट म्हणजे, त्यांना दुरावल्यासारखे वाटेल आणि त्यांच्या मुळांची लाज वाटून ती धर्मांतरासाठी सोपे लक्ष्य होऊ शकतील. शिवाय, मजबूत मुळे आणि पाया नसल्यामुळे ती ड्रग्ज, व्हेपिंग सारख्या वाईट प्रभावांना बळी पडू शकतील आणि त्यांना एकटेपणा, मानसिक ताण, समवयस्कांचा दबाव इत्यादींना तोंड द्यावे लागेल.

म्हणून आपण त्यांची हिंदु ओळख, मुळे, संस्कृती, धर्म इत्यादींची जाणीव आणि अभिमान जोपासण्याची खूप गरज आहे. तसेच आपल्याला त्यांच्यामध्ये एकता, एकनिष्ठा (Loyalty), परस्पर आदर, पाठिंबा, आणि प्रतिष्ठेची (Dignity) मजबूत भावना विकसित करण्याची देखील आवश्यकता आहे; दुर्दैवाने, ऐतिहासिकदृष्ट्या हे गुण हिंदु समाजाच्या बलस्थानी नाहीत याचे एक संभाव्य कारण म्हणजे परस्पर आदर आणि प्रतिष्ठेचा अभाव, ज्यामुळे काही लोक दुरावले गेले आणि नंतर बदला घेण्यासाठी शत्रूशी मिळाले; परिणामी हिंदु समाजाचे अपरिमित नुकसान झाले; आम्हाला ते अवगुण दूर करायचे आहेत.

पाठशाळा

वरील गोष्टींमुळे प्रेरित होऊन, मी आमच्या परिसरात एक प्रयोग म्हणून हिंदु सांस्कृतिक पाठशाळा सुरू केली आहे, ज्याला भरपूर प्रोत्साहन, सहभाग आणि पाठिंबा मिळत आहे. आम्हाला ही शाळा जागतिक दर्जाची करायची आहे.

धर्म, योग, भाषा, संगीत, नृत्य हे एक एक विषय

शिकविण्यासाठी शाळा आहेत, परंतु हिंदु संस्कृती व्यापकपणे शिकविण्यासाठी नाहीत. त्यामुळे आपली मुले त्यांची हिंदु ओळख, मुळे, वारसा, आणि त्याबद्दल अभिमान या गोष्टींना मुकतात.

ही उणीव भरून काढण्यासाठी आमची पाठशाळा ही केवळ धार्मिक शाळा, संगीत शाळा, गणित शाळा, भाषा शाळा इत्यादी नाही तर ती या सर्वांहून अधिक आणखी काही गोष्टी शिकविण्यासाठी आहे. आमच्या हिंदु संस्कृती शाळेचे उद्दिष्ट म्हणजे आमच्या मुलांना त्यांच्या मुळांचा, वारशाचा आणि संस्कृतीचा अभिमान वाटावा आणि भविष्यात ते या सर्वांचे प्रवक्ते व्हावे (''जपूया संस्कृती'').

या शाळेच्या नावात ''हिंदु'' हे विशेषण मुद्दाम, एका कारणास्तव वापरले आहे; सामान्यतः ते टाळून ''भारतीय'' किंवा दुसरे काहीतरी वापरण्याची प्रवृत्ती असते. तथापि, ''भारतीय'' मध्ये इतरांचाही समावेश होतो आणि त्यामुळे कायद्याच्या दृष्टीने शाळा हिंदू-इतर संस्कृती समाविष्ट करण्यासाठी स्वतःला भाग पाडून घेऊ शकतो.

सुदैवाने, हिंदु या विशेषणाबद्दल संकोच करण्याची आता गरज नाही; खरं तर, अनेक उपराज्ये (States) व देश हिंदु लोकांना सुसंस्कृत, हुशार, वाहिलेले (Dedicated), शांतताप्रिय, कष्टाळू आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा असलेले आणि समाजात महत्त्वपूर्ण योगदान देणारे म्हणून मान देतात. NG, GA, TX, OH मिशिगन, मिसिसिपी यांनी ऑक्टोबर आणि कॅनडाने नोव्हेंबरला हिंदु वारसा महिना म्हणून घोषित केले आहे, तर PA,CT,CA ने दिवाळीला राज्य-सुट्टी म्हणून घोषित केले आहे!

वर्गातील विषयांची उदाहरणे:

भारत म्हणजे हिंदु धर्माची, देवांची, प्रबुद्ध लोकांची, ज्ञानाची, सुसंस्कृत समाजाची, सर्व क्षेत्रातील विभूतींची भूमी आहे.

भारत मातेसाठी ''वंदे मातरम, सुजलाम् सुफलाम..'' राष्ट्रगीत, प्रचलित आरत्या ई.

संस्कृत वर्णमाला, ॐ, सात स्वर, गीता व रामायण सारखे आपले धर्मग्रंथ,

असाधारण हिंदु लोक: शंकराचार्य, ज्ञानेश्वर, कालिदास, टिळक, सावरकर, रामानुजन, शकुंतला देवी, लता मंगेशकर,

आचार (Etiquettes)**:** पूजा चालू असताना मंदिरात, वडीलधारी लोकांशी,

हिंदू धर्म, अध्यात्म, स्वस्तिक, योग, ध्यान, प्राणायाम,...

गायत्री मंत्र, सूर्यनमस्कार, शांति मंत्र,

पाढे

आपले शरीर (७ चक्रे, इडा, पिंगला. सुषुम्ना, कुंडलिनी), शारीरिक प्रक्रियांशी संबंध,

आपले अन्न, सण, पोशाख, संगीत, नृत्य,

आपले वृक्ष : तुळशी, वड, पिंपळ, औदुंबर, कढीलिंब

आपले सण: गणेशोत्सव, नवरात्री गरबा, रास, दिवाळी,

भारताचा नकाशा, नद्या, ग्रह, पृथ्वी (वराह अवताराशी संबंध), महिने, राशि, नक्षत्र

कला आणि हस्तकला: आकाश कंदील, हार, रांगोळी,

साध्या दैनंदिन पाककृती प्रात्यक्षिकांसह: वरण, भात, भाजी, पोळी इत्यादि.

जपूया संस्कृती, विणूया नाती
पेटवू मशाली, बनूया ज्योती
जपूया संस्कृती, विणूया नाती ।।
मराठी मनांची, विणूया नाती
जपूया संस्कृती, विणूया नाती ।।

पाचूच्या नगरी उल्हास नवा
ज्ञानाच्या पंथी हवा
ना सूर्य जरी मी, असे मी काजवा

या काजव्यांचा बनू दे सूर्य
रूजल्या बीजांचा बनो वटवृक्ष
या देशामधली मराठी माती
जपूया संस्कृती, विणूया नाती ।।

-संजय राऊत (सिॲटल)

संस्कृत वेदान्त
Learn Sanskrit language, Sanskrit Literature and Vedanta online
Embark on a profound journey with Sanskrit Vedanta – A gateway to learn the Sanskrit language and to unravel the treasures of ancient Sanskrit literature and Vedanta philosophy.
NEW BATCHES START FROM JANUARY EVERY YEAR. FOR FURTHER DETAILS AND REGISTRATION, PLEASE VISIT THE WEBSITE – WWW.SANSKRITVEDANTA.ORG
Mr. Phadke will be available for consultation in the booth of Nipun Insurance Brokers at BMM 2026 Expo in Seattle
पण्डित पुरुषोत्तमशास्त्री फडके संस्कृत पाठशाला, पुणे
Shree Neelakanth Phadke
Neelakanth Purushottamshastri Phadke, a Sanskrit scholar turned successful insurance executive, shares his vast knowledge of and love for Sanskrit by teaching Sanskrit. From translating and writing two books on Sanskrit to pursuing an MBA from Japan and a law degree at 64, his multi-disciplinary experience lends a unique perspective to his teaching. Currently chairman of Nipun Insurance Brokers and Nipun Investment, Phadke's deep connection to Sanskrit persists.

KULSWAMINI PAITHANI
From Matunga, Mumbai to Global Seattle
PURE HANDLOOM PAITHANI SAREES
• 250+ COLOURS •
Handloom heritage from Matunga, Mumbai— crafted for the world.
HANDLOOM HERITAGE
TIMELESS ELEGANCE
OUR CURATED COLLECTION
Classic White
Soft Pink
Royal Blue
Traditional Red
Majestic Purple
Matunga, Mumbai
@kulswamini_paithani_04
+91 97639 54858
Inquiries Welcome
• Proud Sponsor • BMM Seattle 2026 •



If Pune, why YASHADA?

Invest in a **Yashada Realty** property with the peace of mind knowing your asset is in capable hands. Thoughtfully designed homes and commercial spaces, in prime locations, connectivity, facilities and thriving communities combined with international quality standards and amenities make Yashada Realty the ideal choice for NRIs looking to build wealth in India.

ONGOING PROJECTS

Ravet · Punawale · Baner · Wakad · Mamurdi

NRI PRIVILEGE PROGRAM

2% Stamp Duty Waiver*

*Will be paid by developer

Scan to visit our Instagram and Website

For Details & Registration
+91 89565 47323
nri@yashadarealty.com

YASHADA™ REALTY
LIVYNG, REIMAGINED

Maharashtra Foundation

Social and Economic Justice for All

Established in 1978, Maharashtra Foundation has helped over 3,000 donors support their chosen causes and has partnered with more than 200 NGOs across Maharashtra to drive meaningful social change.

Since 2022, Maharashtra Foundation's Pancham Initiative has been transforming rural communities through a holistic approach to development. By supporting education, healthcare, women's empowerment, sustainable livelihoods, and environmental conservation, Pancham helps villages build self-reliance and create lasting change. Together, we can empower communities, nurture opportunity, and build a brighter future for generations to come.

Please join us in continuing this journey of transforming lives and strengthening communities across Maharashtra.

Education | Healthcare | Environment Protection | Women's Empowerment | Poverty Reduction

Our Initiative

Pancham
Partnering with villages for holistic development

Supported Villages
Kusumbi - Satara
Mutnur - Gadchiroli
Savade - Palghar
Satkondi - Ratnagiri
Pimparwadi - Pune

Proud sponsor of BMM 2026 Convention for Uttarrang

for details go to

www.maharashtrafoundation.org



Sanskaranche Zare

The childwood you miss

The festivals you celebrate

The language you smile in

The moments you carry

veenaworld.com

At Veena World we understand that connection.

As we strengthen our presence across the USA and UK, we are privileged to remain connected with Indian families who continue to celebrate their roots while embracing the world as their home. The first home may be thousands of miles away, but the values, relationships and memories that shaped us continue to travel with us every day.

From Women's Special Tours to Seniors' Special Tours, from Family Holidays to Corporate Tours, from Customised Holidays to Adventure Journeys, from India to Antarctica...

Wherever your travel dreams take you, Veena World's warmth, care and reassurance will always be by your side.

Come, Celebrate Life Around the World with Veena World!

Become a Veena World Travel Affiliate

Call: +91 887 997 9733 I usa@veenaworld.com

Proudly Associated with BMM 2026

Time to use your BMM scratch & win voucher!

T&C apply.

www.veenaworld.com I usa@veenaworld.com I Call: +1 903 648 5240

Veena World ← USA → Travel Affiliates

New York City - Swarga Travel Ready LLC +1 6318770741
New Jersey, Colonia - Travelscape +1 8483631435
North Carolina - Bliss Tours LLC +1 9842662053
Georgia, Alpharetta - Blossom Journeys +1 2035549121
Georgia, New Norcross - Madhu Patel +1 7705249717
Chicago, Palatine - Pachamama Travels +1 8473406843
Michigan, Novi - SWAMI Tours and Travels +1 2489803736
Indiana, Carmel - Saffron Holidays +1 4804695875
Missouri, St. Louis - mPath Services +1 3148823360

Texas, Houston - Tripcrafters +1 8329235716
Colorado Springs - Worry Free Travels LLC +1 7193521797
California, Sacramento-Dhaval Bilimoria +1 9164718162
California, Pleasanton - Golden Setu +1 9256602522
California, San Jose-Dipali Khangaonkar +1 4083161050
Washington, Bonney Lake - Kavitha Nandy +1 4252190869
Washington, Lynnwood - Shruti Sathe +1 9726559248
Fayetteville, Arkansas - WorldWide Wander +1 4694731311
OSA Toronto, Canada-Pratibha Hukerikar +1 (416) 8786879

VEENA WORLD

Travel. Explore. Celebrate Life.